# अर्थसंवाद

अ

खंड 21, अंक 1
एप्रिल-जून, 1997
भारतीय सौर चैत्र-ज्येष्ठ 1919

- 'नोबेल' चे मानकरी
- सरकारी उद्योग क्षेत्र
- लघुउद्योग-सद्य:स्थिती, समस्या, उपाय
- आर्थिक सुधारणानंतरचा भांडवल बाजार
- पैसा व त्याची निर्मिती
- अभिमत अर्थशास्त्रातील हस्तक्षेप नीती
- योजनेकडून बाजाराकडे

मराठी अर्थशास्त्र परिषद
मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये ।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तित: ।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

खंड 21, अंक 1

एप्रिल–जून 1997

* प्रमुख संपादक

रवीन्द्र दोशी

* सहायक संपादक

अजित डांगे

* सल्लागार मंडळ
(1997–2000)

कुमुद पोरे
एस. के. जी. सुंदरम
भगवान म्हस्के
विनायक देशपांडे

* संपादकीय पत्रव्यवहार

रवीन्द्र दोशी,
प्राध्यापक व विभाग प्रमुख,
अर्थशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर–416 004
दूरध्वनी (निवास)
[ 0231 – 656963 ]

## अनुक्रमणिका

1 जेम्स मिरलीस व विल्यम विक्रे
विनायक श्रीधर देशपांडे

8 सरकारी उद्योगक्षेत्राची भावी दिशा
पुरुषोत्तम पाळंदे

13 लघुउद्योग : सद्य:स्थिती, समस्या आणि उपाययोजना
वसंत पटवर्धन

26 लघुउद्योग : उल्हास, आक्रोश आणि उमेद
प्रमोद ठोंबरे

39 आर्थिक सुधारणानंतरचा भांडवल बाजार
मो. वा. पटवर्धन

56 अर्थ शब्दाची वाट पाहे
नी. बि. सोवनी

59 अभिजात अर्थशास्त्रातील हस्तक्षेप नीती
वंदना दांडेकर

69 योजनेकडून बाजाराकडे संक्रमण
शि. ना. माने

81 पैसा व त्याची निर्मिती
वि. गो. पेंढरकर

91 सांख्यिकी पुरवणी (26)
रवीन्द्र दोशी

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कार्यकारी मंडळ

( 1997-98 )

**अध्यक्ष**

दि. व्यं. जहागिरदार

**कार्याध्यक्ष**

व्यं. सु. पाटणकर

**कार्यवाह-खजिनदार**

आ. गो. पुजारी

**प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'**

रवीन्द्र दोशी

**सदस्य**

शिवाजी पाटील
रमेशचंद्र बेराड
दिलीप पाटील
बाळकृष्ण कुलकर्णी
नंदकिशोर सुदा
कृष्णराव भोसले
विनायक देशपांडे
सुभाष माने
सुरेंद्र देसाई

■ **कार्यालयीन पत्रव्यवहार :**

(वर्गणी व जाहिरात पाठविणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे, इत्यादी)
**डॉ. आ. गो. पुजारी,**
कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद,
किल्ला भाग, **मंगळवेढा** 413 305 (जिल्हा सोलापूर)
(दूरध्वनी : 02188-20556)

■ **परिषदेचे प्रमुख कार्यालय :**

मराठी अर्थशास्त्र परिषद,
द्वारा / सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई 400 014.

■ **वर्गणी :**

(अ) **परिषदेचे सदस्य**

( 1 ) आजीव सदस्य : रु. 600 ( एकरकमी )
( 2 ) साधारण सदस्य : रु. 100 ( वार्षिक )
( 3 ) संस्था सदस्य :
शैक्षणिक संस्था : रु. 100 ( वार्षिक )
व्यावसायिक संस्था : रु. 150 ( वार्षिक )

[ * परिषदेच्या सदस्यांना 'अर्थसंवाद' त्यांच्या वर्गणीतच दिला जातो. ]

(आ) **'अर्थसंवाद' वर्गणीदार**

ग्रंथालये : रु. 100 (वार्षिक)

(इ) **वर्षगणना** 1 एप्रिल ते 31 मार्च

** वर्गणी डिमांड ड्राफ्ट / मनी ऑर्डरने 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे मंगळवेढ्याला पाठवावी.

■ **'अर्थसंवाद' साठीच्या अनुदानाबद्दल आभार :**

( 1 ) पश्चिम विभागीय केंद्र, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, मुंबई.
( 2 ) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
**(टीप : म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकामधील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.)**

# नोबेलचे मानकरी : 1996

# जेम्स मिरलीस व विल्यम विक्रे

विनायक श्रीधर देशपांडे *

स्वीडनच्या विज्ञान अकादमीने 1996 चे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक 8 ऑक्टोबर, 1996 रोजी जाहीर केले. 60 वर्षीय ब्रिटिश प्राध्यापक जेम्स मिरलीस ( James Mirrlees ) आणि कॅनडा येथील 82 वर्षीय विल्यम विक्रे याना या वर्षीचे नोबेल पारितोषिक विभागून देण्यात आले. अर्थशास्त्रातील हे अत्युच्च पारितोषिक तिसऱ्यांदा केंब्रिज विद्यापीठाकडे (इंग्लंड) गेले. यापूर्वी जेम्स मीड (1977) आणि रिचर्ड स्टोन (1984) या अर्थशास्त्रज्ञांना ही पारितोषिके प्रदान करण्यात आली होती. नोबेलच्या मानकऱ्यांमध्ये अमेरिकेच्या पाठोपाठचा क्रम इंग्लंडचा लागतो. आतापर्यंत एकूण चार ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञांना या पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. जॉन आर. हिक्स (1972) हे ऑल सोल्स कॉलेज, ऑक्सफर्ड येथे काम करीत होते. कॅनडाकडे प्रथमच हे पारितोषिक यंदाच्या वर्षी आले.

## विल्यम स्पेन्सर विक्रे

विक्रे यांचा जन्म 1914 साली ब्रिटिश कोलंबिया (कॅनडा) येथे झाला. त्यानी 1935 साली येल विद्यापीठाची बी. एस. ही पदवी मिळविली. कोलंबिया विद्यापीठातून त्यानी एम. ए. ची पदवी 1937 साली प्राप्त केल्यानंतर याच विद्यापीठात संशोधन करून डॉक्टर ही पदवी 1947 साली वयाच्या तेहतिसाव्या वर्षी संपादन केली. त्यानी आपले अध्यापनाचे कार्य याच विद्यापीठात सुरू केले आणि उर्वरित आयुष्य त्यानी या संस्थेलाच वाहून घेतले. विक्रे यानी आपल्या व्यावसायिक जीवनाची सुरुवात कर क्षेत्रातील संशोधक म्हणून केली. दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वी आणि युद्धकालात त्यानी आपले लक्ष सरकारी वित्त समस्येवर आणि विशेषकरून कर पद्धतीवर केन्द्रित केले. या क्षेत्रात त्यानी आपल्या कार्याचा ठसा उमटविला. विक्रे यानी लिहिलेला 'Agenda for Progressive Taxation' (1947) हा ग्रंथ बराच गाजला आणि त्याना या क्षेत्रात मान्यता प्राप्त झाली.

* पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर.

1949–50 या वर्षी त्यानी युद्धोत्तर काळात जपानची करसंरचना ठरविण्याकरिता कार्ल शुप (Carl Shoup) यांच्या कर अभियानात सामील होऊन संशोधनाचे कार्य केले. त्यानंतर त्यानी बऱ्याच आंतरराष्ट्रीय कर सल्लागार समित्यांवर कामे केली.

विक्रे यानी आपल्या कारकिर्दीत सर्वसामान्य आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न नवनवीन उपक्रमांद्वारे केला. यात प्रामुख्याने कर समस्या, लोकोपयोगिता आणि शहरी वाहतूक यांचा समावेश होतो. समतोल संघीय अर्थसंकल्पावर त्यानी कडाडून हल्ला चढविला होता. नोबेल पारितोषिक प्राप्त झाल्यानंतरच्या मुलाखतीत विक्रे यानी सांगितले की, अमेरिकेची अर्थव्यवस्था समतोल संघीय अर्थसंकल्पामुळे पंगु होण्याची शक्यता आहे. अर्थसंकल्पाचे धोरण अखणाऱ्यांनी हळूहळू तुटीची रक्कम वाढवावी. सध्याच्या 126 दशलक्ष डॉलरपासून ही रक्कम 500 दशलक्ष डॉलरपर्यंत न्यावी असे विक्रे यानी सुचविले. यामुळे बेकारीचा दर एक टक्क्यापेक्षा कमी होऊन लोकांची क्रमशक्ती वाढेल असा त्यानी अंदाज व्यक्त केला होता. विक्रे स्वतःला केन्सचे अनुयायी समजत होते. समतोल अर्थसंकल्पाचे दुष्परिणाम दर्शविणे हे त्यांचे महत्त्वाचे कार्य होते असे विक्रेंना वाटत होते.

कोलंबिया विद्यापीठात 60 वर्षे दीर्घकाळ सेवा केल्यानंतर आणि नोबेल पारितोषिकाची 1·2 दशलक्ष डॉलर एवढी रक्कम जेम्स मिरलीस यांच्यासमवेत 9 ऑक्टोबरला (मंगळवार) प्राप्त केल्यानंतर केवळ तीन दिवसांनीच (शुक्रवार) विक्रे यांचा मृत्यू झाला. त्यानी स्थापन केलेल्या 'ट्रेड' (कर, साधनसामग्री, विकास आणि अर्थशास्त्र) या संस्थेच्या अधिवेशनासाठी बोस्टन येथे स्वतःच्या गाडीने जात असताना वाटेतच त्याना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यानी आपली गाडी रस्त्याच्या कडेला लावली आणि 82 वर्षीय विक्रे स्वर्गवासी झाले.

## जेम्स ए. मिरलीस

जेम्स मिरलीस यांचा जन्म 1937 साली मिन्निशाफ (स्कॉटलंड) येथे झाला. 1957 साली त्यानी गणित हा विषय घेऊन एडिनबर्ग विद्यापीठाची पदवी प्राप्त केली. केंब्रिज विद्यापीठात त्यानी आपले संशोधनाचे कार्य पूर्ण करून 1963 साली वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी अर्थशास्त्र या विषयात डॉक्टर ही पदवी मिळविली. ऑक्सफर्ड विद्यापीठात त्यानी 1969 ते 1995 या दरम्यान अध्यापनाचे कार्य केले. 25 वर्षांपेक्षा अधिक काळ ऑक्सफर्ड विद्यापीठात घालविल्यानंतर मिरलीस केंब्रिज विद्यापीठात रुजू झाले.

मिरलीस यांनी मुख्यत्वेकरून आर्थिक नीतीचे उपयोगितावादी विश्लेषण आणि आर्थिक अभिवृद्धी सिद्धान्त या क्षेत्रात मोलाची भर घातली. अमेरिकेचे अर्थशास्त्रज्ञ पिटर डायमंड यांच्यासमवेत मिरलीस यानी उपभोग कर संरचनेचे विश्लेषण केले. सामाजिकदृष्ट्या करामुळे अकार्यदक्षता येऊ नये असा विचार या दोघांनी मांडला. कर संरचना आणि कार्यदक्षता, प्रशुल्काचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम या अभ्यासाव्यतिरिक्त विकसनशील राष्ट्रांतील प्रकल्प मूल्यमापन (Project appraisal) आणि आर्थिक नीती या क्षेत्रांतदेखील मिरलीस यांचे कार्य लक्षणीय आहे. विकास प्रकल्पांचे मूल्यमापन कोणत्या आधारावर व्हावे यासंबंधीचे मापदंडदेखील नंतरच्या काळात मिरलीस यानी सुचविले.

जेम्स मिरलीस आणि विल्यम विक्रे या दोन नोबेल मानकऱ्यांनी आपापले कार्य स्वतंत्ररित्या केले असले तरी त्यांचे संशोधन मुख्यत्वेकरून मुक्त आयकर पद्धतीचे संकल्पचित्र कसे कसावे या प्रश्नावर अधिक केन्द्रित झाल्याचे दिसते. इतरांना आपल्यापेक्षा अधिक ज्ञान असल्यास आपला व्यवहार त्या व्यक्तींशी कसा असावा ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न या दोघा अर्थशास्त्रज्ञांनी केला. (How do you deal someone who knows more than you do ?)

## माहितीचे अर्थशास्त्र

निर्णय घेणाऱ्या व्यक्तींना भिन्नभिन्न स्वरुपाची माहिती उपलब्ध झाल्यास काय स्थिती निर्माण होऊ शकेल याबाबतचे विश्लेषण विक्रे आणि मिरलीस या दोघांनी केले. अशा प्रकारची असममिती (informational assymmetries) स्थिती प्रत्यक्षात बरेचदा निर्माण होते. बँकांतून कर्ज घेणाऱ्यांचे भविष्यात उत्पन्न

किती असेल याबाबतची संपूर्ण सत्य माहिती बँकांजवळ नसते. बँकेच्या व्यवस्थापकीय संचालकाला ज्या प्रमाणात परिव्यय आणि स्पर्धात्मक स्थितीबाबत विस्तृत माहिती असते त्याप्रमाणात बँकेच्या खुद्द मालकाला याबाबत ज्ञान नसते. विमा कंपन्यांनी संपत्तीचा विमा काढून दिल्यानंतर विमाधारकाची संपत्तीबाबत काय जबाबदारी असावी याबाबत विमा कंपन्या संपूर्णपणे सुरुवातीसच अवगत राहू शकणार नाहीत. इतर बाह्य घटकांचा परिणाम जोखिमेवर होऊ शकतो. लिलाव करणाऱ्या अभिकर्त्यांना संभाव्य ग्राहक किती रक्कम खर्च करावयास तयार राहतील याबाबतची संपूर्ण माहिती नसते. शासनाला उत्पन्न कर लादताना प्रत्येक नागरिकाची उत्पादकता किती आहे याबाबतचे ज्ञान नसते.

अपूर्ण आणि असममिती माहिती वितरित झाल्यास त्याचे मूलभूत आणि दूरगामी परिणाम होतात. मुख्यत्वेकरून प्राप्त माहितीचा उपयोग व्यूह आखून केल्यास माहितीधारक त्याचा स्वतःचे हित साधण्याच्या दृष्टीने उपयोग करू शकेल. विविध प्रोत्साहनात्मक आणि नियंत्रणाच्या समस्या हाताळण्यास सोयीचे व्हावे यादृष्टीने कंत्राट आणि संस्था याचे संकल्पन कसे करता येईल याबाबतचे प्रश्न माहितीच्या अर्थशास्त्रात झालेल्या संशोधनाच्या आधारे सोडविता येतील. यामुळे विमा विपणन, पत विपणन, लिलाव बाजार ( auction ), पेढीचे अंतर्गत संघटन, करपद्धती, सामाजिक विमा, स्पर्धात्मक स्थिती, राजकीय संस्था, यांची कार्यपद्धती समजणे अधिक सोयीचे होऊ शकेल.

या वर्षीच्या पारितोषिक विजेत्यांनी माहितीची असममिती या घटकाला केन्द्रबिंदू मानून माहितीचे अर्थशास्त्र हे दुर्लक्षित राहिलेले क्षेत्र तपासण्यास सुरुवात केली. अर्थशास्त्रज्ञांनी स्वार्थाच्या माध्यमातून समृद्धी साधता येऊ शकते असे गृहीत धरले होते. या गृहितामुळे आणि संपत्तीलाच अधिक महत्त्व दिल्यामुळे नितिमत्तेला या शास्त्रात स्थान नव्हते. या वर्षीच्या नोबेल पारितोषिक प्राप्त तज्ज्ञांनी लोकांना सत्य व संपूर्ण माहिती पुरविण्याचे महत्त्व सांगून अर्थशास्त्राच्या सिद्धान्तात नैतिकता आणण्याचा प्रयत्न केला. विल्यम विक्रे आणि जेम्स मिरलीस यांनी असममिती माहिती या क्षेत्रात संशोधन करून अर्थशास्त्राला वेगळी दिशा देण्याच्या दृष्टीने महत्त्वाची कामगिरी केली. यात प्रामुख्याने आर्थिक व्यवहारात काही व्यक्तींजवळ इतर व्यक्तींपेक्षा अधिक माहिती उपलब्ध असते आणि त्यामुळे प्रत्येक बाबतीत असममिती माहिती अंतर्भूत होते असे दर्शविण्यात आले आहे. खाजगी माहिती लोकांच्या प्रेरणेचे विरूपण करू शकेल आणि त्यामुळे उद्दिष्टांचा पाठपुरावा कार्यदक्षतेने करणे शक्य होणार नाही. हे विरूपण करणारे परिणाम ( distorting effects ) लोक कशा रीतीने कमी करतील हे समजून घेणे अर्थशास्त्रज्ञांपुढे भावी काळातील आव्हान राहील.

## आय करपद्धती

आय करपद्धतीच्या तत्त्वांचा विचार बऱ्याच पूर्वीपासून तत्त्वचिंतक, अर्थशास्त्रज्ञ आणि राजकीय तज्ज्ञ करीत आहेत. कराची संरचना विविध न्याय्य तत्त्वांमुळे निर्धारित होते. कल्याणाची बाजू मांडताना ऑक्सफर्डचे प्राध्यापक फ्रान्सिस एजवर्थ यांनी उपयोगितावादाचा अवलंब केला. उत्पन्नातील विषमता दूर करावयाची असल्यास वृद्धिगत कर दराचा स्वीकार होणे आवश्यक आहे, असा निष्कर्ष एजवर्थ यांनी काढला. वृद्धिगत कर लादल्यास व्यक्तीला अधिक काम करण्यास प्रोत्साहन राहणार नाही असे 1940 च्या सुमारास विक्रे यांनी नमूद केले. विक्रेनी या समस्येकडे पुन्हा नव्याने बघण्यास सुरुवात केली. प्रत्येक व्यक्ती कुठलेही उत्पादनकार्य निवडताना कर सूची विचारात घेईल. शासनाला मात्र व्यक्तीची कार्यदक्षता/उत्पादकता याबाबतची माहिती नसते आणि असममिती माहिती वितरित होते. विक्रे यांनी एका प्रारूपाच्या आधारे कार्यदक्षता आणि समानता यात समतोल साधण्याच्या दृष्टीने आय करपद्धतीची आखणी कशी करता येईल हे दर्शविण्याचा प्रयत्न केला.

आय कराची युक्त पातळी निर्धारित करण्याच्या दृष्टीने 25 वर्षांच्या कालावधीनंतर जेम्स मिरलीस यांनी विक्रे यांच्या प्रारूपाचा उपयोग केला. इतर अनेक समस्यांची सोडवणूक या प्रारूपाद्वारे होऊ शकेल असे मिरलीस यांच्या लक्षात आले. क्लिष्ट माहिती आणि प्रोत्साहन समस्या या बाबींचे विश्लेषण करण्यास मिरलीस यांची पद्धती आधुनिक पद्धती म्हणून गणली

जाऊ लागली. स्वतःचे हित जोपासण्याकरिता खाजगी माहिती लपवून ठेवण्याच्या प्रवृत्तीला कशा रीतीने आळा घालता येईल याबाबतचे विश्लेषण मिरलीस यांनी केले. प्रेरणा समस्येचे निराकरण आणि युक्त कंत्राटाचे संकल्पन मिरलीस यांच्या अभ्यासाच्या आधारे शक्य होईल.

आदर्श कर पद्धतीत समता आणि कार्यदक्षता या दोन परस्परपूरक उद्दिष्टांमध्ये समतोल साध्य करणे आवश्यक आहे. शासनाने योग्य सममूल्यन ( right trade off ) प्रस्थापित करण्याकरिता खाजगी माहिती विचारात घ्यावी असे विक्रे सुचवितात. कर आकारणी करताना शासनाने व्यक्ती फक्त समतेचाच विचार करील आणि प्रेरणेची अपेक्षा करणार नाही हे गृहीत धरणे चुकीचे ठरण्याची शक्यता आहे. समान कर योजना राबविल्यास ज्या व्यक्तींची काम करण्याची क्षमता आहे आणि उत्पादकता अधिक आहे त्यांना इतरांपेक्षा अधिक कर द्यावा लागेल आणि यामुळे कार्यदक्ष व्यक्ती मेहनत करून उत्पादकतेत वाढ करण्याचा प्रयत्न करणार नाही.

शासनाने जर व्यक्तींच्या कार्यदक्षतेबाबत माहिती प्राप्त केली तर वरील प्रश्नांची सोडवणूक करता येऊ शकेल. शासनाला फक्त व्यक्तींच्या उत्पन्नाबद्दलची माहिती असते. अधिक उत्पन्न मिळविल्यास अधिक कराचा भरणा करावा लागेल. यामुळे काम कमी करण्याची प्रवृत्ती वाढत जाते. विक्रे यांनी युक्त कर योजनेचे संकल्पचित्र प्रेरणेचे परिणाम विचारात घेऊन रेखाटणे कसे कठीण आहे हेदेखील दर्शविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचबरोबर प्रेरणा, कार्यदक्षता, समानता या तीनही बाबींचा विचार कर संरचनेत व्हावा असे सुचविले.

मिरलीस यांच्या मतानुसार मुक्त कर पद्धती प्रेरणेशी मिळतीजुळती असावी ( incentive compatible ). व्यक्तींना सत्य सांगण्याची प्रेरणा मिळावी यादृष्टीने कर पद्धतीचा अवलंब करावा असे मिरलीस सुचवितात. व्यक्तींनी अधिक काम करून उत्पादकता वाढवावी असे शासनाला वाटत असल्यास कर दरांची निवड अशीच करावी लागेल की ज्यामुळे व्यक्तींना अधिक काम करण्याची प्रेरणा मिळेल. युक्त कर सिद्धान्तातून प्राप्त झालेले निरीक्षण इतर क्षेत्रातदेखील उपयुक्त ठरले. मिरलीस यांचा सिद्धान्त विम्याच्या क्षेत्रातदेखील अवलंबिण्यात आला. शासनाला ज्याप्रमाणे व्यक्तींची कार्यदक्षता विचारात घेणे कठीण होते त्याचप्रमाणे विमा कंपन्यांना विमाधारक विमा केलेल्या वस्तूची काळजी योग्यरीत्या घेतात किंवा नाही हे बघणे शक्य होत नाही.

## नैतिक जोखिम ( moral hazard )

विमा काढण्यात आलेल्या संपत्तीचे होणारे नुकसान निव्वळ हवामान किंवा प्रयत्नपूर्वक होणाऱ्या चोरीसारख्या बाह्य घटकांवर अवलंबून नसून विमाधारक त्या वस्तूची / संपत्तीची काळजी कशा रीतीने घेतो यावरदेखील निर्भर राहील. या घटकांवर नियंत्रण ठेवणे विमा कंपन्यांना शक्य होत नाही. त्याकरिता त्यांना बरीच किंमत मोजावी लागेल. असल्या प्रकारची समस्या विविध प्रकारच्या सामाजिक विमा, आरोग्य आणि विकलांगता विम्याच्या संदर्भात देखील निर्माण होऊ शकते. विमा कंपन्यांची दयाळू वृत्ती जोखीम वाढण्यास कारणीभूत ठरू शकेल आणि व्यक्ती आपल्या संपत्तीची किंवा स्वतःची काळजी कशी घेते यावर देखील त्याचा विपरित परिणाम होऊ शकेल.

इतर बाबतीत जेथे दोन भिन्न व्यक्तींचा संबंध येतो तेथे एका अभिकर्त्याच्या निर्णयावर अंतिम परिणाम अवलंबून असतो. पेढीचे मालक आणि व्यवस्थापन या संबंधात पेढीचे कार्य व्यवस्थापकाच्या प्रयत्नाने होते. याची परिणती पेढीला मिळणाऱ्या नफ्यात होते. पेढीचे विपणन किंवा उत्पादनाची स्थिती हे स्वैर चल ( random variable ) असू शकतील. विमा कंपनीचे मालक आणि उपक्रमी कंत्राट करताना भरपाईच्या अटी अशाच ठेवतील की जेणेकरून अभिकर्त्यांना काम करण्याची प्रेरणा मिळेल आणि अपेक्षित नफा महत्तम होईल. नैतिक जोखिमेच्या समस्यांचे विश्लेषण करताना तांत्रिक अडचणी आय कर समस्येसारख्याच असतात.

प्रोत्साहन योजनेची (random scheme) आखणी करताना प्रमुखाला स्वतःचा फायदा विचारात घेऊन अभिकर्त्याला प्रोत्साहन कशा रीतीने देता येईल

त्याकरिता उत्पन्न खर्चाची स्थिती काय राहू शकेल याचा विचार करावा लागेल. अभिकर्ता आपले स्वतःचे नुकसान कमीत कमी करण्याच्या प्रयत्नात राहील आणि व्यूहाची आखणी करताना जास्तीत जास्त माहिती प्राप्त करून मिळकत वाढविण्याचा प्रयत्न करील. यात प्रमुखाला कमीत कमी खर्च सोसावा लागेल. कंत्राटाचा करार करताना या बाबींचा अंतर्भाव होतो. निर्णयाचा शेवट अनैच्छिक स्वरुपाचा झाल्यास नुकसानीचा काही भाग अभिकर्त्याला सोसावा लागतो किंवा ऐच्छिक परिणाम प्राप्त झाल्यास त्याला नफ्याचा काही भाग प्राप्त होतो.

## लिलाव

विल्यम विक्रे यानी असममिती माहितीचा अंतर्भाव असलेल्या लिलाव बाजाराचे देखील विश्लेषण केले. आर्थिक कार्यदक्षता वाढविण्याच्या दृष्टीने लिलाव बाजाराची आखणी कशी असावी याबाबतचे संशोधन विक्रे यानी केले. त्यांच्या प्रयत्नामुळे या क्षेत्रात संशोधन व्हावयास अलीकडे सुरुवात झाली. या अभ्यासाचा विस्तार प्रत्यक्षात राजकोष बंधपत्र लिलाव (treasury bond auction) आणि bond spectrum licence साठी करण्यात आला. लिलाव करणारा जेव्हा वस्तूचा लिलाव करतो तेव्हा त्याने संभाव्य ग्राहकांना त्या वस्तूची खरी व संपूर्ण माहिती पुरवावी असे विक्रे सुचवितात. ग्राहकाला ती वस्तू विकत घेणे योग्य आहे किंवा नाही याचा निर्णय घेता येणे आवश्यक आहे. असममिती माहिती लिलाव बाजाराचा एक अविभाज्य घटक आहे. यात संभाव्य ग्राहकाला वस्तूच्या किमतीबाबत मर्यादित ज्ञान असते. विक्रे यानी विविध प्रकारच्या लिलावांच्या गुणधर्मांचे विश्लेषण त्यांच्या 1951 आणि 1962 च्या निबंधात केले. त्यानी द्वितीय किमत लिलावाला ( second price auction ) विशेष महत्त्व दिले. यालाच 'विक्रे लिलाव' (Vickrey Auction) देखील म्हणतात. असल्या प्रकारच्या लिलावात वस्तूचा लिलाव बंद बोलीने ( sealed bidding ) होतो. यात इतरांपेक्षा जास्त किमत नमूद करणाऱ्या व्यक्तीला वस्तू खरेदी करण्याची संधी मिळते. परंतु सर्वात जास्त किमत व्यक्ती जेव्हा देऊ करते तेव्हा ती किमत विक्रे यांच्या मते द्वितीय किमत असते. यामुळे व्यक्तीला खरोखर किती किमत द्यावयाची इच्छा होती हे या यंत्रणेत स्पष्ट होत नाही.

व्यक्तीने स्वतःच्या इच्छेपेक्षा जास्त किमत देऊ करणे म्हणजे जोखीम पत्करणेच होय. इतर व्यक्तींनी नमूद केलेल्या किमतीपेक्षा या व्यक्तीने जास्त किमत (तिच्या इच्छेपेक्षा अधिक) देऊ केल्यास तिला ती वस्तू नुकसान सोसून विकत घेणे भाग पडेल. तद्वतच जर व्यक्तीने आपल्या स्वतःच्या ऐच्छिक किमतीपेक्षा कमी किमत देऊ केल्यास इतरांना कमी किमतीत वस्तू उपलब्ध होईल. यातदेखील व्यक्तीला जोखीम पत्करावीच लागते. म्हणून या प्रकारच्या लिलावात सहभागी होणाऱ्या व्यक्तींनी स्वतःच्या हितासाठी योग्य आणि तिला खरी वाटणारी रक्कम तिच्या इच्छेनुसार नमूद करावी. याकरिता मात्र तिला वस्तूबाबतची संपूर्ण माहिती पुरविण्यात येणे आवश्यक आहे. असल्या प्रकारचा लिलाव हा सामाजिकदृष्ट्या कार्यदक्ष ( socially efficient ) राहील असे विक्रेना वाटते.

विक्रे यानी निव्वळ सैद्धान्तिक योगदान केले नसून सिद्धान्त प्रत्यक्षात कशा रीतीने उपयुक्त ठरतील याचा पाठपुरावा केला. न्यू यॉर्क उपमार्ग प्रवास भाडे पद्धतींचा ( New York subway fare system ) विक्रे यानी 1950 साली केलेला अभ्यास याबाबतचे उदाहरण म्हणून सांगता येईल.

## समारोप

या वर्षीच्या नोबेल पारितोषिक विजेत्यांनी अर्थशास्त्राच्या नव्या क्षेत्राचा पाया रचला. असममिती माहितीच्या समस्येशी कशा रीतीने सामना करता येईल याचा शोध घेणे हा केवळ या तज्ज्ञांचा उद्देश नसून या समस्येची सोडवणूक करण्याकरिता व्यवसायकर्ते प्रत्यक्षात कोणते तंत्र विकसित करीत आहेत हे-देखील जाणून घेण्याचा प्रयत्न या दोन दिग्गजांनी केला आहे. सत्य आणि संपूर्ण माहिती उपलब्ध होण्याची आवश्यकता विक्रे आणि मिरलीस यानी वर्तविली. समाजातील बहुतांश प्रश्न असममिती माहितीमुळे उत्पन्न होतात. जीवन विमा घेतानासुद्धा व्यक्ती सत्य दडवून मृत्यू दावा कसा घेता येईल याचे ज्ञान मिळवून विमा कंपन्यांना फसविण्याचा प्रयत्न करतात. यामुळे

इतर विमा ग्राहकांवर याचा बोजा पडतो. अशा असममिती माहितीवर विमा काढून ठराविक काळ लोटल्यानंतर विमा कंपन्यांचे नियंत्रण राहात नाही.

पर्यावरण समतोल टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने नव्या येणाऱ्या कंपनीच्या मालकांनी योग्य माहिती पुरविणे आवश्यक आहे. परंतु स्वार्थासाठी बरेचदा सत्य दडविण्यात येते. वेळप्रसंगी सरकार दरबारी यासाठी वजनदेखील टाकण्यात येते. याचे परिणाम अनेक वर्षांनंतर भावी पिढ्यांना भोगावे लागतात.

स्वार्थी वृत्तीचा अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होऊ शकतो. सत्य व संपूर्ण माहिती उपलब्ध झाल्यास अनेक आर्थिक व्यवहार सुरळित पार पडू शकतात आणि त्याचा यथायोग्य परिणाम एकूण अर्थव्यवस्थेवर होतो. अर्थशास्त्राच्या प्रमुख प्रवाहापासून भिन्न परंतु आर्थिक प्रश्नाशी निगडित आणि व्यावहारिक दृष्टीने उपयुक्त असा विचार विक्रे आणि मिरलीस यांनी मांडला आहे यात शंका नाही.

## संदर्भ सूची


1 Blaug, Mark and Sturges, Paul (1983), WHO'S WHO IN ECONOMICS, A BIOGRAPHICAL DICTIONARY OF MAJOR ECONOMISTS, 1700–1980.

2 THE ECONOMIC TIMES, October 12 and 20, 1996.

3 THE FINANCIAL EXPRESS, New Delhi, October 9, 1996.

4 THE HINDU, October 9, 1996.


## परिशिष्ट

### "नोबेल" प्राप्त अर्थशास्त्रज्ञांचे प्रमुख ग्रंथ आणि संशोधनपर लेख

### (अ) विल्यम विक्रे

1 'Measurement of Marginal Utility by Reactions to Risk' (Oct. 1945), ECONOMETRICA, pp. 319-33.

2 'Some objections to Marginal Cost Pricing' (June 1948), JOURNAL OF POLITICAL ECONOMY, Vol. 56.

3 'Limitations of Keynesian Economics' (Dec., 1948), SOCIAL RESEARCH, Vol. 15, pp. 403-16.

4 AGENDA FOR PROGRESSIVE TAXATION (1949), Renold Press, Reprinted, New York : Augustus M. Kelley, 1971.

5 'Stability Through Inflation' (1954) in Kenneth Kurihara (ed.), POST-KEYNESIAN ECONOMICS, New Brunswick : Rutgers University Press, pp. 107-10.

6 'Utility, Strategy, and Social Division Rules' (1960), QUARTERLY JOURNAL OF ECONOMICS, Vol. 74, pp. 507-35.

7 'Counterspeculation, Auctions, and Competitive Sealed Tenders' (1961), JOURNAL OF FINANCE, Vol. 16, pp. 8-37.

8 'Auction and Bidding Games' (1962) in RECENT ADVANCES IN GAME THEORY, Princeton, Princeton University Conference, 15-27.

9 'Pricing in Urban and Suburban Transport' (1963), AMERICAN ECONOMIC REVIEW, Vol. 53, pp. 452-65.

10 METASTATICS AND MACROECONOMICS (1964), Harcour, Brace & World, Inc., New York, Burlingame.

11 MICROSTATICS (1964), Harcourt, Brace and World Inc., New York, Chicago, Buringame.

12 'Optimisation of Traffic and Facilities' (May 1967), JOURNAL OF TRANSPORT ECONOMICS AND POLICY, Vol. 1, No. 2.

13 'Congestion Theory and Transport Investment' (1969), AMERICAN ECONOMIC REVIEW, Vol. 59, pp. 251-60.

14 THE CITY AS A FIRM IN THE ECONOMICS OF PUBLIC SERVICES (1977), Eds. M. S. Fledstin and R. P. Inman, Macmillan.

## (आ) जेम्स मिरलीस

1 Stern, N. H. (सहलेखक) (1972) 'Fairly Good Plans', JOURNAL OF ECONOMIC THEORY.

2 Diamond, P. A. (सहलेखक) (March, 1971), 'Production Efficiency', AMERICAN ECONOMIC REVIEW, Vol. 61.

3 ______ (June, 1971), 'Tax Rules', AMERICAN ECONOMIC REVIEW, Vol. 61.

4 Dixit, A. K. and Stern, N. H. (सहलेखक) (July, 1975), 'Optimum Saving and Economies of Scale, RE Studies 42 (3).

5 Stern, N. H. (सहलेखक) (1973), 'MODELS OF ECONOMIC GROWTH, Proceedings of a Conference held by the International Economic Association at Jerusalem, Macmillan Press.

6 Little, I. M. D. (1974), (सहलेखक) 'PROJECT APPRAISAL AND PLANNING FOR DEVELOPING COUNTRIES Heinemann, London, pp. 29-36.

□ □

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### पूर्वीच्या अंकांतील लेखांच्या झेरॉक्स प्रती

ज्या अभ्यासकांना 'अर्थसंवाद' च्या खंड 1, अंक 1 पासून तो आजपर्यंतच्या 'अर्थसंवाद' मधील कोणत्याही अंकातील एखाद्या लेखाची प्रत झेरॉक्स करून पाहिजे असेल तर ती करून पाठविण्याची सुविधा 'अर्थसंवाद' ने सुरू केली आहे. त्यासाठी केवळ झेरॉक्स करण्याचा खर्च संबंधितांकडून आकारला जाईल. अभ्यासकांना पूर्वीचे अंक पुरविता येत नसल्याने ही पर्यायी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्याचा फायदा अभ्यासकांनी जरूर घ्यावा.

**प्रमुख संपादक**

# सरकारी उद्योगक्षेत्राची भावी दिशा

**पुरुषोत्तम पाळंदे** *

जुलै 1991 मध्यें नवीन अर्थव्यवस्थेत अभिप्रेत असलेले अनेक बदल अंशतः का होईना, अमलात आले तरी आहेत किंवा येऊ घातले होते. तरीदेखील अद्यापही काही क्षेत्रे अशी आहेत की, ज्यांना अजून हातच लावला गेला नाही. या क्षेत्रांच्या संबंधात शासन असे करू इच्छिते अशी फार तर अधूनमधून घोषणा होत राहिली. प्रत्यक्षात मात्र कार्यवाही कुठलीही झालीच नाही, उलट उत्तरोत्तर शासनाचा मानस बदलल्याचेच सूचित झाले. याची दोन प्रमुख उदाहरणे म्हणजे सरकारी उद्योग आणि कामगारविषयक धोरण. या दोन्ही आघाड्यांवर विविध राजकीय आणि प्रशासकीय कारणांमुळे आणि दबावामुळे आतापर्यंत काही विशेष अशी हालचाल झालेली आढळत नाही किंवा त्याबाबतीत ठोस असे धोरणही जाहीर झालेले नाही. किंबहुना शासन त्यावर फार गंभीरपणे विचार करीत आहे किंवा त्याचा तसा इरादा आहे असेही स्पष्ट दिसत नाही. नव्यानेच सत्तारूढ झालेल्या शासनाकडून अजून अनेक धोरणांच्या बाबतीत स्पष्ट घोषणा नाहीत हे समजण्यासारखे आहे.

तसे हे दोन्ही प्रांत वेगवेगळे असले तरी त्यांच्यामध्ये बरेच परस्परसंबंध आहेत. दोन्ही क्षेत्रांमध्ये बऱ्याच राजकीय व सामाजिक घटकांचे बरेच खोलपर्यंत हितसंबंध गुंतलेले आहेत आणि त्यांना दुखावण्याचे धाडस कुणीच करू इच्छित नाही हेही आता उघड झाले आहे. दोन्ही क्षेत्रांच्या बाबतीत राजकीय इच्छाशक्तीचा प्रश्न आहे आणि ती अस्तित्वात नाही हे अनेक वर्षांच्या अनुभवाने सिद्ध झालेले आहे.

आजपर्यंत या क्षेत्रांमधील धोरणात्मक बदल थोपवून धरण्यात दबावगट जरूर यशस्वी ठरले. परंतु सध्याच्या जागतिक परिस्थितीत, भारताच्या आर्थिक संरचनेत, यंत्रणेत बरेच बदल अनिवार्य आहेत हे मात्र निर्विवाद. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी, इतर वित्तीय संस्था यांचा दबाव वाढत चालला आहे. आणि त्याचबरोबर अंतर्गत उद्योग क्षेत्राकडूनदेखील धोरण बदलण्यासाठी मोठ्या प्रमाणात तशी पावले

* संचालक, नॅशनल इन्शुअरन्स अॅकॅडेमी, पुणे.

उचलावी लागतील असे दिसते. यापैकी आपणास येथे सरकारी क्षेत्राचा विचार करावयाचा आहे. कारण त्यातल्या त्यात या प्रांतामध्येच जरा लवकर बदल घडून येण्याची शक्यता आहे.

1991 चे नवीन आर्थिक धोरण जाहीर करताना तेव्हाच्या अर्थमंत्र्यांनी सरकारी उद्योगांच्या संदर्भात पुढील बदलांचा उल्लेख केला होता.

(1) सरकारी उद्योगांच्या कार्यकक्षेचा पुनर्विचार केला जाईल आणि त्यांचा मुख्य भर अत्यावश्यक, पायाभूत सुविधा आणि उच्च तंत्रविज्ञानावर आधारित उद्योगांवर राहील.

(2) सरकारी उद्योगांसाठी राखून ठेवलेल्या क्षेत्रांची संख्या मर्यादित केली जाईल.

(3) सरकारी उद्योगांना जास्त स्वायत्तता देणे आणि त्यांची कार्यदक्षता वाढविणे या दोन्ही दृष्टींनी शासन आणि असे उद्योग यांच्यात एकमेकांच्या जबाबदाऱ्या स्पष्ट करणारे करार केले जातील.

(4) संचालक मंडळांची रचना जास्त काळजीपूर्वक करण्यात येऊन त्यांना जास्त अधिकार दिले जातील.

(5) आजारी सरकारी उद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी विशेष प्रयत्न केले जातील आणि त्यांची प्रकरणे औद्योगिक आणि आर्थिक पुनर्रचना मंडळाकडे (Bureau of Industrial and Financial Reconstruction) सोपविली जातील.

(6) अशा काही उद्योगांमधील काही भाग भांडवलाची विक्री करण्यात येईल.

(7) पुनर्रचनेच्या कार्यक्रमात ज्या कामगारांच्या हितसंबंधांना बाधा येईल त्यांना संरक्षण पुरविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील.

या यादीपैकी फक्त काही बाबतीतच निर्णय घेतले गेले आणि कृती केली गेली. उदाहरणार्थ, राखीव क्षेत्रांची संख्या कमी केली गेली; काही प्रमाणात समभागांची विक्री होऊन त्यातून सुमारे दहा हजार कोटी रुपये जमा झाले आणि शासनाबरोबर पूर्वीपासूनच होत असलेल्या करारांची संख्या वाढली. सूचित केलेल्या इतर बदलांचे भवितव्य काय आहे हा प्रश्न सध्या तरी अनुत्तरित राहतो. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊनही असे म्हणता येईल की, सरकारी क्षेत्रामध्ये मूलगामी स्वरूपाचे बदल अटळ आहेत. किंबहुना सरकारी उद्योगांच्या खाजगीकरणाची प्रक्रिया लांबली तरी जे उद्योग अथवा प्रकल्प सरकारीच राहतील त्यांच्या फेररचनेची अत्यावश्यकता राहीलच. संभाव्य स्पर्धेची शक्यता लक्षात घेऊन सरकारी क्षेत्राला आपले अस्तित्व अबाधित राखावयाचे असेल तर त्याला स्वतःमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणले पाहिजेत. स्वतःच्या व्यवहारात सुधारणा केली पाहिजे.

स्पर्धेला तोंड देण्याची क्षमता वाढविणे हे या बदलांमध्ये मुख्य सूत्र राहील. खाजगी क्षेत्राची कार्यदक्षता का जास्त राहू शकते याची छाननी करून त्यांच्या कार्यपद्धतीतला काही भाग सरकारी क्षेत्राला उचलता येतो का याचा विचार करावा लागेल. सर्वसाधारणपणे असे निश्चितपणे म्हणता येईल की, खाजगी उद्योगांमधील सर्वच गोष्टी आदर्श नाही मानता आल्या तरी काहींचा अंतर्भाव सरकारी क्षेत्रात झाल्यास त्या उद्योगांना आणि एकूण अर्थव्यवस्थेला त्याचा लाभच मिळेल. खाजगी क्षेत्रामध्ये जे जे चांगले आहे, सरकारी हिताच्या दृष्टीने जे स्वीकारार्ह आणि उत्पादक आहे ते ते उचलावयाला कोणतीच आणि कोणाचीच हरकत असू नये. सरकारी उद्योगांतील परिवर्तनाची दिशा या प्रकारची राहावी लागेल हे निःसंशय.

1991 ते 1996 या कालावधीत जाहीर केलेल्या धोरणांचे (ती धोरणे तशीच किंवा जवळजवळ त्याच स्वरूपात अमलात आणली गेली तर) संभाव्य परिणाम काय होऊ शकतील हे पाहाणे उपयोगी ठरेल. सरकारी उद्योगांकरिता राखून ठेवलेल्या क्षेत्रांची संख्या आता 17 वरून 6 वर आणून ठेवली आहे. आणि त्यांच्यामध्ये देखील खाजगी उपक्रमींना शिरताच येणार नाही असे बंधन नाही साहजिकच राखीव 6 क्षत्रे वगळता इतर सर्व क्षेत्रांमध्ये आता खाजगी उद्योग मोठ्या प्रमाणावर प्रवेश करू शकतील. इतक्या वर्षांची कृत्रिम

बंधने दूर झाल्यामुळे ज्या ज्या व्यवसायांमध्ये नफा मिळविणे शक्य आहे तेथेतेथे खाजगी उपक्रमी आकर्षित होणारच. पर्यायाने जे सरकारी उपक्रम आज अकार्यदक्ष आहेत ते तसेच राहिले तर ते खाजगी स्पर्धेत टिकूच शकणार नाहीत. अशा परिस्थितीत जर उद्योग पूर्णत: अगर अंशत: बंद करणे प्राप्त झाले तर त्यात काम करीत असलेल्या कामगारांचा प्रश्न मात्र उभा राहणार आहे.

साहजिकच, या नवीन निर्माण होऊ घातलेल्या स्पर्धेचा विचार करून सरकारी क्षेत्राला आपल्या दैनंदिन कारभाराची धोरणे आखावी लागतील. काही दिवसांपुरते खाजगीकरण रूढ अर्थाने टळले तरी योग्य त्या सुधारणांचा अवलंब न केल्यास कुठल्या ना कुठल्या प्रकारच्या खाजगीकरणाला तोंड द्यावेच लागेल. या शक्यतेचा अजून सरकारी क्षेत्र फार विचार करीत आहे असे जाणवत नाही.

खाजगी क्षेत्राकडून संभाव्य स्पर्धेला परिणामकारकरीत्या तोंड द्यावयाचे तर पुढील काही क्षेत्रांशी संबंधित पावले उचलणे भाग पडेल.

1 पैशाचा पुरवठा
2 उत्पादन विक्री व्यवस्था
3 कामगारविषयक धोरणे
4 भांडवलाची पुनर्रचना आणि मालकी संरचनेत बदल
5 पुढील विकासाची दिशा आणि उत्पादनक्षमतेचा पूर्ण वापर
6 आजारी उद्योग

अर्थात हे बदल घडवून आणताना आजपर्यंतच्या विशिष्ट आर्थिक, धोरणात्मक पार्श्वभूमीमुळे काही मर्यादा पडणार आहेत याचेही भान ठेवले पाहिजे. ते ठेऊन हे उद्योग नवीन वस्तुस्थितीला सामोरे कसे जातात याकडे लक्ष ठेवणे महत्त्वाचे आहे. आता वरील मुद्यांचा संक्षिप्त आढावा घेऊ.

## 1 पैशाचा पुरवठा

याबाबतीतला फरक जाणवण्यासारखा राहणार आहे. कारण, सरकारी उद्योगांना यापुढे आर्थिक पाठिंब्यासाठी सर्वस्वी शासनावर अवलंबून राहता येणार नाही. गुंतवणुकीसाठी लागणारा पैसा आणि खेळते भांडवल या दोन्हींचा पुरवठा वर्षानुवर्षे जवळजवळ पूर्णपणे शासनाकडून होत राहिला. आता मात्र शासनाच्या भूमिकेत बदल झाला असून सरकारी उद्योगांनी स्वबळावर आपले व्यवहार चालवावेत असा आग्रह आहे. विशेषत: खेळत्या भांडवलाची गरज तर शक्यतो बँकांकडून भागवावी अशा विचाराने आता मूळ धरले आहे. नेमका हाच काळ असा आहे की यावेळी सरकारी उद्योगांना विस्तार, आधुनिकीकरण करणे क्रमप्राप्त आहे. म्हणजे त्यासाठी भांडवल उभारणी मोठ्या प्रमाणात केली गेली पाहिजे. याचा अर्थ असा की, यापुढे सरकारी उद्योगांना वित्तसंस्था आणि बँका यांचाच मोठ्या प्रमाणावर आश्रय घेतला पाहिजे. ओघानेच त्यांना आर्थिक शिस्त पाळणे अनिवार्य होणार. ही गोष्ट अवघड असली तरी एका अर्थाने अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने ती इष्टापत्तीच आहे. कारण स्वत:च्या गुणवत्तेवर, बळावर पैसे उभे करता येतात याची त्यांना जाणीव होईल, प्रचीती येईल. काही सरकारी उद्योगांकडे ही ताकद निश्चितच आहे. अर्थात हा मार्ग अवलंबिण्यापूर्वी अशा उद्योगांनी स्वत:चा कारभार सुधारून त्यातून नफा मिळविण्याचा निकराचा प्रयत्न केला पाहिजे. आणि त्यानंतरही जी तूट जाणवेल ती भरून काढण्यासाठी वित्तसंस्था आणि बँका यांच्याकडून साहाय्याची अपेक्षा करावी. थोडक्यात म्हणजे, जास्तीत जास्त स्वयंनिर्भरतेवर भर देणे इष्ट ठरेल.

## 2 उत्पादन विक्री व्यवस्था

विक्रीकला हे एक असे अंग आहे की ज्याकडे सरकारी क्षेत्राने कधी विशेष लक्षच पुरविले नाही. त्यांच्या एकाधिकारामुळे तशी त्यांना आवश्यकताही कधी भासली नाही आणि त्यासाठी त्यांनी कधी विशिष्ट अशी यंत्रणाही उभी केली नाही. ग्राहकाला आवडो अगर न आवडो, त्याला समाधानकारक सेवा मिळो अगर न मिळो, जाण्यावाचून पर्यायच त्याला त्या विशिष्ट उत्पादकाकडे नव्हता. परिणामी, उत्पादनांच्या किमती आणि त्यांचा दर्जा याबाबत सरकारी उपक्रम बऱ्याच अंशी उदासीन राहू शकले. म्हणजेच खाजगी एकाधिकाराचे जे तोटे

उदभवले त्याच उणिवांची झळ सरकारी क्षेत्राला, म्हणजेच पर्यायाने ग्राहकाला, पोहोचली. आता मात्र परिस्थिती बदलण्याचीच नव्हे तर काही क्षेत्रांमध्ये बदलल्याची चिन्हे स्पष्ट आहेत. खाजगी क्षेत्राकडून, मर्यादित प्रमाणात का होईना, स्पर्धा निर्माण झाल्या–बरोबर सरकारी उद्योगांवर दडपण जाणवू लागले आणि त्यानाही ग्राहकाकडे, त्याच्या समाधानाकडे लक्ष देणे प्राप्त झाले. केवळ सरकारी मालकी असल्यामुळे पक्के असलेले सरकारी गिऱ्हाईक आता संपले आणि किंमत व गुणवत्ता यामध्ये वरचढ असलेले घटकच टिकू लागले. समाजाच्या आणि सामान्य ग्राहकाच्या दृष्टीने ही महत्त्वाची बाब आहे. अशा परिस्थितीत विक्री कौशल्याच्या बाबतीत सरकारी उद्योगांना नव–नवीन तंत्रांचा, ज्ञानाचा अवलंब करावा लागणार आहे. त्यांच्यापुढील हे नवीन आव्हान ते कसे पेलतात याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल.

## 3 कामगारविषयक धोरणे

राजकीय दबावामुळे सरकारी उपक्रमांमध्ये कामगारविषयक धोरण नेहमीच नरमाईचे आणि पड खाण्याचे राहिले. सेवकवर्गावर खऱ्या अर्थाने वचक कधीच राहिला नाही आणि त्यामुळे त्यांची गैरशिस्त सहजतेने सहन केली गेली. उत्पादकता तर खूपशी खालावली. या कारणांमुळे सेवकांची संख्या गरजेपेक्षा कितीतरी जास्त पटीने राहिली. त्यात भर पडली तो शासकीय धोरणांमुळे. रोजगार पुरविण्याचे (निर्मितीचे नव्हे) साधन म्हणूनच सरकारी उद्योगांकडे पाहिले गेले. साहजिकच नोकरभरतीला धरबंदच राहिला नाही. नुसता आकडा फुगत गेला असे नाही, तर कामगारांच्या पात्रतेचा विचारच केला नाही. सेवकांवरचा खर्च अफाट वाढला तरी त्याची फिकीर केली गेली नाही. हा सर्व डोईजड, न झेपणारा प्रकार नवीन संदर्भात टिकूच शकणार नाही. त्यामुळे याबाबतीतही कणखर धोरण सरकारी व्यवस्थापनाला, म्हणजेच शासनाला, अवलंबिणे जरुरीचे ठरले.

## 4 भांडवलाची पुनर्रचना आणि मालकी संरचनेत बदल

सरकारी क्षेत्रामध्ये जनतेचे करोडो रुपये गुंतलेले आहेत. केवळ भारत सरकारच्या मालकीच्या 245 उद्योगांमध्ये एक लाख पन्नास हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक झालेली आहे. या उपक्रमांपैकी किमान काही उपक्रमांमधील तरी अंशतःचा एकाधिकार संपविण्याच्या दृष्टीने त्यांचे समभाग काही प्रमाणात विक्रीसाठी काढण्याचे शासनाने ठरविले. आतापर्यंत अशा विक्रीतून जमा झालेल्या सुमारे दहा हजार कोटी रुपयांचा सध्या तरी विनियोग प्रामुख्याने वित्तीय तूट भरून काढण्यापुरता झाला असला तरी टप्प्याटप्प्याने मालकीत बदल घडवून आणण्याच्या दृष्टीनेही तिचा उपयोग होईल असे दिसते.

राजकीयदृष्ट्या तर एकदम फार मोठ्या प्रमाणावर समभागांची विक्री शक्य होणारच नाही. पण काही व्यावहारिक अडचणींचीही जाणीव ठेवायला हवी. गेला काही काळ भांडवल बाजारातले व्यवहार बऱ्याच अंशी थंडावलेले आहेत. पण एरवीदेखील भांडवल बाजाराची सध्याची क्षमता लक्षात घेता इतक्या मोठ्या प्रमाणावर रकमांची उलाढाल त्यात हाताळली जाऊ शकेल अशी शक्यता कमी आहे. तसेच एकदम एवढे मोठे भांडवल बाजारात ओतले गेले तर इतरही समभागांच्या किमतींवर त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो. हे सगळे घडावयाला अजून काही कालावधी नक्की लागेल या समाधानात बदलाचे विरोधक वावरू शकतील. परंतु कालांतराने का होईना, हे घडणे अटळ आहे हे विसरून चालणार नाही.

## 5 पुढील विकासाची दिशा आणि उत्पादन–क्षमतेचा पूर्ण वापर

1996 च्या आर्थिक नीतीमधला अत्यंत महत्त्वाचा भाग होता उद्योग परवाना पद्धतीचे शिथिलीकरण. उपक्रमांना स्वतःच्या उद्योगांशी संबंधित सर्व निर्णय स्वतः घेण्याची मुभा असावी हाही त्या धोरणातला महत्त्वाचा गाभा. त्या प्रक्रियेमध्ये शासनाचा हस्तक्षेप किमान असावा हे त्यातले सूत्र. जे तत्त्व खाजगी उद्योगांना लागू तेच सरकारी उद्योगांनाही लागू व्हावे अशी अपेक्षा गैर नाही. त्यांनाही स्वतःच्या विकासाची, विस्ताराची आणि आधुनिकीकरणाची दिशा ठरविण्याचे स्वातंत्र्य असावे हे ओघाने आले. शासनाचीही भूमिका सध्या तरी तशीच दिसते. अशा

मनोभूमिकेचा लाभ सरकारी उद्योगांच्या व्यवस्थापकांना घेता आला पाहिजे. तद्वतच उत्पादनक्षमतेच्या वापरावरील निर्बंध उठल्यामुळे उभ्या केलेल्या क्षमतेचा पूर्ण वापर करणेही आता शक्य आहे. तसे झाल्यास सरकारी उपक्रमांच्या उत्पादकतेत सुधारणा होऊन उपादन परिव्यय कमी होऊ शकेल आणि त्यांची स्पर्धाशक्ती वाढू शकेल. या सर्व गोष्टींच्या बरोबरीने गुणवत्तेकडे, ती सुधारण्याकडे लक्ष देणेही त्याना भाग पडेल.

## 6 आजारी उद्योग

जाहीर झालेल्या धोरणांमधील अजून एक भाग म्हणजे आजारी सरकारी उद्योगांची प्रकरणे बी. आय. एफ. आर. कडे सोपवावयाची. त्यासाठी कायद्यात बदल करून आजारी सरकारी उद्योगही बी. आय. एफ. आर. च्या अखत्यारीत आणले गेले. अशा उद्योगांची छाननी होऊन त्यांचे काय करावयाचे याचा निर्णय वरील संस्थेकडून उपलब्ध व्हावयाला निश्चितच काही काळ लागेल. त्यामुळे राजकीयदृष्टचा जास्त काळ सवड मिळेल. पण हे अल्पकालीन समाधान ठरेल. एक ना एक दिवस मात्र काही कठोर निर्णय घेण्याची पाळी येणार हे निश्चित. इतर निर्णयांबरोबरच येथेही अतिरिक्त ठरणाऱ्या कामगारांचे काय करावयाचे हा प्रश्न भेडसावणारच आहे.

बी. आय. एफ. आर. च्या आदेशांमुळे काही उद्योगांची पुनर्रचना करावी लागेल आणि कदाचित काही सेवकवर्ग कमी करणे अपरिहार्य ठरेल. अथवा काही उद्योग किंवा त्यांचे विभाग बंद करणे देखील क्रमप्राप्त ठरेल. या दोन्ही शक्यतांमध्ये एक इष्ट भाग मात्र असा की, शासनाचा फार मोठा पैसा जो आज अनुत्पादकरीत्या अडकून पडला आहे तो तरी मोकळा होईल आणि जे इतर उद्योग कार्यदक्षतेने चालू राहतील, त्यांच्यामध्ये गुंतवणुकीसाठी निधी उपलब्ध होऊ शकेल. म्हणजेच पर्यायाने एका बाजूला शासकीय तिजोरीवरचा तोटचाचा भार कमी होईल आणि दुसऱ्या बाजूला पैशाअभावी अडून राहिलेले प्रकल्प मार्गी लागतील अथवा अर्धे काम पूर्ण झालेले प्रकल्प करावयाला अवसर मिळेल.

## मथितार्थ

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की बदलत्या परिस्थितीची योग्य ती दखल घेऊन त्या परिस्थितीशी जुळवून घेण्याचे धोरण अवलंबिणे व अमलात आणणे सरकारी क्षेत्राला अपरिहार्य आहे. काळाला अनुसरून योग्य ती पावले नेटाने टाकून वर उल्लेख केलेल्या किमान पाच सहा बाबींमध्ये तरी बदल आवश्यक आहेत, अपेक्षित आहेत.

□ □


## 'अर्थसंवाद' : पूर्वीच्या वर्षांचे अंक

'अर्थसंवाद'चे 1992-93, ते 1996-97 या वर्षांचे मर्यादित अंक उपलब्ध आहेत. ज्या व्यक्ती, संस्था आणि ग्रंथालयांना या वर्षांचे प्रत्येकी चार अंकांचे संच पाहिजे असतील त्यांनी **कार्यवाहांकडे** प्रत्येक वर्षासाठी रु. 100/- पाठवून मागणी करावी. मर्यादित संच उपलब्ध असल्याने 'प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी' यानुसार अंक पुरविले जातील.

कार्यवाह – खजिनदार

# लघुउद्योग : सद्यःस्थिती, समस्या आणि उपाययोजना*

**वसंत पटवर्धन****

## 1

### प्रस्तावना

लघुउद्योग ही संज्ञा मोठ्या व मध्यम उद्योग घटकांच्या तुलनेत लहान या अर्थी सर्वसाधारणपणे वापरली जाते. लघुउद्योग आणि ग्रामीण घरगुती कुटिरोद्योग यांचा काही वेळा एकत्रितपणे विचार केला जातो. शिवाय लघुउद्योग म्हणून ज्या उत्पादक उद्योगांचा कधीकधी नामोल्लेख होतो त्यांच्या विविध उत्पादन पद्धतीत आणि प्रक्रियांमध्ये पुष्कळच गुणात्मक फरक असतो. म्हणून वेगवेगळ्या संदर्भात लघुउद्योगांच्या कामकाजाचे आणि कार्याचे विवरण आणि विवेचन करताना सर्व लघुउद्योगांत साधर्म्य कमी असते याचेही भान ठेवणे आवश्यक असते.

शासकीय कार्यक्रम, सवलती, अनुदाने, व्याज दर या सर्व संदर्भात लघुउद्योगांची व्याख्या, लघुउद्योग घटकांतील यंत्रसामग्रीत केलेल्या स्थूल गुंतवणुकीच्या (gross investment in plant and machinery) आधारे ठरविली गेली आहे. 1966 पासून रुपये 7.50 लाख इतकीच गुंतवणूक असलेले उद्योग घटक लघु दर्जास पात्र ठरविले जात असत. भाववाढ आणि लघुउद्योगांच्या एकंदर संरचनेत होणारे तसेच औद्योगिक क्षेत्रात होत गेलेले बदल ध्यानात घेऊन ही गुंतवणुकीची मर्यादा रुपये 10 लाख, रुपये 15 लाख, रुपये 35 लाख अशी वाढत जाऊन सध्या रुपये 60 लाखापर्यंत यंत्रसामग्रीत गुंतवणूक असलेले उद्योग, उत्पादक उपक्रम लघुउद्योग म्हणून समजले जातात आणि त्यासाठी असणाऱ्या निरनिराळ्या सवलतींना पात्र ठरतात. म्हणून लघुउद्योग या क्षेत्रात पारंपरिक अगदी रुपये 10,000 पासून रुपये 60 लाखापर्यंत गुंतवणूक असणाऱ्या उद्योग–उपक्रमांचा समावेश होऊ शकतो. फेब्रुवारी 1997 मध्ये लघुउद्योगांसाठी ही व्याख्या रुपये 3 कोटीपर्यंत वाढविण्यात आली. तसेच रुपये 5 लाखापर्यंत यंत्रसामग्रीत गुंतवणूक असणाऱ्या

* महिला महाविद्यालय, सातारा यांच्या विद्यमाने दिनांक 23 फेब्रुवारी, 1997 रोजी ' लघुउद्योग : सद्यःस्थिती, समस्या आणि धोरण ' या विषयावर आयोजित केलेल्या जमनालाल बजाज स्मृती उपक्रमामध्ये केलेले भाषण.

** भूतपूर्व प्राध्यापक, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे.

घटकांना अतिलघु घटक ( tiny ) समजले जात असे. ती मर्यादा रुपये 25 लाखापर्यंत वाढविण्यात आली आहे.

शिवाय कारखानेविषयक (factory) आकडेवारी संकलित करताना भारत सरकारच्या सांख्यिकी विभागात विशिष्ट उद्योग–उपक्रमात कामावर असलेल्या कामगार/नोकर यांच्या संख्येनुसार कारखान्यांची विगतवारी उपलब्ध होत असते. त्यामधील किमान कामगार असणाऱ्या, म्हणजे 49 पर्यंत कामगार असणाऱ्या उद्योग घटकांनाही काही संदर्भात लघुउद्योग समजण्यात येते.

पूर्वी मोठ्या उद्योग घटकांची त्यांच्यावर असणाऱ्या परवाना मिळविण्यासारख्या अटींमुळे गणना करण्याची पद्धती होती; पण मध्यम उद्योग घटक कोणते याबद्दल बरीच संदिग्धताही असे. त्यामुळे काही वेळा जे घटक मोठे व मध्यम नाहीत ते लघुउद्योग असे मानले जाते. सारांश, लघुउद्योगाची व्याख्या जरी स्पष्ट असली तरी त्यातील उद्योगनिहाय फरकांमुळे, गुणात्मक वैशिष्ट्यांमुळे लघुउद्योग ही संज्ञा पुष्कळच गोंधळाची आणि व्यामिश्र स्वरुपात वापरली जात असते; अशा उद्योग घटकांचे स्वरूप बरेच मिश्रही आढळते. उदाहरणार्थ, पंचवार्षिक योजनांमध्ये निरनिराळ्या क्षेत्रात केलेल्या गुंतवणुकीसंबंधीची माहिती देताना ग्रामीण पारंपरिक, विखुरित उद्योग आणि अद्यावत यंत्रसामग्री वापरणारे उद्योगघटक यांची माहिती एकत्रित दिलेली आढळते. म्हणजे लघुउद्योग व ग्रामीण उद्योग मिळून एकत्रितपणे पहिल्या योजना कालात 2.1 टक्के एवढा एकूण योजनेच्या खर्चात हिस्सा होता; तो दुसऱ्या व तिसऱ्या योजनाकालात 4 टक्के आणि 2.8 टक्के होता. चौथ्या व पाचव्या योजनाकालात तो 1.5 टक्क इतका कमी झाला. पण सहाव्या योजनाकालात तो 1.8 टक्के असा वाढला आणि सातव्या योजनेत परत 1.5 टक्के असा घसरला. लघुउद्योग आणि ग्रामीण उद्योग यावरील शासकीय योजनेअंतर्गत खर्चाची वेगवेगळी विभागणी उपलब्ध नाही.

1991 च्या नवीन आर्थिक मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणाची अमलबजावणी सुरू होईपर्यंत देशाचे एकूण औद्योगिक विकासविषयक धोरण 1956 च्या औद्योगिक धोरणाच्या पायावर आधारित होते. लघुउद्योग क्षेत्र बरेच गुंतागुंतीचे, व्यापक, व्यामिश्र आहे. कारखाने कायद्यान्वये वीज वापर करणारे 10 किंवा अधिक रोजगार असणारे आणि वीज न वापरणारे 20 किंवा अधिक कामगार असणारे घटक 'कारखाने' या संज्ञेत येतात. या कायद्यानुसार कारखाने म्हणून समजले जाणारे उद्योग घटक 'संघटित' असे समजले जातात. तर 10 पेक्षा कमी कामगार असणारे घटक 'असंघटित' मानले जातात. दहापेक्षा कमी कामगार असणारे बरेच उत्पादक घटक भांडवलसधन असू शकतात. शिवाय खादी आणि ग्रामीण उद्योग कायद्याच्या कक्षेत यणारे सर्व उद्योग सामान्यतः पारंपरिक व 'असंघटित' असे असतात. तेव्हा 'लघुउद्योग' या ढोबळ व्याख्येत सामावलेल्या सर्व उद्योग घटकांविषयी त्यांची संख्या, उत्पादन, त्यातील रोजगार याविषयीची माहिती पुष्कळ अपुरी आहे याची नोंद सुरुवातीस घेणे उचित होईल. खादी आणि ग्रामीण उद्योगांतील उद्योग बव्हंशी विखुरित, विकेंद्रित, असंघटित व पारंपरिक स्वरुपाचे आहेत. त्यांना पतपुरवठा, कर्जे वगैरे सवलतींचा लाभ अत्यंत अल्प प्रमाणातच झालेला आढळतो. वर उल्लेख केलेल्या निरनिराळ्या राष्ट्रीय संस्था, म्हणजे कारखाने कायदा, खादी/ग्रामोद्योग कायदा, वार्षिक औद्योगिक सर्वेक्षण यामार्फत नियमितपणे एकत्र केलेली माहिती लघुउद्योगांबद्दल पूर्णपणे विश्वसनीय आकडेवारी पुरविते असे म्हणता येणार नाही. लघुउद्योग क्षेत्राचा विस्तार व विकास बराचसा अद्यावत कारखाने क्षेत्रात झाला आहे. पारंपरिक क्षेत्राबद्दलची माहिती बरीच अपुरी, त्रोटक आहे. या पार्श्वभूमीवर यापुढील विवेचनाच्या मर्यादा ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.

## 2

## लघुउद्योग क्षेत्राचे स्वरूप आणि विविधता

शेतीपासून उत्पादन होणाऱ्या शेतीमालावर प्रक्रिया करणारे (भात, डाळी, कापूस, तेलबिया, फळे, भाज्या, वगैरे) तसेच शेती उत्पादनासाठी निविष्टी (inputs) पुरविणारेही लघुउद्योग आहेत (बियाणे, खते, औषधे फवारणी, अवजारे, इत्यादी) त्याचप्रमाणे

ग्राहकांना उपयुक्त असणाऱ्या पादत्राणे, साबण, कापड/कपडे अशा पारंपरिक वस्तूंच्या उत्पादनापासून ग्राहकोपयोगी अद्यावत स्वरुपाच्या प्लॅस्टिकच्या उत्पादनापर्यंत, इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिकल वस्तू, शेतीस उपयोगी लहानमोठी ऑईल इंजिने, इलेक्ट्रिक मोटारी, यांचाही लघुउद्योगांत समावेश होतो. शिवाय मोटारी, ट्रक, स्वयंचलित दुचाकी, भारी उद्योगांना लागणारी संयंत्रे, इत्यादींचे उत्पादन करणाऱ्या मोठ्या आणि मध्यम आकाराच्या उद्योग घटकांना यंत्रांचे सुटे भाग व लहानमोठी अवजारे उत्पादन करून पुरवठा करणारे उत्पादकही लघुउद्योग म्हणून अस्तित्वात आहेत. मोटारी, स्वयंचलित दुचाक्या, मालवाहू ट्रक अशा वाहनांची सेवा (servicing) करणारे घटकही लघुउद्योगच होत.

म्हणजे ग्रामीण विभागात असणारे आणि नागरी भागात असणारे असे दोन्ही स्थाननिहाय प्रकारचे तसेच ग्रामीण बाजार आणि महानगरांतील किंवा राज्य पातळीवर बाजारास माल तयार करून पुरविणारे असे विविध प्रकारचे उत्पादक उद्योग घटक लघुउद्योग व्याख्येत बसत असतात. त्यामुळे साधर्म्य, कमी, वैविध्य पुष्कळ आणि गुणात्मक फरकही खूप असतो. 1970 च्या दशकात सुरू करण्यात आलेल्या निर्यातविशिष्ट उद्योग क्षेत्रांत (export promotion zones) असलेले आणि 100 टक्के निर्यातीसाठीच उत्पादन करणारे घटकही याच क्षेत्रात आहेत. सुरुवातीपासून मुंबईच्या सांताक्रुझ, गुजराथेतील कांडला बंदर अशा निर्यातविशिष्ट क्षेत्रातील उद्योगघटक बव्हंशी लघुउद्योग संज्ञेस पात्र ठरलेले आहेत. वरील माहितीवरून लघुउद्योग क्षेत्र किती व्यापक, मिश्र आणि वैविध्यपूर्ण आहे त्याची कल्पना येते. ग्रामीण भागात उत्पादन करून ग्रामीण बाजारासाठी उत्पादन करणाऱ्या घटकांचे प्रश्न, अद्यावत यंत्रसामग्रीचा वापर करून मोठ्या भारी उद्योगसंस्थांना निविष्टी (सुटे भाग, प्रक्रिया) पुरविणाऱ्या उद्योग उपक्रमांपेक्षा स्वाभाविकच भिन्न आहेत. त्यांच्या विविध अडचणी सारख्याच नाहीत. त्यांच्या भांडवलाची गरज, तंत्रविज्ञानाची पातळी, कामगारांचे शिक्षण, व्यवस्थापन या सर्वच बाबतीत गरजा भिन्न असतात, अडचणींचे स्वरूप वेगवेगळे असते. म्हणून लघुउद्योग या समान संज्ञेस जरी निरनिराळे उत्पादक उद्योग पात्र ठरत असले तरी त्यांच्यात साम्यस्थळांपेक्षा विविधताच अधिक आहे याची नोंद घेण्याची गरज आहे.

अशा या लघुउद्योग क्षेत्राचे एकूण औद्योगिक संरचनेत जे महत्त्व आहे ते मात्र वैशिष्टयपूर्ण आहे. स्वराज्य मिळाल्यापासून गेल्या पन्नास वर्षांत लघुउद्योगांचे महत्त्व ध्यानात घेऊन त्यांच्या विकासासाठी, वाढीसाठी केन्द्र व राज्य सरकारांनी वेळोवेळी आखलेल्या धोरणात लघुउद्योग क्षेत्राला प्राधान्य दिले आहे. ते कितपत उचित होते, आवश्यक होते किंवा अनावश्यक होते की अपुरे होते यासंबंधी बरेच मतभेदही आहेत. स्वाभाविकच लघुउद्योगांना मिळणाऱ्या सवलती अपुऱ्या आहेत. त्यांच्या प्रगतीसाठी आखलेले कार्यक्रम कार्यदक्षतेने राबविले जात नाहीत, सरकारी नोकरशाहीच्या (बँका व वित्तीय संस्था धरून) लाल फितीमुळे त्यांच्यापर्यंत सवलती पोचत नाहीत अशी टीका लघुउद्योग क्षेत्राच्या समर्थकांकडून केली जाते. उलट लघुउद्योग क्षेत्राला अनाठायी, अनावश्यक सवलती व सुविधा दिल्यामुळे ते कार्यदक्ष न राहता पांगळे राहिले आहेत, स्पर्धेला तोंड देऊ शकत नाहीत अशीही टीका मोठ्या उद्योगपतींकडून आणि मुक्त अर्थव्यवस्थेच्या, स्पर्धेच्या समर्थकांकडून वेळोवेळी होत असते. या दोन्ही टीकांमध्ये कमीअधिक प्रमाणावर तथ्य आहे; त्याचा विचार करण्यापूर्वी लघुउद्योगांची सद्यःस्थिती काय आहे ते थोडक्यात पाहू.

## 3

### सद्यःस्थिती

लघुउद्योग सुरू करताना किंवा चालविताना त्याची राज्याच्या उद्योग संचालनालयाकडे नोंदणी झाली पाहिजे असे बंधन नसते. त्यामुळे नोंदणी नसलेल्या उद्योग घटकांची संख्या बरीच असू शकते. 1990–91 या वर्षाच्या भारत सरकारच्या आर्थिक आढाव्यानुसार लघुउद्योग घटकांची एकूण संख्या 19.38 लाख होती. पैकी 28 टक्के घटकांची नोंदणी झालेली नव्हती. एकंदरच लघुउद्योग क्षेत्र हे विकेन्द्रित, विखुरित स्वरुपाचे असल्यामुळे त्यासंबंधीची माहिती अचूक असण्याचा दावा शासनही करीत नाही. (सद्यःस्थिती असे या लेखातील विचारविमर्शाचे स्वरूप

असले तरी सामान्यतः अलीकडील 1992–95 या कालातीलच माहिती उपलब्ध आहे आणि त्यातील बरीचशी (अंदाज ' स्वरुपाची आहे.) शिवाय या लेखातील टीका/समीक्षा प्रायः तुलनेने संघटित पण विखुरित अशावत लघुउद्योगांसंबंधी आहे. ग्रामीण भागातील पूर्वीच्या बलुतेदारी, कुटिरोद्योग स्वरुपाच्या उद्योग घटकांची माहिती पुरेशी उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे विवरण या लेखात केलेले नाही.

1995-96 च्या केन्द्र सरकारच्या उद्योग मंत्रालयाच्या अहवालानुसार लघुउद्योग घटकांची संख्या 1993–94 मध्ये 23·84 लक्ष होती ती 1994–95 मध्ये 25·70 लक्ष झाली आणि त्यांचे स्थूल उत्पादन ( 1990–91 च्या स्थिर किमतीच्या हिशोबात ) रु. 1,80,956 कोटी वरून रु. 1,99,427 कोटी झाले असावे असा अंदाज दिला आहे. या क्षेत्रातील रोजगारांची संख्या (कामगार) 1990–91 मध्ये 125 लाख होती ती 1994–95 मध्ये 146 लाखापर्यंत वाढली आणि या क्षेत्रातून झालेल्या निर्यातीच्या मार्फत 1992–93 मध्ये रु. 17,785 कोटी उत्पन्न झाले ते 1994–95 मध्ये रु. 26,400 कोटीपर्यंत वाढले. सामान्यतः 1991 नंतरच्या वर्षांत लघुउद्योग क्षेत्रातील उत्पादनातून झालेली मूल्यवृद्धी ( value added ) एकंदर औद्योगिक उत्पादनात 40 टक्के होती. तर त्या क्षेत्राचा एकंदर निर्यातीतील वाटा 35 टक्के असावा असे नवव्या पंचवार्षिक योजनेसाठी तयार केलेल्या कच्च्या आराखड्यात नमूद केले आहे. या परिच्छेदात दिलेली माहिती ही बव्हंशी अशावत आणि तुलनेने संघटित लघुउद्योग क्षेत्रासंबंधीच आहे. (ग्रामीण आणि पारंपरिक उद्योगघटकांचा या माहितीत समावेश नाही असे मानण्यास जागा आहे.)

लघुउद्योग क्षेत्रासंबंधी राष्ट्रीय औद्योगिक गणना ( **Census by Central Statistical Organisation** ) केली जाते. त्यातून, लघुउद्योगांसंबंधी खास म्हणून 1987–88 साली करण्यात आलेल्या सार्वत्रिक पाहणीतून आणि इतर आर्थिक पाहण्यांतून वेळोवेळी माहिती संकलित करण्यात येते. शिवाय दरवर्षी कारखान्यांच्या नमुना पाहण्यांतून मर्यादित स्वरुपातही बरीच विश्वसनीय माहिती उपलब्ध होत असते. अगदी अलीकडील, म्हणजे 1988 च्या, लघुउद्योगांच्या सार्वत्रिक गणनेच्या आकडेवारीतील काही माहिती चिंताजनक वाटते. उदाहरणार्थ, 9·87 लाख लघुउद्योग घटकांची माहिती संकलित करण्याचा संकल्प करण्यात आला. पैकी 5·6 टक्के लघुउद्योगांचा ठावठिकाणाच ( **not traceable** ) मिळाला नाही. 30 टक्के उद्योग घटकांचा पत्ता लागला परंतु ते बंद पडलेले आढळले. कार्यशील असणाऱ्या लघुउद्योगांची टक्केवारी 60 टक्के होती.

दरवर्षी घेण्यात येणाऱ्या औद्योगिक क्षेत्राच्या पाहणीवरून बरीच माहिती मिळते. 1991–92 या वर्षाच्या माहितीनुसार ' कारखाना ' या व्याख्येत बसणाऱ्या उद्योग घटकांच्या विवरणातून असे दिसून आले की, 49 संख्येपर्यंत कामगार असणाऱ्या कारखान्यांची संख्या एकूण कारखान्यांत 77·2 टक्के होती; त्यात गुंतविलेल्या स्थिर भांडवलाचा हिस्सा 4·53 टक्के आणि एकूण भांडवलाचा 6·56 टक्के होता. पण अशा कारखान्यांतील कामगारांचा हिस्सा 18·2 टक्के; निविष्टींचा 15·2 टक्के, स्थूल उत्पादनाचा 13·75 टक्के आणि मूल्यवृद्धीचा 8·51 टक्के होता. म्हणजे 49 पर्यंत कामगार संख्या असलेल्या कारखान्यांतून 14 टक्के उत्पादन आणि 8·5 टक्के मूल्यवृद्धी असे योगदान एकूण कारखानदारी क्षेत्राला झाले असले तरी त्यातील कामगारांची संख्या 18 टक्के होती. अशा 49 पर्यंत कामगार असलेल्या कारखान्यांतून दर कामगारामागे सरासरी रु. 42,351 एवढी स्थिर भांडवलाची गुंतवणूक होती तर रु. 30,637 एवढी मूल्यवृद्धी प्रतिकामगार होती आणि त्याचे वेतन रु. 10,053 एवढे होते.

बँका व वित्तीय संस्थांकडून तसेच अन्य शासकीय संस्थांकडून सोईसवलती मिळण्यास पात्र असणाऱ्या लघुउद्योगांत सध्या रु. 60 लाखापर्यंत यंत्रसामग्रीतील स्थूल गुंतवणुकीची मर्यादा आहे. अशा भांडवलाच्या गुंतवणुकीनुसार कारखान्यांच्या माहितीचे विवरण पाहता असे दिसून येते की, रु. 10 लाखापर्यंत गुंतवणूक असणाऱ्या कारखान्यांची संख्या एकूणपैकी 74·8 टक्के होती; त्यातील स्थिर भांडवलाचा हिस्सा 1·65 टक्के, कामगारांचा 23·2 टक्के, स्थूल उत्पादनाचा 9·6 टक्के, मूल्यवृद्धीचा 7·8 टक्के होता. दुसऱ्या टोकाला रु. 10 ते 50 लाख गुंतवणूक अस–

णाऱ्या कारखान्यांची संख्या 17·2 टक्के, त्यातील स्थिर भांडवलाचा हिस्सा 3·1 टक्के, कामगारांचा 12·9 टक्के, स्थूल उत्पादनाचा 11·8 टक्के आणि मूल्यवृद्धीचा 8·14 टक्के होता.

लघुउद्योग घटकांची नोंदणी करण्याचे बंधन त्यांच्यावर नसले तरी जर त्या घटकाला बँकेकडून वा वित्तीय संस्थेकडून साहाय्य घ्यावयाचे असेल किंवा बीज/पाणी या निविष्टीच्या दरांतील उपलब्ध शासकीय सवलतींचा लाभ घ्यावयाचा असेल तर मात्र राज्याच्या उद्योग संचालनालयाकडे नोंदणी करणे आवश्यक असते. परंतु एकदा नोंदणी झाल्यानंतर सदर लघुउद्योग चालू आहे की बंद पडला किंवा आजारी झाला याची माहिती शासनाकडे संकलित करण्याची पद्धत नाही आणि अशी व्यवस्था करण्यात आलेली नाही. म्हणून पूर्वी दिलेल्या लघुउद्योगांच्या आकडेवारीतील माहितीबद्दल संभ्रम आहे आणि संशयाला बराच वाव उरतो.

1992–93 मध्ये नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च आणि एफ. एन. एस. या जर्मन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने लघुउद्योगांची व्यापक पाहणी करण्यात आली होती. या पाहणीच्या पद्धतीत सांख्यिकी दृष्टीने काही त्रुटी असल्या तरी पाहणीतून निघणारे निष्कर्ष लघुउद्योग क्षेत्राच्या कार्यपद्धतीवर उपयुक्त प्रकाश टाकतात. ते निष्कर्ष असे.

(1) 1970–71 च्या स्थिर किमतीत लघुउद्योगातील उत्पादनात 1973–74 ते 1988–89 कालावधीत दरसाल 6·9 टक्के वाढ झाली तर मोठ्या उद्योगक्षेत्रांत 8.3 टक्के वाढ झाली.

(2) अद्ययावत लघुउद्योग क्षेत्राचा एकूण ग्रामीण लघुउद्योग क्षेत्रांतील उत्पादनातील हिस्सा 1979–80 ते 1991–92 या कालावधीत 74 टक्क्यांवरून 89 टक्के इतका वाढला. म्हणजे विखुरित ग्रामीण पारंपरिक उद्योगांचा वाटा बराच कमी झाला. म्हणजेच ग्रामीण पारंपरिक उद्योग घटकाचे महत्त्व आणि योगदान कमी झाले.

(3) लघुउद्योग क्षेत्र हळूहळू अधिकाधिक भांडवलसधन होत गेले. भाववाढीमुळे व तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे हे होणे स्वाभाविकच होते.

(4) निर्यातीतील लघुउद्योगांचा हिस्सा 1979-80 ते 1990-91 या कालावधीत 19 टक्क्यांवरून 29.6 टक्के इतका वाढला.

(5) लघुउद्योग क्षेत्रातील घटकांची संख्या आणि त्यातील भांडवली गुंतवणूक तसेच उत्पादन, कामगार संख्या यातील एकूण विषम विभागणी सुरुवातीस दिलेल्या आकडेवारीवरून दिसून येते. एन. सी. ए. ई. आर. च्या या पाहणीत असे दिसून आले की, रुपये 5 लाखापर्यंत गुंतवणूक असलेल्या पाहणीतील घटकांची संख्या 86 टक्के, त्यांचा कामगार संख्येतील हिस्सा 59 टक्के, स्थिर भांडवलात तसेच उत्पादनात 45 टक्के होता. म्हणजे रुपये 5 लाखाहून अधिक गुंतवणूक यंत्रसामग्रीत असलेल्या घटकांची संख्या एकंदर लघुउद्योगांच्या संख्येत 14 टक्के होती तर त्यांचा कामगारांच्या संख्येतील हिस्सा 41 टक्के आणि स्थिर भांडवलात तसेच उत्पादनात 55 टक्के होता. या उद्योगघटकांना सामान्यपणे लघुउद्योग क्षेत्रातील संघटित उद्योग घटक मानण्यास हरकत नाही. म्हणून शासकीय योजनांमार्फत दिल्या जाणाऱ्या सवलतींचा, सुविधांचा ओघ रुपये 5 लाखापर्यंत (1989 ची) गुंतवणूक असणाऱ्या घटकांकडेही पोचला पाहिजे.

(6) या पाहणीतील एक महत्त्वाचा निष्कर्ष पतपुरवठा आणि भांडवलाची उभारणी यासंबंधीचा आहे. प्रस्थापित उत्पादनक्षमतेपेक्षा कमी प्रत्यक्ष उत्पादन असणाऱ्या घटकांपैकी 25 टक्के घटकांनी आपल्याला गरजेपेक्षा कमी पतपुरवठा झाल्यामुळे उत्पादन अपेक्षेइतके होऊ शकले नाही असा दावा केला. त्यांचे खेळते भांडवल/उत्पादनाचे गुणोत्तर 1 : 4.5 होते तर कर्ज/स्वभांडवलाचे 0.37 : 1 होते. जेवढे खेळते भांडवल (पतपुरवठा) बँकांकडून मिळावयास ते पात्र होते त्याच्या फक्त 36 टक्के गरज बँकांकडून पुरविली गेली. या पाहणीतील घटकांपैकी फक्त एकषष्ठांश घटकांना दीर्घ मुदतीची कर्जे वित्तीय संस्थांकडून मिळाली.

(7) एन. सी. ए. ई. आर. / एफ. एन. एस. च्या

या पाहणीतील इतर महत्त्वाचे निष्कर्ष असे होते : त्यांच्यापुढील अडचणीत (अ) अपुरा पतपुरवठा आणि येण्याची वसुली होण्यातील विलंब, (ब) विशिष्ट कच्च्या मालाचा अपुरा पुरवठा आणि (क) कामगारांतील गैरहजेरी, अनियमितता या महत्त्वाच्या समस्या होत्या.

(8) लघुउद्योग क्षेत्राला सरकारकडून मिळत गेलेले साहाय्य नगण्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन मोठ्या उद्योगांच्या तुलनेत त्याना सापत्न–भावाची ( a poor cousin ) वागणूक मिळते.

अतिलघु ( tiny ) व पारंपरिक उद्योगांचा विचार करता अतिलघु उद्योगांना विशेष साहाय्य देण्यास पात्रता जी रु. 2 लाखापर्यंत यंत्रसामग्रीतील गुंतवणुकीची होती ती 1991 च्या आर्थिक सुधारणां–पासून रु. 5 लाखापर्यंत वाढविण्यात आली. प्रत्यक्षात अशा अतिलघुउद्योगांना कितपत साहाय्य होत असू शकेल ही वादाची बाब आहे. उदाहरणार्थ, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाकडून 1995-96 मध्ये मंजुरी देण्यात आलेल्या अर्थसाहाय्यात रु. 50,000 पर्यंत कर्जमंजुरी झालेल्या उद्योगघटकांची संख्या 69 टक्के होती. पण त्याना मिळणाऱ्या अर्थसाहाय्याची टक्केवारी 1·5 टक्के होती; दुसऱ्या बाजूस रु 60 लाखाहून अधिक कर्जमंजुरी करण्यात आलेल्या घटकांची संख्या 5·8 टक्के होती पण वित्तसाहाय्यात त्यांचा हिस्सा दोन–तृतीयांश होता. (येथे म. रा. वि. मं. च्या कार्य–पद्धतीवर टीका अभिप्रेत नाही. फक्त वस्तुस्थितीचे निर्देशन यातून होते ते असे की, संख्येने कमी असलेले मोठे घटक बराच अर्थसाहाय्याचा वाटा उचलतात. ही साधी गणिती बाब आहे.) येथे एक मुद्दा आवर्जून लक्षात घेण्यासारखा आहे की, एकंदर लघुउद्योग क्षेत्रातील जवळपास 85 टक्के घटक रु. 5 लाखापर्यंत गुंतवणूक करणारे आहेत आणि त्यांच्यापैकी बरेच वित्तीय अथवा पतपुरवठा सहाय्यापासून वंचित राहतात. लघुउद्योगांच्या संबंधातील आणखी एक महत्त्वाच्या पैलूचा येथे आवर्जून उल्लेख केला पाहिजे तो म्हणजे त्यांच्या एकंदर संख्येतील आजारी उद्योगांचा, म्हणजेच त्यांच्या दुर्बलतेचा. 1988 च्या लघुउद्योगांच्या पाहणी–नुसार कामगारविषयक अडचणींमुळे संकटात असलेल्यांचे प्रमाण 2.3 टक्के होते. कच्च्या मालाच्या अपुऱ्या उपलब्धतेचा प्रश्न 5.6 टक्के घटकांना त्रास–दायक ठरला होता. उद्योगघटकांच्या उपक्रमी भागीदार मालकांच्या आपसातील वैमनस्यामुळे (मतभेदामुळे) 3.7 टक्के घटक अडचणीत आले होते तर वित्तपुर–वठ्याच्या अनुपलब्धतेमुळे 35 टक्के आणि विक्री–संबंधीच्या अडचणींमुळे 14.3 टक्के उद्योगघटक समाधानकारकपणे कार्यशील नव्हते.

प्रत्यक्ष आजारी असलेल्यांपैकी 16.1 टक्के घट–कांनी कच्च्या मालाच्या समस्येमुळे कार्यदक्षता ढासळली असे नमूद केले होते तर 15 टक्के घटकांना खेळत्या भांडवलाच्या अपुरेपणामुळे अपयश आले. 15 टक्के घटकांना वीज/ऊर्जा पुरेशी न मिळाल्यामुळे आजारपण आले तर 14 टक्के घटकांना माल विक्रीतील अपयशा–मुळे आजार आला.

1988 मधील सार्वत्रिक पाहणीच्या वेळी असे दिसून आले की, 82 टक्के घटकांची भांडवली गुंतव–णूक रु. 1 लाखापर्यंत होती, 60 टक्क्यांहून अधिक घटकांत चारपर्यंतच कामगार संख्या होती तर 15 टक्के घटकांकडे 5 ते 9 अशी कामगार संख्या होती वरील आकडेवारीवरून बव्हंशी लघुउद्योग किती लहान होते त्याची कल्पना यावी या परिस्थितीत 1995–96 मध्ये फारसा फरक पडला असण्याची शक्यता नाही. आजारपणाच्या संदर्भात हे नमूद केले पाहिजे की, आजारी पडण्याचे प्रमाण लघुउद्योग क्षेत्रातच आहे असे नव्हे. 1980 ते 1988 या काळात लघुउद्योगांपैकी आजारी उद्योगघटकांची संख्या 23,149 वरून 2,40,573 पर्यंत वाढली आणि त्यांच्याकडे बँकांनी दिलेल्या कर्ज रकमेचा आकडा रु. 306 कोटीवरून रु. 2,141 कोटीपर्यंत वाढला; बिगर लघुउद्योग क्षेत्रांतील (म्हणजे मध्यम व मोठ्या) उद्योगांतील आजारी उद्योग घटकांची संख्या 1,401 वरून 2,011 वर गेली तर त्यांच्याकडील अडकलेल्या कर्जाच्या रकमेचा आकडा रुपये 1,502 कोटीवरून रु. 5,564 कोटीपर्यंत वाढला. म्हणजे बिगर लघुउद्योगातही आजाराचे प्रमाण कमी नव्हते परंतु लघुउद्योगात ते बरेच जास्त होते. उलट बिगर लघुउद्योगातील आजारी घटकांकडे अडकलेल्या बँक साहाय्याची रक्कम लघु–उद्योगांतील अशा रकमेच्या अडीचपट होती.

अद्ययावत लघुउद्योगांमधील उत्पादक कार्यदक्षता

बिगर लघुउद्योग क्षेत्रापेक्षा कमी असते अशा स्वरुपाचा महत्त्वाचा आक्षेप व टीका लघुउद्योगांबद्दल घेतला जातो. तो एका दृष्टीने खराही आहे. कारण तुलनेने लघुउद्योगांत भांडवल सघनता कमी असते. भांडवला-पोटी रोजगार मात्र अधिक पुरविले जातात. लघु-उद्योगांत रोजगारांची क्षमता व निर्मिती जास्त असते हेच तर त्यांचे बलस्थान मानले गेले आहे. भारता-सारख्या अविकसित देशांत एकूणात भांडवलाची कमतरता आहे आणि राहणार आहे. उलट मनुष्यबळ विपुल असते म्हणून तर लघुउद्योगांना आर्थिक उत्पादन संरचनेत आजवर प्राधान्य देण्यात येत होते. स्थिर, म्हणजे यंत्रसामग्रीमधील, गुंतवणूक जसजशी वाढत जाते तसतसे उत्पादन व भांडवलाची उत्पादकताही वाढत जाते. हा सामान्य प्राथमिक अर्थशास्त्रीय सिद्धान्त व अनुभव आहे. पण त्यामुळे लघुउद्योग क्षेत्राची उत्पादकता / कार्यदक्षता कमी असते हा त्या क्षेत्रावरील आरोप आणि टीका उचित आहे असे म्हणता येत नाही. ती वस्तुस्थिती आहेच. प्रश्न आहे तो भांडवलसघन उद्योगांची वाढ करून रोजगार-निर्मितीला दुय्यम स्थान दिले जाणे देशाच्या सद्यः-स्थितीत योग्य ठरेल का हा.

उत्पादकता, कार्यदक्षता यांचा विचार करीत असताना लघुउद्योगांत आजारी घटकांचे प्रमाण व संख्या जास्त आहे असा आक्षेप घेतला जातो. उदाहर-णार्थ, मार्च 1995 अखेरीस 2.68 लाख आजारी उद्योगांत बँकांचे रु. 3,547 कोटी अडकून पडले होते तर त्याचवेळी 1,015 बिगर लघुउद्योगघटकांत आजारपणामुळे रु. 8,739 कोटी अडकले होते. म्हणजे लघुउद्योगांत अडकलेल्या रकमेच्या जवळजवळ अडीच-पट रक्कम बिगर लघुउद्योगांमध्ये अडकली होती. तेव्हा लघुउद्योग क्षेत्रात संख्येने आजारी उद्योग 10/15 टक्के असले तरी आजारी बिगर लघुउद्योग क्षेत्रात बँकांची फार मोठी रक्कम अडकली होती हे विसरून चालणार नाही.

अलीकडील, म्हणजे 1995–96 या वर्षाच्या, भारत सरकारच्या आर्थिक आढाव्यानुसार लघुउद्यो-गांची सरकारी क्षेत्रातील बँकांकडील खाती (accounts) मार्च 1994 अखेर 28.79 लाख होती आणि त्यांच्याकडे या बँकांचीच रुपये 21,440 कोटी येणी रक्कम होती (म्हणजे ही थकित रक्कम नव्हे). दोन वर्षांपूर्वी, म्हणजे मार्च 1992 अखेर, वरील आकडे-वारी 28.63 लाख खाती आणि येणी रक्कम रुपये 17,487 कोटी अशी होती. म्हणजे दोन वर्षांत 0.5 टक्के तर बँकांकडून उपलब्ध साहाय्याची रक्कम 22.6 टक्के वाढली होती. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या 1995–96 च्या ताज्या वार्षिक अहवालानुसार, मार्च 18, 1994 अखेर लघुउद्योग क्षेत्राला बँकिंग क्षेत्रा-कडून झालेल्या वित्त/पत पुरवठ्याची येणे रक्कम रुपये 22,617 कोटी होती; ती मार्च 29, 1996 अखेरीस रु. 31,884 कोटी होती. म्हणजे या रकमेत दोन वर्षांत 41 टक्के वाढ झाली होती. परंतु याच दोन वर्षांत एकंदर औद्योगिक उत्पादन क्षेत्राकडे (लघु + मध्यम व मोठे उद्योग एकत्रित) बँकांकडे येणे रक्कम रुपये 80,482 कोटीवरून 55 टक्क्यांनी वाढून रुपये 1,24,992 कोटी झाली. स्वाभाविकच मार्च 1994 मध्ये लघुउद्योग क्षेत्राचा हिस्सा एकंदर उद्योग उत्पादन क्षेत्राच्या बँक साहाय्यात मार्च 1994 मध्ये 28.1 टक्के होता तो मार्च 1996 अखेरीस 25.5 टक्क्यां-पर्यंत घसरला. या टक्केवारीवरून लघुउद्योग क्षेत्रास बँकांकडून होत असणाऱ्या अर्थसाहाय्यात घसरण झाली हे स्पष्ट होते. लघुउद्योगांचे उत्पादन मात्र वाढले होते.

## 4

## लघुउद्योगक्षेत्राची एकंदर उद्योग संरचनेत वाटचाल

वरील आकडेवारीवरून लघुउद्योग क्षेत्राच्या एकंदर औद्योगिक संरचनेत असलेल्या स्थानाची बरीच यथार्थ कल्पना यावी. लघुउद्योग क्षेत्राला गेली 20–25 वर्षे प्राधान्याने वित्तीय/पतपुरवठा करण्याचे बँका आणि वित्तीय संस्थांचे धोरण होते आणि अजूनही ते जारी असल्याचे सांगण्यात येते. अगदी अलीकडील आर्थिक आढाव्यातही लघुउद्योगांना उत्तेजन व प्रोत्साहन देण्याचे धोरण चालू असल्याचे म्हटले आहे. अगदी 1960–70 च्या दशकापासून लघुउद्योगांना प्रोत्साहने देण्याचे धोरण अस्तित्वात आहे. निव्वळ आकडेवारी पाहता या क्षेत्राची संख्यात्मक वाढ तर झाली आहेच पण गुणा-त्मक वाढही झाली आहे हे नाकारता येणार नाही.

लघुउद्योग क्षेत्रात तुलनेने कमी गुंतवणुकीमुळेही जास्ती रोजगार उपलब्ध होऊ शकतात; उद्योगधंद्यांची ग्रामीण भागात, औद्योगिकदृष्ट्या अविकसित किंवा विकसनशील राज्यांत, जिल्ह्यांत व क्षेत्रांत वाढ व विस्तार होण्यात लघुउद्योग महत्त्वाची कामगिरी करू शकतात. स्थानिक पातळीवर नवीन प्रकारचे उद्योजक उभे करण्यातही लघुउद्योग साहाय्यभूत होऊ शकतात अशा स्वरूपाच्या भूमिकेतून लघुउद्योगांना नानाविध प्रोत्साहने देण्याचे सरकारी धोरण आहे. अशा प्रोत्साहनांचे स्वरूप खालील प्रकारचे आहे. (1) वित्त व पतपुरवठा सढळपणे म्हणजे कमी (25 टक्के) मार्जिनवर, म्हणजे उपक्रमीचे स्वतःच्या भांडवल 25 टक्के असे, ठेऊन तिप्पट रकमेचे अर्थसहाय्य करणे; (2) असा पत/वित्त पुरवठा करताना सवलतीच्या व्याजाच्या दराने त्यांना अर्थसहाय्य देणे; (3) मागास उद्योग क्षेत्रात पाणी, वीजपुरवठा सवलतीच्या दराने करणे; (4) सरकारच्या खात्याकडून जी खरेदी करण्यात येते ती करताना लघुउद्योगांची मालाची पुरवठा करण्याची किंमत 20 टक्के अधिक असली तरी त्यांच्याकडून प्राधान्याने खरेदी करणे; (5) लघुउद्योगांना कच्च्या मालाचा, विशेषतः जो माल बाजारात पुरेसा उपलब्ध नाही त्याचा, पुरवठा अग्रक्रमाने करणे; (6) लघुउद्योगांच्या माल विक्रीत त्यांना साहाय्य देणे; (7) त्यांच्या उत्पादनास राखीव क्षेत्र ठेवणे; अशी 836 उत्पादने राखीव ठेवली आहेत.

या महत्त्वाच्या सवलती लघुउद्योगांना देण्यात येत आहेत. त्यापैकी कच्च्या मालाचा पुरवठा आणि तयार मालाची विक्री या संदर्भात राज्य शासनांनी उभारलेल्या संस्थांकडून जे सहाय्य करण्यात येते ते अत्यंत अपुरे आहे असे आढळते. या दोन्ही बाबतीत लघुउद्योगांना मोठ्या प्रमाणावर अडचणी येतात असे वेळोवेळी केलेल्या लहानमोठ्या पहाण्यातून आढळून आले आहे. क्रमांक 4 च्या, म्हणजे सरकारने प्राधान्याने लघुउद्योगांकडून खरेदी करावी, या उद्देशाबद्दल अनुभव निराशाजनक आहे. सरकारी खाती आणि सरकारी क्षेत्रातील मोठ्या व मध्यम उद्योगांकडून यासंबंधीची कार्यवाही निराशाजनकच आहे.

वित्त आणि पतपुरवठा सढळपणे आणि सवलतीच्या व्याज दराने करण्याच्या शासकीय उद्दिष्टांबद्दल आणि त्यासंबंधी झालेल्या कार्यवाही (अमलबजावणीबद्दल) महत्त्वाचे मतभेद व तात्त्विकदृष्ट्या (अर्थशास्त्रीय दृष्टीतून) आक्षेपही भूतकाळात वेळोवेळी घेतले गेले आहेत आणि अद्यापि ते आक्षेप घेतले जातात. ही दोन्ही उद्दिष्टे व त्यांची कार्यवाही वरवर पाहता उचित व नवीन उद्योगांच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहे असे म्हटले जाते. फक्त अशा सवलतींचा लाभ कुणाला होतो, किती होतो आणि किती काळ व्हावा याबद्दल या विषयावरील अर्थशास्त्रीय विवेचनात बरीच चर्चा होत असते आणि याबद्दलचा अनुभवही सार्थकता निर्माण व्हावी असा आहे.

अशा सुविधा आणि सवलती दिल्यामुळे लघुउद्योग घटक स्पर्धेला तोंड देण्यास असमर्थ होतात. ते पांगळेच राहतात हा या संबंधीच्या धोरणावरील एक आक्षेप आहे. संघटित (तुलनेने) लघुउद्योग क्षेत्रातील प्रायः रु. 5 लाखापेक्षा अधिक गुंतवणूक असलेल्या उद्योगघटकांनाच या सोईसवलतींचा लाभ होतो या आक्षेपात तथ्य आहे असे दिसते. अतिलघुउद्योगांपर्यंत बँकिंग / वित्तीय साहाय्याच्या योजनांचा लाभ पुरेशा प्रमाणात पोचत नाही. कारण असा लाभ घेण्यासाठी लागणारी विविध तऱ्हेची क्षमता त्यांच्याजवळ नसते हे खरे आहे. त्यासाठी उद्योजकता विकास आणि उद्योगघटकांतील व्यवस्थापनात गुणवत्ता वाढविण्यासाठी योजलेल्या अनेक कार्यक्रमांतून काही फलित हाती येत असले तरी होत असलेले साहाय्य अत्यंत अपुरेच ठरले आहे यात संशय नाही.

लघुउद्योग घटकांना वृद्धीसाठी किंवा नवीन उपक्रमींना नव्याने उद्योग सुरू करण्यासाठी जी स्थिर भांडवलाची (इमारती व यंत्रसामग्रीची) उभारणी करावयाची त्यासाठी दीर्घ मुदतीचे कर्ज देण्यासाठी (1951 च्या राज्य वित्तीय महामंडळ कायद्यानुसार) राज्य वित्तीय महामंडळे 40 वर्षांपूर्वीपासून सुरू झाली असली तरी त्यांचा आवाका अपुराच ठरला आहे. आवश्यकतेच्या मानाने फारच कमी उद्योगघटकापर्यंत त्यांचे अर्थसहाय्य पोचले आहे यात संशय नाही. हीच परिस्थिती मोठ्या अनुसूचित बँकांच्या 1969 च्या व नंतर 1980 च्या राष्ट्रीयीकरणानंतर बँकांकडून प्राधान्य क्षेत्राला पतपुरवठ्याच्या धोरणासंबंधीही आहे असे म्हणावयास हरकत नाही. या संदर्भात एक दोन

ठळक बाबींचा उल्लेख करणे अस्थानी ठरणार नाही. बँका आणि वित्तीय महामंडळे किंवा तत्सम संस्थांनी लघुउद्योग क्षेत्राला पतपुरवठा आणि वित्तीय सहाय्य अग्रक्रमाने द्यावे असे धोरण असले आणि एकंदर पतपुरवठ्याच्या 15 टक्क्यांपर्यंत लघुउद्योगांचा वाटा असावा असे उद्दिष्ट असले (आणि ते 1990–92पर्यंत बव्हंशी गाठण्यातही आले होते) तरी लघुउद्योगांना संचालनातील विविध समस्यांची बँका व वित्तीय संस्थांना पुरेशी जाण नसते असे दिसून येते. लघुउद्योगांना योग्य वेळी (timely) आणि पुरेसा (adequate) वित्त व पतपुरवठा झाला पाहिजे याची जाण जरी बँकांच्या व वित्तीय संस्थांच्या वरिष्ठ अधिकारी वर्गात असली तरी प्रत्यक्षात ज्या कर्मचाऱ्यांचा शाखा किंवा विभागीय पातळीवरील लघुउद्योगांशी संबंध येतो त्या कर्मचाऱ्यांना किंवा संबंधित अधिकाऱ्यांना संबंधित लघुउद्योगांच्या उत्पादन, व्यवस्थापन, विक्री याबाबतीत बहुधा पुरेशी समज व माहिती नसल्यामुळे लघुउद्योगांची बरीच अडचण होते. विशेषतः राष्ट्रीयीकृत बँकांतील कनिष्ठ पातळीवरील कर्मचाऱ्यांची विचारसरणी ही गेल्या वीस-पंचवीस वर्षांत सरकारच्या खात्यातील कर्मचाऱ्यांसारखीच नोकरशाही वृत्तीची झाली असल्याचा सार्वत्रिक अनुभव आहे. सामान्यतः नफा–कार्यक्षमता–कार्यदक्षता या त्रिगुणांचा आढळ असणाऱ्या व्यावसायिक ( professional ) गुणांचा परिपोष करण्यात सरकारे आणि राष्ट्रीयीकृत बँका अपयशी ठरल्यामुळे लघुउद्योगांची बरेच वेळा अडवणूक होत असते.

सरकारच्या अदूरदर्शी धोरणांचाही परिणाम बँकांच्या कार्यदक्षतेवर विपरीत झाला आहे यात शंका नाही. गेल्या 15–20 वर्षांत अनेक राज्य सरकारांनी बँकांच्या लघुग्राहकांनी (विशेषतः शेतकऱ्यांनी) घेतलेली कर्जे माफ केली. अशा कर्जमाफीच्या धोरणामुळे बँकांच्या ताळेबंदावर, नफा मिळविण्याच्या क्षमतेवर प्रतिकूल परिणाम झाला. मुळात लहान रकमांची कर्जे देताना आवश्यक त्या किमान व्यावसायिक नियमांचा आणि कसोट्यांचा भंग करून, कर्ज मेळावे भरवून अस्थानी कर्जे देण्यास बँकांना भाग पाडण्यात आले; नंतर अशा व इतर वसुली होण्याची शक्यता असलेल्याही कर्जदारांची परतफेड वसूल करण्यात बँकांना प्रोत्साहन न देता बँकांना कर्जमाफीच्या चुकीच्या धोरणांचे बळी पडावे लागले. त्यामुळे बँकांची व्यावसायिक कार्यदक्षता उणावली इतकेच नव्हेतर कर्जाकडे व्यावसायिक दृष्टीने पाहून वसुलीचे प्रयत्न करण्याचा बँकांचा आणि बँक कर्मचाऱ्यांचा उत्साह कमी होण्यात सरकारच्या तात्पुरत्या राजकीय लाभाच्या दृष्टीने घेतलेल्या कर्जमाफीसारख्या अस्थानी उदारतेचा परिणाम झाला.

लघुउद्योगांपैकी विशेषतः महानगरे आणि इतर लहान मोठ्या नागरी क्षेत्रांतील बहुतेक लघुउद्योगांचा व्यवहार हा मोठ्या व मध्यम उद्योगघटकांशी पूरक स्वरूपात होत असतो. पुण्यासारख्या शहराच्या परिसरातील 70 ते 80 टक्के लघुउद्योग तंत्रदृष्ट्या बऱ्यापैकी प्रगत आहेत, त्यांचे मालक (उपक्रमी / व्यवस्थापक) बव्हंशी सुशिक्षित आहेत तरीही त्यांना बँकांकडून येणारा अनुभव फारसा समाधानकारक नाही. अशा उद्योगघटकांना मोठ्या / मध्यम उद्योग कंपन्यांकडून त्यांच्या सुटे भाग/ यंत्रभाग पुरविण्याच्या कामी जी वसुली करावयाची असते त्याबाबतीतही अनुभव आश्वासक नाही. किमान 90 ते 180 दिवसांपर्यंत त्यांची येणी थकविली जातात असा 80 टक्के तंत्रदृष्ट्या समर्थ उद्योगघटकांचा अनुभव आहे. अशा वसुलीस विलंब झाल्यास त्यावर कायदेशीर कारवाई करून मोठ्या उद्योगांकडून वसुली करणे लघुउद्योगांना प्रायः अशक्य असते. 1970–72 पासून अशा स्वरूपाच्या अडचणी व तक्रारी लघुउद्योगांनी वारंवार रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांकडे करूनही फारशी सुधारणा झालेली नाही. अशा विलंबित बिलांवर व्याज देण्याचे बंधनही अलीकडील काळात मोठ्या/ मध्यम उद्योगांवर घालण्यात आले असले तरी या बंधनांची आणि नियमांची कार्यवाही व्यावहारिकदृष्ट्या सोपी नाही हे उघड आहे.

लघुउद्योग घटकांच्या अडचणी जशा विशिष्ट प्रकारच्या आणि कायम स्वरूपाच्या असतात तशाच त्यांच्या व्यवस्थापनातील त्रुटींचाही उल्लेख अपरिहार्य आहे. बँका / वित्तीय संस्थांकडून अर्थसाहाय्य मिळविण्यासाठी आणि मिळविताना लघुउद्योगांनी ज्या स्वरूपाचा पूर्वाभ्यास आणि गुंतवणूकपूर्व आखणी करावयास हवी तशी लघुउद्योग करीत नाहीत. बाजारातील स्पर्धा, उत्पादन करावयाच्या मालाची भविष्यातील मागणी, त्यासाठी येणाऱ्या उत्पादन परिव्ययाचे

वास्तव अंदाज, इतर खर्च, नफ्यातोट्याचे दीर्घकालीन अंदाज ही आवश्यक कागदपत्रे तयार करताना लघु-उद्योग घटकही पुरेशी शिस्त पाळीत नाहीत. आर्थिक नियोजन, व्यावसायिक शिस्त, धनको बँक / वित्तीय संस्थेला सातत्याने माहिती पुरविणे. ( returns ) या किमान गोष्टींची पूर्तताही एरवी कार्यदक्ष असण्याची क्षमता असलेले लघुउद्योजक करीत नाहीत. बँक / वित्तीय संस्थेशी आपले संबंध एकप्रकारे सहकार्याचे आणि सहभागाचे आहेत / असावेत याची जाणीव लघु-उद्योजक ठेवीत नाहीत आणि बँकांना आपल्या उत्पादन/विक्रीसंबंधी पुरेशी उचित माहिती देण्यास खळखळ करतात असा अनुभव सार्वत्रिक नसला तरी बऱ्हंशी आढळतो.

लघुउद्योग घटक व बँका यांच्या संबंधाचे स्वरूप व्यावसायिक परस्पर-सामंजस्याचे असावयास हवे तसे काही वेळा नसते हे नाकारण्यात अर्थ नाही. बँक राष्ट्रीयीकरणानंतर बँकांची शाखावाढ करण्याचे धोरण योग्य असले तरी त्यात तारतम्य पाळण्यात आले नाही. 1970 ते 1985 या पंधरा वर्षात बँकांची शाखावाढ इतकी झपाट्याने करण्यात आली की, बँक कर्मचाऱ्यांच्या संख्यात्मक वाढीबरोबर त्यांच्या गुणात्मक कार्यदक्षतेकडे बरेच दुर्लक्ष करण्यात आले. भारत सरकार, राज्य सरकारे, रिझर्व्ह बँक या सर्व धोरणात्मक निर्णय घेणाऱ्या शिखर संस्थांच्या अव्यावसायिक दृष्टिकोनाचा परिणामही बँकांच्या कार्यदक्षतेवर झाला असला पाहिजे. कर्जे देण्याच्या व्यवहारात जिल्हा, तालुका, क्षेत्रीय इष्टांक ठरवून ते पूर्ण करण्याच्या मागे बँका व कर्मचारी लागले आणि बँकिंग व्यवसायातील गुणवत्तेची हानी झाली. शेकडो नव्हे तर हजारो कोटी रुपये रकमा थकित होऊन उद्योगधंद्यात करण्यात आलेली गुंतवणूक अनुत्पादक ठरली.

लघुउद्योग क्षेत्राचा विकास आणि वाढ करावयाची म्हणजे काही किमान अनुभव, व्यापार-उत्पादन, खरेदी विक्री, कामगारांशी संबंध अशा विविध बाबींची समज असणारे उपक्रमी निर्माण करणे एकाएकी शक्य नाही. Rome was not built in a day या सुप्रसिद्ध म्हणीमुसार उपक्रमशीलतेची वाढ अपेक्षेइतक्या झपाट्याने होत नसते. उपक्रमशीलतेसाठी प्रशिक्षण देऊन काही किमान गुणांची जोपासना करणे आवश्यक असते तसेच काही गुण जन्मजात असावे लागतात. या विधानाबद्दल थोडेफार मतभेद होणे शक्य आहे. अन्यथा मारवाडी, गुजराथीसारख्या विशिष्ट समाजातील बहुतांश लोक व्यापार, उत्पादन, उद्योग, व्यवसायांत आघाडीवर का आहेत याचा उलगडा होणे कठीण आहे. आसाम, पूर्वांचल राज्ये, ओरिसा, बंगाल, तामिळ नाडू किंवा महाराष्ट्र अशा राज्यांत गुजराथी, मारवाडी जमातींचा प्रभाव स्थानिक व्यापारी मंडळींपेक्षा लक्षणीय असलेला दिसतो. ध. रा. गाडगीळांनी म्हटल्याप्रमाणे मराठी माणसात व्यापार, उदिमासाठी आवश्यक ती 'बनिया वृत्ती' नाही. तेव्हा लघुउद्योगांची वाढ करण्यासाठी बँकांवर कर्जे देण्याची जबाबदारी सोपवून सरकार मोकळे झाले. पण बँकिंग, वित्तीय क्षेत्राच्याही मर्यादा ध्यानात घ्यावयास हव्या होत्या. ते न झाल्यामुळे न पेलणारी जबाबदारी बँकांवर पडली. अव्यावहारिक उद्देश व उद्दिष्टे बँकांपुढे ठेवण्यात आली आणि अपयशाचे धनी बँकांना व्हावे लागले. लघुउद्योगांचा विकास करण्यासाठी उपक्रमशीलता विकास संस्था, विपणन व विक्री यासाठी स्थापन करण्यात आलेल्या शासकीय संस्था अशाच रीतीने सरकारच्या, राजकीय पक्षाच्या अदूरदर्शी धोरणांच्या बळी ठरल्याचे आढळले. उपक्रमशीलतेच्या वाढीला काही पारंपरिक सामाजिक पूर्वग्रह, समज यांचा अडथळा होतो हे ध्यानात घ्यावे लागेल.

## 5

## धोरणांची समीक्षा

सरकारी धोरणांचो मूळ उद्दिष्टे कितीही चांगली असली तरी त्यांची अमलबजावणी करण्यात नोकरशाही, सरकारी क्षेत्रातील संस्था यशस्वी ठरल्या नाहीत. बँकांच्या व्यवस्थापनाचे सरकारीकरण झाले असे दोष एकंदर औद्योगिक धोरणाच्या आणि विशेषत: लघुउद्योगांच्या विकासाच्या अमलबजावणीच्या प्रयत्नांत स्पष्ट झाले.

लघुउद्योगांना नाना प्रकारची उत्तेजने आणि सोईसवलती दिल्या तरी लघुउद्योगांची वाढ पुरेशी आणि गुणात्मक झाली नाही; लघुउद्योगांसाठी असलेल्या गुंतवणूकविषयक मर्यादेत राहिल्यामुळे विशिष्ट

लाभ मिळतात म्हणून बऱ्याच लघुउद्योगांना उत्पादन व विक्रीच्या वाढीस प्रोत्साहन न मिळता उलट आपला घटक लहान आकाराचा ठेवण्यात स्वारस्य असते असा आरोपही लघुउद्योगक्षेत्रावर केला जातो. किंबहुना लघु उपक्रमींना त्यामुळे आपला उद्योग स्पर्धेस तोंड देण्यास सक्षम करण्याची गरजच वाटत नाही असा आक्षेपही अशा प्रोत्साहनांबद्दल केला जातो. या टीकेत तथ्य आहे. अनुभव असाही आहे की, कामगारांच्या संख्येत वाढ केल्यास कारखानेविषयक बंधनांना तो पात्र होईल म्हणून उत्पादन न वाढविता 10 पेक्षा कमी कामगार ठेवण्याकडेच त्यांचा कल असतो. म्हणजे उत्पादन, माल विक्री वाढविण्याची गरज आणि क्षमता असली तरी लघु उपक्रमी आपला मूळ उद्योग घटक न वाढविता नवीनच दुसरा उद्योग घटक सुरू करून तेच उत्पादन तेथेही सुरू करतो. लघुउद्योगांची स्वाभाविक / नैसर्गिक वाढ करण्यास तो उत्सुक राहात नाही. असा आक्षेप खोटा नाही, कारण जर तशी वाढ केली तर लघुउद्योग म्हणून त्यास मिळणाऱ्या निरनिराळ्या सवलती मिळणे बंद होईल. ही अडचण मुख्यत: कारखानेविषयक जाचक बंधनांमुळे कामगारांची संख्या वाढविण्यासंबंधात असते. भांडवलाची वाढ झाली तरी गेल्या पंचवीस वर्षांत लघुउद्योगांच्या भांडवलविषयक व्याख्येतील वाढत्या गुंतवणुकीच्या सोईमुळे त्याची अडचण होत नाही.

पतपुरवठा आणि वित्तीय साहाय्याच्या सातत्याने मिळणाऱ्या सवलतींमुळे एक शक्यता मात्र आहे की, लघुउद्योग दिवसेंदिवस अधिकाधिक भांडवलसधन होत जातो. तंत्रदृष्ट्या कराव्या लागणाऱ्या बदल आणि विकासामुळे तांत्रिकदृष्ट्या सक्षम लघुउद्योगांतील भांडवलसधनता वाढणे इष्ट आणि स्वाभाविकही आहे. यामुळे भांडवल / उत्पादनाचा गुणोत्तर सुधारत जातो. निर्यातीच्या दृष्टीने, तसेच टेल्को, बजाज ऑटो, बजाज टेम्पो, किर्लोस्कर कंपन्या, अल्फा लाव्हल, ग्रीव्हज–सारख्या मोठ्या कारखान्यांना माल, सुटे भाग, प्रक्रिया सेवा पुरविणाऱ्या लघुउद्योगांमध्ये तंत्रविज्ञानाचा विकास करीत राहाणे अपरिहार्यही असते. परिणामी असे तंत्र–विज्ञानविशिष्ट लघुउद्योग भांडवलसधन होत असणे स्वाभाविक आहे. लघुउद्योगांच्या विकासात अशा मोठ्या उद्योगघटकांचा, समुहांचा मोठा हातभार लागला असल्यामुळे पुणे, बंगलूर, चेन्नाई, लखनौ, दिल्ली सारख्या महानगरांजवळ तंत्रविज्ञानविशिष्ट लघुउद्योगांची संख्या गेल्या दोन दशकांत वाढलेली आढळते.

अशा प्रकारच्या मोठ्या, भारी उद्योगांचे साहाय्यभूत ठरणारे लघुउद्योग त्यांच्या प्रभावामुळे वाढतात हे खरे. परंतु जपानमध्ये मोटारी, जहाजे, इलेक्ट्रॉनिक्स उद्योग यात असणाऱ्या मोठ्या उद्योगांचे जसे पालकत्वासारखे संबंध त्यांना मालपुरवठा करणाऱ्या लघुउद्योगांशी असतात तसे आपल्या देशात नाहीत. तसे निर्माण करण्याचे प्रयत्न मोठ्या उद्योगांनी केले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. अशा पालकस्वरूपी संबंधामुळे लघु–उद्योगांना जपानमध्ये वित्त, पत, तंत्रविज्ञान या सर्व बाबतीत मोठ्या उद्योगधंद्यांकडून सतत सहाय्य व मार्गदर्शन मिळते. तसे आपल्या देशात घडत नाही.

परंतु वित्तीय व व्याजविषयक सवलतीमुळे ग्रामीण किंवा इतर लहान नगरांतील लघुउद्योगांतही भांडवलसधन उद्योग घटक सुरू होण्याची प्रक्रिया कितपत इष्ट आहे याचा विचार शासकीय धोरणात झाला आहे असे दिसत नाही. लघुउद्योगांना प्रोत्साहने देण्यात ते मोठ्या प्रमाणावर कामगारांना रोजगार पुरवू शकतात या शक्यतेचा व उद्देशाचा भाग असतो. तेव्हा भांडवलाच्या गुंतवणुकीपेक्षा किती नवीन रोजगार उपलब्ध करून देण्यात आले यावर काही सवलती अवलंबून ठेवाव्या अशी सूचना विचारार्ह ठरते. लघु–उद्योग भांडवलाच्या वापराच्या दृष्टीने मोठ्यांच्या तुलनेत कार्यदक्ष (Capital efficient) नाहीत अशा स्वरूपाच्या आक्षेपात फारसा अर्थ नाही. किंबहुना कमी भांडवलात उत्पादनक्षमता निर्माण करणे हाच तर लघुउद्योग घटकांच्या दृष्टीने जमेचा भाग आहे. भारतात शेतीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्या आणि रोजगारांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे ही बाब इष्टच आहे. पण बिगरशेती व्यवसायात औद्योगिक उत्पादन व सेवा यामध्ये त्याच प्रमाणात रोजगारवृद्धी होत नाही. हीच मूळ समस्या आहे. संघटित खाजगी औद्योगिक उत्पादन क्षेत्रात उपलब्ध रोजगारांच्या संख्येत वाढ झालेली नाही ही गेल्या आर्थिक सुधारणा सुरू झाल्यानंतरच्या 4–5 वर्षांतील आकडेवारीतून दिसणारी उघड बाब आहे. तत्पूर्वीच्या 1969 ते 1989 या दशकातही खाजगी संघटित क्षेत्रातील कामगारांची संख्या 46.74 लाखावरून 46.91 लाख अशी कमी

झाली होती. (जर्मनी, फ्रान्ससारख्या प्रगत देशांतही अशीच परिस्थिती आहे.) तेव्हा रोजगार पुरविणे किंवा नव्याने निर्माण करणे हे लघुउद्योग क्षेत्राचे प्रधान उद्दिष्ट नसले (आणि नसावे) तरी रोजगारात वाढ होण्यास अनुकूल असे धोरण शासनाने आखले पाहिजे. कामगारविषयक किचकट व बंधनकारक ठरणारे कायदे आणि नियम यासाठी शिथिल करावे लागले तरी चालेल पण रोजगारवाढीस अनुकूल वातावरण निर्माण व्हावयास हवे. कल्याणकारी राज्याच्या अतिरिक्त अस्थायी धोरणामुळे ज्याला रोजगार मिळेल त्याला किमान गरजेनुसार वेतन मिळण्याची हमी आणि रोजगार मिळणार नाही तो अर्धपोटी अशी चमत्कारिक स्थिती सध्या अर्धनागरी व ग्रामीण क्षेत्रात आढळते.

आतापर्यंत केलेल्या विवेचनाच्या आधारावरून भविष्यातील लघुउद्योगविषयक धोरणासंबंधी विचार करता ग्रामीण भागात, अविकसित राज्यात आणि विकसित राज्यातील औद्योगिकदृष्ट्या मागास जिल्ह्यात व विभागात औद्योगीकरणाचा वेग वाढविणे अगत्याचे आहे असा निष्कर्ष निघतो. याकरिता आजपर्यंत राब-विलेल्या कार्यक्रमांचे यश बरेच अपुरे आहे. या संदर्भात भविष्यातील धोरणाबद्दल काही प्रश्न उपस्थित करणे येथे उचित ठरावे.

(1) उद्योगीकरणाची प्रक्रिया ग्रामीण व देशाच्या अविकसित भागात वेगाने होऊन औद्योगिक रोजगार निर्माण होण्यासाठी ग्रामीण भागातील औद्यो-गिक वस्तू उत्पादनासाठीची मागणी वाढली पाहिजे. अशी मागणी वाढविण्यासाठी ग्रामीण भागातील लोक-समूहांचे उत्पन्नाचे स्तर उंचविले पाहिजेत. केवळ लोकसंख्या वाढली म्हणजे मागणी वाढेल असे नव्हे. ग्रामीण भागातील मागणी वाढण्यासाठी उत्पन्न वाढले पाहिजे. प्रत्यक्षात केवळ स्थूल राष्ट्रीय उत्पादनात वाढ होऊन किंवा दरडोई उत्पन्न वाढून मागणी वाढणार नाही. एकंदर देशातील उत्पन्नातील विषमता कमी झाल्याशिवाय, खालच्या स्तरातील उत्पन्नाचा स्तर उंचविल्याशिवाय मागणी वाढणार नाही. 38 टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली असताना ग्रामीण भागात उद्योगधंदे काढले तरी ते मागणीच्या अभावी टिकाव धरू शकतील का ? सद्यःस्थितीत विकेन्द्रीकरण यशस्वी होऊ शकेल का ?

(2) राखीव म्हणून जी 800 हून अधिक उत्पादने लघुउद्योग क्षेत्रासाठी ठेवण्यात आली आहेत त्याचा खरोखरीच कितपत लाभ लघुउद्योगांनी घेतला आहे ? मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणाचा भाग म्हणून बहुराष्ट्रीय कंपन्या आणि विदेशी तसेच एतद्देशीय मोठ्या व मध्यम कंपन्या आपला विशेषतः ग्राहको-पयोगी टिकाऊ आणि इतर वस्तूंचा बाजार विस्तारीत आहेत. अशा कंपन्यांशी करावयाच्या स्पर्धेत येथील लघुउद्योग कितपत टिकाव धरतील ? ग्रामीण भागा-तील जीवनावश्यक वस्तूंचा बाजार बहुराष्ट्रीय कंपन्या व मोठ्या उद्योग समूहांना खुला करणे देशाच्या हिताचे आहे का ?

(3) लघुउद्योगांत मोठ्या उद्योगांना 24 टक्क्यापर्यंत समभाग घेण्याची नवीन धोरणामुळे मुभा ठेवल्यामुळे असे लघुउद्योग घटक खरोखरीच व्यवस्था-पन व संचलनाच्या दृष्टीने एतद्देशीय उपक्रमीचे राहतील की मोठ्या उद्योगांच्या अंकित होतील ? अशा अंकित उद्योगांना सवलती देणे कितपत रास्त, न्यायाचे होईल ?

(4) अलिकडेच लघुउद्योगांतील व्याख्येत बदल करून रुपये 3 कोटीपर्यंत (रुपये 60 लाखावरून) यंत्र-सामग्रीत गुंतवणूक असणाऱ्या उद्योगांना लघुउद्योग ठरविण्यात आले आहे. भाववाढ लक्षात घेऊनही ही मर्यादा रुपये 3 कोटीपर्यंत वाढविल्यामुळे एकूण अद्यावत लघुउद्योगक्षेत्रापैकी फारतर 5 टक्के घटकांना या वाढीचा लाभ मिळू शकेल. बाकीच्या 90–95 टक्के घटकांच्या परिस्थितीत काही लाभदायक फरक पडेल का ?

(5) निर्यातक्षम तंत्रदृष्ट्या सक्षम लघुउद्योग घटकांना तसेच अभियांत्रिकी, रासायनिक क्षेत्रांत असलेल्या लघुउद्योग घटकांना वाढत्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. इलेक्ट्रॉनिक उद्योगा-तील जकात व करविषयक धोरण निर्यात करणाऱ्या उद्योगांना पोषक नाही असा अनुभव येत आहे. जाग-तिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था यांचे लाभ खरोखरीच उद्योगीकरणास पोषक ठरतील का ? रिझर्व बँकेचे माजी गव्हर्नर वेंकिटरमणन हे या धोरणाचा पुरस्कार करीत असले तरी त्यांनीसुद्धा देशी उद्योगांना थोडेफार

संरक्षण चालू ठेवण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे.

(6) विकेन्द्रित, ग्रामीण, विखुरित लघुउद्योग क्षेत्रांतील पारंपरिक उद्योग घटकांना प्रोत्साहक ठरेल असे सध्याच्या धोरणात काही विशेष आहे का? या पारंपरिक उद्योगांची वाढ व विकास होण्यासाठी काही नावीन्यपूर्ण धोरणाची गरज आहे का?

(7) लघुउद्योगांना विविध प्रकारच्या कर्जांची मर्यादा, सवलतीचे व्याज दर, पाणी/वीज वगैरे आणि इतर निविष्टींच्या पुरवठ्यातील साहाय्य इत्यादी सवलती, तसेच उत्पादनासाठी राखीव क्षेत्र अशा निरनिराळ्या प्रोत्साहनांच्याबाबत एक महत्त्वाचा मुद्दा असा की, त्या कायमस्वरुपी नसाव्या. त्यामुळे लघुउद्योग घटक कायमचे पांगळे व दुबळे राहण्याचा धोका असतो. म्हणून काही सवलती एखादा लघुउद्योग घटक किफायतशीर (नफ्यात येईपर्यंत) होईपर्यंत किंवा उत्पादन सुरू झाल्यापासून जास्तीत जास्त पाच वर्ष (त्यातील कमी मुदतीपर्यंत) मर्यादित ठेवल्या पाहिजेत; कोणत्या सवलतींना अशा मर्यादा घालाव्या यासंबंधी विचार करणे आवश्यक आहे. एकंदरित लघुउद्योगांना सवलतींच्या सवयीचे गुलाम होऊ देणे इष्ट नाही. या सूचनेचा गंभीरपणे विचार झाला पाहिजे.

□ □


# मराठी अर्थशास्त्र परिषद

## परिषदेचे सदस्य आणि हितचिंतक याना आवाहन

'अर्थसंवाद' या नियतकालिकावरील आणि कार्यालयीन खर्च गेली काही वर्षे सातत्याने वाढत असल्यामुळे आणि परिषदेला मिळणाऱ्या अनुदानात कोणतीही वाढ नसल्यामुळे परिषदेला दरवर्षी अधिकाधिक तूट येत आहे. ही तूट भरून काढण्यासाठी वर्गणीचे दर सुधारणे, जाहिराती मिळविणे इत्यादी निर्णय परिषदेच्या कार्यकारी मंडळाने वेळोवेळी घेतले आहेत. त्याचबरोबर मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या नावे एक स्वतंत्र कायम निधी उभारावा असेही ठरले आहे. या कायम निधीसाठी सदस्यांकडून आणि परिषदेच्या हितचिंतकांकडून देणग्या/अनुदाने मिळवावीत असेही वार्षिक साधारण सभेत सातत्याने ठरविण्यात आले आहे. 'अर्थसंवाद' चे वाचक, परिषदेचे साधारण सदस्य आणि अन्य हितचिंतकही या निधीसाठी स्वयंस्फूर्तपणे, यथाशक्ती आपले आर्थिक साहाय्य देतील आणि परिषदेला आर्थिक स्थैर्य मिळवून देतील असा आम्हांस विश्वास वाटतो.

या निधीसाठी पाठवावयाचे बँक ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डर 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने काढावेत आणि ते मंगळवेढा येथील कार्यालयीन पत्त्यावर पाठवावेत.

देणगीदारांची नावे वेळोवेळी 'अर्थसंवाद' च्या अंकात दिली जातील.

कार्यवाह-खजिनदार

# लघुउद्योग : उल्हास, आक्रोश आणि उमेद*

प्रमोद ठोम्बरे**

गेल्या पन्नास वर्षांच्या पार्श्वभूमीवर आजच्या लघुउद्योगांची स्थिती काय, त्यांच्या समस्या कोणत्या आणि त्याविषयीचे धोरण कसे घडत येत आहे याचा ऊहापोह आज येथे आपण करणार आहोत. लघुउद्योगांबद्दल गैरसमजच फार. लग्नाच्या बाजारात दुर्लक्षणीय स्थळ, अशी लघुउद्योग तरुणाची परवड. महाराष्ट्रातील एका, नंतर खूप ख्यातनाम झालेल्या, उपक्रमीचे लग्न ठरले त्यावेळची जुनी गोष्ट. पट्टेवाला असलेला वर आहे ना अशी चौकशी वधूकडील कोणी वयस्क बाईने केली. नेमस्त वराकडे पट्टेवाल्याचा थाट नाही हे कळल्यावर तिला कोण खंत वाटली ! लघुउद्योग म्हणजे काहीतरी किरकोळ, कटकटीची, सरळ नसलेली बाब असे कित्येकांना वाटते. लघुउद्योग क्षेत्र बऱ्याच महत्त्वाच्या बाबतीत मोठ्या उद्योग क्षेत्राच्या खांद्याला खांदा लावून आहे हे त्यांच्या गावीही नसते. देशभरच्या सुतार–लोहारांच्या नेटावर टेल्कोच्या एखाद्या प्लॅन्टमध्ये तयार होणाऱ्या ट्रकच्या किमतीइतक्या बैलगाड्या तयार होऊ शकतात हे कोणाला खरे वाटत नाही. पेन्शनवाली नोकरी पकडण्याचेच ध्येय असलेल्यांना जोखीम आणि अनिश्चिततेच्या वारूवर स्वार होण्यातील रोमांचकतेचा मोह पडत नाही. त्यातून इकडून तिकडून जमविलेली पुंजी घालून उभ्या केलेल्या उपक्रमाला नित्यनैमित्तिकतेच्या एवढ्या मोठ्या रामरगाड्यातून जावे लागते की बोलायलाची सोय नाही.

## लघुउद्योग क्षेत्राची कामगिरी

अनुकूल धोरणाची महिरप असताना आणि प्रतिकूलतेची संततधार, निदान अधूनमधूनची धार, असताना गेल्या अर्धशतकात लघुउद्योगांनी केलेली आगेकूच विस्मयजनक म्हणावी लागेल. पहिल्या योजनेच्या सुरुवातीला असलेली लघुउद्योग घटकांची काही हजार ही किरकोळ संख्या, पंचेचाळीस वर्षानंतर, 1995 साली, 25.71 लाख या प्रचंड संख्येवर पोहोचली आहे, एक जरा मोठे युनिट काढायचे सोडून काही चलाख उपक्रमी चार छोटी युनिटे टाक–

* महिला महाविद्यालय, सातारा व मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने सातारा येथे दिनांक 23 फेब्रुवारी, 1997 रोजी जमनालाल बजाज स्मृती उपक्रमांतर्गत 'लघुउद्योग : सद्यःस्थिती, समस्या आणि धोरण' या विषयावरील चर्चासत्रात केलेले भाषण. (यात व्यक्त झालेली मते ठोम्बरे यांची वैयक्तिक असून ते ज्यांच्या सेवेत आहेत ती मराठा चेम्बर ऑफ कॉमर्स अॅन्ड इन्डस्ट्रीज, पुणे ही संस्था त्यांच्याशी सहमत असतेच असे नाही.)

** सहायक कार्यवाह, मराठा चेम्बर ऑफ कॉमर्स अॅन्ड इन्डस्ट्रीज, पुणे.

तात ही टीका गृहीत धरली तरी लघुउद्योग घटकांची वाढीव संख्या कमी नाही. पण देशातील कामकरी वयोगटाच्या लोकसंख्येच्या दृष्टीने ही संख्या तशी कमीच आहे. शतकोटीकडे झुकणाऱ्या लोकसंख्येत पाव टक्का देखील उपक्रमी नाहीत हे आपणास फारसे भूषणावह नाही. अधिकाधिक लोकांनी आपापल्या परीने उपक्रमी व्हावे म्हणून उपक्रमींच्या विकासाचे कार्यक्रम जोरात चालू आहेत. पण अखेर समाजाची मूल्ये काय आहेत, आकांक्षा काय आहेत आणि त्यांची साहस करण्याची, जोखीम अंगावर घेण्याची इयत्ता काय आहे या मर्यादा त्यावर पडणार आहेत. उपक्रमशीलता विकासाच्या गंगेत कोणाला नुसते ढकलले की तो स्नातक उपक्रमी होईल हे संपूर्ण खरे नाही.

पुढचा मुद्दा तो रोजगार पुरविण्याचा. आमच्या देशातला तो जिव्हाळ्याचा विषय आहे. आधुनिक तंत्रविज्ञान स्पृहणीय आहे हे खरे. पण रोजगार पुरविण्याच्या निकषावर ते तेवढे उतरत नाही. 1995 सालचे आकडे विचारात घेतले तर लघुउद्योगांनी अथवा अनौपचारिक क्षेत्राने दीड कोटी रोजगार पुरविले आहेत. म्हणजे या प्रांतात ते मोठ्या क्षेत्राच्या खांद्याला खांदा मिळवून आहेत. सरासरी दहा हजार रुपयात लघुउद्योगातील एक रोजगार निर्माण होतो तर पुष्कळ उच्चतांत्रिकी असलेल्या मोठ्या उद्योगात पाचपाच लाख रुपये वेचूनसुद्धा एक रोजगार निर्माण करता येत नाही. रोजगार पुरविणे याला सर्वोच्च प्राधान्य द्यावयाचे ठरविले तर लघुउद्योगांना तगविण्याखेरीज आणि बहरविण्याखेरीज पर्याय नाही.

आता उत्पादनमूल्याकडे वळू. लघुउद्योगांनी 1994–95 सालात केलेल्या एकूण उत्पन्नाचे चालू किमतीला मूल्य 2,940 अब्ज रुपये आहे. उत्पादनाच्या महत्त्वाच्या प्रांतातदेखील लघुउद्योग क्षेत्र मोठ्यांशी बरोबरी करीत आहे. आजच्या घटकेला निर्यात ही कर्तबगारी तशी जमावयाला अवघड. कित्येक मोठ्या कंपन्या निर्यातदार आहेत. पण निव्वळ निर्यातदार आहेत काय ? म्हणजे त्यांची निर्यात त्यांच्या आयातीपेक्षा जास्त आहे का ? कित्येक कंपन्यांची नाही. त्या नुसत्या निर्यातदार; पण निव्वळ निर्यातदार असे म्हणता येणार नाही. लघुउद्योगाला आयातीच्या कटकटी सांभाळणे अवघड असते. त्यामुळे त्यांची आयात फारशी नसतेच. त्यांचा निर्यातीतील वाटा चाळीस टक्के आहे असे गतसालची सरकारी आकडेवारी सांगते. एकंदरित, कमीत कमी गुंतवणुकीत मोठ्या क्षेत्राइतके उत्पादनमूल्य निर्माण करण्याची आणि मोठ्यांच्या इतका रोजगार पुरविण्याची मर्दुमकी चिमुकल्या म्हणून कधीकधी हिणवल्या जाणाऱ्या लहान क्षेत्राने गाजविली असून निर्यातीसारख्या मोक्याच्या व्यवहारातील त्यांचा सुमारे चाळीस टक्क्यांचा वाटा कौतुक वाटावे असा आहे.

## शासकीय आधार

गेल्या चाळीसपन्नास वर्षांत इथपर्यंत मजल जी मारली त्याला बव्हंशी कारण दिसते ते म्हणजे लघुउद्योग क्षेत्राला शासनाने आधार, संरक्षण, उत्तेजन, सवलती देण्याचे जे धोरण राबविले ते. आर्थिक नियोजनाचे पर्व सुरू होण्याच्या सुमारास कायदा झाला (Industries Development and Regulation Act) की शासनाच्या किंवा दिल्लीच्या परवान्याशिवाय कुणी कसला औद्योगिक उपक्रम अंगिकारावयाचा नाही. या कायद्याने लघुउद्योगांना अनुज्ञप्तीपासून मुक्त ठेवले. त्यामुळे उद्योग सुरू करणे लहान माणसाच्या आटोक्यात राहिले. काही वस्तू लघुउद्योग विभागासाठी राखून ठेवण्यात आल्या. आज ती संख्या 836 आहे. मोठ्या प्रमाणावरील उद्योगांना त्या वस्तू करता येत नाहीत. सरकारला लागणाऱ्या वस्तू खरेदी करताना लघुउद्योगांत तयार झालेल्या वस्तुंना प्राधान्य द्यावे, मोठ्या उद्योगातील वस्तूंच्या किंमतीपेक्षा त्या पंधरा टक्क्यांपर्यंत चढ्या असल्या तरी प्राधान्याने खरेदी कराव्यात अशी तरतूद आहे. बयाणा रकमा, सुरक्षा ठेव भरण्याबाबत सूटसवलत असावी असाही शासकीय फतवा आहे. लहान उद्योगांना काम पुरविण्यासाठी मोठ्या उद्योगांना प्रोत्साहन राहावे म्हणून मोठ्यांना उत्पादन शुल्कात सवलती ठेवल्या आहेत. आता तर तीस लाख रुपयापर्यंत करपात्र उलाढाल करणाऱ्या लघुउद्योग घटकांना उत्पादन शुल्काची काही कटकट नाही. या मोलाच्या सवलतीमुळे आम्ही टिकू शकलो, वाढू शकलो असे कित्येक लघुउपक्रमींनी मला सांगितले आहे.

बँकांनी कर्जे देताना चाळीस टक्के निधी प्राधान्य

क्षेत्राला द्यावेत असा दंडक आहे. शेतीबरोबरच लघु-उद्योगांना या प्राधान्य क्षेत्रात गणले आहे. शेतीबरोबरच लघुउद्योगांना बँकांकडून, ठराविक मर्यादेपर्यंत तरी, हक्काने कर्जे मिळण्याची सोय उपलब्ध झाली आहे. शासनाने तर फार मोठा लवाजमा लघुउद्योगाच्या विकासासाठी बाळगला आहे. हप्त्याने, भाडेपट्टीने यंत्र-सामग्री देण्यासाठी अगदी जवाहरलाल नेहरूंच्या काळापासून, नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन ( NSIC ) आहे. आता ती देशात आणि परदेशातही लघुउद्योगाचे उत्पादन प्रदर्शित करीत आहे. लघुउद्योग क्षेत्राला पत-पुरवठा करण्यासाठी, स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया ( SIDBI ) ही शिखर बँक आहे. आता तर राष्ट्रीयीकृत बँकांच्या शाखांमार्फत लघुउपक्रमींना कर्जे मिळण्याची जशी पूर्वापारची सोय आहे त्या-बरोबरच फक्त लघुउपक्रमींचीच ऊठबस खपवून घेणाऱ्या सुमारे 70–72 शाखा भारतभर निघाल्या आहेत. ही सुधारणा सरकारच्या गळी उतरविण्यात इतरांबरोबर आमचाही हातभार लागला आहे. लहान माणसाला खेळत्या भांड-वलाच्या गरजेचे, गुंतागुंतीचे गणित मांडावयास लागू नये म्हणून आगामी उलाढालीच्या पाचव्या हिश्श्याने बँकांकडून खेळते भांडवल उपलब्ध करण्याबाबत रिझर्व्ह बँकेने फतवे काढले आहेत. लघुउद्योगांना सवलतीच्या दराने, एक टक्का कमी व्याजाने, दर आकारले जातील ही सवलत दीर्घकाळ टिकली. आता अशा व्याजविषयक सवलती सर्वत्रच बंद होत आहेत हा भाग वेगळा. निज-धन नाही म्हणून छोटा उद्योग टाकता येत नाही अशा अभागी लोकांसाठी मृदु कर्जाची सोय पन्नास वर्षांपूर्वी स्टेट बँकेने सुरू केली. ती आता अधिक व्यापक होत आहे. बीज भांडवल, नॅशनल इक्विटी फंड या नावांनी या योजना नावारूपाला आलेल्या आहेत. खरोखरच्या गरजूंसाठी त्यांचा उपयोग होणे अगत्याचे आहे. अवघ्या दहा टक्के निजधनावर दहा लाखांचा प्रकल्प उभा करणे मराठी तरुणाला शक्य आहे. महिला उपक्रमींनाही अशी सवलत आहे. एकं-दरित, भांडवल नाही असे रडगाणे गाण्याची सोय तरुण वर्गासाठी आता राहिलेली नाही. कर्जाचा गोवर्धन आपल्या करंगळीवर तोलत ठेवण्याचे कसब मात्र या कर्जदारांनी दाखविले पाहिजे.

कच्चा माल देण्यासाठी, पक्का माल विकण्या-साठी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ (MSS-IDC) सारख्या संस्था राज्याराज्यांत आहेत. वित्त-पुरवठ्यासाठी महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ (MSFC) सारख्या संस्थाही राज्याराज्यांत आहेत. मोठ्यांकडून लहानांना वेळेवर पैसे मिळण्यास प्रोत्सा-हन राहावे म्हणून एक कायदा अलीकडे झाला आहे (Interest on delayed payments to SSI ). शासनाने आपली बांधिलकी दाखविण्यासाठी कार-भाराचा मोठा बंदोबस्त केन्द्र पातळीवर आणि राज्या-राज्यांत ठेवला आहे. पूर्वी उद्योग खात्याच्या भव्य पसाऱ्यात लघुउद्योगखाते कोपऱ्यात अदबीने बसावयाचे, आता लघुउद्योगासाठी स्वतंत्र मंत्रालय केन्द्रस्थानी आहे. कर्तबगार सनदी अधिकारी, उद्योग आयुक्त, राज्या-राज्यांत आहे. जिल्ह्याजिल्ह्याला जिल्हा उद्योग केन्द्र लघुउद्योगांची दखल घ्यावयास, वास्तपुस्त करावयास आहे. उद्योग चालविण्याची मर्दुमकी मागास भागात केल्याबद्दल पॅकेज स्कीमखाली बक्षिसी, करसूट अशी प्रलोभने आहेत. लघुउद्योगांच्या आधाराच्या आणि प्रोत्साहनाच्या धोरणाच्या परिपूर्तीसाठी शासनाने कार्य-कलापाचे एवढे प्रचंड जाळे विणले आहे. लांब पल्ल्याच्या धोरणातील नेमकेपणा आणि सुसंगती शासन-व्यवहारात कोठे दिसते असे कोणी विचारले तर मी लघुउद्योगविषयक शासकीय धोरणाकडे बोट दाखवेन.

## पाव टक्केवाले आणि त्यांचे प्रशिक्षण

ही झाली जमेची बाजू. पण त्यावरून या क्षेत्रात सारे काही आलबेल आहे असा समज कोणी कृपया करून घेऊ नये. अनागोंदी, अरेरावी, विसंगती, उपेक्षा यांचे वेळोवेळी घडणारे दर्शन भयाकूल करणारे आहे. यापूर्वी उल्लेखिलेल्या धोरणातील सुसंगतीची शोभा आणि दीर्घकालचा एकवचनीपणा अवलोकून दाटलेला उल्हास या चित्राची दुसरी बाजू पाहिली की पार मावळून जातो आणि मन उदास होते. व्यवस्थेची विलोभनीयता आणि वास्तवातील व्यवहार यामधील मोठाथोरला दुरावा पाहिला की विषण्णतेखेरीज आपल्या हाती काय लागणार ?

बांडगुळीपणा, परोपजीवित्व कमी व्हावयाचे असेल तर उपक्रमींची संख्या खूप वाढली पाहिजे. लोक-संख्येत जेमतेम पाव टक्का उपक्रमी पाहिले की योजक-

स्तत्र दुर्लभः या उक्तीतील सत्य पटू लागते. उपक्रमशीलता विकासाच्या प्रयत्नांची यंत्रणा आता सज्ज झाली आहे. पण त्यातून नवे उपक्रमी मात्र म्हणावे त्या अर्थाने तयार झाल्याचे दिसत नाही. उपक्रमशीलता विकास प्रशिक्षण केन्द्रांबरोबरच शाळा–महाविद्यालये आणि परिवार संस्कृती यातून ते बाळकडू मिळाले पाहिजे. मराठी युवतींनी जोडीदार निवडताना जोडीदारातील उपक्रमीच्या अंगाला प्राधान्य देण्याचे ठरविले तरी मराठी उपक्रमशीलता विकासाच्या प्रांतात फार मोठे स्तुत्य स्थित्यंतर घडेल. होणारे उपक्रमशीलता विकासाचे कार्यक्रमदेखील फार चांगले होतात असे नाही. छंद म्हणून, कोणी वरिष्ठांनी सांगितले म्हणून, कोणी डायरी भरण्यासाठी, कोणी क्लबातली बाब म्हणून तर कोणी फॅशन म्हणून हे कार्यक्रम करतातही. पण या प्रशिक्षणाचे चार शिंतोडे अंगावर उडवून घेतलेल्या, नवजात उपक्रमी अर्भकाचे पुढे होते काय? त्याचा उद्योगघटक निश्चेपर्यंत, तो स्थिरावेपर्यंत त्याना सोबत करण्याची गरज आहे. या सोबतीचा खर्च हा नवउपक्रमी बहुधा पेलू शकणार नाही. या पेचातून मार्ग निघाला पाहिजे. उद्योग चालविण्याच्या भल्याबुऱ्या कल्पना डोक्यात घेणारे अर्धकच्चे नवे उपक्रमी तयार होणे कोणाच्या हिताचे नाही. नुसत्या नवउपक्रमीला किंवा पहिल्या पिढीच्या उपक्रमीलाच तेवढी प्रशिक्षणाची गरज आहे असे नाही. जुन्या, जाणत्या, जातिवंत, यशस्वी उपक्रमीलाही आपला थोडा वेळ प्रशिक्षणात घालविण्याची गरज आहे. यश मिळवून देणारे जुने इंधन नेहमीच कामी येईल असे नाही. नवी कोणती तत्त्वे, कोणते आचार, कोणती माहिती, कोणती तंत्रे, कोणती वृत्ती आत्मसात केली पाहिजे हे अधूनमधून शिकून घेतले पाहिजे. उपक्रमीला कमी वेळात, त्याची कामाची नेहमीची वेळ संपल्यावरच्या फावल्या वेळात, आठवड्यातील मोजक्या दिवसात, अनुभवी, यशस्वी पण परोपकारी अशा नामवंत उपक्रमींकडून पेशेवाल्यांकडून प्रशिक्षण मिळत राहिले पाहिजे. या सर्व अंगांचा विचार करून, गेल्या दहा वर्षात, पुण्याच्या मराठा चेम्बरने दोनतीनदा राबविलेला लघुउद्योग व्यवस्थापन कार्यक्रम उल्लेखण्यासारखा आहे. तसे प्रयोग जागोजाग झाले पाहिजेत. लघुउद्योग बहुधा कौटुंबिक मालकीचे असतात. तेथे आता एक पिढी जाऊन दुसरी येऊ घातली आहे. या वारशाचेही काही प्रश्न आहेत. प्रशिक्षणात या वारसाविषयक प्रश्नांची दखल घेतली जाण्यास वाव आहे. लघुउपक्रमीच्या पत्नीने काही किरकोळ कौशल्ये शिकून घेतली तर ती त्याची धंद्यातील विश्वासू साथीदार बनू शकेल. आपला उद्योग कोणत्या दशेत आहे याचेही तिचे ज्ञान ताजे राहील. हा प्रशिक्षण प्रयोग होणे आवश्यक आहे. एकंदरित, प्रशिक्षणाचा प्रश्न अजून पूर्णपणे सुटलेला नाही.

## पुरस्कार विरुद्ध नियंत्रण

आता लघुउद्योगाचा आधारवड कसा आहे तो पाहू. शासन लघुउद्योगांच्या पाठीशी राहिले आहे खरे. पण त्याबद्दलची प्रतिक्रिया मिश्र आहे. लघुउद्योगांचा पुरस्कार आणि लघुउद्योगांचे नियंत्रण अशी दोन परस्परविरोधी कामे शासकीय बनली. नोकरशाहीला नियंत्रणाचे काम आकर्षक वाटले. त्यांनी ते पराकोटीला नेले. या धिप्पाड नोकरशाहीचे लहानग्यांसाठी आणि एकंदर उद्योगविश्वासाठीच असे किचकट नियम केले की उत्पादन सोडून अवांतर बाबींसाठीच उपक्रमी तास खर्ची पडू लागले. त्यातून उपक्रमीकडे संशयानेच पाहाण्याची वृत्ती. विश्वास टाकून मोठमोठी कामे करून घेण्यापेक्षा संशयी राहून कामाला बगल देणेच नोकरशाहीला व्यवहार्य वाटते. त्यामुळे बिचारा छोटा उपक्रमी कागदबाजीच्या, सोपस्कारांच्या, सव्यापसव्याच्या जंजाळात अडकला. जंजाळ तर असे विचित्र की, एका विख्यात उद्योगपतीने पूर्वी म्हटल्याप्रमाणे एक कायदा पाळण्यासाठी दुसरा कुठला तरी कायदा चक्क मोडावा लागतो, पुन्हा असल्या पेचप्रसंगातून मार्ग काढण्यासाठी चिरीमिरी, दस्तुऱ्या आणि बिदागया! खुले आर्थिक धोरण 1991 साली आल्यापासून वरिष्ठ धोरणधुरिणांना हे जंजाळ कमी करण्याचे महत्त्व पटू लागले आहे. पण ही जाणीव खालपर्यंत काही पोहोचलेली नाही. शिवाय आकर्षक ठरणाऱ्या नियंत्रणकार्यातच गोडी निर्माण झाल्याने त्यांच्याकडील पुरस्काराचे काम धूळ खात पडले.

## संलग्नीकरण

लघुउद्योग क्षेत्रातील बहुतेक घटक सरकारचे वा मोठ्या घटकांचे पुरवठादार किंवा पूरक उद्योग आहेत. अशी कामे मिळविण्याचे आणि ती टिकवून ठेवण्याचे एक विशिष्ट तंत्र आहे. यात अवसानघात कधीही होऊ

शकतो. म्हणून काम जाण्याचा बाका प्रसंग आला तर काय करावयाचे याचा प्लॅन बी तयार ठेवावा लागतो. शिवाय छोट्या उद्योगांची अशा कामापोटीची येणी वेळेवर होतातच असे नाही. बिले वसूल करण्यास सहा–सहा महिने लागणे असे कित्येकांच्या बाबतीत घडते. फार तगादा करावा तर धंद्याला कायमचे मुकण्याचा धोका. चालत आलेले काम सोडणेही बरे नव्हे. म्हणून केन्द्र शासनाने पैसे वेळेवर न देणे, देणाऱ्याला खर्चाचे होईल अशा प्रकारचा कायदा अलीकडे केला आहे. असा कायदा करावा लागावा यावरून परिस्थिती कशी गंभीर आहे याची कल्पना येईल. या कायद्यातील तरतुदी पैसे थकविणाऱ्याला जबर चाबा बेऊ शकतील अशा नाहीत म्हणून तो सुधारावा अशी लघु उपक्रमींची मागणी आहे. येणी वसूल करण्यासाठी आता फॅक्टरिंग नामक सुविधाही उपलब्ध झाली आहे. ठराविक कमिशन देऊन येणी फॅक्टरिंग कंपनीकडे वळविली की वसुलीची जबाबदारी वटाव स्वीकारणाऱ्या कंपनीकडे; लघुउपक्रमीकडे नाही. पण हे चित्रही फार आशादायक नाही. कारण त्या वटाव स्वीकारणाऱ्या कंपनीला अंगठा दाखविला गेला की अंतिम जबाबदारी पुन्हा लघुउपक्रमीवरच. असले पुळचट फॅक्टरिंग काय कामाचे? येणे एकदा फॅक्टर झाले की त्या येणे व्यवहाराशी असलेला लघुउपक्रमीचा संबंध कायमचा संपला अशी व्यवस्था व्हावयास हवी. परदेशात ती तशी आहे. ज्याला 'फॅक्टरिंग विदाऊट रिकोर्स' म्हणतात ते येण्याची नितान्त गरज आहे. आणखी एक लक्षात घेण्यासारखी बाब ही की, उत्पादन शुल्कविषयक कायद्यानुसार सदर शुल्क माल कारखान्याबाहेर काढण्यापूर्वी लघुउद्योगास भरावे लागते. पण हे माल बाहेर काढण्यावेळी भरलेले उत्पादन शुल्क त्याला तीन, चार, सहा महिन्यांनी मोठ्या घटकांकडून मिळणाऱ्या बिलाच्या रकमेबरोबर मिळते. या रकमा लहान माणसास मोठ्या असतात. त्या इतके दिवस अडकून पडल्याने लहान माणसाची दमछाक होते. यावर उपाय म्हणजे ज्या मोठ्या कारखान्याच्या पुरवठ्याचे काम लघुउद्योगाने केले आहे त्यावरील उत्पादन शुल्क मोठ्या कारखान्यानेच भरावे, लघुउपक्रमीने नव्हे, अशी सुधारणा व्हावयास हवी.

हे छोटे प्रश्न एकमेकात गुंतलेले असले तरी ते संलग्नीकरणाचे, उद्योगातील पूरकता तत्त्वाचे प्रश्न या मथळ्याखाली एकत्रित करता येतील. उद्योग हे क्षेत्र तसे एकजिनसीच आहे. लहान विरुद्ध मोठे असे चित्र उभे करून काही चांगले साधणार नाही. मोठ्यांची कामे लहान करतात म्हणून मोठ्यांच्या यशात लहानांचा मोठा वाटा आहे. सर्वच कामात मोठ्यांनी स्वावलंबी राहण्याचे ठरविले तर वस्तू खूप महाग होण्यापलीकडे दुसरे काही साधेल असे वाटत नाही. पण अशा लहानांना आपल्याशी संलग्न ठेवण्यात मोठ्या कारखान्यांना मोलाची भूमिका बजाविता येण्यासारखी आहे. त्यांना गुलाम ठेऊन आपल्या लहरीनुसार कसेही झुगारून देण्यापासून ते त्यांच्या वाढीत आणि विकासात स्वारस्य घेण्यापर्यंत सर्व शक्यता संभवतात. त्यांच्याकडून किफायतशीर काम करून घेत घेत त्यांना सुधारणे, विकसविणे निकडीचे आहे. याबाबत साताऱ्यापासून लांब नसलेल्या एका जुन्या कारखान्याने जुन्या कामगारांना लघुउपक्रमी बनवून, त्यांना संलग्न करून त्यांची भरभराट कशी घडवून आणली ते मी जवळून पाहिले आहे. शंतनुराव किर्लोस्कर यांनी संलग्नीकरणाच्या या मोहिमेला फार मोठा विधायक हातभार लावला. खुद्द लघुउपक्रमीच त्यांच्या त्या कामाची पावती देतात. एवढे पायाभूत काम करूनदेखील आम्ही ते आमच्या हितासाठी केले, कुणावर काही उपकार केले नाहीत अशा आशयाचे विनयाचे उद्गार त्यांनी काढल्याचे सांगतात. लघुउपक्रमींना निरपेक्ष हितकर्ताच पाहिजे असे नाही. स्वहितासाठी का होईना पण लघुउद्योगांच्या विकासात सक्रिय भूमिका बजाविणाऱ्या मोठ्या कारखान्यांचे सर्वत्र स्वागत व्हावे.

लघु–उद्योगांच्या सेवकवर्गविषयक समस्याही आहेत. लघुउद्योग म्हणजे मोठ्या कारखान्यांना कुशल कामगार पुरविणाऱ्या शाळा आहेत; प्रशिक्षण विद्यालये आहेत असे म्हणतात. या कामगारांना शिकविण्यात रस घेऊन त्यांना समर्थ करणाऱ्या उपक्रमींना या कामगारांच्या उलाढालीचा पडघमही ऐकावा लागतो. कूचकामी पोराला प्रशिक्षित करून कुशल कामगार केले आणि तो लगेच मोठ्या पगाराच्या मोहापायी मोठ्या कारखान्यात गेला हे पाहून "हेच फल काय मम तपाला", असा मनस्ताप करून घेणारे लघुउपक्रमी हजारोंनी आहेत. ही सेवकांच्या उलाढालीची ब्याद टाळण्यासाठी काहींनी तांत्रिक अर्हता नसलेल्यांनाच कामावर ठेवण्यास सुरुवात केली आहे. ही चतुराई तरी

कशी म्हणावी? कारण उलाढालीचे संकट टाळावयास केलेली कारवाई गुणवत्तेच्या, दर्जाच्या सुधारणेच्या आड येणारी ठरू शकेल. म्हणून आमच्या परिचयाच्या एका यशस्वी पण अल्पशिक्षित उपक्रमीने on the job training ही संकल्पना शासनाच्या गळी उतरविण्याचा खूप प्रयत्न केला. उनाड मुलांना विद्यावेतन देऊन कामावर घ्यावे. कामगार कायद्यांनी त्याच्या आड येऊ नये. त्यांचे पुस्तकी शिक्षण स्थानिक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने (I T I) करावे अशी ती योजना होती. सर्वोच्च पातळीवरदेखील त्याचे कौतुक झाले. पण घडले मात्र काही नाही. धन जोडता जोडता उपेक्षित अल्पशिक्षितांना रोजगारावाटे मोफत तांत्रिक शिक्षण देण्याची स्वप्ने एखादा छोटा उपक्रमी रंगवू शकतो हे जितके मनोरम दृष्य आहे तितकेच त्याबाबतीत समजून उमजूनदेखील काही घडत नाही हे करुण दृष्य आहे.

## लघुतम क्षेत्राची उपेक्षा

1991 सालापासून आर्थिक आघाडीवर नवे वारे वाहू लागले आहे. त्याला सुसंगत असे लघुउद्योग धोरण प्रथमच त्या साली केंद्र सरकारने प्रसिद्ध केले. त्यात लघुतम (tiny) उद्योगघटकांसाठी आणखी आकर्षक असे वेगळे धोरण जाहीर करण्याचे आमिष होते. आता सहा वर्षे उलटून गेली, अजून ते धोरण जाहीर होतेच आहे! खरे तर लघुतम क्षेत्राचे धोरण त्वरित जाहीर होऊन त्याची अमलबजावणी होणे फार अगत्याचे होते. आमच्या लघुउद्योग क्षेत्रात 95 टक्के घटक लघुतम क्षेत्रातलेच आहेत. या श्रेणीची लघुतम घटकांची सरकारी व्याख्या पाच लाख वा कमी गुंतवणूक यंत्रसामग्रीत असलेले घटक अशी आहे. हा खरा शासकीय आधाराची गरज असलेला गाभा आहे. त्याना अनुज्ञप्तींचे (licence), ना हरकतींचे जंजाळ नसले, त्याना कर वा कामगार कायदे नसले तर सरकारचे वा समाजाचे एवढे नुकसान होत नाही. कामगार कायद्यातील जाचकपणामुळे लघुउपक्रमी एवढा धास्तावलेला आहे की जादा कामगार भरती करावी लागेल या भीतीने त्याने आपली नैसर्गिक वाढ देखील आखडती घेतली आहे. कारखाना कायदे हे आणखी एक त्याला धास्तावयाला लावणारे कलम. या विविध कायद्याखालच्या निरिक्षकांमुळे लघुउपक्रमी इतका जेरीला येतो की नको ते 'इन्स्पेक्टर राज' आणि नको तो लघुउद्योग असे त्याला वाटते.

## लघुउद्योगांवरील आक्षेप

अशा प्रतिकूल वातावरणातही लघुउद्योग वाढले. पण ते आडवेच वाढतात; उभे वाढत नाहीत अशी टीका काहीजण करतात. म्हणजेच एकच घटक मोठा करत जाण्याऐवजी दोनचार लहान लहान घटक सवलती उपटण्याच्या मिशाने काढतात. फार थोडे घटक त्यांच्या प्राथमिक शाळेपासून विद्यापीठापर्यंत पोहोचतात. टीका काहीशी खरी आहे. मग लघुउपक्रमाला मोठे व्हावेसे वाटत नाही का? वाटते. पुष्कळ मोठे होतातही. निरमा, रिलायन्स, कॅमलिन, थर्मेक्स यांचे प्रवर्तक एकेकाळी अगदी छोटेच होते. मग सगळे छोटे असे मोठे होत नाहीत या तक्रारीला काय म्हणावे? प्रत्येक मतदाराने पंतप्रधान झालेच पाहिजे असे म्हणण्यासारखे आहे. पण एका बिगरपुढारलेल्या समाजाच्या विद्याविभूषित, यशस्वी, तरूण उपक्रमीने याचा माझ्याकडे जो खुलासा केला तो विचार करावयाला लावणारा आहे. त्याचे म्हणणे असे की, घटक मोठे होत असताना मालकाला सतत बदलत्या मनोरचनेचे, बदलत्या व्यक्तिमत्वाचे राहावे लागते. पण एकाचे चार घटक करताना ही कसरत करण्याची आवश्यकता नसते. ज्याना ही कसरत नकोशी वाटते ते उभे मोठे होत नाहीत. आडवे मोठे होणे जरासे सोपेही असते. पहिल्या घटकाच्या वेळी झालेल्या चुका पुढील घटकाच्या वेळी सुधारता येतात. आणखी एक बारकावा असा की लघुउपक्रमी ही एक अभिमानास्पद परिचय आहे; ज्याच्यासाठी धडपडावे असे स्वतंत्र अस्तित्व आहे. मोठे होताना ही अस्मिता, हा स्वतः विषयीचा सार्थ अभिमान फेकून द्यावा लागतो. मग तो एखाद्याला फेकवत नसेल तर? थोडक्यात, लघुउपक्रमी मोठे होऊ शकतात, होतात, पण जे धोरण म्हणून लघु उपक्रमीच राहणे पसंत करतात त्याना तुमच्यात टाटा–बिर्ला होण्याचा दम नाही असे म्हणणे अनावश्यक कठोरपणाचे ठरेल. तरीपण एका लघुउपक्रमीच्या मेळाव्यात शंतनुराव म्हणाले ते मनन करण्यासारखे आहे. लहान राहण्यात काही फायदे आहेत हे जसे खरे तसे मोठे होण्यातही काही फायदे आहेत. मात्र ते फायदे खरोखर मोठे झाल्याखेरीज दिसत नाहीत. तेव्हा लहानांची वाढ खुंटते, या शेरेबाजीतील एकांगीपणा लक्षात घ्यावा.

## केविलवाणा अपुरेपणा

इथे वित्तपुरवठा क्षेत्रातील अधिकारी व्यक्ती उपस्थित असल्यामुळे त्याविषयी मी जरा जपूनच बोल इच्छितो. पण किती उलाढालीला किंवा किती गुंतवणुकीला किती वित्तपुरवठा याचा सर्वमान्य, निदान बँकांना मान्य असा निकष लावला तर लघुउद्योग क्षेत्राला मिळावयाला पाहिजे त्याच्या जेमतेम चाळीस टक्के वित्तपुरवठा प्रत्यक्षात मिळतो, तोही त्याची वाट खूप पाहिल्यावर, असा माझा दावा आहे. या विषयासाठी नेमलेल्या आणि नायक आयोग या नावाने ओळखल्या जाणाऱ्या तज्ज्ञांच्या समितीलाही याच्या आसपासच्या निष्कर्षापाशीच यावे लागले आहे. शंभर रुपयांचा खर्च चाळीसात भागवा असे म्हणण्यासारखे आहे. यापेक्षा कितीतरी अधिक वित्तपुरवठा मिळविलेल्या बिगरलघुउद्योग क्षेत्राची उत्पादनविषयक कामगिरी यापेक्षा भव्य नाही.

एकंदरीत, नितांत आणि केविलवाणा अपुरेपणा लघुउद्योग क्षेत्राच्या माथी मारला जात आहे. बँका त्यांच्या जवळील निधीपैकी साधारण पंधरा टक्के निधी लघुउद्योगांना कर्जाऊ देतात. योजनांतर्गत खर्च कधीही पाच टक्क्यांवर गेला नाही. सरकारी प्रोत्साहने आणि मदती यांची यादी मोठी असते. पण मुळापर्यंत गेले तर तपशील केविलवाणा असतो. 1995 सालच्या आर्थिक सर्वेक्षणात मनमोहनसिंगांनी लघुउद्योगांना दिलेल्या सवलतींची एक रकानाभर यादी दिली आहे. त्यात गुणवत्ता सुधारणारे आय एस ओ 9000 प्रमाणपत्र मिळविण्याच्या खर्चातील अर्धा भाग शासन उचलते असे म्हटले आहे. ते खरेही आहे. पण असा फायदा कितींना झाला? त्यावर्षीचा आकडा आहे शेहेचाळीस. म्हणजे 25 लाख लघुउद्योगांतील 46 जणांना गुणवत्ता सुधारण्याचे अनुदान दिले याचा डांगोरा पिटावयाचा तो किती? तीच बाब मागासलेल्या भागात उद्योग काढण्याचा पराक्रम केल्याबद्दल देण्यात येणारे आणि अर्थसाहाय्य म्हणून ओळखले जाणारे भांडवलविषयक अनुदान. ते देण्याची प्रतीक्षा यादी सातसात वर्षांची जुनी. भाववाढ जमेस धरली तर ते अनुदान आपोआपच पस्तीस–चाळीस टक्क्यांवर आलेले असते. अशा कित्येक बाबी निदर्शनास आणता येतील. सारे चुकते ते शासकीय धोरणाचे आणि कार्यक्रमाचेच, उपक्रमीचे वा त्याच्या संघाचे काही चुकतच नाही असा माझा दावा मुळीच नाही.

## नोंदविण्यासारखे विक्रम

आमचा लघु उपक्रमी त्याच्या घटकाच्या चार भिंतीआड कामाचा मोठा वाघ आहे. पण घटकाबाहेरच्या आसमंताविषयीची त्याची समज पुष्कळदा तुटपुंजी असते. शासनाची सोंड काय म्हणते आणि शेपूट काय म्हणते याची संगती कशी लावावी याचे त्याला कोडे पडते. त्यामुळे त्याचे आसमंताच्या मुद्यांशी संबंधित असलेले निर्णय चुकतात देखील. आमच्या हुशार तंत्रविशारदाला हिशोबाच्या वाहिवर मांड पक्की ठेवता येत नाही. अल्पकालीन निधी दीर्घकालीन कारणासाठी वापरण्याची गोष्ट तो बिनदिक्कतपणे व चोख समजून करतो. विश्वास टाकल्यावर भर इतका की हिशेबनिसाने आणलेले हिशोब समजून न घेता सह्या करून गोत्यात येण्याचे प्रसंग घडतात. कागदबाजीची गुंतागुंत डोक्यात घुसवून शीण आणण्यापेक्षा पाकीट देऊन प्रश्न सुटतात का याकडे त्याचा कल जाऊ शकतो. एका नामांकित पाश्चात्य देशात इंजिनिअरिंगचे उच्च शिक्षण घेतलेल्या एका तंत्रविशारदाचा घटक त्याच्या हिशेब सल्लागाराच्या आग्रहाने वर्षानुवर्षे तोटा दाखवत होते. याचा आपल्या कर्ज उभारण्याच्या शक्तीवर विनाकारण किती विपरित परिणाम होईल याची त्याला कल्पना आली नाही. पण असल्या चुका मला निरागसपणाच्या वाटतात. वर्षाला एक लाख रुपये दराने बत्तीस वर्षांत बत्तीस लाखांचे अर्थसाहाय्य हस्तगत करण्याचे चापल्य मी जसे पाहिले तसेच रोकड व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष झाल्याने तो रस्त्यावर येण्याची वेळ आल्याचेही मला दिसले. अमेरिकेतील लठ्ठ पगाराची नोकरी सोडून, भारतात छोटा घटक टाकण्याच्या खस्ता खाऊन, आपल्या उत्पादिताच्या राष्ट्रीय पेठेतील सत्तर टक्के हिस्सा पादाक्रांत करून उपक्रमशीलतेचा राष्ट्रीय पुरस्कार मिळविणारा उपक्रमीही मला आढळला. तरतूद आहे म्हणून पैसे खर्च करीत नाही. पण वेळ आल्यास तरतूद नसली तरी पैसे खर्च करण्यास मागेपुढे पाहात नाही असे तत्त्वज्ञान सुनवून, नियमबद्ध आणि रटाळ खर्चव्यवस्थापनाची रेवडी उडविणारा तरुण उपक्रमीही मला नवोन्मेष दाखविणारा वाटला. अवघ्या पाच लाखांच्या रोख पत–

पुरवठा मर्यादेमध्ये कोटी दीड कोटीची उलाढाल करणारा, शून्य व्याज खर्चावर पन्नास लाखाची पातळी गाठणारा, आपले इडली–डोसा मिक्स जगातल्या कित्येक देशात खपविणारा, कुणी आजारी पडल्यावर कुणा भल्या गृहस्थाकडून थर्मास मागवून आणावयाची संस्कृती घालवून, घराघरात नव्हे तर घराच्या खोलीखोलीत थर्मास पोहोचविणारा आणि तो पोहोचविता पोहोचविता उद्योगाच्या प्राथमिक शाळेतून माध्यमिक शाळेत जाणारा, असे विलक्षण प्रतिभेचे उपक्रमीही मला आढळत गेले. मालाचा दर्जा इतका चांगला आणि खर्चावर नियंत्रण इतके भक्कम की कुणा मोठ्या कारखान्याने सूडबुद्धीने वा अविचाराने जरी आपल्याला कटाप करावयाचे ठरविले तरी ते घडण्यास दहाबारा वर्षे लागतील. कारण असा दुसरा तयार होण्यास तेवढा वेळ लागणारच. असे डावपेच आखणाराही पाहण्यात आहे. हैद्राबादेत पुण्याच्या एका नामवंत कारखान्यास सुटे भाग तयार करून पुरविणारा एक लघु उपक्रमी मला भेटला. दर चांगले मिळतात का असे मी क्षेमकुशल विचारावे तसे विचारले. त्याचे उत्तर– "दर फार कमी असतात ते खरे, पण त्या दरातही किफायतशीर उत्पादन काढावयाचे कसे त्याचे तंत्र मी शोधले आहे." तवा तापलेला आहे हे बरोबर हेरून अगदी लहान असतानाही भांडवलाच्या सार्वजनिक विक्रीसारखे खेळ यशस्वी करणारेही पाहण्यात आहेत. या कित्येकांचे विक्रम खरे तर कुठेतरी नोंदवून ठेवावयास हवे आहेत. विस्तार भयास्तव विक्रमांची ही यादी मी येथे आटोपती घेतो.

छोट्या उद्योगाच्या क्षेत्रात धामधूम एवढी मोठी की रणधुमाळीत येईल त्या क्षणाचा विचार करावयाचा. त्याच्या पुढच्या क्षणाचा नाही अशा संस्कृतीत अडकावे लागते. त्या संकटावर मात करून दूरदृष्टीचा व्यूह अंगिकारण्याची उसंत, तसेच सगळी कामे आपण एकट्याने निपटण्याऐवजी विश्वासू आणि समर्थ सहकाऱ्याकडून पार पाडण्याचा नेम यांचा त्याला लाभ झाल्यास त्याचे उपक्रमशीलतेचे कर्तृत्व आणखी बहराला येऊ शकेल.

## नवी आव्हाने

आता लघु उपक्रमी एका अवघड चक्रव्यूहात सापडलेला आहे. या चक्रव्यूहात शिरण्याचे स्वातंत्र्य आहे, पण बाहेर पडण्याचे नाही. त्यातून स्वाभिमान राखून बाहेर पडणे अगदीच अशक्य. नुकताच अबीद हुसेन समितीच्या अहवालाचा गोषवारा जाहीर झाला आहे. त्याचे संरक्षण हळूहळू काढून त्याला मुक्त अंतराळातल्या वाऱ्यावर फेकावे असे काही धोरणधुरिणांना वाटत असावे. संपूर्ण विदेशी मालकीचे लघुउद्योग घटक भारतात निघू देण्याचा घाट घातला जात आहे. लघुउद्योगांची व्याख्या साठ लाख रुपयांच्या गुंतवणुकीवरून तीन कोटी रुपयांच्या गुंतवणुकीवर जाण्याचा मार्ग खुला होऊ लागला आहे. मोठे विदेशातले महामोठे, वामनावतार घेऊन स्पर्धेच्या रणांगणात भेटतील आणि आपणास खतम करतील अशी भीती कित्येकांना वाटत आहे. निर्बंधित अमदानीतली सुखे अनुभवून निरामय झालेल्यांना मुक्ततेच्या रानवाऱ्याचे भय वाटत आहे. चाळीस वर्षांपूर्वी त्यांचे प्रश्न जसे होते तसे ते थोड्याफार फरकाने आजही आहेत असे जुन्या लघु उपक्रमींचे म्हणणे आहे. फुटकळपणाला आता वाव नाही. ठोस आकारात या स्पर्धेत उभे ठाकावयास हवे आहे. त्यासाठी ज्या तडजोडी कराव्या लागतील, जो एकांडा शिलेदारीपणा टाकावा लागेल त्यात आपल्यातील कलंदरपणाची बूज राहील का याची शंका त्याला येत आहे. ही आव्हाने जबर आहेत. पण आव्हाने काय सर्वच काळात असतात. त्या आव्हानांतूनही तो मार्ग काढेल आणि खवळलेल्या सागरात लाटा लोटणारी, आणखी रोमांचकारक लघु उपक्रमशीलता आकारास येऊ लागेल असा मला विश्वास वाटतो.

## परिशिष्ट

### लघुउद्योग क्षेत्राची एकंदर कामगिरी

| वर्ष | घटकांची संख्या (लाख) 31 डिसेंबर रोजी | किमतींना चालू उत्पादन (कोटी रुपये) | रोजगार (लाख) | निर्यात (कोटी रुपये) |
|---|---|---|---|---|
| 1991–92 | 20.82 | 1,78,699 | 129.80 | 13,883 |
| | (6.9) | (15.0) | (3.6) | (43.7) |
| 1992–93 | 22.46 | 2,09,300 | 134.06 | 17,785 |
| | (7.9) | (17.1) | (3.3) | (28.1) |
| 1993–94 | 23.81 | 2,41,648 | 139.38 | 25,307 |
| | (6.1) | (15.5) | (4.0) | (42.3) |
| 1994–95 | 25.71 | 2,93,990 | 146.56 | 29,068 |
| | (7.8) | (21.7) | (5.2) | (14.9) |
| 1995–96 | 27.24 | 3,56,213 | 152.01 | 36,470* |
| | (8.1) | (21.2) | (4.1) | (25.5) |

* जलद अंदाज

**टीप :** कंसातील आकडे मागील वर्षाच्या तुलनेने झालेली वाढ दर्शवितात.

**स्रोत :** ECONOMIC SURVEY, 1997, पृ. 132.

□ □


# मराठी अर्थशास्त्र परिषद

**विश्वस्त मंडळ** ( 1995 – 98 )

1 डॉ. प्रफुल्ल सुळे, मुंबई
2 डॉ. रवीन्द्र स. सबनीस, मुंबई
3 श्री. किरण बाबूराव ठाकूर, बेळगाव

# आर्थिक सुधारणानंतरचा (1991 ते 1997) भांडवल बाजार*

मो. वा. पटवर्धन**

मराठी अर्थशास्त्र परिषदेने पत्रपंडित पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यानासाठी या वर्षी मला आमंत्रित केले याबद्दल मी परिषदेचा अत्यंत आभारी आहे. या व्याख्यानाचे सहआयोजन अंबेजोगाईच्या खोलेश्वर महाविद्यालयाने त्यांच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त केले आहे त्यांचेही आभार मानणे माझे कर्तव्य आहे.

पां. वा. गाडगीळ हे एक व्यासंगी पत्रकार होते तसेच अर्थशास्त्राचा त्यांनी खूप अभ्यास केला होता. स्वत: पां. वा. गाडगीळ समाजवाद व सहकाराचे खंदे पुरस्कर्ते होते. मार्क्सचा त्यांचा विशेष अभ्यास होता. 'भारताचे आर्थिक नियोजन', 'समाजवादाची वाटचाल' हे त्यांचे ग्रंथ नियोजन व समाजवादावरील त्यांची निष्ठा दाखविणारे होते. 'लोकशक्ती,' 'नवयुग', 'लोकमान्य' व 'नवशक्ती'त संपादक असताना त्यांनी आर्थिक विषयांना भरपूर महत्त्व दिले होते. अशा या केवळ पत्रपंडितच नव्हे तर अर्थपंडिताच्या दहाव्या पुण्य-स्मरण दिनाच्या दिवशी योगायोगाने मी बोलणार आहे '1991 नंतरच्या आर्थिक सुधारणांच्या संदर्भातील भांड-वल बाजार' या विषयावर. अर्थात नियोजन व समाज-वादातही भांडवल अगदी नगण्य असते असे नाही. उलट भांडवलाची साधनसंपत्ती दुर्मिळ असल्यामुळेच नियो-जनाचे महत्त्व वाढते.

मी काही भांडवलशाहीची कास जरी धरणारा नसलो आणि आजही त्यावर जोर देणार नसलो तरी आर्थिक उन्नयन व्हावयाचे असेल तर श्रमशक्तीचेच दुसरे स्वरूप जे भांडवल आहे त्याची खूप प्रचंड प्रमा-णावर गरज आहे असे अर्थशास्त्राचा आजीव विद्यार्थी म्हणून मला प्रामाणिकपणे वाटते. धनशक्ती हे संचित श्रमाचे दृश्य फळ असते हा आधुनिक अर्थशास्त्रातला महत्त्वाचा नियम आहे. मग ते श्रम आपले असोत वा दुसऱ्यांचे असोत. "Workers of the World, unite, you have nothing to lose" या पांवाना आवड-णाऱ्या घोषवाक्यापेक्षा "Financiers of the


* मराठी अर्थशास्त्र परिषद व खोलेश्वर महाविद्यालय, अंबेजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 18 एप्रिल, 1997 रोजी अंबेजोगाई येथे झालेले पत्रकार पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यान, 1997.

** भूतपूर्व अध्यक्ष, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे.

world unite. you have everything to gain through the capital employment". हे वैश्विकीकरणाची कास धरू लागलेल्या एकविसाव्या शतकाचे नवे घोषवाक्य होत आहे आणि भारताला त्याचा विसर पडून चालणार नाही. जगातील सर्व विकसित राष्ट्रांना आजच्या प्रगत स्थितीला पुढे न्यायला हे भांडवलच कारणीभूत झाले आहे. आजच्या जर्मनी व जपानबद्दल बोलताना मार्शल योजना किंवा मॅकार्थर योजनेचा विसर पडू शकणार नाही. दक्षिण आशियाई राष्ट्रांना व चीनलाही भांडवलाची कास गेल्या 20 वर्षांत मोठ्या प्रमाणात धरावी लागली आहे. भांडवलाची ही भलामण केल्यानंतर मी मूळ विषयाकडे वळू इच्छितो. भांडवल व भांडवल बाजार या शब्दाने आज जरी समभाग, दीर्घ मुदतीचे रोखे एवढ्याचा सामान्य जनतेला बोध होतो तरी तो संकुचित आहे. त्यासाठी भांडवल बाजाराची एकूण संरचना, गेल्या सहा वर्षांत त्याची व्याप्ती वाढविण्याचे झालेले प्रयत्न, भारताची एकूण गरज, भांडवल बाजाराचे आकर्षण वाढविण्यासाठी केलेल्या उपाययोजना, भांडवल बाजारातील व्यवहार व त्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानाची आवश्यकता आणि विविध संस्थांचे कार्य याचा थोडासा मागोवा घेणे इष्ट ठरेल.

भांडवल बाजाराच्या आवाक्यात विपणीय प्रपत्रे आणि अविपणीय प्रपत्रे व निधी या दोघांचा समावेश होईल. विपणीय प्रपत्रात (1) सरकारी रोखे, (2) सार्वजनिक संस्थांची बंधपत्रे, (3) युनिट ट्रस्ट, (4) इतर अन्योन्य निधींच्या मुक्तद्वार योजना किंवा पुनर्खरेदीच्या योजनांमधील युनिटे व (5) खाजगी कंपन्यांचे भाग भांडवल व रोखे यांचा समावेश होईल. खाजगी कंपन्यांचे प्राथमिक भाग भांडवल आणि ते उभारल्यावर शेअर बाजारावर नोंदले गेल्याने त्याबद्दलचे दुय्यम बाजारात होणारे व्यवहार याचाही समावेश करावा लागेल. प्राथमिक भाग वा रोखेविक्रीचेसुद्धा देशांतर्गत विक्री व समुद्रपारीय विक्री असे भाग पडतील.

अविपणीय भांडवलात बँकांच्या मुदत ठेवी, बँका व वित्तसंस्थांनी दिलेली मुदती कर्जे, टपाल कचेऱ्यांतील ठेवी, राष्ट्रीय बचतपत्रे, भविष्य निर्वाह निधी, पेन्शन निधी यांचा समावेश होईल. या सर्वांचा एक आकृतीबंध असतो, तो खालील आराखड्यावरून लक्षात येईल.



या सर्व भांडवल बाजारात, विशेषतः प्राथमिक बाजारात, ज्या ज्या घटकांची जरुरी असते त्यात कंपनीचे प्रवर्तक, संचालक, दलाल, उपदलाल रेटिंग एजन्सीज, हमीदार, विपणीकर्ते ( market makers ), निबंधक, हस्तांतरण अभिकर्ते ( transfer agencies ), प्रकल्पसेवा बँकर ( merchant banker ) यांची जरुरी असते तर दुय्यम बाजारात बदला धनको, रोखारूपी व्यवस्थापक ( portfolio managers ), अडते ( jobbers ), विक्रेते ( dealers ), फ्लोअर ब्रोकर्स हे घटक आणखी वाढतात. अन्योन्य निधीसाठी विश्वस्तांची भर पडते. या सर्व घटकांना गेल्या सहा वर्षात खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. पूर्वी हे घटक इतके नव्हते आणि होते ते इतके कार्यरत नव्हते. भांडवल बाजाराचे स्वरूप व व्याप्ती जशी वाढली तसे अनेक नवीन घटक निर्माण झाले, कारण त्यांचा उदय किंवा जन्म अपरिहार्य होता. विशेषतः रेटिंग एजन्सीज म्हणजे मूल्यांकन संस्था, विपणीकर्ते, प्रबंधक हस्तांतरण अभिकर्ते, प्रकल्पसेवा बँकर्स, रोखारूपी व्यवस्थापक यांची वाढ गेल्या दहा वर्षातील आहे.

या सर्व घटकांचा उगम स्वयंभूरित्या झाला तरी त्यांच्या कामाला गती आणण्यासाठी तसेच काही शिस्त आणण्यासाठी शासनाला गेल्या वर्षात बरीच पाउले उचलावी लागली. पण गेल्या सहा ते दहा वर्षातील स्थित्यंतरे आणि त्यासाठी शासनाने केलेले उत्तेजनात्मक प्रयत्न बघण्यापूर्वी भारतीय भांडवलाचा स्वातंत्र्योत्तर इतिहास बघणे उपयुक्त ठरेल.

1947 साली स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच भारताच्या विकासासाठी भांडवलाची व भांडवल बाजाराची जरुरी आहे हे इथल्या धुरिणांना पटले होते. समाजवादी विचारांचा राष्ट्रनेत्यांवर पगडा असूनही म्हणूनच भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा सुरुवातीपासून अंगिकार केला होता. 1947 चा भारत हा तसा अविकसित देशातीलच एक होता.

अविकसित व विकसनशील देशात उत्पन्न कमी म्हणून बचत कमी, गुंतवणूक कमी, म्हणून उद्योगधंद्यांसाठी भांडवल कमी. त्यामुळे उत्पादन कमी, रोजगार कमी, म्हणून उत्पन्न कमी असे दुष्टचक्र उभे राहते. केवळ श्रमशक्तीने ते भेदता येत नाही. भांडवलाची जोड त्या श्रमशक्तीला मिळाली तर मात्र विकासाचा वेग वाढतो. (हे तत्त्वज्ञान आता पूर्वीच्या साम्यवादी देशांनाही पटले आहे.)

मात्र विकसनशील देशांमध्ये भांडवलाची जोड श्रमशक्तीला देण्यासाठी शासनालाच पाउले उचलावी लागतात. त्यासाठी सरकारी माध्यमातून भांडवल पुरविणाऱ्या संस्था निर्माण कराव्या लागतात आणि त्या संस्थांना अर्थसंकल्पीय स्रोतांबरोबरच खाजगी क्षेत्रातील स्रोतही मिळावेत असे बघावे लागते. हे भांडवलदेखील योग्य क्षेत्रात जावे हेही सरकार बुद्धिपुरस्सर ठरविते. सरकारी उद्योगही स्वतःच उभे करावे लागतात. सरकारी वित्तसंस्था व उद्योगांचा जन्म असा होतो. 'अजन्मा जन्मासी आला' अशा पद्धतीने हे क्षेत्र कृष्णाप्रमाणे असे अवतरते. पुढे मात्र अपरिहार्यपणे त्यात शिरणाऱ्या दोषांमुळे त्याचे कंसस्वरूप होते तो भाग वेगळा! असे भांडवल भारतीय उद्योगांना दीर्घकालीन कर्जाद्वारे व कधी भांडवलाचे भाग घेऊन पुरविण्यासाठी भारतात म्हणूनच 1948 साली भारतीय औद्योगिक वित्त महामंडळाची (IFCI) स्थापना झाली. हे मंडळ स्थापन करण्यात चिंतामणराव देशमुखांचा सर्वात मोठा वाटा होता. 1945 सालीच भारतीय रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर रामनाथ झा यांना याबाबतचा एक अभ्यास करावयाला सांगितला होता आणि त्या अभ्यासाच्या पार्श्वभूमीवरच ते मंडळ स्थापन झाले. पुढे 1952 ते 1956 साली अर्थमंत्री असताना, इंपिरियल बँक ऑफ इंडियाचे 1955 साली हस्तांतरण करून भारतीय स्टेट बँकेची स्थापना करताना त्यांच्या दृष्टीसमोर या बँकेने उद्योगांना मोठ्या प्रमाणात भांडवल पुरविण्याचाच उद्देश होता. 1955 साली जागतिक बँकेचा सहभाग घेऊन भारतीय औद्योगिक पत व गुंतवणूक महामंडळाची (ICICI) स्थापनाही त्याचसाठी झाली. आयुर्विमा महामंडळाचेही गठन त्याच दृष्टीने झाले. विविध राज्यात राज्य वित्तीय महामंडळे स्थापन झाली. 1954 मध्ये राष्ट्रीय औद्योगिक विकास महामंडळ (NIDC) तर 1955 मध्ये राष्ट्रीय लघुउद्योग महामंडळ स्थापन झाले. सर्वसाधारण विमा मंडळ व तिच्या पोटकंपन्या, घरबांधणी व नागरी विकास महामंडळ (HUDCO), भारतीय औद्योगिक विकास बँक (1964), राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक,

युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया (1964) या सर्व केन्द्र शासकीय संस्थांबरोबरच सिकॉम, पिकअप, सिडको अशा राज्य पातळीवर संस्था निर्माण झाल्या. या साऱ्यांचा उद्देश अध:संरचनांच्या कंपन्यांना व आवश्यक त्या उद्योगांना भाग भांडवल व दीर्घ मुदतीची कर्जे देणे हाच होता.

देशात या वित्तसंस्था काढल्या जात असतानाच विकासासाठी विदेशी ऋण घेणेही देशाच्या हिताचे आहे हे तत्त्व सी. डी. देशमुखांनी आपल्या अर्थमंत्री पदाच्या कारकिर्दीत मान्य केले होते ते दोन कारणांनी. एक म्हणजे, नियोजनाचे सर्वमान्य उद्दिष्ट भांडवल निर्मितीत वाढ करणे हे होते. आपल्या 1954-55 च्या अर्थसंकल्पाच्या भाषणात तसे त्यांनी स्पष्ट म्हटले होते. असे भांडवल 15 ते 25 टक्के इतके विकास योजनांना पुरविणे, आणि तेही अन्य खर्च डावलून, हे विकसनशील देशांना शक्य नसते. हा विदेशी कर्जाचा विचार नंतर मागे का पडला हे कळावयाला मार्ग नाही, पण 1960 च्या पूर्वी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत प्रशांतचंद्र महालनबिस प्रतिमान मान्य झाले तेव्हा भिलई, राऊरकेला व दुर्गापूर येथील पोलाद कारखाने विदेशी वित्तीय सहभागानेच उभे केले गेले होते. असे प्रकल्प नंतर फार जरी उभे राहिले नाहीत तरी सरकारी उद्योगांचा विचार बळावला आणि अर्थसंकल्पीय मदतीतून अनेक सरकारी उद्योग उभे राहिले. अन्य देशात त्यांना खाजगी क्षेत्रातून वित्तपुरवठा झाला असता. समभाग विक्री ही त्या कारखान्यांनी जनतेला केली असती.

1969 नंतर तर बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर सरकारी रोखे बँकांकडून वैधानिक तरलता क्षमतेसाठी घ्यावयाला लावून केन्द्र शासनाने आपल्याकडे मोठी रक्कम ओढून घ्यावयाला सुरुवात केली. तीही पुरी पडणार नाही असे वाढून तुटीच्या वित्तपुरवठ्याचा व रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेण्याचा सपाटा सुरू झाला. बँका, विमा मंडळेही रोखे खरेदीसाठी पात्रीव कुरणे ठरली. राज्यांनीही त्याचे अनुकरण केले. आज शासकीय कर्जाची रक्कम कशी वाढली आहे ते तक्ता 1 मधील आकड्यांवरून कळेल. ती कर्जे भांडवल पुरविण्यासाठीच होती.

**तक्ता 1**

**सरकारी कर्जातील वाढ**

(कोटी रुपये)

| वर्षे | योजना | केन्द्र सरकारतर्फे स्थूल भांडवल उभारणी | भांडवलासाठी राज्यांना व खात्यांना मदत | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1951–56 | पहिली | 612 | 993 | 1,605 |
| 1956–61 | दुसरी | 1,444 | 2,461 | 3,905 |
| 1961–66 | तिसरी | 2,445 | 4,707 | 7,152 |
| 1966–69 | | 1,301 | 3,694 | 4,995 |
| 1969–74 | चौथी | 2,969 | 7,942 | 10,991 |
| 1974–79 | पाचवी | 5,951 | 19,980 | 25,931 |
| 1980–85 | सहावी | 14,823 | 49,645 | 64,468 |
| 1985–90 | सातवी | 31,616 | 1,01,941 | 1,33,557 |
| 1990–91 | | 8,602 | 26,456 | 35,058 |
| 1991–92 | | 9,259 | 25,906 | 35,165 |
| 1992–97 | आठवी | 75,100 | 1,81,340 | 2,56,440 |

**स्रोत :** आर्थिक सर्वेक्षण, 1996-97, पृष्ठ एस. 38.

या रकमा देशातील भांडवली जमेतून उभ्या झाल्या. प्रत्यक्ष त्यांचा भांडवल बाजाराशी संबंध नव्हता. त्यात सरकारी रोखे मोठ्या प्रमाणावर होते. आज देशाचे या अंतर्गत कर्जाशिवाय भांडवल स्वरूपातच घेतलेले बाह्य कर्जही त्या संदर्भात मोजावयाला हवे. हे बाह्य कर्जही वाढले आहे. 1980-81 साली अंतर्गत कर्ज 48,451 कोटी रुपये होते ते 1990-91साली 2,83,033 कोटी रुपयाइतके वाढले तर मार्च 1997 अखेर ते अंदाजे 6,13,208 कोटी रुपये आहे (आर्थिक सर्वेक्षण, 1996-97, पृष्ठ 22, तक्ता 5). बाह्य कर्ज इथे तक्ता 2 मध्ये उल्लेखिलेले आहे ते त्यावेळच्या विनिमय दराने रूपांतर करून घेतलेले असल्याने ते आकडे वास्तव ठरणार नाहीत. पण आपले विदेशी मुद्रा कर्ज कशा प्रकारे वाढले याचा अंदाज ते आकडे कोटी डॉलरमध्ये बघितले की येऊ शकेल. या विदेशी मुद्रा कर्जाबद्दल सविस्तर केलेले भाष्य पुढे आहे. विकसनशील

**तक्ता 2**

**भारताचे विदेशी मुद्रा कर्ज**

(कोटी डॉलर)

| वर्ष | कर्ज | वर्ष | कर्ज |
|---|---|---|---|
| 1982-83 | 2,563 | 1990-91 | 8,198 |
| 1983-84 | 2,880 | 1991-92 | 8,394 |
| 1984-85 | 3,127 | 1992-93 | 8,922 |
| 1985-86 | 3,667 | 1993-94 | 9,210 |
| 1986-87 | 4,131 | 1994-95 | 9,899 |
| 1987-88 | 4.637 | 1995-96 | 10,100 |
| 1988-89 | 5,725 | 1996-97 | उ. ना. |
| 1989-90 | 6,251 | — | — |

स्रोत : Country Profile, India, Nepal, 1989-90, 1991-92, 1996-97. E. I. U. London.

देशांना असे बाह्य कर्ज अपरिहार्य ठरत असले तरी गेल्या दहा वर्षातील आपल्याकडील वाढ डोळ्यात भरणारी आहे. गेल्या वर्षातील बाह्य कर्जाचा अधिकृत आकडा उपलब्ध नाही. पण ते अंदाजे 9,500 कोटी डॉलर आहे. आजच्या विनिमय दराने ही रक्कम रुपयात 3,30,000 कोटी रुपये होते. म्हणजे एकूण बाह्य व अंतर्गत कर्ज 10 लक्ष कोटी रुपये झाले आहे.

या सर्व रकमा अंतिम उपयोगासाठी भांडवल बाजारातच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष शिरल्या आहेत. त्यातून वित्तीय तूट फक्त वजा करावी लागेल. या स्रोतांचे बाजारात काहीतरी विपणीय स्वरूप हवे. पण भारतीय भांडवल बाजारामध्ये शासकीय रोखे तात्त्विकदृष्ट्या विपणीय असले तरी प्रत्यक्षात ते नसतात. पण त्यांचा भांडवल बाजारामध्ये वरील विवेचनावरून व शासकीय तक्त्यावरूनही समावेश करावयाला हरकत नाही. त्यानंतर सरकारी उद्योगांची बंधपत्रे धरावयाला हवीत. 1991 पर्यंत असे उद्योग स्वतःची बंधपत्रे फारशी काढत नसत. पण अर्थसंकल्पातून त्यांना भांडवल पुरविण्याचा ओघ गेल्या सहा वर्षात आटला आणि त्यामुळे त्यांना असे रोखे मोठ्या प्रमाणावर आता काढावे लागत आहेत. हे रोखे घ्यावयाला तेव्हा अप्रत्यक्षरित्या देशीविदेशी बँकांना उद्युक्त केले गेले, कारण त्यावेळेला त्यांचा खप होणे कठीण होते. याचे कारण म्हणजे त्यांच्यावरील व्याज कंपन्यांच्या रोख्यांच्या तुलनेने कमी होते. हे रोखे ज्या बँकांनी घेतले त्यांनी त्याचीच अदा केलेली किंमत पुन्हा अप्रत्यक्षरित्या आपल्याकडे दुरकानी हिशोबाप्रमाणे ठेव म्हणून ठेऊन घेतली. तीवर उत्पन्न मिळविण्यासाठी मग आडवळणाने त्यांचा शेअर बाजारात उपयोग केला गेला आणि बहुचर्चित घोटाळ्याचा त्यातून उगम झाला असा समज आहे. पण तो विषय इथे चर्चेचा नाही. अशा रकमा भांडवली बाजाराचा एक भाग ठरला एवढेच त्यातले तात्पर्य आहे. अशा रोख्यांची नक्की रक्कम किती त्याचे आकडे मला मिळाले नाहीत, पण केन्द्रीय सरकारी उद्योगातील गुंतलेल्या भांडवलाचे जे आकडे उपलब्ध आहेत ते भांडवल शासकीय भांडवल व रोख्यातून या बँकांतील किंवा वित्तसंस्थातून घेतलेल्या कर्जातूनच आले आहे हे उघड असल्याने त्यातील वाढ इथे जरूर बघता येईल. ती तक्ता 3 प्रमाणे होती.

### तक्ता 3

**सरकारी उद्योगांत गुंतलेले भांडवल**

(कोटी रुपये)

| वर्ष | भांडवल |
|---|---|
| 1960–61 | 240 |
| 1970–71 | 3,650 |
| 1980–81 | 18,230 |
| 1990–91 | 1,02,080 |
| 1992–93 | 1,39,930 |
| 1993–94 | 1,59,840 |
| 1994–95 | 1,61,310 |

**स्रोत :** आर्थिक सर्वेक्षण, 1996–97, पृष्ठ 120.

राज्य शासनांना त्यांच्या उद्योगांसाठी केन्द्राने दिलेल्या मदतीचे, कर्जाचे आकडे अन्यत्र व्यक्त होतात. त्याचा समावेश इथे केलेला नाही. सरकारी उद्योगांच्या वरील आकड्यातसुद्धा 1991 नंतरची वाढच रोख्यांच्या संदर्भात बरीचशी धरावयाला हवी. कारण शासनाच्या पूर्वीच्या कारखान्यांना जवळजवळ 100 टक्के रक्कम भांडवल म्हणून अर्थसंकल्पातून दिली गेली होती. अशा सरकारी वित्तसंस्थांच्या आकड्यांचाही विचार करताना काही रकमा दोनदा धरल्या जाण्याची शक्यता आहे. कारण एकाच्या गोळा झालेल्या भांडवलातूनच दुसऱ्यांना सम व अग्रहक भागातील गुंतवणुकीसाठी वा कर्जासाठी रक्कम दिली जात असते. भारताच्या भांडवल बाजारातून दोनदा वा तीनदा येणाऱ्या अशा रकमांची वजावट करून नक्की भांडवल बाजाराचा आवाका सांगणे तसे कठीण आहे. तो बराचसा बरोबर फक्त खाजगी कंपन्यांच्या संदर्भात भांडवल उभारणीचा विचार करताना मिळू शकेल.

खाजगी क्षेत्रात भांडवल उभारणी मोठ्या प्रमाणावर झाली पाहिजे असेच नाही तर सरकारी क्षेत्रातील वित्तसंस्था व उद्योग यानाही भांडवल उभारावयाला स्वायत्तता दिली पाहिजे हा विचार 1990–91 पासून बळावू लागला. त्याची कारणे अनेक होती. एकतर अर्थसंकल्पातून पुरेसा भांडवल पुरवठा होणे कठीण होऊ लागले आणि दुसरे म्हणजे लोकानीच बचत करून गुंतवणूक करावयाला हवी असेल तर कर कमी करा, अर्थव्यवस्था मुक्त करा, बाजाराभिमुख करा असा जागतिक संस्थांचा दबाव येऊ लागला होता. खाजगी क्षेत्रातील भांडवल उभारणीचा विचार करण्यापूर्वी विशेषतः युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया या कंपन्यांना भांडवल पुरवत होती तेव्हा तिचा आणि गेल्या दहा वर्षात राष्ट्रीयीकृत बँकांनी स्थापलेल्या व अन्य अन्योन्य निधींचा उल्लेख अपरिहार्य ठरेल. युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाची स्थापना एका स्वतंत्र कायद्यान्वये भारत सरकारने 1964 साली केली. त्याचा उद्देश लहानलहान रकमा सामान्य व्यक्तींकडून बचत म्हणून गोळा करून ती रक्कम भांडवल बाजारात आणणे हाच होता. आज युनिट ट्रस्टतर्फे एकूण भाग भांडवल कर्जे, रोखे, अन्य धनपत्रे यात सुमारे 75,000 कोटी रुपयांची गुंतवणूक आहे तर अन्य खाजगी अन्योन्य निधी, बँकांतर्फे उभारलेले फंड आणि आयुर्विमा व सर्वसाधारण विमा महामंडळाच्या अन्योन्य निधी योजनांमध्ये 20,000 कोटी रुपये गोळा होऊन अन्यत्र भांडवल पुरवठ्यासाठी वितरित झाले आहेत.

युनिट ट्रस्टची स्थापना 1964 साली झाली तरी भूतपूर्व पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंह यांनी दीर्घमुदतीचे राजकोषीय धोरण जाहीर केल्यानंतर 1987 साली स्टेट बँक, बँक ऑफ इंडिया, कॅनरा बँक, पंजाब नॅशनल बँक, वगैरे राष्ट्रीयीकृत बँकांना अन्योन्य निधी स्थापावयाची परवानगी मिळाली. त्यानंतर खाजगी क्षेत्रातील संस्थांनाही अन्योन्य निधी स्थापता आले. मार्च 1996 ला सरकारी क्षेत्रात युनिट ट्रस्ट व बँकांतर्फे 160 योजनांमधून 77,734 कोटी रुपये उभे केले गेले तर खाजगी कंपन्यांच्या 37 योजनांतून 3,288 कोटी रुपये भांडवल उभे राहिले. सर्व अन्योन्य निधींची विमा कंपन्यांच्या योजना वगळता ही एकूण 81,022 कोटी रुपयांची रक्कम समभागात, रोख्यात व अन्य वित्त प्रपत्रांत किंवा कर्जात गुंतविली गेल्याने तिचा हिशोब तिथेतिथे येतो. अन्योन निधींचा गुंतवणुकीसाठी निदशकांना कसा उपयोग होतो तेवढी मिती दाखविण्यापुरतेच या आकड्यांचे महत्त्व आहे. भारतातील भांडवल बाजाराचे स्वरूप अन्य देशांतील बाजारापेक्षा अगदी भिन्न आहे. याचे कारण तो बाजार विविध बँकांनी जरूरीप्रमाणे विस्तृत झाला आहे.

भांडवल बाजारात येणारे स्रोत हे शेवटी स्थूल राष्ट्रीय बचतीतून येत असतात, म्हणून त्या बचतीशीही आपल्याकडील भांडवलाचा संदर्भ बघितला पाहिजे. पूर्वी ही बचत अर्थक्षेत्रात फार कमी असावयाची. 1978-79 साली ती फक्त तेरा टक्के होती. 1987–88 साली ती 44 टक्क्यांवर जाऊन पोचली. तरीही त्यातील बरीच रक्कम पोस्ट व बँकांकडील ठेवी, बचत पत्रे यातच होती. विदेशी बचत किंवा स्रोत अनिवासी भारतीयांच्या राष्ट्रीयीकृत व विदेशी बँकांच्या शाखा–तील ठेवीद्वाराच होती. अन्य विदेशी गुंतवणूक 1992 पर्यंत नगण्यच होती. 1987–88 मध्ये युनिटस्, कंप–न्यांचे भाग व रोखे यातील गुंतवणूक स्थूल राष्ट्रीय बचतीपैकी जेमतेम 7 टक्के होती. विमा, भविष्य निर्वाह निधी व निवृत्ती वेतन निधी यात 26.5 टक्के रक्कम होती आणि हा स्रोतही खाजगी कंपन्यांच्या भागांत, रोख्यांत, कर्जात परावर्तित होत होता.

या सर्व परिस्थितीत 1991–92 च्या आर्थिक क्षेत्रातील दुरवस्थेमुळे अपरिहार्यपणे बदल झाला. जागतिक संस्थांनी त्या दुरवस्थेतून बाहेर पडण्यासाठी मदत करताना अप्रत्यक्षपणे दबावही आणला. कुठल्या कारणांनी का असेना 1991 हे वर्ष मैलाच्या दगडा–सारखे ठरले. त्यावेळची भांडवल बाजाराची परिस्थिती कशी होती, ती बदलण्यासाठी कायकाय प्रयत्न झाले याचा सविस्तर आढावा घेतल्यावर भांडवल बाजार आज कुठे उभा आहे, त्याच्या नवीन समस्या काय आहेत किंवा त्यात काय नवीन विचार करता येतील हे बघणे सोपे जाईल. गेल्या सहा वर्षात झालेले बदल हे संख्यात्मक होते तसेच गुणात्मकही होते. ते केवळ विविध प्रपत्रांबाबत झाले असे नाहीत किंवा संस्थांबाबत झाले असे नाही तर तत्संबंधी असणाऱ्या अनेक घटकां–बाबत देखील झाले.

फार पूर्वी भांडवल बाजारात समभाग व अत्यल्प प्रमाणात अग्रभाग यांची विक्री होत होती. पण गेल्या काही वर्षात प्रपत्रांमध्ये बरेच नाविन्य आले. परिवर्त–नीय, अपरिवर्तनीय, अंशतः परिवर्तनीय, शून्य टक्के व्याजाचे परिवर्तनीय असे रोख्यांचे प्रकार निर्माण झाले. इक्विप्रेफरन्स शेअर्स असा नवीन प्रकार रूढ होऊ बघत आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये लाभांश करमुक्त केला गेल्याने कंपन्या अग्रहक्काचे, मताधिकार नसलेले भाग काढण्याचा विचार करू लागल्या आहेत. डीप डिस्का–उंट बाँडसारखे 25 वर्षांचे बाँडस पूर्वी अकल्पनीय होते, पण ती कल्पना 1991–92 मध्ये प्रत्यक्षात आली. त्यानंतर गुंतवणूकदारांच्या गरजा लक्षात घेऊन विविध वर्षांसाठी व्याज किंवा भांडवली नफा देणारी अनेक प्रपत्रे भारतीय औद्योगिक विकास बँक व भारतीय औद्योगिक पत व गुंतवणूक महामंडळ यानी गेल्या सहा वर्षात काढली. निर्देशांकाशी संलग्न असाही एक इंडेक्स बाँड सध्या जाहीर झाला आहे.

अन्य घटकांच्या बाबतीत मागील वर्षांचे तुलना–त्मक आकडे जरी नसले तरी 1994–95 व 1995–96 या दोन वर्षांचे आकडे खूप काही सांगून जातात. प्राथमिक बाजारातील प्रकल्पसेवा बँकरांची संख्या आता 790 वरून 1,012 वर गेली तर हमीदार 36 वरून 40 झालेले दिसतात. रोखासंग्रह व्यवस्थापक 108 वरून 113 झाले तर निबंधक (registrars) व हस्तां–तरण अभिकर्ता ( transfer agent ) ही कामे कर–णाऱ्या कंपन्या 238 वरून 334 वर गेल्या आहेत. दुय्यम बाजारातील, 'सेबी' कडे नोंद झालेल्या दला–लांचा आकडा एका वर्षात 6,711 वरून 8,476 इतका वाढला. अडते (jobbers), व्यापारी (dealers), उपदलाल ( sub–brokers ), इत्यादीसंबंधी पुरेशी माहिती उपलब्ध नाही.

भांडवल पुरवठ्याच्या बाबतीत 1991 नंतर जे खूपच बदल झालेले आहेत त्यात हा बाजार वाढण्या–साठी (1) नियंत्रणे कमी करणे, (2) विनियमन वाढविणे, (3) निवेशकांना संरक्षण देणे, (4) बच–तीला व गुंतवणुकीला उत्तेजन देणे, (5) शेअर बाजा–रांची संख्या वाढविणे, (6) प्रपत्रांत विविधता आणणे, (7) अन्योन्य निधी व अन्य संस्थांची संख्या वाढविणे, (8) या सर्व घटकांची विश्वासार्हता वाढविणे, (9) अनेक स्रोत वाढविणे, (10) विदेशातूनही भांडवल आणण्यासाठी आवश्यक सुधारणा करणे आणि (11) सर्वच व्यवहारांतील पारदर्शकता वाढविणे यासाठी बरीच पाउले उचलली गेली. त्यांचा परामर्श इथे घेणे उचित होईल. ही संकलित माहिती 1991 पासून दर वर्षाच्या आर्थिक सर्वेक्षणात मिळते. 1990–91 पर्यंत आर्थिक सर्वेक्षणात भांडवल बाजाराची सविस्तर माहिती दिली जात नव्हती. फक्त शासनाकडून झालेले

भांडवली जिंदगीचे जे प्रयत्न होते त्यावर त्यात भर असावयाचा, तोही पंचवार्षिक किंवा वार्षिक योजनांच्या संदर्भातच! त्याखेरीज विदेशातून विविध स्वरुपात घेतल्या गेलेल्या स्रोतांचा त्यात उल्लेख असावयाचा. 1980–81 मध्ये असे कर्जसाहय 2,162 कोटी रुप–यांचे होते, ते 1989–90 मध्ये 5,802 कोटी रुपये झाल्याचे 1990–91 च्या सर्वेक्षणात म्हटले होते.

1992-93 च्या सर्वेक्षणात भांडवल बाजाराच्या सुधारणेसाठी एक धाडसी कार्यक्रम अंगिकारावयाला हवा असा स्पष्ट उल्लेख आहे. शेअर बाजाराच्या कारभारात प्रदीर्घ विलंब कार्यप्रणालीत पारदर्शकतेचा अभाव, तसेच शेअर्सच्या किमती कृत्रिमपणे वाढविण्याचे डावपेच आणि अंतर्गत गोपनीय माहितीवर आधारित व्यवहार या गोष्टींवर उपाय योजण्याबद्दल संकेत होते. पूर्वी कबूल केलेला पण कार्यवाहीत न आलेला 'सेबी'बाबतचा वटहुकूम त्यासाठीच 30 जानेवारी, 1992 रोजी काढला गेला होता. 1947 चा भांडवल भाग नियंत्रक कायदा रद्द केला गेला आणि भाग–भांडवल कचेरी रद्द केली. कंपन्यांना भाग भांडवल काढण्यासाठी सरकारकडे जाण्याची जरुरी नाहीशी झाली; 'सेबी'ची मंजुरी मिळाल्यावर सरळ भांडवल बाजारात जाण्याचे स्वातंत्र्य प्राप्त झाले. त्याचवेळी भागांच्या किमती व अधिमूल्यांवरची नियंत्रणेही निघाली. भांडवल बाजाराच्या शृंखला तुटण्याला अशी सुरुवात झाली. जानेवारी 1993 पर्यंत विदेशातही भांडवल उभारण्याची सुवर्ण संधी दिली गेली आणि दोन कंपन्यांनी 25 कोटी डॉलर उभारले. 'सेबी'चे अधिकार वाढविले गेले. अन्योन्य निधींची तपासणी करण्याचा अधिकार त्यात समाविष्ट होता. त्याप्रमाणे 'सेबी'ने तपासणी करून आपले अहवाल शासनाला दिले. अन्योन्य निधींसारखीच शेअर बाजारांचीही कडक तपासणी सुरू झाली. दलाल व उपदलालांच्या नोंदीची पद्धत सुरू झाल्यावर निवेशकांना आपण कुणाशी व्यवहार करतो आहोत हे कळावयाला लागले. प्राथमिक बाजारांतून भांडवल उभारताना माहिती पत्रकांमध्ये सर्व वस्तुनिष्ठ महत्वाच्या बाबी, जोखमीचे घटक व त्यावर व्यवस्थापनाचे खुलासे स्पष्टपणे दाखविण्याची जबाबदारी कंपन्यांवर टाकण्यात आली. अर्थात सिगा–रेटची जाहिरात करताना धूम्रपान करणे आरोग्यास विघातक आहे ही पाटी जशी निमिषार्धात आपल्या डोळ्यासमोरून जाते तशाच प्रकारे बारीक अक्षरातल्या जोखमीच्या बाबी केवळ वैधानिक पूर्ततेसाठी निवे–शकांच्या डोळ्यांसमोर आणल्या जातात. दूरदर्शनवरील जाहिरातीत तर हे शब्द बघण्याची स्पष्ट थट्टा आहे. पण 'सेबी'सारख्या नोकरशहांनी चालविलेल्या संस्थेकडून यापेक्षा जास्त अपेक्षिणे हे जरा जास्तच आहे.

1992–93 मध्येच प्रकल्पसेवा बँकरांसाठी आचारसंहिता सुरू झाली. मुंबई बाजाराचा वरचष्मा कमी करण्यासाठीच भारतीय औद्योगिक बँक व अन्य बँका आणि वित्त संस्थांनी राष्ट्रीय शेअर बाजाराची स्थापना करण्याचे ठरविले. अनिवासी भारतीय व समुद्रपारीय कंपन्यांना विनापरवानगी भाग किंवा रोखे द्यावयाची परवानगी भारतीय कंपन्यांना मिळाली. 'सेबी'कडे नोंदणी केलेल्या विदेशी गुंतवणूक संस्था, निवृत्त निधी, अन्योन्य निधी, निवेशन विश्वस्त संस्था, रोखासंग्रह व जिंदगी व्यवस्थापक याना भारतीय भांड–वल बाजारात गुंतवणूक करावयाची सरकारने परवा–नगी दिली. 'सेबी'च्या संचालक मंडळाचा पाया विस्तृत करण्यात आला. शेअर बाजारात फक्त अडीच तास व्यवहार होत होते त्याऐवजी तीन तासांचा काला-वधी करण्यात आला. सप्टेंबर, 1992 मध्ये लहान कंपन्यांना मुंबई व अन्य बाजारांवर नोंदणी करता येण्याइतके तीन कोटी रुपयांचे भांडवल गोळा करणे शक्य नसल्याने 'ओव्हर दी काउंटर एक्स्चेंज ऑफ इंडिया'ची स्थापना झाली. प्रत्यक्षात तिचे कामकाज 1993–94 या वर्षात सुरू झाले.

अशा सुधारणा सर्व घटकांसाठी होत असतानाच, एप्रिल 1992 मध्ये शेअर बाजारात तेजीच्या लाटा उसळल्या. रोखे व शेअर घोटाळ्यांचे प्रकरण त्यातून हलाहलासारखे वर आले. त्यामुळे त्याच्या मुळाशी वायदे बाजारातील व्यवहार असल्याने ते शक्य झाले या समजुतीखाली वायदे व्यवहारांना बंदी घालण्यात आली.

त्याचवेळी शासनालाही आपली बाजारातील कर्जे वाढवावयाची होती. म्हणून बँक रेट बारा टक्केच सांगितला गेला तरी वीस वर्षांच्या मुदतीच्या रोख्यांची विक्री करण्याऐवजी ती मुदत पंधरा वर्षांची ठरविली गेली आणि त्यावरील व्याजही 11·5 टक्क्यांऐवजी

13 टक्के केले गेले. 91 दिवस व 364 दिवसांच्या ट्रेझरी बिलांची तसेच पाच, सहा, सात व दहा वर्षांच्या रोख्यांची लिलावाने विक्री करण्यात आली. बँकांनी अडचणीच्या वेळी रोखे विकले तरी ते थोडया जास्त भावाने त्याना पुन्हा खरेदी करता यावेत म्हणून काही रोख्यांसाठी पुनर्खरेदीचा विकल्प सुरू झाला. ज्याना हा विकल्प नको होता त्याना रोख्यांवर पुनर्वित्ताची सवलत दिली गेली. ( Repurchase Options – REPOS – and Refinance ).

1991–92 पासून निर्देशांक झपाटयाने वर जाऊ लागल्यावर प्राथमिक बाजारात विक्रीला काढलेल्या भांडवलाच्या कितीतरी पट मागणी येऊ लागली. भागवाटप होण्यापूर्वीच त्यांची छुप्या अधिमूल्याने राखी बाजारात ( Gray Market ) विक्री सुरू होऊ लागली. एकाच व्यक्तीने वेगवेगळ्या नावाने भागांसाठी अर्ज टाकायचाला सुरुवात झाली. कारण भाग वाटप लॉटरी पद्धतीने करण्याची तेव्हा पद्धत होती. टाटा टिमकेन कंपनीने याबाबतीत उच्चांक गाठला. मागणीला प्रतिसाद देण्यासाठी अनेक कंपन्या भूछत्रासारख्या निघाल्या आणि त्यांच्या भागांची विक्री सहज होऊ लागली. 1990–91 मध्ये 1,105 कंपन्यांचे 12,633 कोटी रुपयांचे भाग विकले गेले. 1991–92 मध्ये 1,263 कंपन्यांनी 9,402 कोटी रुपयांचे भाग विकावयाला काढले. आर्थिक सुधारणांची गंगा सरकारी उद्योगांवरूनही गेली. बरील दोन वर्षात अनुक्रमे 31 व 20 शासकीय कंपन्या भांडवल बाजारात रोखे व भागांच्या रूपाने 6,208 व 7,061 कोटी रुपयांसाठी उतरल्या.

या बाजाराला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली ती 'क्रिसिल' व 'इक्रा' या पतमूल्यन संस्थांच्या मूल्यांकनाने! 'क्रिसिल' खरेतर 1987 मध्येच आणि 'इक्रा' 1990 साली सुरू झाली होती पण 1991 नंतर कंपन्यांच्या रोख्यांसाठी व मुदती ठेवींसाठी त्यांचे मूल्यांकन सक्तीचे झाले. वित्त संस्थांना कर्जे देण्याच्या वेळीही बँकांनी या संस्थांचे मूल्यांकन कर्जदारांनी मिळविणे सक्तीचे केले आणि भांडवल बाजारात स्टँडर्ड ॲन्ड पूर, मुडीज सारख्या भारतीय कंपन्यांचे पदार्पण झाले. स्टॉकइन्व्हेस्टची कल्पनाही जानेवारी 1992 ला स्टेट बँकेने सुरू केली आणि ऑक्टोबर 1992 पासून सर्व बँकांनी ती अमलात आणली.

1992–93 मध्ये 1,016 इश्यूज बाजारात आले आणि भांडवल बाजारात 18,690 कोटी रुपये उभे झाले. प्रत्यक्षात 'सेबी'ने मंजुरी दिलेल्या 1,236 इश्यूची रक्कम 27,194 कोटी रुपये होती. त्यापैकी सार्वजनिक विक्रीसाठी 11,450 कोटी रुपयांचे भाग व रोखे होते आणि 15,744 कोटी रुपये हक्कभागांमधून उभे राहिले. भांडवल नियंत्रक कचेरी गेल्यानंतर अधिमूल्य ठरविण्याचे स्वातंत्र्य मिळालेल्या शेकडो कंपन्यांनी मन:पूत अधिमूल्य घेऊन भागांसाठी विक्री केली आणि बाजारातील चढत्या भावामुळे हुरळलेल्या नागरी विभागातील भागधारकांनी तरीही उदंड प्रतिसाद दिला.

विदेशातून भांडवल यावे या उद्देशाने आणि जागतिक संस्थांच्या दबावाने विमा क्षेत्र खाजगी व विदेशी कंपन्यांना खुले करण्याची कल्पना त्याचवेळी मूळ धरू लागली. भारतात आयुर्विमा व सर्वसाधारण विम्याला अपरंपार वाव आहे आणि विदेशी कंपन्यांना या व्यवसायात रस आहे. राष्ट्रीयीकृत क्षेत्रातील बँकांबरोबर खाजगी बँकाही काम करीत आहेत. तेव्हा विमा क्षेत्रात त्यासाठी चाचपणी करण्यासाठी एप्रिल 1993 मध्ये मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली गेली. तिचा अहवाल आल्यानंतर अनेक वर्षे त्यावर शासन कृती करू शकले नसले तरी ते पाऊलही अप्रत्यक्षपणे भांडवल बाजाराची व्याप्ती वाढण्यासाठीच होते. मात्र सध्या वामनाचे हे तिसरे पाऊल अजून अधांतरीच आहे.

1992 च्या रोखे व भाग घोटाळ्यानंतर आणि अवाच्या सव्वा अधिमूल्याने हक्कभाग निघाल्यानंतर भांडवल बाजाराचे आकर्षण ओसरले आणि 1993 मध्ये मंदीची लाट आली. हक्कभाग व प्राथमिक भाग यासाठी ज्या आक्रमक पद्धतीने जाहिरात झाली ती बघता, जाहिरातींबद्दलही आचारसंहिता असण्याची आवश्यकता निर्माण झाली. 1984 मध्ये कंपनीची प्रथम भाग विक्री करताना शेअर बाजारावर नोंद करून घेऊ इच्छिणाऱ्या कंपन्यांसाठी त्यांच्या भांडवलापैकी किमान साठ टक्के रक्कम जनतेला विक्रीसाठी खुली असावी असा नियम केला गेला होता. त्यामागची

कल्पना विसरली जाऊन सुधारणांच्या नावाखाली प्रवर्तकांची टक्केवारी 40 वरून 75 टक्के केली. त्यामुळे जनतेला फक्त 25 टक्केच राहिले. 1992–93 मध्ये अनेक पटीने भाग विक्री झाल्यावर अनेक अर्ज परत करावे लागले हे पाहिल्यावर किमान 100 ऐवजी 500 शेअरचा अर्ज केला पाहिजे असे बंधन आले. मात्र कंपनी एका वेळी अर्जद्रव्यापोटी अडीच रुपयेसुद्धा घेऊ शकेल या नियमामुळे किमान 1,350 रुपयांचीच गुंतवणूक झाली आणि भागांचा आकडा वाढविण्यामुळे काहीच साधले नाही. याचवेळी भागांच्या मागणीच्या टक्केवारीनुसार हिस्सेराशीने (Pro-rata) भाग वाटप करावयाचा नियम नव्याने सुरू झाला आणि अन्योन्य निधी तसेच विदेशी गुंतवणूक संस्थांना विक्रीपूर्वी निश्चित रकमेचे भाग वाटप करण्याची किंवा राखून ठेवण्याची कंपन्यांना परवानगी मिळाली. (डिसेंबर, 1992 मध्ये 'सेबी'ने पहिल्या सहा विदेशी गुंतवणूक संस्थांना मान्यता दिली.) भाग भांडवलाच्या 5 टक्क्यां-पर्यंत परंतु दर कर्मचाऱ्याला जास्तीत जास्त दोनशे भाग देण्याची मुभा कंपनीला मिळाली. 1992 या वर्षात 'सेबी'ने मार्गदर्शक तत्त्वे, परिपत्रके यांचा सुकाळ सुरू केला होता. भाग धारकांना त्याचा किती फायदा झाला हे फक्त परमेश्वरच जाणे ! मात्र इतके नियम करीत असताना आणि भाग विक्रीचे पत्रक 'सेबी'ने काटेकोरपणे बघितल्याखेरीज विक्रीला परवानगी दिली जात असताना सदर कंपनीच्या आर्थिक स्थितीबद्दल, प्रकल्पाबद्दल किंवा भागांच्या किमती. अधिमूल्याबाबत 'सेबी' कुठल्याही रीतीने जबाबदार नाही असा खुलासा विक्री पत्रकात करण्याचे बंधन घातले गेले (disclamer clause). 1992–93 मध्येच अंतर्गत व्यापाराबद्दल. (insider trading) आणि दलाल, उपदलाल प्रकल्प–सेवा बँकर, रोखासंग्रह व्यवस्थापक यांच्याबद्दलची आचारसंहिता ठरविली गेली. रोखासंग्रह व्यवस्थापकां–प्रमाणेच अन्योन्य निधीबद्दलचेही नियम ठरविले गेले. बंद योजनेसाठी किमान 20 कोटी रुपये व मुक्त योजनेसाठी 50 कोटी रुपये किमतीची युनिटे असावीत, अन्योन्य निधीसाठी विश्वस्त मंडळ व जिंदगी व्यवस्थापन कंपनी असावी वगैरे बंधने आणली गेली. याखेरीज भाग वाटपाच्या वेळी 'सेबी'चा प्रतिनिधी असावा, भाग विक्रीसाठी किमान तीस केन्द्रे बँक शाखा-द्वारा असावीत, भाग नियंत्रक कचेरीच्या जुन्या नियमा-प्रमाणे अधिमूल्य कसे ठरविले गेले त्याचा खुलासा विक्री पत्रकात असावा, वगैरेबाबत नियम झाले.

दलालांनादेखील बरीच नियमावली लावण्यात आली. स्वतःचा व्यवहार व ग्राहकांचा व्यवहार यासाठी हिशेब वेगळे ठेवले जावेत आणि खरेदीविक्री व्यव–हारांची किमत व दलाली करारपत्रात वेगळी दाखवावी असे ठरले. हे करारपत्र व्यवहार झाल्यापासून 24 तासात मिळावे, दलालांनी स्वतःच्या हिशोबाचे लेखा परीक्षण करून ते 'सेबी'ला सादर करावे म्हणून निर्बंध आले.

पण याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे ठराविक किम–तीला विकण्याचे व विकत घेण्याचे बंधन घेऊ शकणाऱ्या विपणीकर्त्यांची कल्पना उदयाला आली. निष्पत्र व एकाजागी नसणारे (scripless b floorless) खरेदी-विक्रीचे व्यवहार करण्यासाठी राष्ट्रीय भाग बाजाराने संगणित्रावर पटलाधारित यंत्रणा उभारावी (ON-LINE TRADING) हेही निश्चित झाले.

1994 च्या सप्टेंबरमध्ये मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकाने अडीच वर्षांतर पुन्हा 4,640 चा उच्चांक गाठला. राष्ट्रीय शेअर बाजाराचे व्यवहार प्रत्यक्ष नोव्हेंबर 1994 मध्ये सुरू झाले. त्याचा वेगळा निर्देशांक सुरू झाला आणि गुंतवणूकदारांना आणखी एक मंडई मिळाली, पण बंतर वायदे व्यवहारांवर बंदी असल्याने बाजार पुन्हा मंदावला. 1995 च्या सुरु–वातीला वायदे बाजाराऐवजी पर्याय व भविष्यकालीन पद्धती (options & futures) सुरू करण्याचे पहिले पाऊल म्हणून एक वटहुकूम काढला गेला. पर्याय व भविष्यकालीन पद्धतीला दलालांचा विरोध आहे तर वायदे बाजाराला 'सेबी'चा विरोध आहे. गुंतवणूकदारांची स्थिती मात्र 'आई जेवू घालीना, बाप भीक मागू देईना' अशी झाली आहे. 'सेबी'च्या तर्फे समित्या, सभांमध्ये ते गुऱ्हाळ गत दोन वर्षांवर चालू आहे. डिसेंबर, 1993 पासून बदला पद्धती बंद झाल्यानंतर भागांचे प्रत्यक्ष हस्तां–तरण व विक्रयमूल्यप्रदान (delivery & payment) ही पद्धती चालू आहे. मार्च 1994 ला ठराविक 'अ' गटातील भागात व्यवहार पुढे ओढण्याचे थोडे सुधारित नियम आले आहेत. नवीन 'ब' गट रोखीचा गट म्हणून झाला आहे. त्यातही आता ज्या भागांचे

जास्त व्यवहार होतात त्यांचा 'ब 1' असा गट करण्यात आला आहे.

1994–95 मध्येच उपग्रहांच्या माध्यमातून तेरा शहरात राष्ट्रीय बाजाराचे सदस्यत्व दिले गेले. राष्ट्रीय शेअर बाजाराचे व्यवहार वाढावेत म्हणून बँकांनी याच बाजारात रोख्यांचे व्यवहार केले पाहिजेत अशी सक्ती केली गेली. ब्रेबॉर्न स्टेडियम असताना मुंबईत जसे वानखेडे स्टेडियम उभारले गेले तोच प्रकार मुंबई शेअर बाजार शंभर वर्षांपेक्षा जास्त काल अस्तित्वात असूनही राष्ट्रीय शेअर बाजाराबाबत अवलंबिला गेला. आता मात्र तो स्थिरावला आहे आणि 525 शेअरचे व रोख्यांचे व्यवहार तिथे होतात. राष्ट्रीय बाजाराचा स्वतःचा निर्देशांकही केला गेला आहे. याचवेळी विदेशी गुंतवणूक संस्थांना महत्त्व दिले गेले. जानेवारी, 1995 पर्यंत 286 विदेशी गुंतवणूकदार संस्थांना 'सेबी' तर्फे नोंदणीपत्र दिले गेले. अनिवासी भारतीयांना इथे गुंतवणुकीसाठी रिझर्व्ह बँकेची परवानगी लागत होती तीही त्यावेळी काढून टाकली गेली.

1995-96 मध्ये सर्व वित्तपत्रांच्या बाजारातील उपसंस्थांची भांडवलाची पर्याप्ती ( adequacy ) 'इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ सिक्युरिटीज कमिशन्स' च्या मापदंडानुसार वाढविली जाण्याबाबत विचार झाला आणि 1957 च्या 'सिक्युरिटीज कॉंट्रॅक्टस् (रेग्युलेशन) रूल्स' मध्ये सुधारणा करून कंपन्यांना शेअर बाजारात सदस्यत्व द्यावयाचे ठरले. मर्यादित जबाबदारी व कंपनीकरण यामुळे व्यवसायात पुरेसे भांडवल घालण्याबद्दल दलालांना आता उत्तेजन मिळाले आहे. 1997–98 च्या अर्थसंकल्पात खाजगी दलाल जर कंपनीकरण करणार असतील तर त्या भांडवलावर भांडवली नफा कर एकदा लावला जाणार नाही ही सवलत देण्यात आली आहे. अशा कंपनीच्या संचालक मंडळावर अभारतीयसुद्धा येऊ शकतील. प्रत्येक शेअर बाजारातील भांडवलाची अट पुरी केल्यास एका कंपनीला अनेक शेअर बाजारात सदस्यत्व घेता येईल. या सवलतीचा फायदा अनेक विदेशी वित्तपत्र संस्थांनी घेऊन भारतातील दलाली कंपन्यांत आपली गुंतवणूक वाढविली. मार्च, 1995 ते डिसेंबर, 1995 या 9 महिन्यांत कंपनी दलालांची संख्या 143 वरून 616 वर गेली आहे. तसेच सर्व शेअर बाजारांवरील दलालांना 30 जून, 1996 पूर्वी विमा उतरण्याबद्दलचेही बंधन घातले गेले.

'सेबी' ने आग्रहणाबाबतही ( take-over ) काही मार्गदर्शक तत्त्वे नोव्हेंबर, 1994 मध्ये घातली आणि त्याचा पुनर्विचार करण्यासाठी नोव्हेंबर, 1995 मध्ये न्यायमूर्ती भगवती यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली तर भागांचे हस्तांतरण त्वरित कसे होईल याचा विचार करण्यासाठी 1996 मध्ये चंद्रशेखरन समिती अस्तित्वात आणली गेली. तिचा अहवाल व शिफारशी नुकत्याच प्रसिद्ध झाल्या असून 'सेबी' त्यावर विचार करीत आहे. पण हे चालू असतानाच 'सेबी' अन्य क्षेत्रातही काही पाउले या वर्षात टाकत होती. विशेषतः 1995–96 आणि 1996–97 या वर्षात भांडवल बाजारातील मरगळ पाहून नवीन प्राथमिक भाग विक्रीसाठी आणखी नियम करण्यात आले. निवेशकांना जास्त संरक्षण देण्याचा त्यात उद्देश होता. त्याचबरोबर भांडवल बाजाराला नाणे बाजाराची जोड देण्यासाठी रिझर्व्ह बँकेने एप्रिल व जुलै, 1996 मध्ये देशातील बँकांच्या एक वर्षापेक्षा अधिक मुदतीच्या कायम ठेवींवरील व अनिवासी भारतीय यांच्या दोन वर्षे ठेवींवरील व्याज दरांची नियंत्रणे काढून टाकली. नाणे बाजारातील अन्योन्य निधीमध्ये कंपन्यांना जाण्यास परवानगी दिली. विकास वित्त संस्थांना कर्जरोख्यांचे वाटप होण्यापूर्वी ती रक्कम वापरावयाला परवानगी दिली. नवीन प्राथमिक भाग विक्रीसाठी पात्रता नियम ठरविण्यात आले. तीन वर्षे सतत लाभांश दिलेले असावे अशी अट कारखानदारी व्यवसाय करणाऱ्या व सेवा कंपन्यांना भाग विक्रीसाठी घालण्यात आली. उत्पादन कंपन्यांनाही ही अट घातली असली तरी ती पाळता येत नसेल तर तिच्या भाग विक्रीचा प्रकल्प सरकारी वित्त संस्थेने किंवा अनुसूचित व्यापारी बँकेने मूल्यमापन केलेला असावा आणि त्यापैकी किमान 5 टक्के भाग घ्यावयाचे किंवा कर्ज द्यावयाचे कबूल केलेले असावे ही प्रतिअट घालण्यात आली. अन्योन्य निधीबाबतही एक चर्चा पत्रिका टाकण्यात आली. जून, 1996 मध्ये यूरो इश्यूजसाठी नवी मार्गदर्शक तत्त्वे आणली गेली. बँका, वित्तसंस्था व ज्या बँकेतर वित्तसंस्था रिझर्व्ह बँकेकडे नोंदल्या गेल्या आहेत त्यांना 'ग्लोबल डिपॉझिटरी रिसिटस्' काढण्याची परवानगी देण्यात आली. स्टेट बँकेने त्या–

तक्ता 4

[14] शेअर बाजाराची प्रगती

| तपशील | 1990 | 1991 | 1992 | 1993 | 1994 | 1995 | 1996 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 मुंबई शेअर बाजारातील निर्देशांक (1978-79=100) | 783 | 1,168 | 4,285 | 2,280 | 3,779 | 3,226 | 3,367 |
| 2 मुंबई बाजाराचे बाजार मूल्य (कोटी रु.) | 75,300 | 1,10,000 | 1,94,400 | 1,88,500 | 2,70,000 | 4,33,100 | 4,71,000 |
| 3 स्थूल राष्ट्रीय उत्पादिताशी टक्केवारी | 17 | 21 | 32 | 27 | 31 | 47 | 43 |
| 4 नोंद झालेल्या कंपन्या | 6,100 | 6,200 | 6,500 | 7,000 | 7,800 | 9,000 | 9,300 |
| 5 उभारलेल्या भांडवलाची रक्कम (कोटी रु.) | 12,300 | 11,300 | 14,500 | 29,800 | 39,600 | 48,800 | 27,400 |
| 6 मुंबई बाजारातील वर्षाची उलाढाल (कोटी रु.) | 29,400 | 36,000 | 71,800 | 45,700 | 84,500 | 67,700 | 50,100 |
| 7 स्थूल राष्ट्रीय उत्पादित (कोटी रु.) | 4,56,800 | 5,33,500 | 6,16,800 | 7,05,300 | 8,01,000 | 9,45,600 | 11,00,000 |
| 8 डॉलर-रुपया सरासरी विनिमय दर (रुपये प्रतिडॉलर) | 17 | 18 | 25 | 29 | 31 | 31 | 33 |

प्रमाणे आपल्या 'ग्लोबल डिपॉझिटरी रिसिटस्' काढल्या. पूर्वी परवानगी दिलेल्या उपयोगांखेरीज 'ग्लोबल डिपॉझिटरी रिसिटस्'ची रक्कम संयुक्त प्रकल्पातील गुंतवणुकीत किंवा मूळ कंपनीच्या भारतातील शंभर टक्क्यांच्या पोटकंपनीत गुंतवावयाला परवानगी दिली गेली. विदेशी मुद्रेतील परिवर्तनीय रोख्यांच्या (FCCB) रकमेच्या उपयोगावरील निर्बंधही शिथिल केले गेले. तीन वर्षांच्या ट्रॅक रेकॉर्डची अट अध:संरचनेतील ऊर्जानिर्मिती, दूरसंचार, नैसर्गिक वायू व अशोधित तेल उत्खनन व शुद्धीकरण, बंदरे, विमानतळ व महामार्ग अशा प्रकल्पांसाठी काढून टाकली गेली.

या अनेक घटकांबाबतच्या सुधारणांचा परिणाम भारतातील कंपन्यांच्या भांडवल उभारणीवर नक्कीच झाला. भारतातील खाजगी कंपन्या 1990 पर्यंत जनतेला विक्रीसाठी फार मोठ्या प्रमाणात भांडवल काढत नव्हत्या. एकतर बँका, विमा महामंडळे, युनिट ट्रस्ट, वगैरेतर्फे कर्जे व भागांची हमी किंवा खरेदी या स्वरुपात त्यांची गरज भागत होती, तर दुसऱ्या बाजूने शेअरमधील गुंतवणूक फायदेशीर ठरते असा गुंतवणूकदारांमध्ये विश्वास निर्माण झाला नव्हता. 1990 च्या आधी फक्त पाच वर्षेच मागे डोकावले तरी 1985 मध्ये 14 शेअर बाजारात नोंदलेल्या कंपन्यांची संख्या 4,344 होती, त्यांच्या विविध इश्यूंची संख्या 6,714 होती आणि त्यांचे बाजारमूल्य 21,077 कोटी रुपये होते. हे 14 शेअर बाजार मुंबई, कलकत्ता, मद्रास, दिल्ली, अहमदाबाद, हैद्राबाद, इंदूर, बेंगलोर, कोचीन, पुणे, कानपूर, लुधियाना, गुवाहाटी व मंगलोर इथे होते. 1990 नंतरची प्रगती तक्ता 4 प्रमाणे आहे.

तक्ता 4 मधील आकडे हे भारतातील भांडवल उभारणीबद्दल आहेत. त्याबरोबरच खाजगी कंपन्यांना विदेशांत जी. डी. आर. व ई. सी. बी. या दोन मार्गांनी 1992–93 पासून भांडवल उभारता आले आहे. भारतीय कंपन्यांना ग्लोबल डिपॉझिटरी रिसीटस्द्वारा भांडवल विक्री करण्याची परवानगी दिली गेल्यावर रिलायन्स इंडस्ट्रीजने मे 1992 मध्ये 15 कोटी डॉलरची पहिली विक्री केली. पाठोपाठ नोव्हेंबरमध्ये ग्रासिमचा 9 कोटी डॉलरचा इश्यू निघाला. त्यानंतर अरविंद मिल्स, बजाज ऑटो, अशोक लेलँड, बॉम्बे डाईंग, बी. एस. ई. एस., सेंचुरी टेक्स्टाइल्स, हिंडाल्को, इंडियन रेयॉन, आय. सी. आय. सी. आय., लार्सन टुब्रो, रणबक्षी, टेल्को, स्टेट बँक अशा अनेक नामवंत कंपन्यांनी ऑक्टोबर 1996 पर्यंत जवळजवळ 543 कोटी डॉलरच्या जी. डी. आर. काढल्या. आय. सी. आय. सी. आय. ने 2·5 टक्क्यांचे बॉंडही काढले तर महिंद्र महिंद्रने 5 टक्के इतके जास्त व्याज जुलै 1996 मध्ये दिले होते. जुलै 1993 पासून जुलै 1996 पर्यंत 11 कंपन्यांनी 103 कोटी डॉलरची विदेशी व्यापारी कर्जे (ECB) काढली होती. रिलायन्सने तर अलीकडेच 100 वर्षांच्या एका बॉंडसाठी यशस्वी बोलणी केली आहेत. भारतीय कंपन्यांच्या ग्लोबल डिपॉझिटरी व यूरो इश्यूंचा प्रवास तक्ता 5 प्रमाणे होता.

याखेरीज अनेक बहुउद्देशीय कंपन्यांनी इथल्या भांडवलातील आपली टक्केवारी वाढविली. 1992-93 पासून अशा कंपन्यांनी अनेक ठिकाणी 74 टक्क्यांपर्यंत भांडवल वाढविले. त्याचवेळी विदेशी कारखानदारी संस्थांना 100 टक्के मालकीची पोटकंपनी काढण्याची मुभा मिळाली आणि केवळ गुंतवणूक करणाऱ्या संस्थांना भारतीय कंपन्यांत 24 टक्क्यांपर्यंत व बँकांत 20 टक्क्यांपर्यंत रक्कम गुंतविता येऊ लागली. ही मर्यादा यंदाच्या अर्थसंकल्पात तीस टक्क्यांपर्यंत नेली आहे. इतक्या सवलती दिल्या जाऊनही त्यामानाने विदेशी भांडवल आकर्षित होत नाहीय याचा मात्र विचार होत नाही. त्यांना जी क्षेत्रे पाहिजे आहेत ती जर मिळाली नाहीत किंवा भांडवलावर करोत्तर 15 वा 16 टक्के प्रत्याय मिळाला नाही तर विदेशी गुंतवणूकदार येणार नाहीत. "न वा अरे सर्वस्य कामाय सर्वं प्रियं भवति। आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति" हा विचार भांडवल बाजारासही असणारच हे उघड आहे.

जी. डी. आर. व यूरो इश्यूंचा एक नवीन भांडवल स्रोत म्हणून इथे उल्लेख केला आणि त्यातील प्रगतीही बघितली तरी भारतीय भांडवल बाजार हा इथल्या निवेशामुळेच गेल्या सहासात वर्षांत वाढला आहे. भांडवल बाजारातील खाजगी क्षेत्राचा विचार करताना प्राथमिक बाजार व दुय्यम बाजार यांच्यावरच रोख होता. पण 1995 च्या जूनपासून प्राथमिक बाजारातील निशापलायन करणाऱ्या प्रवर्तकांचा कटुतर अनुभव गुंतवणूकदारांना आल्यावर निश्चित व्याज–

### तक्ता 5

### भारतीय कंपन्यांच्या ग्लोबल डिपॉझिटरी रिसिटस् व यूरो इश्यू

(कोटी डॉलर)

| वर्ष | ग्लोबल डिपॉझिटरी इश्यू | | यूरो इश्यू | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम |
| 1992–93 | 2 | 24.0 | – | – | 2 | 24.0 |
| 1993–94 | 17 | 159.7 | 9 | 89.6 | 26 | 249.3 |
| 1994–95 | 28 | 205.0 | 2 | 10.2 | 30 | 215.2 |
| 1995–96 | 7 | 62.7 | – | 122.3 | 7 | 185.0 |
| 1996 (एप्रिल ते ऑक्टोबर) | 5 | 91.6 | 2 | 22.5 | 7 | 114.1 |
| एकूण | 59 | 543.0 | 13 | 244.6 | 72 | 787.6 |

स्रोत : STATISTICAL OUTLINE, 1996–97, Tata Press.

रूपाने उत्पन्न देऊ करणाऱ्या रोखे व बाँडचे आकर्षण निर्माण झाले. सरकारी रोखे फारसे व्यक्तिश: घेतले जात नव्हते. पण वित्तसंस्था व कारखानदारीच्या कंपन्यांच्या रोख्यांची गेल्या दोन वर्षांत चलती झाली आहे. विशेषत: खाजगी क्षेत्रातील कंपन्यांनी रोख्यांवर भर देताना खाजगी स्वरुपाचे वाटप (Private placement) मोठ्या प्रमाणावर केले. कारण बँकांनी आपले व्याजाचे दर भरपूर वर नेले. गेली दोन वर्षे रिझर्व्ह बँकेने उत्तम व्याज दर (prime lending rates) कमी करण्याबाबत बँकांना सांगितले तरी प्रत्यक्षात 19 ते 22 टक्के वार्षिक दरच बहुतेक कर्ज–दारांच्या डोक्यावर बसले होते. ते देण्यापेक्षा उत्तम व्यवस्थापन व उत्पादनामुळे ख्यातनाम असलेल्या कंपन्यांचे 14 ते 17 टक्के दरांचे रोखे घ्यावयाला निवेशक पुढे येऊ लागल्यावर ते काढणे कंपन्यांना इष्ट वाटले. त्यामुळे बँकांवर अवलंबून राहणे व विलंबानेच कर्ज मिळविण्यासाठी मिनतवारी करणेही जरुरीचे राहिले नाही.

त्यात फक्त एकच अडचण निवेशकांच्या दृष्टीने होती आणि अजूनही आहे. ती म्हणजे या कर्जरोख्यांची खरेदीविक्री बाजारात तितकीशी सुलभ नाही. त्यामुळे रोखतेचा अभाव ही बाब गुंतविल्यानंतर लक्षात येते. तारण घेऊन त्यावर कर्ज द्यायलाही बँका तयार नसतात. ज्यांना मोठी रक्कम गुंतवून तीवरील उत्पन्न नंतर वाटावयाचे आहे असे अन्योन्य निधीच यात निवे–शनासाठी पुढाकार घेत असतात. कर्जरोख्यांचा बाजार वाढावा म्हणून शासनाने विदेशी गुंतवणूक संस्थांना दोन वर्षांपूर्वी इश्यूच्या 20 टक्क्यांपर्यंत रक्कम गुंत–विण्याची परवानगी दिली होती. 1997–98 च्या अर्थसंकल्पाच्या सुमारास ती मर्यादा 100 टक्के केली गेली आहे. मात्र रोखतेचा अभाव व दीर्घ मुदतीनंतर भारतीय कंपन्यांची सुस्थिती किती असेल याबद्दलची थोडी साशंकता यामुळे विदेशी गुंतवणूक संस्थांनी आपला रोख अजून रोख्यांकडे वळविलेला नाही.

भारतीय वित्तसंस्थांनी मात्र रोख्यांच्या आकर्ष–णाचा खूप फायदा घेतला आहे. मार्च 1992 ला संपलेल्या वर्षात एकूण बाँड व रोखे यांची विक्री 30,000 कोटी रुपयांची होती. त्यातील सरकारी संस्थांची रक्कम 20,000 कोटी रुपये होती. 1992 साली केन्द्र शासनाचे रोखे व राज्य शासनांचे रोखे अनुक्रमे 78,000 व 22,000 कोटी रुपयांचे होते. म्हणजे सर्व रोख्यांची एकूण बाजारपात्र रक्कम

1,30,000 कोटी रुपये होती. मार्च 1996 ला संपलेल्या वर्षात सरकारी क्षेत्रातील रोखे 45,000 कोटी रुपये, खाजगी क्षेत्रातील 16,000 कोटी रुपये, केन्द्र शासनाचे रोखे 1,70,400 कोटी रुपये व राज्य शासनाचे 38,000 कोटी रुपये असे बाजारपात्र रोखे 2,69,400 कोटी रुपयांचे होते. त्यातील सरकारी रोखे वजा केले तरी समभागांच्या आजच्या बाजारमूल्यांच्या ही रक्कम जवळजवळ 14 टक्के होते. त्यामुळे या बाजारातील रोखता वाढावी असे प्रयत्न वाढवाव्याला हवेत. ही रोखता वाढली नाही याचे कारण आपल्याकडे व्याज दर सतत वाढत होते म्हणून रोख्यांमध्ये वटाव (discount) निर्माण होत होता तसेच भागांच्या मागणीच्या तुलनेत त्यांचा पुरवठाही कमी होता. दलालांनीही या बाजाराला संघटन देण्याचा प्रयत्न केला नाही. भांडवल बाजारातील कर्जपत्रांच्या या घटकातील ऐपतदारी (solvency) मात्र केवळ आपल्याकडेच कमी आहे असे नाही. जगातील अन्य विकसनशील बाजारातही समभागांपेक्षा रोख्यांची रक्कम कमी असते आणि तिथे मोठ्या प्रमाणावर व्यवहार होत नाहीत. 1994 सालासाठी उपलब्ध असलेल्या जागतिक बँकेच्या आकडेवारीनुसार आपल्या शेजारी राष्ट्रांपैकी काहींची स्थिती तक्ता 6 प्रमाणे होती.

**तक्ता 6**

**भागांचे व बाँडचे बाजारमूल्य**

(कोटी डॉलर)

| देश | भागांचे बाजारमूल्य | बाँडचे बाजारमूल्य |
|---|---|---|
| चीन | 4,400 | 3,300 |
| इंडोनेशिया | 4,700 | 900 |
| मलेशिया | 19,900 | 4,000 |
| फिलिपाइन्स | 5,600 | 2,500 |
| थायलंड | 13,200 | 1,400 |
| भारत (मार्च 96 साठी) | 15,700 | 7,500* |

* सार्वजनिक व शासकीय कर्जरोखे धरून

रोख्यांच्या बाबतीत गेल्या सात वर्षांत केवळ अपरिवर्तनीय रोख्यांऐवजी पूर्ण परिवर्तनीय रोखे, अंशतः परिवर्तनीय रोखे, अग्रहक्काचे कालांतराने समभागात रूपांतर होणारे भाग असे अनेक प्रकार गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी काढण्यात आले. भारतीय औद्योगिक विकास बँक, आय. सी. आय. सी. आय., स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया अशा सरकारी व शासकीय भांडवल असलेल्या वित्तसंस्थांनीही 1991 पासून 5 वर्षे मुदतीपासून 25 वर्षांपर्यंत मुदतीचे नियमित उत्पन्न देणारे किंवा आज भरपूर वटाव दराने कमी किमतीला 2,500 रुपयांला पंचवीस वर्षांनंतर एक लाख रुपये देणारे फ्लेक्सिबाँड काढले. ही रक्कम त्या संस्थांद्वारे कंपन्यांना कर्ज देण्यासाठी वा भाग भांडवल / रोख्यांत घालण्यासाठी वापरली गेल्याने त्यांचे द्विगणन होईल म्हणून आकडेवारी जरी दिली नाही तरी त्यामुळे भांडवल बाजाराला आणखी एक मिती मिळाली एवढेच इथे सूचित करावयाचे आहे; 1997 साली तर अशा संस्था जवळजवळ 10,000 कोटी रुपयांचे असे बाँड काढणार आहेत. याशिवाय रोख्यांद्वारे रकमा आकर्षित करून आपापल्या प्रकल्पांसाठी कोकण रेल्वे, कृष्णा जल योजना, सरदार सरोवर निगम, नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन, वगैरेंनीही रोखे व भांडवल बाजारात पदार्पण केले आहे.

रोख्यांच्या बाजाराला गेल्या तीन वर्षांत जास्त उठाव आला आहे. यंदा तर रिझर्व्ह बँकेने घटत्या व्याज दराचे धोरण सुरू केल्याने गुंतवणूकदार तिकडे जास्त आकर्षित होईल. मात्र 1994 च्या शेवटच्या तिमाहीपूर्वी प्राथमिक भाग भांडवल विक्रीची चलती होती. विशेषतः भांडवल बाजारात 1992 व 1994 मध्ये भरपूर तेजी आल्याने व्यक्तिगत गुंतवणूकदारांनी त्यात खूप गुंतवणूक केली. परिणामी पुरवठा कमी पण मागणी जास्त झाल्याने कंपन्यांनी अधिमूल्य खूप मोठ्या प्रमाणात आकारून समभाग विक्रीला काढले होते. पण 1995 पासून बाजारात घसरगुंडी सुरू झाल्यावर अनेक शेअरांची किंमत 20 पासून 90 टक्क्यांपर्यंत घसरली. त्यामुळे प्राथमिक बाजार आता रोडावला आहे. 1992–93 पासूनच्या चार वर्षांत अनुक्रमे 1,039, 1,278, 2,024 व 1,100 इश्यूंची विक्री झाली होती आणि 30,364, 38,394, 44,793 व 13,000 कोटी रुपये जमा झाले. प्रपत्रांच्या वर्गीकरणानुसार त्यांचे आकडे तक्ता 7 प्रमाणे आहेत.

## तक्ता 7

### रोख्यांच्या प्रपत्रानुसार वर्गीकरण

| वर्गीकरण | 1992 –93 | 1993 –94 | 1994 –95 |
|---|---|---|---|
| समभाग | 20,286 | 23,379 | 33,357 |
| परिवर्तनीय रोखे | 7,571 | 8,397 | 8,021 |
| अपरिवर्तनीय रोखे | 1,504 | 3,198 | 2,810 |
| सरकारी उद्योगांचे बाँड | 1,003 | 3,420 | 605 |
| वरीलपैकी– | | | |
| खुली विक्री | 17,024 | 19,233 | 24,605 |
| हक्कभाग | 11,735 | 12,962 | 11,155 |
| खाजगी निवेशन | 1,605 | 6,199 | 9,033 |
| **क्षेत्रनिहाय** | | | |
| खाजगी क्षेत्र | 19,221 | 20,837 | 33,437 |
| सरकारी क्षेत्र | 1,473 | 10,064 | 3,113 |
| सरकारी अन्योन्य निधी | 9,700 | 6,054 | 6,980 |
| खाजगी अन्योन्य निधी | – | 1,439 | 1,263 |

* हा निबंध तयार करण्याच्या वेळी 1995–96 चे आकडे उपलब्ध नव्हते.

भांडवल बाजाराच्या भारतीय संदर्भात मी एक वेगळा मुद्दा मांडू इच्छितो. भांडवल बाजार हा दीर्घ मुदती भिडवली व प्रकल्प उभा करण्यासाठी असतो अशी कल्पना आहे. त्यामुळे बँकांकडून वस्तूसूची (inventory) ठेवण्यासाठी वा उधारी विक्रीची वसुली होण्यापोटी जी कर्जे दिली जातात ती भांडवल बाजाराच्या संकल्पनेत बसत नाहीत. पण भारतात गेली कित्येक वर्षे अधिकर्ष (overdraft) व (cash credit) ची विशेष पद्धती अमलात आहे. (त्यातील बराच भाग एक विशिष्ट– तीन वा सहामाही–कर्जात रूपांतरित करण्याचे धोरण रिझर्व्ह बँकेने गेली दोन वर्षे अमलात आणले असले तरी ते कृत्रिम व वरकरणी पतपुरवठा धोरणात सुधारणा केल्याचे दाखविण्यासाठीच आहे हे उघड आहे.) त्यामुळेच औद्योगिक विकास वाढत असल्याने या रोख पतीच्या रकमा कधीच फेडल्या जात नाहीत. उलट वाढत्या विक्रीच्या अनुषंगाने त्या वाढतच असल्याने दीर्घमुदती कर्जे वा रोख्यांपेक्षाही त्या कर्जांचा प्रत्यक्ष उपयोग भांडवल बाजारासारखाच इथे होतो. टंडन वा चोरे समितीत कारखान्यांच्या किमान, अपरिहार्य वस्तूसूची व उधारीसाठी भाग भांडवलाचाच उपयोग करावा अशी कल्पना धरून बँकांच्या कर्जाबाबत मार्गदर्शक तत्त्वे देण्यात आली होती. कमाल अनुज्ञेय बँक ऋण पुरवठ्याचे (maximum permissible bank finance) तत्त्व त्याच्या पुढची पायरी म्हणून काही वर्षे अमलातही आले होते. पण इतके होऊनही भारतातील कंपन्यांना जो कर्जपुरवठा झाला त्याचे स्वरूप भांडवल बाजाराचेच आहे हे मान्य व्हावे हा माझा मुद्दा आहे. तो ग्राह्य धरला तर भारतीय बँक पद्धतीने आज केलेला 3,40,000 कोटी रुपयांचा कर्जपुरवठा किंवा निदान त्यातील 70 ते 75 टक्के भाग भांडवल बाजारात धरला तर या बाजाराची व्याप्ती आणखी वाढेल. आज ना उद्या या कर्जांची बरीचशी फेड भाग भांडवलातून करावी लागेल. त्यामुळे हे मान्य करावे लागेल. आज कर्जावरील व्याज प्राप्ती–करासाठी नक्त नफा काढण्यापूर्वी वियोजनीय (deductible) आहे आणि त्यामुळे भाग भांडवलावरील देय लाभांशापेक्षा कर्ज घेणे स्वस्त पडते या एकाच कारणामुळे ही कर्जे तशीच राहात आहेत, किंबहुना वाढत आहेत. अप्रत्यक्ष स्वरूपातील भांडवल बाजारातील बँकांच्या या योगदानाचे (contribution) खऱ्या अर्थाने अजून मूल्यमापनच झाले नव्हते. पण ही रक्कम एकूण ज्ञात भांडवल बाजाराच्या 40 टक्क्यां–इतकी भरावी.

बँकांच्या योगदानाप्रमाणे या क्षेत्रात कंपन्या व बँकेतर वित्तसंस्थाही वाढता भाग घेऊ लागल्या आहेत. या संस्थांच्या ठेवींचाही भांडवलाप्रमाणे दीर्घमुदती जिंदगी उभारण्यासाठी उपयोग होतो. लीझिंग, हायर परचेस या व्यवसायाने भांडवल बाजाराला आणखी एक मिती दिली आहे.

भारतीय भांडवलात कंपन्या व विशेषकरून बँकेतर वित्तसंस्थांचा सहभाग 1991–92 पासून प्रचंड प्रमाणात वाढला आहे. 1991–92 साली यातला नियमानुसार ठेवींचा आकडा 9,235 कोटी रुपये होता तर निर्बंधमुक्त ठेवी 43,693 कोटी रुपयांच्या होत्या.

1994–95 साली हे आकडे अनुक्रमे 34,406 कोटी रुपये व 1,88,982 कोटी रुपये इतके होते. बँकेतर वित्तसंस्थांकडे 1991–92 साली 19,304 कोटी रुपये होते ते 1994–95 साली 69,510 कोटी रुपये झाले. अ–वित्त कारखानदारी कंपन्यांकडे याच ठेवी 30,746 कोटी रुपयांवरून 1,47,776 कोटी रुपये इतक्या झाल्या. एवढ्या प्रमाणावर असलेल्या ठेवींमुळे बँकांकडे तितक्या कमी प्रमाणात ठेवी गोळा झाल्या. कंपनी कायद्याच्या 58 अ कलमाचे याबाबतीत नियम रिझर्व्ह बँक ठरविते आणि याबाबत आता बरेच निर्बंध आले आहेत. हे आकडे 'स्टॅटिस्टिकल आउटलाईन ऑफ इंडिया, 1996–97' या टाटा सर्व्हिसेसच्या पुस्तकावरून घेतले आहेत. पण सकृद्दर्शनी तरी कंपन्यांकडील व वित्तसंस्थांकडील ठेवी या बँकांच्या ठेवींच्या 50 टक्के दिसत आहेत तितक्या त्या नसाव्यात. त्यामुळे या आकड्यांची खात्री करून घ्यावी लागेल. पण त्यामुळे मूळ विवेचनास बाध येत नाही. भांडवल बाजाराची व्याप्ती वाढविण्याच्या संदर्भात आजही वर निर्देशिलेल्या प्रश्नांखेरीज अनेक प्रश्न आपल्यासमोर उभे आहेत. त्या सर्वांची संपूर्ण उत्तरे देऊ शकणारा 'विक्रम' आज तरी आपल्याकडे नसल्याने भांडवल व्यवस्थेच्या मानगुटीवरील वेताळ कित्येक वर्षे उतरणार नाही.

या प्रश्नांपैकी एक प्रश्न म्हणजे सरकारी उद्योगाच्या भाग भांडवलाचे निर्निवेशन हा होय. गेली पाच-सहा वर्षे हा प्रश्न नुसता चर्चिला जात आहे. त्यामुळे मार्च 1991 ते मार्च 1997 या सहा वर्षांत 24,500 कोटी रुपयाइतके निर्निवेशनाचे उद्दिष्ट समोर ठेऊनही जेमतेम 10,915 कोटी रुपये शासनाला मिळू शकले आणि तेही तुटी भरून काढण्यातच खर्च झाले. भारताच्या या उद्योग क्षेत्रातील ज्या नवरत्नांचा 1997 च्या अर्थसंकल्पात उल्लेख केला गेला त्यातील नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन वगळता इतर आठ उद्योगांचे आजचे बाजारमूल्य अंदाजे एक लक्ष कोटी रुपये आहे. महानगर टेलिफोन निगम, स्टेट बँक, भारतीय औद्योगिक विकास बँक, नॅशनल ॲल्युमिनियम या कंपन्यांमुळे त्यात आणखी 45,000 कोटी रुपयांची भर पडेल. इतर लहानमोठ्या उद्योगांचे बाजारमूल्यही धरून एकूण ही रक्कम 2,00,000 कोटी रुपयांवर जाईल. रामकृष्ण समितीच्या निर्निवेशनाबाबतच्या शिफारशीत याबाबत मोठ्या प्रमाणावर काही शिफारशी नाहीत. या भागांची सरसकट विक्री अगदी विदेशी भांडवल आकर्षित करून केली गेली तरी शासन एकतर ही सर्व रक्कम अध:संरचनेसाठी आज ऊर्जा, दूरसंचार, विमानतळ, बंदरे, महामार्ग, रेल्वे वाघिणी व डबे, वगैरेसाठी वापरून तिथला ताण कमी करू शकेल किंवा तितक्या रकमेचे रोखे फेडून त्यावरील जवळजवळ 25,000 कोटी रुपये व्याज दरवर्षी वाचवू शकेल. भारतीय भांडवल बाजारावर या दोन्ही बाबींचा दूरगामी परिणाम होईल. ही रक्कमही सर्व अध:संरचनेतील त्रुटींसाठी पुरी पडणार नाही. विदेशी भांडवल मोठ्या प्रमाणावर आकर्षित करावे लागेल. विदेशी कर्जे व भांडवल मिळण्याची ही क्षमता अन्य देशांप्रमाणे भारतालाही निर्यात वाढवून सिद्ध करावी लागेल. दरवर्षी निर्यात 15 टक्क्यांनी वाढली तर या कर्जात 750 कोटी डॉलरची सुरुवातीला व 5 वर्षांनी 1,500 कोटी डॉलरची भर पडेल. पाच वर्षांतील एकत्र रक्कम सुमारे 1,60,000 कोटी रुपये होईल. निर्यातीचा दर वाढला तर हे भांडवल आणखी मोठ्या प्रमाणात येईल. त्या दृष्टीने यंदा एप्रिलपासून विदेशी व्यापारी कर्जे घेण्याबद्दल खूप सवलती जाहीर झाल्या आहेत. कंपन्या स्वसामर्थ्यावर 20 वर्षांपर्यंतची 20 कोटी डॉलरची कर्जे घेऊ शकतील किंवा 10 वर्षांपर्यंतची 10 कोटी डॉलरची कर्जे घेऊ शकतील. विदेश विनिमय करणाऱ्या बँकांनाही नवीन पतपुरवठा धोरणानुसार प्रत्येकी एक कोटी डॉलरचे कर्ज बाहेरच्या देशात घेता येईल.

भांडवली व्यवहारासाठी रुपया परिवर्तनीय झाला तर बाहेर मोठ्या प्रमाणात विदेशमुद्रा जाण्याऐवजी ती आत जास्त येईल ( forex intlow ). मात्र त्यामुळे भारतीय कंपन्या तो ताण सहन करू शकतील का, रुपयाचे मूल्य स्थिर ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेला जास्त प्रयत्नशील राहावे लागेल का, हेही प्रश्न मग निर्माण होतील.

भारताचे स्थूल राष्ट्रीय उत्पादित, चलनफुगवटा धरून चालू भावाने, जर सरासरीने पंधरा टक्के यंदा (व दरवर्षी) वाढले तरी या वर्षी सुमारे 1,35,000 कोटी रुपये पैसा स्वरुपात भांडवल बाजारात उपलब्ध होतील. त्यातील 80,000 कोटी रुपये बँकांत ठेवी स्वरुपात जातील आणि उरलेले 55,000 कोटी रुपये

भविष्यनिर्वाह निधी, निवृत्ती वेतन योजना यात तसेच अन्योन्य निधीत आणि कंपन्या व वित्तसंस्था यांच्या रोख्यांत जातील. दरवर्षी ही रक्कम वाढतच राहील. बँकांना आपल्या ठेवींपैकी आता भाग भांडवल 5 टक्के तर रोख्यात अनिर्बंध (काही निर्बंध सोडून) घालता येतील आणि उरलेली किमान 60 टक्के रक्कम कर्जात देता येईल. या सर्वांचा भांडवल बाजारावर नक्कीच मोठा परिणाम होईल. त्याचा परिणाम समाजव्यवस्थेत असमतोल निर्माण करण्याच्या संदर्भात होईल का हा प्रश्न आजतरी अनुत्तरित राहणार आहे.

पहिली व्यवस्था मोडून पुरवठा बाजूचे अर्थशास्त्र (supply side of Economics) येत असताना आपली व्यवस्था पुरी बदलून निघणार आहे. त्यामुळे काही फायदे होतील, काही तोटे होतील. मात्र भांडवल बाजाराचे प्राधान्य वाढल्यामुळे भांडवलशाही या शब्दाने पूर्वी जो अर्थ ध्वनित होत होता तो आता असणार नाही. कारण सर्वच संदर्भ आता जगभर बदलत चालले आहेत आणि भारत त्याला अपवाद असणार नाही.

1990–91 साली भारताचे स्थूल राष्ट्रीय उत्पादित तत्कालीन किमतीनुसार 4,75,604 कोटी रुपये होते. या उत्पादिताच्या 27.4 टक्के स्थूल राष्ट्रीय भांडवल उभे राहिले होते. स्थूल राष्ट्रीय बचतीचा दर स्थूल राष्ट्रीय उत्पादिताच्या 24 टक्के होता. शेअर बाजारांची संख्या 14 होती. शासकीय संस्थाच मोठ्या प्रमाणात दीर्घ मुदतीचे कर्ज देत होत्या आणि भांडव–लातही सहभागी होत होत्या. रुपया–डॉलरचा विनिमय दर सरासरी 22 रुपये 74 पैसे होता. मुंबई बाजाराचा निर्देशांक 1,300 ते 1,490 पर्यंत फिरत होता. विदेशी गुंतवणूक संस्थांचे आगमन झालेले नव्हते. मुंबई शेअर बाजारातील नोंदलेल्या कंपन्यांचे बाजारमूल्य 1,10,000 कोटी रुपये होते. भारतातील सर्व बाजा–रांतील नोंद झालेल्या कंपन्यांची संख्या 6,500 होती. त्यावर्षी 12,300 कोटी रुपयांचे भांडवल प्राथमिक बाजारातून उभे राहिलेले होते. 1984–85 मध्ये ही रक्कम फक्त 1,050 कोटी रुपये होती तर 1980–81 साली ती जेमतेम 160 कोटी रुपये होती. आर्थिक विकासासाठी भांडवल बाजाराची वाढ जोमदार झाली पाहिजे या निष्कर्षाप्रत सरकार आले होते. त्यादृष्टीने 1991 पासून आजतागायत बरीच पावले उचलली गेली. सुधारणा केल्या गेल्या म्हणून आतापर्यंत विवेचन केलेले दृश्यफल दिसत आहे.

भांडवल बाजारातील संख्यात्मक व गुणात्मक बदल इतक्या विवेचनानंतर आपल्यापुढे प्रकर्षाने आले आहेत. पण यापुढे या बाजाराचे भवितव्य काय असेल? त्याच्यासमोर काही समस्या, काही अडचणी असणार आहेत का? विशेषत: अर्थसंरचनेसाठी अकल्पनीय असे भांडवल भारताला लागणार आहे आणि त्या संदर्भात विदेशी भांडवलाला भारताची सर्व दारे उघडली गेली तर एका आक्रमणाला आपल्याला सामोरे जावे लागेल का भारतीय नागरिकानाच बचतीसाठी भरपूर सवलती दिल्या जातील या प्रश्नांची उत्तरे आपल्याला हुडकावी लागतील. रिझर्व्ह बँक आपल्या पतपुरवठा धोरणात व्याजाची धोरणे कशी बदलेल त्यावरही या बाजारा–तील मागणी व पुरवठा अवलंबून राहील. एक कोटी अनिवासी भारतीयांनी मनात आणले तर दर वर्षी अनिवासी चिनी रहिवाशांप्रमाणे ते विदेशी चलनातून किमान 40 ते 50 हजार कोटी रुपयांचे भांडवल पाठवू शकतील पण त्यासाठी कशी धोरणे आखावयाला हवीत याचा गंभीर विचार व्हावयाला हवा. मनमोहनसिंग यांच्या कारकिर्दीत सुधारणा झाल्या त्या विदेशी निवेशक डोळ्यासमोर ठेऊन जास्त होत्या. आयकरा–तील, भांडवली नफ्यावरील करांमधील केलेले घट सोडता इतर सर्व सवलती त्यांनी एकेक करीत काढून घेतल्या होत्या म्हणूनच गेली अडीच वर्षे त्याला अवकळा आली होती. चिदंबरम यांनी ती दूर कर–ण्याचा उत्तम प्रयत्न केला एवढ्यात राजकीय अस्थिरता भारताला ग्रासू लागली आहे. तिचा किती विपरित परिणाम होईल हा मुख्य प्रश्न सध्या होणार आहे.

भांडवल बाजारात समभागांचे महत्त्व असते पण सरकारी व खाजगी कर्जे वाढल्याने व्याजाचा बोजा वाढला तर आपण कर्जे सापळ्यात सापडू का हा आणखी एक प्रश्न आहे. रुपयाची संपूर्ण परिवर्तनीयता आण–ण्याबद्दलही हल्ली अग्रक्रमधून सूतोवाच केले जाते. निर्यातीचे प्रमाण कितीतरी पटीने वाढल्याखेरीज ही परिवर्तनीयता पळत जाणाऱ्यासमोरचे क्षितिज कसे पुढेपुढे जाते तशी पुढेपुढे हुलकावणी देत जाणार आहे.

आणखी एक महत्त्वाचा विचार करावयाला लावणारा प्रश्न असेल तो ज्या वेगाने हे सारे होणार आहे त्याने आपल्याला भोवळ तर येणार नाही ना हा होय! नॅशनल डिपॉझिटरीज, संगणित्र पटाधारित प्रपत्रविरहित व्यवहार वगैरेत गफलत करून, पुरेशी माहिती नसलेल्या पण गुंतवणुकीस उत्सुक असलेल्या निवेशकांना पुरेसे संरक्षण मिळणार का? हातात भाग-पत्रे असून जिथे त्यांना फसविले जाते तिथे नुसत्या इलेक्ट्रॉनिक ट्रॅन्स्फरमध्ये दुसऱ्यांच्या नावांचा गैरफायदा कशावरून घेतला जाणार नाही? मुंबईत आज तीन शेअर बाजार आहेत. आता लहानलहान आठदहा शेअर बाजारांचे एक फेडरेशन मुंबईत करण्याचा घाट चालू आहे. भागधारकांचा त्यामुळे आणखीनच गोंधळ होईल. त्याशिवाय मुंबई शेअरबाजारातील दलाल स्वतःची बँक स्थापू बघत आहेत. जगात कुठेही शेअर बाजाराची स्वतःची बँक नाही. हाही प्रयोग घोटाळ्याला आमंत्रण करेल का अशी भीती मनात उगीचच उभी राहते.

भांडवल बाजारावर आमूलाग्र परिणाम करू शकेल अशी एक बाब सध्या शासनाच्या विचाराधीन आहे. ती म्हणजे कंपनी कायद्यात आमूलाग्र बदल करून भाग भांडवलापैकी 25 टक्के भाग मताधिकार नसलेले भाग म्हणून काढावयाला परवानगी देणे आणि स्वतः-चेच भाग विकत घ्यावयाला आणि ते रद्द करावयाला किंवा ट्रेझरी स्वरूपात ठेऊन पुन्हा विकावयाला खरेदीला परवानगी देणे ही होय. याशिवाय लाभांशावरील कर रद्द झाल्याने मताधिकार नसलेले अग्रहक्क भाग कंपन्या काढू बघत आहे. अशा किंवा अन्य मताधिकार नसलेल्या भागांमुळे समभागधारकांच्या हक्कांवर गदा येऊन, प्रवर्तकांची कंपन्यांवरील पकड वाढेल आणि कंपनी व्यवहारातील लोकशाही नाहिशी होईल हे नवीन भय निर्माण होऊ घातले आहे. याखेरीज अनेक यक्षप्रश्न या बाजाराच्या संदर्भात यापुढे उभे राहतील. कंपनी कायद्यात होऊ घातलेल्या बदलांमुळे, विशेषतः कंपनीला स्वतःचे भाग विकत घेता येऊन त्यांची सतत खरेदी विक्री करण्याच्या buy back च्या अधिकारामुळे, भागधारकांना धक्का पोचेल. अशा व्यवहारात पारदर्शकता किती राहील, अंतर्गत गोपनीय माहितीचा किती दुरुपयोग होईल हे सांगता येत नाही.

सुधारित कंपनी कायद्याच्या मसुद्यात, वित्तसंस्थांना किंवा अधःसंरचनेच्या कंपन्यांना वेळोवेळी भांडवल उभारणी करता यावी म्हणून एका ठराविक काळासाठी वैध ठरणारे 'शेल्फ प्रॉस्पेक्टस' काढण्याची कल्पनाही क्रान्तिकारी आहे. पण त्या काळात वेळोवेळी होणारे बदल त्या कंपन्या भावी भागधारकांपर्यंत किलपत पोहोचवतील हे बघण्याची जबाबदारी 'सेबी'ला घ्यावी लागेल.

दुसरी एक आंतरराष्ट्रीय संकल्पना भारतात रूढ होऊ बघत आहे. विविध मोठ्या निवेशकांकडून व निवेशक बँकरांकडून संभाव्य किमतीबद्दलचे अंदाज घेऊन विक्रीची किंमत ठरविण्याची व 'बुक बिल्डिंग' ची ती संकल्पना होय. गेली दोन वर्षे तिचा काही उपयोग झाल्याचे दिसत नाही. त्याचप्रमाणे एखादी कंपनी ताब्यात घेण्याबद्दलचे आग्रहणाचे नियमही कंपन्यांच्या आकारावर आणि त्यामुळे भांडवल बाजारावर परिणाम करणारे ठरतील. त्यामुळे लहान व अकार्यदक्ष कंपन्या नाहीशा होतील. पण त्यामुळे अशा कंपन्यात आज ज्यांची रक्कम गुंतली आहे त्यांना संरक्षण मिळणार नाही. व्यवस्थापन ताब्यात घेण्यापुरते भाग हळूहळू घेऊन इतरांच्या भागांची मग किंमत केली जाणार नाही. 'सेबी' व कंपनी विभागांचे नियमांचे इतके चक्रव्यूह करूनही सामान्य निवेशक आज आहे तिथेच उभा राहील. आजच तीस हजारपेक्षा जास्त कंपन्यांच्या भागांचे बाजारमूल्य दर्शनी किमतीच्या 15 ते 30 टक्केसुद्धा नाही. घेताना या निवेशकांनी दर्शनी किमतीवर अधिमूल्यही दिले होते. त्यांचे आज जवळ-जवळ सव्वा लक्ष कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे.

भारतीय भांडवल बाजारावर आज विदेशी भांडवल गुंतवणूक संस्थांचा नको तितका पगडा आहे. विदेशी गुंतवणूकदार संस्था मोठ्या प्रमाणावर रकमा आणतात तेव्हा बाजारात तेजी निर्माण होते असा एक भ्रम आहे. कारण 1992 वा 1994 साली त्यांचे अस्तित्व नसतानाही तेजी होती.

1994 साली जेव्हा तेजी होती तेव्हा विदेशी गुंतवणूक एकूण बाजारमूल्याच्या अडीच टक्केही नव्हती आणि आजही ती 5 टक्क्यांच्या आसपासच आहे. एवढ्या अल्प प्रमाणातल्या विदेशी गुंतवणुकीमुळे तेजी येते

असे म्हणणे हे कुत्रा शेपटी हलवितो असे म्हणण्याऐवजी शेपटी कुत्रा हलविते असे म्हणण्यासारखे ठरेल. पण आज तरी तो भ्रम आहे. दुसरे म्हणजे, अनेक विदेशी सल्लागार संस्था भारताच्या भांडवल बाजाराच्या मूल्यमापनावर सतत बोलत आहेत. इतर कुठल्या देशातल्या शेअर बाजारावर त्या इतके मतप्रदर्शन करीत असतील असे वाटत नाही. पण भारताचे किंमत / उपार्जन (P / E Ratio) गुणोत्तर जास्त आहे, ते कमी व्हावयाला हवे असा त्यांचा घोशा असतो. जपानच्या किंमत / उपार्जन गुणोत्तराबद्दल त्यांना कुणी अभावित सल्ला देते का ?

भारतातील रोखासंग्रह व्यवस्थापनासाठी आलेली रक्कम तप्त मुद्रेसारखी (hot money) अनेकांना वाटते. पण आपली विदेशमुद्रा गंगाजळी 2,000 कोटी डॉलर झाल्यामुळे आजच रिझर्व्ह बँक विनिमय दराची स्थिरता ठेवण्यासाठी आटापिटा करत असताना किंवा अनिवासी भारतीयांच्या ठेवींबद्दल उदासिनता दाखवीत असताना रोखासंग्रहातील 400 कोटी डॉलरपैकी काही रक्कम गेली तर विषाद वाटण्याचे कारण नाही; तो वाटत असेल तर मग संपूर्ण परिवर्तनीय रुपयाची भाषा स्वप्नातसुद्धा आणू नये. भारतात आलेल्या विदेश-मुद्रेचा भांडवल बाजारात किती नगण्य वाटा आहे हे 1985 ते 1993 या आठ वर्षांत आंतरराष्ट्रीय बाजारात एकूण समभाग व रोख्यांची विक्री किती झाली याचे जे माहीत असलेले आकडे तक्ता 8 मध्ये दिले आहेत त्यावरून कळेल.

भाग भांडवलाची रक्कम 1994 ते 1996 या तीन वर्षांत जास्तच वाढली असेल. तरीही जागतिक भांडवल बाजारात रोख्यांवर जास्त रोख असतो हे लक्षात येईल. किंबहुना हे लक्षात आल्यामुळेच आपल्या शासनाने आता विदेशी गुंतवणूक संस्थांना इथे रोखे बाजारात 100 टक्क्यांपर्यंतही गुंतवणूक करावयाला परवानगी दिली आहे. 1997-98 च्या अर्थसंकल्पात समभागासाठी ही परवानगी 24 टक्क्यांवरून 30 टक्के केली गेली आहे.

भांडवल बाजार आता किती अंगाने भारतात फुलला आहे, बहरला आहे याचे बरेचसे यथार्थ चित्रण करण्याचा हा प्रयत्न आहे. तो एकांगीही वाटण्याची

**तक्ता 8**

**आंतरराष्ट्रीय बाजारातील समभाग व रोख्यांची विक्री**

(कोटी डॉलर)

| वर्ष | समभाग | रोखे | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| 1985 | 270 | 27,820 | 28,090 |
| 1986 | 1,170 | 37,780 | 38,950 |
| 1987 | 1,820 | 36,560 | 38,380 |
| 1988 | 770 | 44,580 | 45,350 |
| 1989 | 810 | 45,840 | 46,350 |
| 1990 | 730 | 42,760 | 43,490 |
| 1991 | 2,340 | 51,260 | 53,600 |
| 1992 | 2,350 | 58,620 | 60,970 |
| 1993 | 4,070 | 76,980 | 81,050 |

शक्यता आहे. पण आर्थिक सुधारणांचा ओघ 1991-92 मध्ये सुरू झाल्यानंतर त्यात किती झपाट्याने बदल झाला आहे आणि सतत यापुढेही होणार आहे त्याची या प्रयत्नावरून नक्कीच कल्पना येईल.

या बाजारातील नवे येऊ घातलेले काही प्रश्नही मी आपल्यासमोर उभे केले आहेत. पण प्रयत्न सुरू झाले की प्रश्न उभे राहतात, सुटतात व नवे प्रश्न पुन्हा जन्मतात हा प्रत्येक क्षेत्रातला अनुभव आहे. भांडवल बाजार त्याला अपवाद ठरू शकणार नाही.

या व्याख्यानाच्या निमित्ताने काही प्रश्नांची उकल केली आणि काही तसे अनुत्तरित सोडले असले तरी आपण त्यावर जरूर विचारमंथन कराल अशी माझी आशा आहे.

## संदर्भ सूची


1 Joshi, P. R., FINANCIAL MARKET TRENDS-GLOBAL CAPITAL MARKETS, Tata Mc-Graw Hill.

2 HANDBOOK ON SEBI ACT, 1992 Everest Publishers.

3 Chandratre, K. R. et al., CAPITAL ISSUES AND SEBI LISTING, Bharat Publishing House.

4 Avadhani, V. A., CAPITAL MARKET MANAGEMENT, Himalaya Publishing.

5 ECONOMIC SURVEY, 1990-91 to 1996-97, Government of India.

6 Manmohan Singh, Budget Speeches 1991 to 1996.

7 Chidambaram, P. C., Budget Speeches, 1996 and 1997.

8 QUANTUM STOCK MARKET BOOK, 1997, Business India Group Publication.

9 STATISTICAL OUTLINE OF INDIA, 1989-90 to 1995-96, Tata Services Ltd.

10 Joshi, P. N. and Kochar, MONEY, FINANCE AND TRADE, Himalaya Publishing House.

11 **अर्थसंवाद**, चिंतामणराव देशमुख स्मृती विशेषांक, ऑक्टोबर–डिसेंबर, 1996, खंड 20. अंक 3.

12 COUNTRY PROFILE : INDIA, 1991-92 to 1996-97, Economic Intelligence Unit, London.

13 THE ECONOMIC TIMES.

14 FINANCIAL EXPRESS.

15 BUSINESS STANDARD.

16 DALAL STREET, Various issues.

□ □


# मराठी अर्थशास्त्र परिषद, प्रकाशन चौथे

## अर्थमीमांसा – वैज्ञानिक की कलात्मक ?

**लेखक : नी. वि. सोवनी**

किंमत रु. 250 ( सूट 10 टक्के )

अर्थशास्त्राच्या पदवी आणि पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक याना उपयुक्त संग्राह्य ग्रंथ.

सूट वजा जाता निव्वळ किंमत रु. 225 पुढील पत्त्यावर मनी ऑर्डर / डिमांड ड्राफ्टने पाठविल्यास ग्रंथ आमच्या खर्चाने रजिस्टर्ड बुक–पोस्टने पाठविला जाईल. डिमांड ड्राफ्ट पुणे येथील व्यापारी बँकेच्या शाखेवर देय असावा आणि तो '**मराठी अर्थशास्त्र परिषद**' या नावाने काढावा.

**पत्ता :** डॉ. व्यं. सु. पाटणकर, फ्लॅट क्र. 1, कपिल अपार्टमेंटस्, सर्व्हे क्र. 29, तेजस सोसायटीजवळ, कोथरूड, पुणे 411 029.

# अर्थ शब्दांची वाट पाहे

नी. वि. सोवनी *

## 1

## सॉफ्टवेअर

जानेवारी – मार्च 1996 च्या ' अर्थसंवाद 'च्या अंकात आणि त्यानंतरच्या अंकातही रवीन्द्र दोशी यांनी हिंदुस्थानातून अलीकडे होणाऱ्या ' सॉफ्टवेअर ' निर्यातीसंबंधी टिपणे लिहिली आहेत. त्यानिमित्ताने 'सॉफ्टवेअर' या संज्ञेस पर्यायी मराठी संज्ञेची चर्चा करावयास हवी होती असे मला वाटते. पण त्यांनी ती केलेली नाही. त्यांच्या टिपणांचे निमित्त करून तशी चर्चा मी येथे करणार आहे. ' अर्थशास्त्र परिभाषा कोषात ' ही इंग्रजी संज्ञा दिली आहे आणि त्यास मराठी पर्यायही सुचविलेला आहे. ती कोशात समाविष्ट करण्यास माझाच मुख्य हात होता. त्यावेळी हा प्रकार नुकताच हिंदुस्थानाच्या क्षितिजावर येत होता आणि त्याची दखल घेण्याचाही माझा हेतू होता. त्यानंतरच्या कालात त्याची खूपच वाढ होऊन हिंदुस्थानच्या निर्यातीत तो महत्त्वाचे स्थान पावला आहे. त्यासंबंधी अधिक विस्तृत चर्चा आता करणे आवश्यक झाले आहे. म्हणून हे टिपण.

त्यावेळी सुचविलेला पर्याय ' मृदु सामग्री ' हा माझ्या आताच्या मते चुकीचा, निखळ भाषांतरवजा आहे. दोशी यांच्या टिपणाचे निमित्त करून मी माझा असंतोष व्यक्त करून त्याचे अधिक समाधानकारक उत्तर देता येईल का याचा आदमास येथे घेत आहे. या क्षेत्रातील अधिक तज्ज्ञ मंडळी त्यास चर्चा करून हातभार लावतील अशी आशा आहे.

अर्थशास्त्र परिभाषा कोषात 'software' याची नोंद अशी आहे;

" **Software, n, 1** ( the design, instructions, routines, etc. required for operation of a computer or other automatic

* भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, पुणे.

machines ) सॉफ्टवेअर (न.), मृदुसामग्री. 2 ( the plans, fuel, etc. of a rocket, missile or other space vehicle ) सॉफ्टवेअर (न.), मृदुसामग्री. 3 ( anything thought of as not directly related to some operation, principal function or objective, such as the non-mechanised elements of a mechanised system ) सॉफ्टवेअर (न.), मृदुसामग्री " ( पृ. 195 ).

' मृदुसामग्री ' हा पर्याय इंग्रजी संज्ञेचे निव्वळ भाषांतर आहे. इंग्रजीत software हा पर्याय hardware (लोखंडी किंवा कठीण माल) याचा प्रतिशब्द म्हणून आलेला आहे आणि तो आता सर्वत्र रूढ झाला आहे. मराठीत लोखंडी मालाचा प्रतिशब्द म्हणून ' मृदुसामग्री ' ला मराठीच्या संदर्भात काही अर्थ नाही आणि म्हणूनच तो अर्थवाही नाही. मूळ शब्दाच्या विविध अर्थांकडे लक्ष देऊनच त्यासाठी एका संज्ञेचा हट्ट न करता विविध संज्ञा सुचविणे आवश्यक दिसते.

या मूळ संज्ञेचे जे तीन अर्थ कोशातून दिलेले आहेत त्यापैकी पहिला हा संगणित्राच्या कार्यानुवर्तनाशी निगडित आहे. त्यातही प्रायोजना ( programming ) याच्याशी तो निगडित आहे. या अर्थाकडे लक्ष दिल्यास प्रायोजनाचे कार्यक्रम पत्र / फीत हा पर्याय बरा वाटतो. म्हणून नवा पर्याय ' प्रायोजना कार्यक्रम पत्रिका / फीत ' असा सुचवीत आहे. या संज्ञेला ' आज्ञावली ' असा पर्याय सुचविला गेल्याचे व तो वापरात असल्याचे कळले. हा पर्याय सर्वस्वी योग्य आहे. त्या अनुषंगाने 'प्रायोजना आज्ञावली' हा पर्याय वर सुचविलेल्या पर्यायापेक्षा चांगला आहे.

दुसरा अर्थ आकाशयान, अग्निबाण, वगैरेशी संबंधित आहे. त्या अनुषंगाने आकाशयानाचे आराखडे, इंधन, वगैरे यांची एक संज्ञा करणे अवघड दिसते. म्हणून त्याचा उपयोग करताना वर्णनात्मकच भाषा वापरणे आवश्यक दिसते. म्हणून 'आकाशयानाचे आराखडे, इंधन, वगैरे ' असा पर्याय सुचवितो.

तिसरा अर्थ यांत्रिक संपद्धतीशी निगडित आहे. यांत्रिक संपद्धतीतील अयांत्रिकी दुय्यम भाग वा सामग्री असा अर्थ तेथे अभिप्रेत आहे. 'अयांत्रिकी सामग्री' असा पर्याय सुचविता येईल पण गैरसमज टाळण्याच्या दृष्टीने ज्यावेळी त्याचा उल्लेख करावयाचा असेल त्यावेळी त्याचा पूर्ण वर्णनात्मक असा उल्लेख करावा असे मला वाटते.

## 2

गेल्या एकदोन वर्षांत अर्थशास्त्रीय नियतकालिकांतून दोन इंग्रजी संज्ञा विशेष प्रामुख्याने वावरत आहेत. त्या म्हणजे (1) derivatives आणि (2) stake holders. पहिली पैशाच्या व्यवहारातील आहे. दुसरी ही ब्रिटनमधील मजूर पक्षाच्या नव्या विचारप्रणालीतील आहे. त्यांना मराठी पर्याय शोधणे आवश्यक वाटते. त्यादृष्टीने हे टिपण मुख्यतः चर्चेसाठी आवाहनवजा आहे. निर्णायक मुळीच नाही.

(1) Derivatives : या नावाने ओळखली जाणारी पतबाजारातील पत्रे अनुजात पतपत्रे असतात. वायदे बाजारातील वायदेपत्रांवर आणखी एक वायद्याचा मजला चढविला म्हणजे जे होते ते निराळे वायदापत्रच असते. मूळ वायदेपत्रातून ते उद्भवत असल्यामुळे त्याला derived किंवा ' अनुजात ' वायदेपत्र असे म्हणावयास हवे. ही पत्रे नव्याने उद्भवलेली नाहीत. अगदी पूर्वीपासून ती नाणे बाजारात वावरत आली आहेत. पण अलीकडील संचारण क्षेत्रातील क्रान्तीमुळे त्यांची संख्या व उलाढाल अनेक पटींनी वाढली आहे. त्यांच्या साह्याने होणाऱ्या सट्टयाचे प्रमाणही खूप वाढले आहे. नुकतीच बेअरिंग सेक्युरिटीज ही जुनी पेढी बुडण्यास त्याच्या सिंगापूर शाखेचा मुख्य निकलीसन याने केलेला या अनुजात वायदेपत्रांचा सट्टा कारणीभूत झाला हे आपणा सर्वांना ठाऊक आहे. या इंग्रजी संज्ञेसाठी मी ' अनुजात वायदेपत्र ' हा मराठी पर्याय सुचवीत आहे.

(2) Stake holders : ही संज्ञा ब्रिटिश मजूर पक्षाच्या नव्याने उदयास येणाऱ्या विचारप्रणाली संबंधीच्या वाङ्मयात अवतरली आहे. तिला राजकारण्यांनी व लेखकांनी लोकप्रिय करण्याचा प्रयत्न चालविला आहे. मालक व मजूर हे द्वंद्व जुनेच आहे. पण आताच्या काळात त्यातली हवा पुष्कळशी नाहीशी झाली आहे. पाश्चात्य देशात मजूरवर्ग पूर्वीसारखा गरीब राहिलेला नसून संपन्न व सुखवस्तू झाला आहे.

पण त्यांच्याशिवायही इतर सामाजिक घटकांना अर्थव्यवस्थेचे त्यांच्याइतकेच लागते आहे आणि त्यांचे हितसंबंधही समाजव्यवस्थेत महत्त्वाचे आहेत, त्यानाही कामगारांच्या प्रमाणेच राजकारणाबद्दल व अर्थकारणाबाबत काही म्हणण्याचा तितकाच हक्क आहे. असे गट म्हणजे कामगार धरून, असंघटित मजूर, उपभोक्ते, सेवा पुरविणारे, ग्राहक, स्त्रिया वगैरे. कामगारांचा हा पक्ष यांचीही काळजी करील आणि त्यांच्या हितसंबंधाकडे लक्ष देईल अशी ही प्रस्तावना आहे.

या नव्या सामाजिक व आर्थिक आकृतिबंधास मूर्त स्वरूप देण्यासाठी काही विचारवंत समाजाची आता दोन नवीन गोटात विभागणी करीत आहेत. एक, share holders– भागधारक (मालक) व दुसरे stake holders- दायधारक. या नवीन सुच- विलेल्या पर्यायाचे समर्थन पुढीलप्रमाणे.

Stake या इंग्रजी संज्ञेचा अर्थ खुंटी, मेख असा आहे. जमिनीच्या मालकीच्या हद्दी ठरविताना खुंट्या मारून ती दाखविण्याची पद्धत आहे. तिच्या अनुषंगाने stake याचा विस्तारित अर्थ हक्क, वडिलोपार्जित संपत्तीचा भाग, वगैरे व्यवहारात आला आहे. या अर्थाचा हिंदु कायद्यातला जुना शब्द 'दाय' हा आहे. दायभाग ही हिंदु कायद्याची संहिता प्रसिद्ध आहे. 'दाय' याचा अर्थ आपटे संस्कृत कोशाप्रमाणे share, share in the patrimony (पितृधनातील वाटा) असा आहे. अर्थ आणि समाजव्यवस्था हे सर्व समाजाचे एकप्रकारचे पितृद्रव्यच आहे. म्हणून 'दाय' हा शब्द वर निर्देशिलेल्या अर्थाशी जुळता आहे. Stake holder या संज्ञेला मराठी पर्याय म्हणून 'दायधारक' अशी संज्ञा मी सुचवीत आहे.

☐ ☐

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## (अ) परिषदेची प्रकाशने

(1) नी. वि. सोवनी — **अर्थसिद्धान्त : आणखी चिकित्सक निबंध,** 1977, पृष्टे 226, किंमत रु. 20.

(2) मो. वि. भाटवडेकर — **शिक्षणाचे अर्थशास्त्र,** 1978, पृष्ठे 157 (वितरण : व्हीनस प्रकाशन, अप्पा बळवंत चौक, पुणे), किंमत रु. 20.

(3) म. ग. बापट — **आंतरराष्ट्रीय व्यापार : सिद्धान्त आणि धोरण,** 1982, पृष्ठे 333 (वितरण : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे) (आवृत्ती संपली), किंमत रु. 50.

(4) नी. वि. सोवनी — **अर्थमीमांसा,** 1995, पृष्ठे 345 (वितरण : डॉ. व्यं. सु. पाटणकर, फ्लॅट क्र. 1, कपिल अपार्टमेंटस्, सर्व्हे. क्र. 29, तेजस सोसायटीजवळ, कोथरूड, पुणे 411 029), किंमत रु. 250.

## (आ) परिषदेला देणगीरूपाने मिळालेली आणि परिषदेकडून विक्रीस उपलब्ध प्रकाशने

(1) नी. वि. सोवनी — **त्राफा विचारसरणी : चार व्याख्याने,** पृष्ठे 64 (प्रकाशक : नी. वि. सोवनी), किंमत रु. 10.

(2) नी. वि. सोवनी — **अर्थसिद्धान्त : काही चिकित्सक** निबंध, 1972, (प्रकाशक : देशमुख आणि कंपनी, पुणे).

*ग्रंथ परीक्षण –1*

# अभिमत अर्थशास्त्रातील हस्तक्षेप नीतीची मीमांसा

वंदना दांडेकर *

---

जहागिरदार, मुक्ता दिगंबर, **अभिजात अर्थशास्त्र आणि राज्य हस्तक्षेप नीती**, विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषद, नागपूर, 1996, रु. 200.

---

कोणत्याही समाजात विशिष्ट कालखंडात विशिष्ट मतप्रणालीचा प्रभाव आढळून येतो. ही मत-प्रणाली त्या विशिष्ट समाजात आढळणाऱ्या विशिष्ट राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परि-स्थितीचा परिपाक असते. त्याचवेळी या मतप्रणालीचाही परिणाम तत्कालिन परिस्थितीवर होत असतो. भिन्न कालात भिन्न मतप्रणाली अस्तित्वात येतात, विकास पावतात आणि विलयासही जातात. कालांतराने पूर्वी अस्तित्वात असलेल्या या मतप्रणालींमधील काही तत्त्वांमध्ये, नीतींमध्ये व संकल्पनांमध्ये समयोचित बदल / सुधारणा होऊन नवीन चौकटीत त्या पुनर्प्रस्था-पितही होतात. आर्थिक विचारांच्या इतिहासात चार मूलभूत मतप्रणाली आढळतात – मध्ययुगीन, व्यापार-वादी, अभिमत व समाजवादी.

मुक्ता जहागिरदार यांनी लिहिलेल्या 'अभिजात अर्थशास्त्र आणि राज्य हस्तक्षेप नीती' या पुस्तकात अभिमत मतप्रणालीतील ( Classical economics ) एका नीतीचा – राज्य हस्तक्षेप नीतीचा – आढावा घेतला आहे. प्रस्तुत पुस्तक हे मूलत: नागपूर विद्या-पीठाच्या आचार्य ( Ph. D. ) पदवीसाठी लिहिलेला एक संशोधनपर प्रबंध आहे; त्यात आवश्यक ते फेर-बदल करून या प्रबंधाचे पुस्तकात रूपांतर केले आहे. यामधील विवेचन ऐतिहासिक पद्धतीचे आहे. कोणत्याही संशोधनपर लिखाणाची वैशिष्ट्ये समस्यापूर्ती, सिद्धान्त बांधणी, अनुभवाधिष्ठित पुराव्यांचे अचूक निरीक्षण व वर्णन, आधारसामग्रीच्या नवीन स्रोतांचा शोध, इत्यादी आहेत. उपलब्ध ज्ञानात नवीन ज्ञानाची भर घालणे किंवा उपलब्ध ज्ञानाचे नवीन अन्वय लावणे ही संशो-धनाच्या विविध उद्दिष्टांमधील महत्त्वाची दोन उद्दिष्टे आहेत. अभिमत अर्थशास्त्रज्ञांनी मांडलेल्या मूलभूत तत्त्वांची सखोल व अभ्यासपूर्ण माहिती व विवेचन असणारे मुबलक लेखन आज उपलब्ध आहे. या पार्श्वभूमीवर अभिमत मतप्रणालीमधील राज्य हस्तक्षेप नीतीच्या संदर्भात लेखिकेने कोणते विचार मांडले आहेत, उपलब्ध माहितीचे नवीन कार्यकारण

* अधिव्याख्याती, चिंतामणराव वाणिज्य महाविद्यालय, सांगली.

संबंध प्रस्थापित केले आहेत का, नवीन अन्वय शोध-ण्याचा प्रयत्न केला आहे का, किंवा नवीन संदर्भ प्रस्थापित केले आहेत का, वगैरे बाबींचा शोध प्रस्तुत लेखात घ्यावयाचा आहे.

सन 1991 पासून भारताच्या एकूण आर्थिक नीतीमध्ये अनेक आमूलाग्र बदल घडले आहेत या पार्श्वभूमीवर लेखिकेने मनोगतात म्हटल्याप्रमाणे, "आजच्या उलथापालथीच्या काळात शासन हस्त-क्षेपाचा प्रश्न महत्त्वाचा आहे; कारण, या संदर्भातील शासनाची भूमिका एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे हेलकावे घेणारी आहे", त्या अनुषंगानेही पुस्तकाचे परीक्षण करणे उचित ठरेल. प्रस्तुत पुस्तकाची पुढील उद्दिष्टे नमूद केलेली आहेत (पृ. 9) :

(1) अभिमत अर्थशास्त्रीय मतप्रणालीतील शासन हस्तक्षेप नीतीचे सामान्य स्वरुपात विवेचन करणे;

(2) शासन हस्तक्षेप नीतीचे स्पष्टीकरण मत-प्रणालीच्या अनुषंगाने करणे;

(3) आजच्या समाजातील आर्थिक प्रश्नांचा विचार व सोडवणूक करताना अभिमत दृष्टिकोन व विवेचनातील मूलभूत पैलूंचे प्रकर्षाने विवेचन करणे आणि

(4) अभिमत अर्थशास्त्रज्ञ खरोखरीच निरंकुश-वादी आहेत का याची पडताळणी घेणे.

पूर्वी नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुत संशोधनपर प्रबं-धात ऐतिहासिक विवेचन पद्धतीचा अवलंब केला आहे. इतिहास म्हणजे मानवाच्या महत्कृत्यांच्या अभिप्रायपूर्ण नोंदी होत. या नोंदी केवळ कालक्रमानुसार केलेल्या असतात असे नव्हे तर त्यामध्ये व्यक्ती, घटना, काल आणि स्थळ यामधील परस्परसंबंधाचे एकात्मीकृत (integrated) व विश्वसनीय (truthful) लेखां-कन केलेले असते. गतकालाचा उलगडा होण्यासाठी आणि गतकालीन घटना व त्यांच्या विकासाच्या अनु-षंगाने वर्तमानकाल समजून घेण्यासाठी इतिहासाची मदत होत असते. ऐतिहासिक विवेचन विशिष्ट व्यक्ती, संकल्पना, चळवळ (movement) किंवा संस्थेच्या संदर्भात करता येते. परंतु यापैकी कशाचाही पृथक्‌पणे (isolated) विचार करता येणार नाही, कारण त्यांच्यामध्ये परस्परावलंबित्व असते.

ऐतिहासिक संशोधन पद्धतीत गतकालातील घट-नांची नोंद घेतली जाते. गतकालातील घटनांचे अन्वेषण करणे, नोंदी करणे, विश्लेषण करणे व उलगडा करणे या चार कार्यांचा त्यामध्ये समावेश होतो. जेणेकरून गतकाल आणि वर्तमानकालाचे आकलन होण्यास मदत होईल अशा प्रकारचे सामान्य सिद्धान्त प्रस्थापित करणे हा त्यामागचा उद्देश असतो. तसेच त्याअन्वये विशिष्ट मर्यादेत भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न करणे हाही उद्देश असतो. लेखिकेने मनोगतात व्यक्त केल्याप्रमाणे "ऐतिहासिक संशोधनात कोणत्याही दूरच्या कालातील ऐतिहासिक घटना वा कल्पनांचे अध्ययन केले जाते. हे अध्ययन संबंधित व्यक्ती वा समूहाच्या तत्त्वज्ञानासह केले जाते." या संदर्भास अनुसरून आणि अभिमत मतप्रणालीला लाभलेल्या दीर्घ ऐतिहासिक परंपरेचे स्मरण करून लेखिकेने अवलंबिलेल्या ऐतिहासिक संशोधन पद्धतीत अनुस्यूत असलेले विचारसंघन तत्का-लीन घटना, संदर्भ / संकल्पना यामध्ये नवीन अन्वयांच्या संदर्भात प्रस्तुत केलेले आहे का, त्याअन्वये वर्तमाना-तील नीतींशी संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे का आणि भविष्यकालातील संभाव्य नीतींचा, घटनांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे का याचे परीक्षण प्रस्तुत लेखात करावयाचे आहे.

पुस्तक एकूण सात प्रकरणांमध्ये विभागलेले आहे पहिल्या प्रकरणात अध्ययन पद्धतीचे विश्लेषण केले आहे. दुसऱ्या प्रकरणात मतप्रणालीची अपरिहार्यता स्पष्ट करीत असताना लेखिकेने शुम्पिटर, कार्ल मार्क्स, मॉरिस डॉब प्रभृतींच्या विवेचनांचे आधार घेत मत-प्रणालीचे तात्त्विक स्वरूप समर्थपणे स्पष्ट केले आहे. ग्रेगरी ग्रॉसमनच्या मतानुसार विचारप्रणाली म्हणजे सामाजिक समूहाकडून स्वीकारला जाणारा कल्पनांचा संच आहे (पृ. 16). जे. ए. शुम्पिटरच्या प्रतिपाद-नानुसार अभ्यासकाच्या विश्लेषण कार्यासाठी आधारभूत सामग्री वा विचारांची सर्वसामान्य चौकट त्याच्या 'दृष्टी' ने (vision) पुरविली जाते; या दृष्टीचे स्वरूप मतप्रणालीचे असते (पृ. 16). कार्ल मार्क्सच्या

मते अशा कल्पना व कल्पनांची व्यवस्था ही मतप्रणाली असते. ती दिलेल्या कोणत्याही काळी व दिलेल्या सामाजिक समूहात अस्तित्वात असते. मतप्रणाली ही आर्थिक कल्पना, आर्थिक परिस्थिती, आर्थिक नीती आणि आर्थिक हितसंबंधांची निर्मिती असते ( पृ. 17 ). मॉरिस डॉब यांच्या मते, ज्याद्वारे विश्लेषण, उप-योजन, निष्कर्ष, इत्यादीसाठी उपयुक्त अशी विचा-रांची चौकट तयार होते अशा उच्चस्तरीय संबद्ध संकल्पनांच्या समूहाशी मतप्रणालीचा संबंध असतो ( पृ. 18 ). मतप्रणालीचे तात्त्विक स्वरूप स्पष्ट करीत असताना लेखिकेने मतप्रणालीच्या विकासातील विरोध-विकासात्मक प्रवृत्तीचे स्पष्टीकरण देत असताना इर्वाईग या विचारवंताचे मत उद्धृत केले आहे ( पृ. 22 ). याच प्रकरणात अभिमत मतप्रणालीचे सरंजामशाही व व्यापारवादी मतप्रणालीशी तुलनात्मक विवेचन केले आहे. अर्थशास्त्राच्या आरंभीच्या विद्या-र्थ्यांस हे विवेचन खचितच उपयुक्त ठरेल. अभिमत मतप्रणालीचे सामान्य विवेचन करताना प्रामुख्याने ॲडॅम स्मिथ, रिकार्डो, माल्थस व जॉन स्टुअर्ट मिल या अर्थशास्त्रज्ञांच्या वाङ्मयाचा विचार केला आहे. त्यांची निवड करण्यामागची भूमिका स्पष्ट करताना लेखिकेचे प्रतिपादन असे आहे (पृ. 8). ॲडॅम स्मिथ अर्थशास्त्राचे जनक मानले जातात. अर्थशास्त्रज्ञांच्या पुढच्या पिढ्या स्मिथच्या लिखाणावर परिपोषित झाल्या. विश्लेषणाच्या तंत्रातील रिकार्डोचे अविस्मरणीय योगदान, तर्कशुद्ध युक्तिवादाची पद्धती आणि आर्थिक समस्याग्रस्त त्यांनी विकसित केलेला दृष्टिकोन; सैद्धान्तिक व नीतीविषयक क्षेत्रांतील माल्थसच्या लोकसंख्या सिद्धान्ताचे स्थान आणि जे. एस. मिल यांनी केलेली विषयाची परिपूर्ण मांडणी, या निकषांच्या आधारे लेखिकेने या चार अभिमत अर्थशास्त्रज्ञांची निवड केलेली आहे.

तिसऱ्या प्रकरणात अभिमत अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक नीतीला दिलेले महत्त्व, आर्थिक नीतीचा शासन कार्याशी असलेला संबंध, शासनाची कार्ये व हस्तक्षेपा-तील संबंध, हस्तक्षेपाचे प्रकार व शासन हस्तक्षेपा-विषयी असलेला दृष्टिकोन यांची चर्चा केली आहे. दुसऱ्या प्रकरणाप्रमाणेच हेही प्रकरण अभ्यासकांच्या दृष्टीने माहितीपूर्ण आहे. "अभिमत अर्थशास्त्रज्ञांचा आर्थिक नीतीबद्दलचा दृष्टिकोन लक्षात घेतला तर त्यांना आर्थिक-सामाजिक सुधारणा संप्रदाय म्हणता येईल. अर्थशास्त्राचा विचार शुद्ध सैद्धान्तिक विश्ले-षण व व्यावहारिक शास्त्र म्हणूनही करता येतो. अभिमत अर्थशास्त्रज्ञांनी या दोन्ही पैलूंकडे लक्ष पुरविले यात शंका नाही." (पृ 55). अशा विधानांद्वारे अभिमत संप्रदायाचा सर्वसमावेशक दृष्टिकोन त्यांनी वाचकांपर्यंत पोचविला आहे. आर्थिक नीतीचे रेखाटन व आयोजन करताना अर्थशास्त्रज्ञांची जबाबदारी काय आहे यासंबंधीचे अभिमत संप्रदायाचे मुद्दे स्पष्ट करून शासनाचे दायित्व, कार्य व हस्तक्षेप यांचा सखोल विचार करताना स्मिथ आणि मिल यांच्या विचारांचा आढावा घेतला आहे. स्मिथच्या मते, राज्यकर्त्यांच्या शास्त्राची शाखा असलेले धोरणाभिमुख अर्थशास्त्र व्यक्ती आणि राज्य दोघांनाही समृद्ध बनविण्याचे प्रस्तावन करते (पृ. 59). व्यक्ती स्वहिताची सर्वोत्तम निर्णेता आहे या तत्त्वाचा अर्थ आत्यंतिक निरंकुशवादी मानतात त्याप्रमाणे गृहीत धरला तर शासनाने त्याची सर्वमान्य कार्येही करण्याची गरज नाही असे होईल असे मिल यांचे विधान आहे ( पृ. 60 ). अधिकारात्मक असलेला आणि नसलेला या दोन प्रकारच्या शासन हस्तक्षेपामधील फरक मिल यांनी फार चांगल्या प्रकारे स्पष्ट केला आहे अशी टिप्पणी करून लेखिकेने मिलचे मत उद्धृत केले आहे ( पृ. 64 ). सारांश, एखाद्या विष-याच्या उकलनासाठी जी पूर्वपीठिका आवश्यक असते तिचे रेखाटन या प्रकरणात केलेले आढळते.

चौथ्या प्रकरणात शासनाचा हस्तक्षेप व त्याचे स्वरूप याविषयीचा अभिमतपंथीयांचा दृष्टिकोन विशद केला आहे यामध्येही स्मिथ आणि मिल या विचार-वंतांच्या वचनांचे आधार घेतलेले आढळतात. स्मिथनी 'वेल्थ ऑफ नेशन्स' या ग्रंथात राज्याची तीन कार्ये पुढीलप्रमाणे सांगितली आहेत; (1) परकियांच्या आक्रमणापासून देशाचे संरक्षण करणे; (2) समा-जाच्या प्रत्येक सदस्याचे अन्याय व दडपशाहीपासून संरक्षण करणे आणि (3) सार्वजनिक संस्थांची निर्मिती व संरक्षण ( पृ. 77 ). ही कार्ये पुनर्उद्धृत करून मिल यांनी विशद केलेल्या शासनाच्या आवश्यक व ऐच्छिक कार्यांचा लेखिकेने परामर्श घेतला आहे. आवश्यक कार्यात व्यक्ती व संपत्तीचे संरक्षण व न्याय आणि सर्वमान्य व अन्य ऐच्छिक कार्ये यांचे विवेचन करीत शासन हस्तक्षेपातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे निर्माण

होणारी असुरक्षितता ( पृष्ठे 80 ते 82 ), तिचे स्वरूप आणि विविध कायद्यांचे नैतिक परिणाम उद्‌धृत केले आहेत. वारसा कायदे, कराराशी संबंधित कायदे, दिवाळखोरी संबंधित कायदे, एकस्व कायदे आणि त्यासंदर्भात अभिमतपंथीयांचा दृष्टिकोन विदित करून शासन हस्तक्षेपयोग्य बाबींची चर्चा केली आहे. संपूर्ण प्रकरणावर, अॅडॅम स्मिथ यांचा कार्यासंबंधीचा उल्लेख सोडल्यास, जे एस. मिलच्या लिखाणाचा प्रभाव सातत्याने जाणवतो. तरीही जवळजवळ 37 पानांचे हे प्रकरण अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांची या विषयासंदर्भातील कोणतीही शंका निरसन करणारे आहे.

याच प्रकरणाचा विस्तार म्हणजे पाचवे प्रकरण होय. यामध्ये वितरण आणि शासन हस्तक्षेपाची सांगोपांग चर्चा केली आहे. ही चर्चा प्रामुख्याने रिकार्डो व मिल यांच्या सिद्धान्तांच्या आधारे केली आहे. "वितरणाचा सिद्धान्त ही आर्थिक विकासाच्या संपूर्ण तंत्राच्या आकलनाची किल्ली आहे" (पृ. 114). या रिकार्डोच्या मताबरोबरच "वितरण हा प्रामुख्याने मानवी संस्थांचा विषय आहे" हे मिल यांचे विधानही उद्‌धृत केले आहे." शासन हस्तक्षेप नीतीच्या संदर्भात वितरणाचा प्रश्न महत्त्वपूर्ण ठरतो, कारण वितरणाचे नियम व परिणाम यात कायदा, संस्था व शासकीय उपाय यांनी बदल घडवून आणले जाऊ शकतात. लेखिकेचे असे प्रतिपादन आहे की, "संपत्ती व त्यावरील अधिकारासंबंधीच्या आजच्या कल्पना आणि कायद्यांपेक्षासुद्धा अभिमत अर्थशास्त्रज्ञांचे यासंबंधीचे विचार व प्रतिपादन क्रान्तीकारी, अत्यंत तर्कशुद्ध आणि आर्थिक कारकांचा योग्य परिप्रेक्ष्यातून विचार करणारे असल्याचे दिसून येते." या प्रकरणात कृषी पद्धती व उत्पन्नाचे वितरण (त्यामध्ये कॉटीयर पद्धती, मेटेयर पद्धती, कृषक मालक पद्धती यांचा अंतर्भाव आहे), औद्योगिक क्षेत्र व वितरण, पुर्नवितरण – अभिमत दृष्टिकोन, वारसा संपत्ती, परिस्थितीनिर्मित संपत्ती कर, न्याय्य वितरणासाठी योग्य संस्थात्मक व वैधानिक चौकट, वेतन प्रभावित करणारा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शासन हस्तक्षेप, लोकसंख्या नियंत्रण व त्याचे उपाय या महत्त्वाच्या मुद्यांवर रिकार्डो, मिल, मसग्रेव्ह, रॉबर्ट नॉझिक इत्यादींचे विचार उद्‌धृत केले आहेत. सारांश, न्यायअर्जित उत्पन्नाची व न्यूनतम अनार्जित उत्पन्नाची नीती स्वीकारार्ह मानून आवश्यक उपभोगाच्या शाश्वतीच्या दृष्टिकोनातून शासन हस्तक्षेप कोणत्या प्रकारचा व कोणत्या स्वरुपात असणे आवश्यक आहे याचे समग्र विवेचन या प्रकरणात केले आहे.

सहाव्या प्रकरणात अभिमत अर्थशास्त्रातील निरंकुशता नीतीचे (laissez-faire policy) विवेचन करताना निर्विवाद हस्तक्षेपयोग्य क्षेत्र व निरंकुशतेचे सामान्य क्षेत्र यांची चर्चा केली आहे. या संदर्भात सुधारणावाद्यांचा हस्तक्षेपसमर्थक दृष्टिकोन व शासन हस्तक्षेपाचा प्रत्यक्ष अनुभव यांची सविस्तर चर्चा केली आहे तसेच अभिमत अर्थशास्त्रज्ञांनी निरंकुशता नीतीचे समर्थन करीत असताना जो आधारभूत युक्तिवाद मांडला आहे तोही सांगितला आहे. लेखिकेने हे दृष्टिकोन तौलनिक स्वरुपात मांडले आहेत.

शेवटचे प्रकरण उपसंहाराचे आहे. या प्रकरणात अभिमत अर्थशास्त्रज्ञांनी शासन हस्तक्षेपाला अनेक ठिकाणी मान्यता देऊनही ते अंतिमत: निरंकुशतावादी कसे होते ते स्पष्ट केले आहे. यासाठी अभिमत मतप्रणालीतून प्राप्त होणारे संकेत, शासन हस्तक्षेपासंबंधीचा विवेचनातून प्राप्त निर्देश यांचा वापर करीत निरंकुशता नीतीच्या निष्कर्षाचा मार्ग स्पष्ट केला आहे. त्यासाठी काही मुद्दे ठळकपणे मांडले आहेत.

थोडक्यात, राज्य हस्तक्षेप नीतीच्या संदर्भातील अभिमत विचारधारेतील एक ऐतिहासिक आढावा सदर पुस्तकाद्वारे लेखिकेने सादर केलेला आढळतो. ज्या चार अभिमत अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांचा यासंदर्भात त्यांनी अभ्यास केलेला आहे त्यांची नेमकी आणि वेचक विधाने जागोजागी वापरलेली आहेत. त्याव्यतिरिक्त या चार सिद्धान्तकर्त्यांच्या विचारावर टीकात्मक लिखाण केलेल्या केनक्रॉस, जॉन्सन, ओब्रायन, मसग्रेव्ह, रोझेनबर्ग, राफेल, राइसमन, स्टिग्लर, सॅमेल अशा अनेक विचारवंतांचे विचार उद्‌धृत केलेले आढळतात.

लेखिकेने मनोगतात नमूद केल्याप्रमाणे, "अभिमत अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक जीवनाकडे संपूर्ण समाज जीवनाचा एक भाग म्हणून पाहिले. अर्थशास्त्र हे सामाजिक तत्त्वज्ञानाची एक शाखा आहे या पद्धतीने विवेचन केले आहे." याला अनुसरूनच राज्य हस्तक्षेप

नीती संदर्भातील अभिमत अर्थशास्त्रज्ञांच्या दृष्टि-कोनाची चर्चा करताना तत्कालीन सामाजिक व्यव-स्थेचीही पुसटशी चर्चा केली आहे. ऐतिहासिक अभ्यास पद्धतीत अशा प्रकारची चर्चा अभिप्रेत असते. त्या-दृष्टीने हे पुस्तक त्या निकषास पात्र ठरले आहे. परंतु याचबरोबर पुस्तकातील काही त्रुटीदेखील लक्षात घेणे आवश्यक आहे.

प्रस्तुत लेखाच्या प्रारंभीच पुस्तकाच्या परि-क्षणाचे निकष नमूद केलेले आहेत : संशोधनपर लिखाण, उद्दिष्टे आणि भाषाशैली. पहिले दोन निकष सामान्यपणे समानच आहेत. एखाद्या विषयावरील प्रबंध सादरीकरणाकरिता वापरलेली भाषाशैली विशिष्ट वाचकवर्ग दृष्टीसमोर ठेऊन वापरलेली असते. हा वाचकवर्ग त्या विषयाचे मूलगामी ज्ञान असलेला आणि पारिभाषिक संज्ञांची चांगली माहिती असलेला अभ्यासू व चिकित्सक असतो असे गृहीत असते. परिणामी भाषा बोजड होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बोजड भाषा व कठीण शब्दांचा वापर या-मागचे अंतिम उद्दिष्ट वाचकास विचारोन्मुख करणे हे असेल तर संशोधन ग्रंथामध्ये वापरण्यात आलेल्या अशा भाषाशैलीचा स्वीकार करता येतो. ( तथापि बोजड भाषेमुळे विचारप्रक्रियेस सुरुवात होते का, हा मुद्दा विवाद्य आहेच. ) प्रस्तुत पुस्तक हे मुलतः संशोधनपर प्रबंध म्हणूनच सादर केलेले असल्याने वापरलेली कठीण भाषाशैली प्रत्यक्षात वाचकास विचारोन्मुख करते का हा प्रश्न महत्त्वाचा आहे. मूळ संकल्पनांवरील सकारा-त्मक टीका किंवा मूळ संकल्पनेचा नवीन अन्वय किंवा मूलभूत नवीन संकल्पनेची मांडणी किंवा मूळ संकल्पनेचे प्रचलित परिस्थितीशी उपयोजन यापैकी कोणत्याही एका उद्दिष्टाची परिपूर्ती करण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनपर प्रबंधात झाला असता तर या कठीण भाषा-शैलीचे समर्थन करता आले असते. प्रत्यक्षात हे झालेले आढळत नाही. असा प्रयत्न झाला असता तर पुस्तकाची व पर्यायाने प्रबंधाची उपयुक्तता वाढली असती. जेव्हा एखाद्या संशोधनपर प्रबंधाचे पुस्तकात रूपांतर केले जाते तेव्हाचा वाचकवर्ग वेगळा असतो. हा वाचकवर्ग सामान्य वाचकवर्ग असतो आणि विशेषतः सामाजिक शास्त्र शाखेत अंतर्भाव होणाऱ्या सामान्य वाचकवर्गाच्या दृष्टिकोनातून किंचित क्लिष्ट असणाऱ्या अर्थशास्त्रा-सारख्या विषयावरील लिखाण पुस्तकरूपाने प्रसिद्ध होते तेव्हा क्लिष्ट संकल्पनांचे सुटसुटीत वाक्यांमध्ये व सोप्या शब्दांमध्ये स्पष्टीकरण होणे अभिप्रेत असते; नव्हे ते आवश्यक असते. तरच त्या विषयाच्या विशेष अभ्या-सकांव्यतिरिक्त समाजातील इतर सामान्य वाचकवर्गही या लिखाणाकडे जिज्ञासेपोटी, कुतूहल म्हणून आकृष्ट होऊ शकतो. एखाद्या विषयाच्या अभ्यासकांपुरतेच लिखाण करण्याचा दृष्टिकोन संकुचित आहे. सामान्य व्यक्तीची जिज्ञासापूर्ती हा व्यापक दृष्टिकोन सामाजिक शास्त्र लेखनात होणे आवश्यक असते. हा दृष्टिकोन स्वीकारला नसावा किंवा त्यादृष्टीने लिखाण झालेले नाही असे खेदाने नमूद करावे लागते. सामाजिक शास्त्रांतील ज्ञानासंदर्भात सामान्य लोकांचा काय दृष्टिकोन असतो यासंदर्भात पुढील तपशिलाची नोंद घ्यावयाला हरकत नाही. रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक विभागाचे प्रमुख नरेंद्र जाधव यांनी लिहिलेल्या 'आमचा बाप आन आम्ही' या पुस्तकातील एक प्रसंग आहे. अमेरिकेतील इंडियाना या विद्यापीठात फेलोशिप मिळवून जाधव यांनी अर्थशास्त्र विषयावर प्रबंध सादर केला. या प्रबंधाला सर्वोत्तम संशोधन प्रकल्प म्हणून मान्यताही मिळाली भारतात परत आल्यावर आपल्या वृद्ध व अशिक्षित वडिलांना यासंदर्भात त्यांनी माहिती दिली. तेव्हा वडिलांनी प्रश्न केला, " याचा सामान्य मानसाला उपेग काय ? तू जो आभ्यास करशील, संशोधन करशील त्याचा रस्त्यावरच्या सामान्य मानसाला उपेग होणार नसेल तर ते सगळं झूठ हाये ". हा संदर्भ प्रातिनिधिक आहे किंवा नाही त्याचे उत्तर वाचकवर्गावरच सोडू या. परंतु सामान्य लोकांची हीपण एक अपेक्षा असते हे निश्चित असेल तर ही अपेक्षापूर्ती प्रस्तुत पुस्तकाद्वारे होत नाही खालील उदाहरणे देत असताना 'पुढचेमागचे संदर्भ न देता उदाहरणे दिली ' असा आक्षेप घेतला जाण्याची शक्यता स्वीकारूनही उदाहरणे देत आहे.

" अधिकारात्मक हस्तक्षेपाला बाजारशक्तींना प्रतिबंध करणारा हस्तक्षेप व अधिकारात्मक नसलेल्या हस्तक्षेपाला बाजारशक्ती आवर्धक हस्तक्षेप म्हणता येईल " ( पृ. 66 ).

" ... सनातनी अर्थशास्त्रज्ञ हे पहिले अभ्यासक होते, ज्यांना बाजारयंत्रणेची आवंटनात्मक यंत्रणा भावली " ( पृ. 89 ).

" संपत्तीत प्रयत्न व प्राप्तीतील साहचर्य सारभूत

असल्याने भूसंपत्तीचे विवेचन आवश्यक ठरते" (पृ. 129).

"नैतिक बंधने लोकसंख्येच्या निर्वाह साधनांपेक्षा अतिशयनाला प्रतिबंध घालतील परंतु हे नियंत्रण योग्य संस्थांच्या चौकटीतच कार्यशील होईल" (पृ. 142).

"व्यक्तीच्या आकलनानुसार कृती करण्याच्या स्वातंत्र्यावर प्रतिबंध घालणे म्हणजे मनुष्याला शारीरिक व मानसिक क्षमतांच्या संवेदनात्मक वा क्रियात्मक विकासापासून वंचित करणे ठरेल. .... मानवी मन जेव्हा निम्न दर्जाचे असते तेव्हा त्याला निम्न दर्जाच्या उद्दिपकांचीच गरज असते" (पृ. 38).

"संपत्तीचे उत्पादन ही यादृच्छिक गोष्ट नाही" (पृ. 41).

"न्याय भावनेमुळे समाज संभाव्य बनतो कारण प्रत्यक्ष कार्यान्वित करता येऊ शकेल अशा चूक आणि बरोबर किंवा न्याय व अन्याय यासंबंधीच्या स्वीकृत मानकांवर समाज अधिष्ठित असला पाहिजे" (पृ. 49).

"... खाजगी मदतीच्या अपर्याप्ततेची पूर्ती करण्यासाठी तसेच निरक्षेप गरजांबाबत शाश्वती या शासनाच्या कर्तव्याशी सुसंगत असल्याने गरिबांना आवश्यक मदत शासनाद्वारे पद्धतशीरपणे व सुनिश्चितपणे उपलब्ध करून देणे उचित ठरते" (पृ. 105).

"परिणामातील जरूरीचे तत्व" (पृ. 158).

"समरूप एकल पद्धतीची अनभिष्टता" (पृ. 159).

संपूर्ण पुस्तकात अशा प्रकारच्या शब्दांची व वाक्यांची रेलचेल आहे.

या संदर्भात लेखिकेला एक सवलत देणे योग्य ठरेल. सैद्धान्तिक संकल्पनांच्या स्पष्टीकरणात विशिष्ट पारिभाषिक शब्दांचा वापर करावा लागतो त्यामुळे भाषा काहीशी कठीण होण्याची शक्यता असते. सामाजिक शास्त्रांचे लिखाण प्रादेशिक भाषेत करण्याचे सर्वसामान्य प्रयत्न विशेषतः गेल्या तीनचार दशकातले आहेत. त्यासाठी अधिक काळ जाणे आवश्यक आहे. त्यामुळे काही मूळ संज्ञांच्या भाषांतरित शब्दांच्या वापराविषयी संदेह निर्माण होतात. किंबहुना एकच भाषा प्रचलित असतानाही प्रादेशिक विभागाप्रमाणे मूळ संज्ञांचे पारिभाषिक शब्द वेगवेगळे असू शकतात. भाषांतरित पारिभाषिक शब्दांचे अजून प्रमाणीकरण (standardisation) झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. परिणामी अशा प्रकारच्या पारिभाषिक सूचीचा पुस्तकात समावेश असणे केवळ उपयुक्तच नव्हे तर शास्त्रीयही ठरले असते. जे पारिभाषिक शब्द वापरले आहेत त्यांचा अर्थ सुयोग्य असणे आवश्यक असते. अन्यथा त्यामुळे व सूचीचा अंतर्भाव नसल्याने अधिकच गोंधळ होतो यानजीदाखल पुढील उदाहरण पाहा. लेखिकेने 'कृषकवर्ग' या शब्दाचा वापर केला आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांनी प्रसिद्ध केलेल्या (1976) **मराठी विश्वकोष** खंड 4, पृ. 138 प्रमाणे मराठी भाषेत 'कृषक' हा शब्द नाही. तो 'कृषिक' हा आहे. कदाचित 'कृषिक' शब्दाचे ध्वनिपरिवर्तन (वर्णलोप) होऊन तो 'कृषक' आहे असे मानले तरी त्याचे अर्थ पुढीलप्रमाणे आहेत: "कृषिक्षेत्रात वावरणाऱ्या लोकांचे वेगवेगळे वर्ग, उदाहरणार्थ, जमीनदार, स्वतःची जमीन कसणारा शेतकरी दुसऱ्याची जमीन कसणारी कुळे, भूदास व भूहीन मजूर, इत्यादी." यापैकी नेमका कोणता अर्थ अभिप्रेत आहे? कारण, 'कृषिक' हा शब्द व्यापक आहे. म्हणून त्याच्या वापराचे नेमकेपण निश्चित होणे शास्त्रीय ठरते. अशावेळी 'शेतकरी' हा सामान्यांना अभिप्रेत असलेला व व्यवहारात रुजलेला शब्द वापरणे योग्य ठरले असते. **आदर्श मराठी शब्दकोश** (1970), विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे याप्रमाणेही 'कृषिक' म्हणजे शेतकरी, शेत कसणारा असाच आहे. तसेच 'शेतकरी' याचे अर्थ शेतीवर निर्वाह करणारा कृषीवल, शेताचा मालक, शेतावर काम करणारा असे आहेत.

'बहुआयामी' या शब्दाचा वापर करताना बहुधा multi-dimensional हा इंग्रजी शब्द अभिप्रेत असावा. प्रत्यक्षात **आदर्श मराठी शब्दकोश** (1970) या कोशात 'आयाम' (पु.) या शब्दाचा अर्थ जमीन वगैरेची लांबी (पृ. 55) असा आहे तर **बृहत हिंदी मराठी शब्दकोश,** महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे (1965) यानुसार 'आयाम' (पु.) म्हणजे लांबी,

विस्तार, नियमन, प्रशस्तपणा, माप असा आहे. भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी प्रसिद्ध केलेल्या (1987) **अर्थशास्त्र परिभाषा कोशामध्ये** या शब्दाचा समावेश नाही.

संशोधनपर प्रबंध जेव्हा पुस्तकरूपाने वाचकांना उपलब्ध करून दिले जातात तेव्हा संकल्पनांच्या भाषांतरित शब्दांचे प्रमाणीकरण न झाल्याने जे संदेह निर्माण होऊ शकतात ते टाळण्यासाठी पारिभाषिक संज्ञांची सूची देणे किती आवश्यक आहे हे या उदाहरणांनी स्पष्ट होते.

भाषेच्या वापरासंदर्भात काही विधाने बुचकळ्यात टाकणारी आहेत. लेखिकेने नमूद केल्याप्रमाणे, "पुस्तकातील विवेचनात इंग्रजीतील 'Classical' या शब्दासाठी अभिजात किंवा अभिमत किंवा सनातन या शब्दाचा वापर केला आहे" (पृ. 3). या पार्श्वभूमीवर, "माणसांच्या गुणवैशिष्टयांच्या विकासाचे साधन म्हणून **अभिजात** अर्थशास्त्रज्ञांनी कामाचा केलेला विचार प्रकर्षाने लक्षात घेतला नाही. परंतु **सनातनी** अर्थशास्त्रज्ञांच्या लिखाणातून तो वारंवार सुव्यक्तपणे प्रकटला आहे" (पृ. 30), याचा अर्थ काय? (जाड टाईप माझा आहे.) अशा प्रकारचे दोन वेगवेगळे शब्द वाचकाला संभ्रमात टाकणार नाहीत काय? "शासनाचे दायित्व **वरचेवर** वा नगण्य मुळीच नाही" (पृ. 193). याठिकाणी '**वरचेवर**' या शब्दाचा अर्थ 'वारंवार' (frequent) असा घ्यावयाचा की 'वरवरचा' (superficial) असा घ्यावयाचा की अन्य काही? हा मुद्रणदोष आहे की अर्थदोष? जर हा मुद्रणदोष असेल तर गंभीर स्वरूपाचा आहे आणि असे अनेक मुद्रणदोष प्रस्तुत पुस्तकात आढळतात. जर हा अर्थदोष असेल तर संशोधनाच्या दृष्टिकोनातून अशास्त्रीय आहे.

सारांश, शब्द व भाषेच्या बाबतीत पुस्तकात अनेक त्रुटी आहेत. भाषेला अलंकृत करून तिला अर्थपूर्ण करण्याच्या प्रयत्नात विचारांचा गोंधळ झालेला आहे असे वाटते. भाषाशैलीचा परामर्श घेतल्यानंतर परिक्षणाच्या मुख्य मुद्यांकडे वळू. संशोधनपर लिखाणाची जी चार उद्दिष्टे नमूद केलेली आहेत आणि जी ऐतिहासिक विवेचनपद्धती वापरली आहे त्या अनुषंगाने काही बाबींकडे लक्ष वेधणे जरूर आहे. पूर्वीच नमूद केल्याप्रमाणे अभिमत अर्थशास्त्रज्ञांच्या दृष्टिकोनातून राज्य हस्तक्षेप नीतीचा एक समग्र आलेख वाचकांसमोर उलगडून ठेवण्यात लेखिकेला यश मिळाले आहे यात शंका नाही. यासंदर्भात अर्थशास्त्राच्या अभ्यासकांची व सामान्य वाचकांची जिज्ञासा पूर्ण होईल असे विवेचन केलेले आहे. प्रकरणांचा आढावा सादर करीत असताना हे नमूद झालेले आहेच. परंतु जॉन वेस्ट या लेखकाच्या मताप्रमाणे ऐतिहासिक संशोधनपद्धतीत "विशिष्ट मर्यादित भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न करणे हाही उद्देश असतो," यानुसार प्रस्तुत संशोधनपर पुस्तकात या उद्देशाची परिपूर्ती कुठेही झालेली आढळत नाही. किंबहुना भारताने स्वीकारलेल्या नवीन आर्थिक धोरणाच्या (1991) पार्श्वभूमीवर राज्य हस्तक्षेप नीतीच्या धोरणाचा संदर्भ व भविष्यकालीन मार्गाचा वेध घेणे अपेक्षित होते. ऐतिहासिक संशोधनपद्धती म्हणजे केवळ गतकालीन घटनांच्या नोंदींचा पट उलगडून दाखविणे असा नाही. त्यादृष्टीने या पुस्तकाची मर्यादा जाणवते.

उद्दिष्टांपैकी तिसरे उद्दिष्ट "आजच्या समाजातील आर्थिक प्रश्नांचा विचार व सोडवणूक करताना सनातनवादी दृष्टिकोन व विवेचनातील मूलभूत पैलूंचे प्रकर्षाने विवेचन करणे" असे मांडले आहे. हे उद्दिष्टही साध्य झालेले नाही. या संदर्भात अनेक प्रश्न अनुत्तरित राहतात. '**आजचा समाज**' यामध्ये '**आज**' म्हणजे कोणता निश्चित कालावधी? कोणता '**समाज**' लेखिकेला अभिप्रेत आहे? जर तो विशिष्ट कालावधीतील भारतीय समाज अभिप्रेत असेल तर या समाजातील आर्थिक प्रश्न नेमके कोणते आहेत? ते का निर्माण झाले आहेत? त्यांची सोडवणूक करण्यासाठी अभिमत दृष्टिकोन का उपयुक्त / महत्त्वपूर्ण आहे? त्या विवेचनातील कोणती नीती अधिक योग्य आहे आणि का? त्यासंदर्भात काही प्रयत्न, विचारमंथने झाली आहेत का? त्यातून निष्पन्न काय झाले आहे? जर अशी विचारमंथने झाली नसतील तर लेखिका काय उपाययोजना सुचवितात? त्यांचे समर्थन काय? अशा अनेक बाबींचा सखोल विचार झाला असता तर सिद्धान्तांमधील नीतींच्या व्यावहारिक उपयोजना प्रयत्नांचे श्रेय लेखिकेला खचित मिळाले असते आणि पुस्तकाची व्यवहार्यता वाढली असती. यावरून असे निदर्श-

भास येते की, स्वीकारलेल्या संशोधनपद्धतीत काही उणिवा आहेत. त्यात संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा यांचा उल्लेख नाही.

दुसरी त्रुटी नमुना चाचणी तंत्राविषयीची ( sampling technique ) आहे. अभिमत मतप्रणालीमधील केवळ एकाच नीतीचा – राज्य हस्तक्षेप नीतीचा – विचार केन्द्रीभूत ठेऊन लेखिकेने मीमांसा केलेली आहे. असे असताना यासंदर्भातील सखोल आणि विस्तारित टीकात्मक विवेचन अभिप्रेत होते. स्वतः लेखिकेनेच नमूद केले आहे ( पृ. 7 ) की, अभिमत अर्थशास्त्रामध्ये जेम्स मिल, जे. आर. मॅक्‌लक, नासो सीनियर, फ्रान्समधील जे. बी. से, फ्रेडरिक बॅस्टिआ, जर्मनीतील के. एच्. राउ, फॉन थूनेन, व्हॉल्फ हरमान, अमेरिकेतील एस. सी. करे याव्यतिरिक्त सर एडवर्ड वेस्ट, हेन्री फॉसेट, केर्नस्, थॉमस टूक, इत्यादी अर्थशास्त्रज्ञांचाही समावेश होतो. अभिमत तत्त्वप्रणालीतील काही तत्त्वांशी ज्यांचा मतभेद आहे असे रॉबर्ट टॉरेन्स, कार्ल मार्क्स प्रभृतींचेही वैचारिक योगदान आहे. अभिमत मतप्रणालीला एक समृद्ध, दीर्घ परंपरा आहे. अनेक भाष्यकर व ख्यातनाम विचारवंतांचे मौलिक योगदान तिला लाभलेले आहे. त्या मतप्रणालीवर चिकित्सक टीकाही झालेली आहे. अशी वस्तुस्थिती असताना आणि अभिमत मतप्रणालीतील केवळ एकाच नीतीचा – राज्य हस्तक्षेप नीतीचा – विचार करीत असताना केवळ चारच अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांचा परामर्श घेणे हा दृष्टिकोन संकुचित वाटतो. जर उपरिनिर्दिष्ट विचारवंतांचे विचार, दृष्टिकोन अभ्यासिले गेले असते तर ऐतिहासिक विवेचन पद्धतीतील 'सत्यशोधन' ( fact-finding ) हा उद्देश सफल झाला असता.

अभिमत मतप्रणालीचा पगडा तत्कालिन विविध देशांतील समाजावर होता. परिणामी, त्या त्या विशिष्ट देशातील तत्कालिन राजकीय, सामाजिक परिस्थितीचा आर्थिक नीतींवर होणारा अपरिहार्य परिणाम व आर्थिक नीतींचा अन्य परिस्थितीवर होणारा प्रभाव यांचा उलगडा लेखिकेने केला असता तर राज्य हस्तक्षेप नीतीचा अन्वय एका नवीन चौकटीतून पडताळून बघण्याचे श्रेयही मिळाले असते. कारण कोणत्याही सामाजिक शास्त्रातील संशोधनामध्ये सामाजिक – आर्थिक – राजकीय विचारांचा परस्परसंबंध विशद करणे श्रेयस्कर असते. अभिमत तत्त्वप्रणाली इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका, रशिया या भौगोलिकदृष्ट्या विभिन्न राष्ट्रांमध्ये अनुसरली गेली होती असेच नव्हे तर या देशांच्या राजकीय – सामाजिक चौकटीही भिन्न होत्या या भिन्नत्वातूनही काही एक समान सूत्र राज्य हस्तक्षेप नीतीमध्ये आढळत होते का? या नीतीची प्रत्यक्ष अमलबजावणी होत असताना त्यात काही फरक व साधर्म्य होते काय? अशा प्रकारे तौलनिक विवेचन झाले असते तर ऐतिहासिक संशोधन पद्धतीवर आधारलेला हा प्रबंध खऱ्या अर्थाने एक शोधप्रबंध झाला असता.

प्रत्यक्षात ज्या चार विचारवंतांचा – ॲडॅम स्मिथ, रिकार्डो, माल्थस, मिल – ऊहापोह केलेला आहे त्यासंदर्भातही मिलचा उल्लेख सर्वाधिक आहे. तशी स्पष्ट कबुली लेखिकेनेही दिली आहे. हे विधान पाहा : "पूर्वीच्या अर्थशास्त्रज्ञांच्या लिखाणात अनुस्यूत असलेल्या बाबी मिलच्या लिखाणात सुस्पष्टपणे उल्लेखिलेल्या आहेत. वरील सर्व कारणांमुळे मिल हा एकप्रकारे अभिजात अर्थशास्त्राचा प्रवक्ता असल्याचे त्याचे ग्रंथ वाचताना वारंवार जाणवले. त्यामुळे सनातनी अर्थशास्त्रज्ञांची मते त्यांच्याच शब्दात सांगताना मिलच्या ग्रंथांतील उद्धरणांचा जास्त वापर झालेला आहे, हे नमूद केले पाहिजे" (पृ. 11). (कोणत्याही संशोधनपर लिखाणात व्यक्तींचा नामोल्लेख एकेरी न करता आदरार्थी करावयाचा असतो असा संकेतही लेखिकेने अनेकदा पाळला नाही.) संशोधनाची सुरुवात स्वच्छ आणि वस्तुनिष्ठ बुद्धीने केली पाहिजे. जसजशी विचारांचा वेध घेण्याच्या प्रक्रियेस सुरुवात होते, निरिक्षणांचा अवलंब केला जातो, विचारमंथनास सुरुवात होते तसतशी मांडलेल्या गृहितांची सत्यासत्यता प्रकट होते. प्रस्तुत प्रबंधात गृहितांची आवश्यकता नाही कारण त्यामध्ये मतप्रणालीची चिकित्सक मांडणी आहे. साहजिकच विचारवंतांच्या त्यावरील चिकित्सक लिखाणाचा परामर्श घेणेही नैसर्गिक आहे. परंतु केवळ एल. एच. हॅने यांनी "सनातनी अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांचे संयोजन, पुनर्कथन व सुधारित स्वरुपात शिकवण ही कार्ये मिलने इतक्या यशस्वीपणे केलीत की इंग्लिश विचारकांवर त्यांच्याइतका प्रभाव दुसऱ्या कोणाचाही नाही" (पृ. 11) असे म्हटले म्हणून मिलच्या उद्धरणांचाच जास्त वापर करावयाचा हा दृष्टिकोन सदोष आहे. जर

अभिमत मतप्रणालीतील केवळ एका मतप्रणालीचा सखोल अभ्यास इतके मर्यादित उद्दिष्ट होते, त्यातही फक्त चारच विचारवंतांच्या लेखनाचा फक्त त्याच नीतीपुरता विचार करावयाचा होता तर मग त्या चारही विचारवंतांचे मूळ विचार का नाही अभ्यासावयाचे? केवळ त्या विचारांचे संयोजन, पुनर्कथन व सुधारित स्वरुपातील शिकवण मिलने केली म्हणून मिलच्या उद्धरणांचा जास्त वापर ही दृष्टी संशोधकाची नाही, ही एक पळवाट आहे. किंबहुना ज्या विचारवंतांच्या लेखनात अनुस्यूतता होती, ती काय होती हे मांडावयाला पाहिजे होते. त्यातील संदिग्धता स्वतःच्या प्रयत्नाने दूर करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक होते. मग मिलच्या विचारांचा आढावा घेणे उचित ठरले असते. किंबहुना संदिग्धता, अनुस्यूतता दूर करताना झालेले प्रयत्न कदाचित तितक्या ताकदीचे झालेही नसते (मिलच्या तुलनेत ते दुबळे ठरणेही नैसर्गिकच आहे; येथे सर्वसामान्यपणे कोणत्याही संशोधकास याचीच प्रचीती आली असती) परंतु हे प्रयत्न स्वकष्टार्जित व मौलिक (original) ठरले असते. संशोधनपर लिखाणाचा हेतू हाच असतो. या प्रयत्नांच्या अभावाने प्रस्तुत पुस्तकातील विचार हे बव्हंशी केवळ एक संकलन ठरते.

लेखिकेचे प्रतिपादन असे आहे की, "रिकार्डोचे लिखाण प्रामुख्याने तांत्रिक स्वरुपाचे आहे. हस्तक्षेपासंबंधी नीतीचे विश्लेषण मतप्रणालीच्या अनुषंगाने केलेले असल्याने रिकार्डोच्या वेळोवेळी प्रत्यक्ष उल्लेख व उदाहरणे कमी येणे स्वाभाविक आहे" (पृ. 11). या विधानाची परीक्षा करणे आवश्यक आहे. कारण मुळात संपूर्ण मतप्रणालीतील एका नीतीचा विचार अभ्यासिलेला आहे; त्या नीतीचा अभ्यास करीत असताना फक्त चार अर्थशास्त्रज्ञांच्या त्या नीतीविषयक विचारांचा अभ्यास आहे; आणि या चार अर्थशास्त्रज्ञांपैकी एका अर्थशास्त्रज्ञाच्या लिखाणाविषयीचे हे विधान आहे. म्हणून परीक्षण आवश्यक आहे. प्रश्न असा आहे की, तांत्रिक स्वरुपाचे लिखाण व मतप्रणाली यांचा परस्परसंबंध असतो की नसतो? यासाठी तंत्र म्हणजे काय, लिखाणाच्या ढोबळ पद्धती आणि मतप्रणाली यांचा विचार आवश्यक आहे. मतप्रणालीविषयी अतिशय विस्तृत लिखाण प्रस्तुत पुस्तकात आहे. त्यानुसार, "मतप्रणाली हा कल्पनांचा संच आहे (पृ. 16), ..."ज्या विश्लेषणकार्यासाठी आधारभूत 'सामग्री' व विचारांची सर्वसामान्य 'चौकट' ज्या दृष्टीने पुरविली जाते त्याचे स्वरूप मतप्रणालीचे असते ... मतप्रणाली म्हणजे तत्त्वे, नीती, सिद्धान्त यांना आधारभूत असलेली विचारांची चौकट होय" (पृ. 24). तंत्र म्हणजे कोणतीही क्रिया करण्याची विशिष्ट पद्धती व कृतीतील कौशल्य. तंत्र म्हणजे साधन. विशिष्ट तत्त्वे, नीती, सिद्धान्त, म्हणजेच विशिष्ट मतप्रणालीचे सादरीकरण किंवा लिखाण वर्णनात्मक पद्धतीने किंवा / आणि तांत्रिक पद्धतीने करता येते.

या संक्षिप्त पार्श्वभूमीवर तांत्रिक स्वरुपाच्या लिखाणाचा व मतप्रणालीच्या अनुषंगाने केलेल्या नीतीच्या विश्लेषणाचा परस्परसंबंध तपासून पाहावयाचा आहे. कोणतीही क्रिया विचाराशी निगडित असते. या विचारांची शास्त्रीय पद्धतीने मांडणी केली असता मतप्रणालीची निर्मिती होते. जेव्हा हे विचार तत्त्वे, नीती, सिद्धान्तांच्या माध्यमातून तांत्रिक पद्धतीने लिखित स्वरुपात सादर केले जातात, म्हणजे शब्दांच्या वापराऐवजी साधनांच्या साहाय्याने सादर केले जातात, तेव्हा त्या साधनांना विचारांचा पाया असतो. किंबहुना विशिष्ट विचारांची मांडणी करण्यासाठी सुयोग्य साधनांचा वापर केला जातो; अशी साधने उपलब्ध नसतील तर त्यांची निर्मिती करून विकास केला जातो. कारण विशिष्ट आर्थिक प्रश्नाविषयीचा अर्थशास्त्रज्ञाचा दृष्टिकोन या साधनांद्वारे मांडला जातो. मतप्रणाली व साधने किंवा तंत्र यांचा संबंध असा परस्परावलंबी, परस्पर निगडित असतो. अशा परिस्थितीत रिकार्डोचे जे तांत्रिक स्वरुपातील लिखाण आहे त्यामधील अचूक मर्म मतप्रणालीच्या वर्णनात्मक पद्धतीने उलगडून दाखविणे जास्त सयुक्तिक ठरले असते. रिकार्डोने जी तंत्रे वापरली त्यांचा अर्थ, त्यांचे संदर्भ, त्यांची सयुक्तिकता व या तंत्रांच्या साहाय्याने राज्य हस्तक्षेप नीती विषयीची त्यांनी स्वतः मांडलेली मते किंवा त्या मतांच्या प्रत्यक्ष अनुपस्थितीच्या परिस्थितीत लेखिकेची स्वतःची मते अशी योजना उपयुक्त ठरली असती. केवळ "तांत्रिक स्वरुपाचे लिखाण असल्याने वेळोवेळी प्रत्यक्ष उल्लेख व उदाहरणे कमी येणे स्वाभाविक आहे," हे प्रतिपादनच अस्वाभाविक आहे.

सारांश, मुक्ता जहागिरदार यांनी लिहिलेल्या

'अभिजात अर्थशास्त्र आणि राज्य हस्तक्षेप नीती' या पुस्तकाच्या महत्वाच्या त्रुटी मूलतः भाषेचा वापर आणि संशोधन पद्धतीशी निगडित आहेत. त्यापुढेही जाऊन, संशोधनाचा विषय अतिसंकुचित आणि त्याचेही विश्लेषण अधिकतर जे. एस. मिल यांच्याच संदर्भात असे झाल्यामुळे अतिसंकुचिततेचा आणखी संकोच झाला आहे. संशोधनासाठी एवढे लहानसे विषय निवडणे अनेक अंगांनी मर्यादा निर्माण करणारे कसे असते याचेच प्रत्यंतर या पुस्तकामधून येते. परिणामी, अशा पुस्तकांची उपयुक्तता अत्यंत मर्यादित राहते.

□ □

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## एकविसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे एकविसावे वार्षिक अधिवेशन ऑक्टोबर/नोव्हेंबर, 1997 मध्ये आयोजित होणार आहे. शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती येथील अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ. दि. व्यं. जहागिरदार अध्यक्षस्थानी राहतील. अधिवेशनातील चर्चासत्रांसाठी खालील विषय निश्चित करण्यात आलेले आहेत.

(1) लोकसंख्या आणि आर्थिक विकास

(2) संरचनात्मक बदल आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

(3) महाराष्ट्राची जलसंपत्ती : नियोजन, वाटप व वापर

चौथा विषय तत्कालिन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष यथावकाश जाहीर करतील.

निबंध लेखकांनी जास्तीत जास्त 2,000 शब्दांत विषय मांडावयाचा असून **निबंधासोबत 300 शब्दांत त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. निबंधाच्या दोन प्रती आणि सोबत गोषवारा पाठविल्याखेरीज त्याविषयीचा निर्णय अध्यक्षांकडून पाठविला जाणार नाही.**

निबंध मराठीतच असावेत. ते पूर्वी कोठेही सादर वा प्रसिद्ध केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव (इंग्रजी आद्याक्षरे नकोत) व पत्ता, महाविद्यालयाचे / विद्यापीठाचे / संस्थेचे नाव व पत्ता व स्वतःचे पदनाम हा सर्व तपशील **मराठीतच** देणे आवश्यक आहे.

**31 ऑगस्ट,** 1997 ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख आहे. त्यानंतर पाठविलेले निबंध स्वीकारले जाणार नाहीत, निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत :

डॉ. दि. व्यं. जहागिरदार,
12, 'व्यंकटेश', गुलमोहोर कॉलनी, कॅम्प,
**अमरावती**–444 602.

**आ. गो. पुजारी**
कार्यवाह–खजिनदार

*ग्रंथ परीक्षण - 2*

# योजनेकडून बाजाराकडे संक्रमण

The World Bank, FROM PLAN TO MARKET ( World Development Report, 1996 ), Oxford University Press, May 31, 1996 पृष्ठे IX + 241, रु. 250.

शि. मा. माने *

## प्रास्ताविक

1967 ते 1995 या कालात भांडवलवादी आणि समाजवादी अर्थव्यवस्थांविषयी अनुकूल–प्रतिकूल अशी चर्चा झाली. शास्त्रीय समाजवादाच्या विश्लेषणाचे संस्थापक कार्ल मार्क्स यानी 'कामगारांचे आर्थिक शोषण' आणि 'वस्तूस्तोम' अशा भांडवलवादी दुर्गुणांवर बोट ठेवले. पुढे लड्विग फॉन मायजे यानी (1920) 'समाजवादी अर्थव्यवस्था अस्तित्वात असू शकत नाही' या शब्दांत त्या अर्थव्यवस्थेवर सैद्धान्तिक आक्षेप घेतला. परंतु त्यानंतर पाठीमागील पाचसहा दशकांत या दोन अर्थव्यवस्थांविषयी जे साहित्य उपलब्ध झाले त्यात एकारलेला किंवा टोकाचा दृष्टिकोन क्वचितच दिसतो. विशेषत: लँग आणि टेलर (1938) यानी दोन अर्थव्यवस्थांमधील आभासी (apparent) फटीला (dichotomy) दुय्यम लेखून असे सोदाहरण स्पष्टीकरण केले की, तांत्रिक दृष्टिकोनातून विचार करता, समाजवादी अर्थव्यवस्थेने बाजार यंत्रणेला अपथ्य मानण्यास आधार नाही. याच्याही पुढे जाऊन लेखकद्वय प्रतिपादन करतात की, बाजारयंत्रणेचा आधार घेऊन समाजवादी अर्थव्यवस्था भांडवलवादी अर्थव्यवस्थेइतकी कार्यदक्ष असू शकते.

अगदी अलीकडील पाचसहा वर्षांत आदिष्ट (directed) नियोजनाकडून बाजार यंत्रणेकडे होणाऱ्या 'संक्रमणाच्या अर्थशास्त्रा'त ( Economics of Transition ) दोन्ही अर्थव्यवस्थांमधील आंतरविरोधाचा गडदपणा जास्त पातळ झाला आहे. एक काळ असा होता की, आंतरविरोध मनोन्यासारखा अबाधित वाटत होता. परंतु आज त्याचे लीलया गुंडाळण्यायोग्य तंबूत रूपांतरण घडून आले आहे. दरम्यानच्या काळात व्यवसाय संस्थांची संरचना, मालकी, उद्दिष्टे आणि तंत्रविद्या यांच्या संबंधात जे बदल घडून आले त्यामुळे तथाकथित आंतरविरोधाचा गडदपणा पातळ झाला. अधिक स्पष्टीकरणासाठी पुढील तीन निवडक संदर्भांचा उल्लेख पुरेसा ठरेल.

* भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद आणि अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक, सातारा.

समाजवादी अर्थव्यवस्था आणि भांडवलवादी अर्थव्यवस्था यांच्यात घडून येणाऱ्या समन्वयाचे वस्तुनिष्ठ समर्थन करताना ए. के. सेन (1989) म्हणतात, "एक अपथ्य म्हणून भांडवलवादी अर्थव्यवस्थेच्या बाजारयंत्रणेकडे बघण्याला समाजवादी अर्थव्यवस्थेपुढे तांत्रिक आधार नाही आणि भांडवलवादी अर्थव्यवस्थेची बाजार यंत्रणा सर्व आर्थिक आजारांवरील सार्वत्रिक औषध नाही.

बाजारयंत्रणा मागणी-पुरवठ्यातील समतोलाचा विचार करते. उलटपक्षी, गरज आणि पुरवठा यांच्यात समतोल निर्माण करण्यासाठी नियोजन आवश्यक आहे. बाजारयंत्रणा आणि नियोजन यांच्यावरील या मर्यादांचा विचार करून त्यांचा योग्य समन्वय साधण्याची गरज स्पष्ट करताना भारताचा नियोजन आयोग आठव्या पंचवार्षिक योजनेच्या अहवालात (1992-97, खं. 1, उपोद्घात) म्हणतो, "अशा प्रकारे बाजारयंत्रणा आणि नियोजन यांच्यातील निवडीचा हा प्रश्न नाही; दोन्ही एकमेकांशी पूरक राहतील या हेतूने दोन्हींना एकमेकांच्या कुलपी खोबणीत बसविणे (dovetail) हे (च) आव्हान उभे आहे."

विकासाच्या नवीन आव्हानाविषयी सावध करताना 1995 चा जागतिक विकास अहवाल म्हणतो, "आज निव्वळ खुला बाजार आणि राज्याचा हस्तक्षेप यांच्यातील निवड हा सरकारांच्यापुढील प्रश्न नाही. सरकारी हस्तक्षेपाचे कोणते प्रकार बाजारांच्या कार्यदक्ष कार्यानुवर्तनास सर्वोत्कृष्ट आधार देतात, संयंत्र, तंत्रविद्या आणि लोक यांच्यातील जास्तीत जास्त उत्पादक गुंतवणुकीला उत्तेजन देतात आणि लाभांपासून वंचित कामगारांना साहाय्य करू शकतात याचे निर्धारण करणे ही पार पाडावयाची अवघड कामगिरी आहे. विकासाचे हेच नवीन आव्हान आहे" (पृ. 16)

1995 च्या जागतिक विकास अहवालातील या अवतरणाची विस्तारित आवृत्ती म्हणजेच 1996 चा जागतिक विकास अहवाल (येथुन पुढे 'जाविअ', 1996) असे म्हणता येईल.

प्रस्तुत 'जाविअ', 1996 हा वार्षिक विकास अहवालांच्या मालिकेतील एकोणिसावा अहवाल असून त्यात मध्य आणि पूर्व युरोप, सोविएत युनियन, चीन आणि व्हिएतनाम देशांच्या विघटनातून जन्मलेल्या 28 राज्यांतील योजनेकडून बाजाराकडील संक्रमणाचा विचार करण्यात आला आहे. त्या संक्रमण अर्थव्यवस्थांचा जागतिक लोकसंख्येतील हिस्सा जवळजवळ 33 टक्के आहे. अभ्यासाच्या सोयीनुसार अहवालाची तीन भागात आणि दहा प्रकरणांत मांडणी करण्यात आली आहे. भाग 1 संक्रमणाचे आव्हान याविषयी असून त्यातील चार प्रकरणात अनुक्रमे (1) सुधारणा, प्रगती आणि फलनिष्पत्तीचा आकृतिबंध, (2) उदारीकरण, स्थिरीकरण आणि अभिवृद्धी, (3) मालमत्ता, हक्क आणि उपक्रम (enterprise) आणि (4) लोक आणि संक्रमण, या संक्रमणाच्या प्रक्रियेच्या विविध बाजूंचा विचार करण्यात आला आहे. भाग 2- दृढीकरणाचे (consolidation) आव्हान या विषयाला वाहिलेला असून त्यातील पाच प्रकरणांत अनुक्रमे- (1) विधी अधिसत्ता (rule of law), (2) वित्तीय पद्धतीची बांधणी, (3) अधिक चांगल्या आणि अधिक छोटेखानी (slimmer) सरकारकडे, (4) लोक आणि अभिवृद्धी यांच्यात गुंतवणूक करणे आणि (5) संक्रमण आणि जागतिक अर्थव्यवस्था, यांची सखोल चर्चा करण्यात आली आहे. भाग 3 मध्ये निष्कर्ष मांडण्यात आले असून त्यातील एकमेव प्रकरण निष्कर्ष आणि असिद्ध कार्यसूची (unfinished agenda) यांच्या अनुषंगाने चर्चेचा समारोप करते, अखेरीस, नेहमीप्रमाणे संदर्भ सूची, संक्रमण अर्थव्यवस्थांच्या निवडक निर्देशकांचे परिशिष्ट आणि निवडक जागतिक विकास निर्देशकांचे सांख्यिकी विश्लेषण देण्यात आले आहे.

'जाविअ' 1996 मधील प्रकरणांचा गोषवारा देणे, आवश्यक तेथे टिप्पणी करणे आणि महत्त्वाच्या संकल्पनांची / बाबींची भारतीय संदर्भात मीमांसा करणे, हे प्रस्तुत परिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

### संक्रमण म्हणजे काय ?

केन्द्रित नियोजनाच्या जागी बाजारचलित अर्थव्यवस्थेची क्रमशः स्थापना करणे म्हणजे संक्रमण. स्वाभाविकपणेच हे उद्दिष्ट सिद्ध करण्यासाठी किमत आणि व्यापार उदारीकरण, स्थिरीकरण कार्यक्रम, किमत स्थैर्य, राज्याच्या मालकीच्या कंपन्यांचे खाजगी-

करण, करपद्धती, विधी वित्तीय आणि सनदी सेवेत सुधारणा, इत्यादी गोष्टींचा समावेश केला जातो. पुढील प्रश्न असा आहे की, हे संक्रमण का आवश्यक आहे? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी 'जाविअ' 1996 ने सोविएत युनियनमध्ये प्रथम झालेल्या केन्द्रीय किंवा आदिष्ट नियोजनाचा आधार घेतला आहे. 1928 मध्ये सुरू झालेल्या नियोजन प्रक्रियेचे काही फायदे झाले तसे काही तोटेही सहन करावे लागले. उत्पादनात वाढ, उद्योगीकरण, शिक्षण, आरोग्य, गृहबांधणी, सर्वांसाठी नोकऱ्या, उत्पन्नाचे तुलनात्मक दृष्टीने समान वितरण, 1929-31 मधील महामंदीसारख्या आर्थिक अरिष्टापासून मुक्त अशी अर्थव्यवस्था, इत्यादी फायद्यांची विस्तृत यादी देण्यात आली आहे परंतु केन्द्रित नियोजनाच्या अंगभूत (intrinsic) अकार्यक्षमतेमुळे अर्थव्यवस्था कधीच स्थैर्यापासून दूर गेली. त्याचे स्पष्टीकरण असे. बाजार अर्थव्यवस्थेकडून मिळणाऱ्या माहितीचा पर्याय म्हणून स्वीकारलेल्या अर्थव्यवस्थेत योजनाकारांना वेळीच आणि पुरेशी माहिती मिळू शकली नाही. किंमत संदेश यंत्रणाच अस्तित्वात नव्हती. नियोजनाचे 'व्यक्तिगत सौदा प्रक्रियेत' (पौरुषेय) मोठ्या प्रमाणात रूपांतर घडून आले. यंत्रोत्पादनावर अवाजवी जोर तर उपभोग्य वस्तू उत्पादनाची उपेक्षा झाली. 1950-59 मध्ये 10 टक्के अभिवृद्धी दर राहिला. पुढे त्यात अवत्वरण (deceleration) अटळ होते. 1990 च्या आरंभी तो 2 टक्क्यांपर्यंत घसरला. मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होऊनही अर्थव्यवस्था कुंठित झाली. 'कावीचे अरिष्ट' म्हणून ते प्रसिद्ध झाले. अमेरिकेच्या तुलनेत पोलादाचे उत्पादन जास्त होऊनही त्याची गुणवत्ता निकृष्ट होती. अशा अस्थिरतेपासून व अरिष्टापासून मुक्त होण्याचा एक चांगला पर्याय म्हणजे योजनेकडून बाजाराकडे संक्रमण.

संक्रमणाचा हा आशय स्पष्ट झाल्यानंतर होणारा प्रश्न म्हणजे, ते संक्रमण यशस्वी ठरण्यासाठी काय करावयाला हवे? त्यासाठी संक्रमणाची व्याप्ती आणि आयाम यांचा विचार करणे जरूर आहे. त्या दृष्टिकोनातून पहिल्या चार प्रकरणांतील (भाग 1) स्पष्टीकरणाचा आता एकत्रित आणि संक्षेपात विचार करू.

## सुधारणेचे दोन मार्ग

संक्रमण / सुधारणांविषयीच्या मार्गाची आणि वेगाची चर्चा करताना 'जाविअ' 1996 ने दोन मार्ग सांगितले आहेत. पहिला झटपट आणि समावेशक आणि दुसरा मंदगती किंवा पायरीपायरीने मार्गक्रमण करण्याचा. उदाहरणार्थ, 1990 मध्ये पोलंडने पहिला मार्ग अनुसरला. किंमत, व्यापार, करसुधारणा आणि खाजगीकरण या क्षेत्रात झटपट पाऊले टाकली. बाजार आणि व्यवसाय संस्था यांच्यावरील नियंत्रणे मागे घेतली. विनिमय नियंत्रणे उठविली. हे सर्व रातोरात पार पाडण्यात आले. हे करीत असताना, अर्थातच, व्यष्टीय आणि समष्टीय पातळ्यांवरील आपली पकड सरकारने मुळीच सैल होऊ दिली नाही. म्हणजेच उदारीकरणाकडे वाटचाल करताना सरकार मजबूत आणि समर्थ हवे, हा पोलंडने दाखविलेला एक मार्ग आहे.

दुसऱ्या पायरीपायरीने आगेकूच करण्याच्या नमुन्यासाठी चीनचे डेंगप्रणीत उदाहरण (feeling the stones to cross the river) बोलके आहे. 1978 मध्ये चीनने 'संयुक्त साहसांचा' (joint ventures) मार्ग खुला केला. त्यानंतर टप्प्याटप्प्याने किंमत धोरण शिथिल केले. संक्रमणाच्या सुरुवातीच्या काळात शेतीवर लक्ष केन्द्रित केले. सामूहिक शेतीची जागा घेणाऱ्या कौटुंबिक शेतीला उत्तेजन देण्यात आले. शेतीमाल उत्पादकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शेतीमालाच्या किमती वाढविल्या. त्यानंतर बिगर-राज्य उद्योग क्षेत्राकडे सुधारणेचा मोर्चा वळविण्यात आला. बिगर-राज्य व्यवसाय संस्थांवरील नियंत्रणे शिथिल करण्यात आली. नवीन ग्रामीण शहरे (new rural townships) आणि ग्रामीण उपक्रमांना (rural enterprises) बाजार तत्त्वानुसार कार्य करण्यासाठी उत्तेजन दिले. त्यानंतरचा टप्पा म्हणजे 1984 पासून नागरी क्षेत्रात सुधारणा केल्या. या सर्वांचा अपेक्षित परिणाम झाला. स्थूल उत्पादनातील खाजगी (बिगर-राज्य) क्षेत्राचा हिस्सा मोठ्या प्रमाणात वाढला.

या दोन मार्गांपैकी कोणता मार्ग अनुसरावयाचा? त्या त्या देशातील शासन, लोकांची सहभागी होण्याची क्षमता, विधी, शिक्षण, वित्तीय क्षेत्र, मालमत्ता हक्क, इत्यादी विविध घटकांवर या प्रश्नाचे उत्तर अवलंबून ठेवणे जास्त श्रेयस्कर आहे.

बाजार खुले करणे हा सुधारणेचा पाया आहे.

परंतु बाजार किंमत संदेश समष्टीय आर्थिक समतोलांच्या आणि भावफुगवटयाच्या परिस्थितीत त्यांचे कार्य नेटकेपणाने पूर्ण करू शकत. त्यासाठी उदारीकरणाला पूरक ठरणारे स्थिरीकरण उत्पादकतेत आणि अभिवृद्धीत सुधारणा करण्यासाठी आवश्यक ठरते.

मालमत्ता हक्क आणि प्रोत्साहने यांची निर्मिती करणे तसेच दारिद्रयात घट करणे हे संक्रमणाचे एक मूलभूत आव्हान आहे ते चीनसारख्या संक्रमण अर्थव्यवस्थेने स्वीकारले आणि यशस्वी केले. येथे दारिद्रयात घट करण्याचा प्रश्न उपस्थित झाला म्हणून 'जाविअ' 1996 मध्ये समाविष्ट नसलेल्या भारताच्या अर्थव्यवस्थेचा संदर्भ देण्याचा मोह अनावर होतो. भारतात ज्या प्रमाणात दारिद्रयाचे गुणगाण किंवा अद्भूतीकरण (romanticisation) केले जाते त्याचा चीनमध्ये अभाव आहे. येथे आहे दारिद्रयाचे राजकारण (politics of poverty) आणि जास्त चिंतेची बाब म्हणजे राजकारणाचे दारिद्रय (poverty of politics). आता भाग 2 कडे वळू.

उदारीकरण, स्थिरीकरण, खाजगीकरण आणि दारिद्रयात घट हे संक्रमण अर्थव्यवस्थेचे अंगभूत घटक आहेत. परंतु कंपनशील (vibrant) बाजारचलित अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी ते पुरेसे ठरत नाहीत. केन्द्रीय नियोजनांतर्गत व्यक्तीवादी पौरुषेय सौदा प्रक्रियेमुळे संस्थात्मक घटक (मालमत्ता हक्क, बँक व्यवसाय, सरकारी वित्तव्यवस्था, श्रम बाजार, व्यवस्थापन, पायाभूत सुविधा, इत्यादी) कमकुवत होतात असा सार्वत्रिक अनुभव आहे. परिणाम? ढासळणारी कायदा आणि सुव्यवस्था परिस्थिती, भ्रष्टाचार, संघटित गुन्हेगारीत वाढ आणि आर्थिक कार्यदक्षतेची घसरण. अशी कमकुवत संस्थात्मक घटकांची पार्श्वभूमी असलेले संक्रमण, निदान सुरुवातीच्या अवस्थेत आर्थिक अभिवृद्धीला पोषक ठरत असले तरी ती अभिवृद्धी स्वयंपोषित ठरत नाही. चांगल्या संक्रमणाच्या जोडीला समर्थ आणि जबाबदार संस्था आवश्यक असतात. अशा संस्थांचे दृढीकरण करणे हे एक मोठे आव्हान आहे. त्याचीच चर्चा भाग 2 मध्ये केली आहे.

जास्तीत जास्त निर्णायक संस्था कोणत्या आहेत? या प्रश्नाच्या उत्तरात 'जाविअ' 1996 मध्ये पुढील पाच प्रकरणांत आलेल्या विवेचनाचा गोषवारा देण्याचा प्रयत्न करू. पहिली कळीची संस्था म्हणजे चांगले कायदे आणि त्यांची परिणामकारक कार्यवाही. या पहिल्या प्रकारात व्यवहार परिव्यय (transaction costs) कमी करणे, व्यापार निश्चिततेत वाढ करणे, कार्यदक्षतेसाठी प्रोत्साहने निर्माण करणे आणि गुन्हेगारी व भ्रष्टाचाराचे नियंत्रण करणे या बाबींचा समावेश आहे. दुसऱ्या प्रकारात समर्थ वित्तीय संस्थांचा समावेश होतो. त्या बचतीला उत्तेजन देऊन तिला जास्तीत जास्त उत्पादक चारीकडे (channel) वळवितात. तिसऱ्या प्रकारात सरकार या संस्थेचा समावेश होतो. केन्द्रीत नियोजनातील सर्वेसर्वा किंवा तारणहार सरकारच्या जागी छोटेखानी, स्वच्छ आणि निवडक कार्य पार पाडणाऱ्या सरकारची निर्मिती करणे, खाजगी उपक्रमाला अटकाव करण्याऐवजी त्याला आधार देणे हे या सरकारकडून अपेक्षित आहे.

अर्थात, अशा संस्था निर्वात पोकळीत निर्माण होत नाहीत. त्यासाठी मनुष्यरूपी भांडवली पायाची गरज अपरिहार्य ठरते. आणि या गोष्टीला प्रगत आणि काही संक्रमण देशातील संशोधनाचा आधार प्राप्त झाला आहे, या 'जाविअ' 1996 मधील विधानाशी दुमत होण्याचे कारण नाही.

भाग 2 हा 'जाविअ' 1996 चा गाभा (core) आहे. विशेषतः विधी अधिसत्ता, भ्रष्टाचार, सरकारचे आकारमान आणि लोकातील तसेच अभिवृद्धीतील गुंतवणूक हे संस्थात्मक घटक वर्तमान भारतीय अर्थव्यवस्थेला कथित संक्रमण अर्थव्यवस्थांइतकेच प्रस्तुत ठरतात. परंतु एक तांत्रिक फरक संभवतो. 'जाविअ' 1996 मधील 28 देशांच्या बाबतीत केन्द्रिय नियोजनाकडून बाजाराकडे संक्रमण होत आहे. भारताच्या बाबतीत संक्रमणाची ही संकल्पना त्या अर्थाने तंतोतंत लागू पडत नाही. भारतात संक्रमणाची एक प्रक्रिया चालू आहे परंतु विकासाची निश्चित स्वरुपाची आणि अधिकृत अशी 'जाविअ' 1996 प्रणीत केन्द्रीय किंवा आदिष्ट नियोजनाची रूपरेषा (blueprint) भारतीय नियोजनात सापडत नाही. हा एक वादग्रस्त मुद्दा सोय म्हणून बाजूला सारला तर भारतातील संक्रमण आणि 28 देशांतील संक्रमण यांच्यात सारखेपणा दिसतो. केवळ याच एका मर्यादित दृष्टिकोनातून वरील चार

संस्थात्मक घटकांविषयीचे विश्लेषण भारताला प्रस्तुत ठरते. म्हणून येथून पुढे जास्त विस्ताराने, क्रमश: आणि भारतीय संदर्भ नजरेआड न करता विचार करू.

## विधी अधिसत्ता

केन्द्रीय नियोजनातील नियम आणि बाजार अर्थव्यवस्थेतील नियम यांच्यात फरक आहे. केन्द्रीय नियोजनातील नियम राज्य नियंत्रणाचे आद्य आणि असेरचे हत्यार असते. बाजार अर्थव्यवस्थेतील नियम खेळांचे ( व्यवहारांचे ) विनियमन करतात. त्यामुळे तेथील सर्व व्यक्तींना / खेळाडूंना स्वत:चे हक्क अबाधित ठेवण्याचे तसेच नियमांची कार्यवाही करण्याचे साधन प्राप्त होते. अशा प्रकारे, संक्रमण अर्थव्यवस्थेत मनमानी राज्य नियंत्रणाच्या जागी पारदर्शी नियम कसा तयार करावयाचा असा प्रश्न पडतो. त्या संक्रमण अर्थव्यवस्थेत नियमाचे दोन स्रोत संभवतात. पहिला, केन्द्रित नियोजनपूर्वीपासून चालत आलेला. त्याला स्वदेशी भूमीव्युत्पन्न (home-grown) असे संबोधता येईल. दुसरा, प्रस्थापित बाजारचलित अर्थव्यवस्थांपासून प्रतिरोपण केलेला (transplanted). उदाहरणार्थ, भारतात आर्थिक उदारीकरणाला सुसंवादी ठरणाऱ्या निर्गम धोरणाची (exit policy) मांडणी करणे किंवा आजारी व्यवसाय संस्थेला परत आर्थिक सुस्थितीत आणण्यासाठी तिच्या भूखंडाची / जमिनीची विक्री करण्यास परवानगी देणारा नवीन / दुरुस्त कायदा. तिसरे उदाहरण म्हणून भारतीय बँकांतील असंपादनात्मक / अपालन मत्तांच्या अवाजवी फुगोटयाचा उल्लेख करता येईल. औपचारिक विधी पद्धतीत न्यायाधीश, अभियोक्ता (prosecutor), लवाद (arbitrators) आणि खाजगी विधी व्यावसायिक कायद्यांचे भाष्य करून त्यांची कार्यवाही करतात. ज्यावेळी कायदा आणि त्याचे उपयोजन यांच्यात फट निर्माण होते त्यावेळी संक्रमणाच्या मार्गावर अनेक जाचक गतिरोधक निर्माण होतात. सध्या भारतात अशा गतिरोधकांची वानवा नाही.

## स्पर्धेचा कायदा / नियम
## (Competition Law)

बाजार अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या स्पर्धेचा स्वतंत्र नियम ( कायदा ) आहे. एकाधिकारात किंवा अल्पजनाधिकारात किंवा सर्वसर्वा राज्याच्या नियंत्रणाखाली स्पर्धा अंकुरत नाही. युरोपच्या आर्थिक समाजाने (E E C) स्पर्धेच्या कायद्याची / नियमाची उत्कृष्ट प्रकल्पने तयार करून स्पर्धेचे पोषण केले आणि विकासाला उत्तेजन दिले. याकडे 'जाविअ' 1996 ने आवर्जून लक्ष वेधले आहे. व्यापाररोध (trade barriers), जाचक जकाती, वाटा (quota), आयात पर्यायिता, इत्यादी धोरणे / संस्थात्मक संरोध स्पर्धेला मारक ठरतात. खाजगीकरणापूर्वी एकाधिकार ( सरकारचा आणि उद्योग समूहांचा ) संपुष्टात आणून स्पर्धेचे नियम तयार करणे आणि त्यांची कार्यवाही करणे श्रेयस्कर ठरते. त्यामुळे खाजगीकरणाला पोषक वातावरण तयार होते. आज भारतात खाजगीकरणाला / स्पर्धेला पोषक संस्थात्मक वातावरण तयार करण्यापूर्वी खाजगीकरणावर अकारण जास्त जोर दिला जात आहे. प्राधान्य क्रमातील (order of priority) ही एक त्रुटी आहे आणि 'गंगा आली रे दारी' प्रमाणे 'स्पर्धा आली रे दारी' अशी वारंवार अव्वाच्या सव्वा भाषणबाजी करून हातात काही पडत नाही. उलट, दारातील गंगेचा प्रवाह गढूळ आणि मलीन होतो. 'जाविअ' 1996 चा हा एक लक्षणीय संदेश आहे.

## न्यायालयीन संस्था

न्यायालये तीन प्रकारची कामे करतात. तंटे मिटविणे, कायद्यांची अमलबजावणी करणे आणि विधीविधानासंबंधी (legislation) निर्माण होणाऱ्या त्रुटींचे भाष्याच्या माध्यमातून निवारण करणे. अलीकडील काही वर्षांत आणखी एका नवीन कामाची भर पडली आहे. 'न्यायालयीन कार्यशीलता' (judicial activism) असे त्याला संबोधले जाते. दुबळी कार्यपालिका आणि संक्रमण काळात उफाळून येणाऱ्या प्रकरणांचा गुंता, ही त्याची दोन कारणे आहेत. हे झाले 'जाविअ' 1996 मधील सर्वसाधारण विवेचन.

भारतातील आतापर्यंतच्या न्यायालयीन कार्यशीलतेविषयीचा अनुभव चांगला आणि उत्साहवर्धक आहे. नमुना म्हणून पुढील दोन उदाहरणांचा उल्लेख पुरेसा ठरावा. वेठबिगारी आणि प्रदूषण यांच्याविषयी

सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच पुढील दोन आदेश दिले आहेत.

(अ) "वेठबिगारांची आकडेवारीसह सद्य:स्थिती दाखविणारे तपशिलवार प्रतिज्ञापत्र सर्व राज्यांनी दोन आठवड्यांत सादर न केल्यास संबंधित राज्यांच्या मुख्य सचिवांवर वैयक्तिक शेरे मारले जातील."

(आ) "प्रदूषणकारी कारखान्यांवर सहा आठवड्यांत कारवाई करण्याचा आदेश देताना, कारवाई न करणाऱ्या केन्द्रीय सचिवांवर ठपका ठेवला जाईल." (**महाराष्ट्र टाइम्स**, 14 फेब्रुवारी, 1997).

भारतातील न्यायालयीन कार्यशीलतेविषयीचा आतापर्यंतचा अनुभव उत्साहवर्धक असला तरी येथून पुढील काळात तो तसाच राहील याची हमी देता येत नाही. त्या न्यायालयीन कार्यशीलतेवर पुढील काही मर्यादा पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यापैकी पहिली मर्यादा 'जाविअ' 1996 मध्ये नोंदलेली आहे. उरलेल्या दोन मर्यादा 'जाविअ' 1996 मध्ये नोंदलेल्या नसल्या तरी त्या भारताबरोबच 28 संक्रमण देशांना लागू पडतात.

(अ) सर्वच न्यायाधिशांना नेहमीच बाजार यंत्रणेविषयी संपूर्ण ज्ञान असलेच पाहिजे असे नाही.

(आ) न्यायालयीन कार्यशीलतांतर्गत प्रकरणे आजच्याप्रमाणे भविष्यकाळात पावसाळ्यातील भूछत्राप्रमाणे निर्माण होत गेली आणि त्यांच्यात प्रामतिक वाढ झाली तर आजच्या न्यायपालिकांवरील कामांचा भार आणि ताणाव वाढल्याशिवाय राहणार नाही.

(इ) अशा परिस्थितीत प्रलंबित प्रकरणांचे निकाली प्रकरणांशी वाढलेले प्रमाण जास्त वाढेल. 'प्रलंबित न्याय म्हणजे न्यायाला नकार' हा कटु अनुभव वाढत जाणार.

## भ्रष्टाचाराचे नियंत्रण

'सार्वजनिक पदाचा खाजगी लाभांसाठी वापर' अशी भ्रष्टाचाराची 'जाविअ' 1996 मध्ये सरल व सुटसुटीत व्याख्या करण्यात आली असली तरी संक्रमण अर्थव्यवस्थेत भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्याऐवजी त्याचे 'नियंत्रण' करणे हा शब्दप्रयोग हेतुत: वापरून भ्रष्टाचाराविषयीच्या मायाजालवाद्यांना आणि साक्षात्कारवाद्यांना 'जाविअ' 1996 ने एकप्रकारे धक्का दिला आहे.

'भ्रष्टाचाराची भरभराट का होते?' या प्रश्नाचे सापेक्षी विश्लेषण करताना सर्व 28 संक्रमण अर्थव्यवस्थांच्या पुराव्याच्या आधारे 'जाविअ' 1996 म्हणतो, "....ज्यावेळी सरकारी अधिकारी आणि खाजगी अभिकर्ते यांना (भ्रष्टाचारामुळे) जास्त लाभ आणि अल्प तोटा होतो...", (पृ 95) त्यावेळी भ्रष्टाचाराची भरभराट होते. म्हणजे भ्रष्टाचार परिव्यय (धोका) आणि लाभ यांच्यातील विषम विनिमयाच्या परिस्थितीत निर्माण होतो. दुसऱ्या शब्दांत, भ्रष्टाचारातील चढउतारांच्या साहाय्यानेच परिव्यय-लाभ समतोल प्राप्त करण्याच्या प्रवृत्तीचे होतात. त्यावेळी प्रस्थापित होणाऱ्या बिंदूत भ्रष्टाचार समूळ नष्ट होत नाही. उलटपक्षी, समाजाला/अर्थव्यवस्थेला सुसह्य होईल इतक्या प्रमाणात तो स्थिरावतो. अर्थशास्त्रातील समतोलाच्या संकल्पनेला प्रमाण मानावयाचे झाल्यास, त्या समतोल बिंदूत भ्रष्टाचार शून्य होत नसून तो धन असतो. आणि विशेष म्हणजे तो समतोल बिंदू स्थितीशील नसून गतीशील असतो. म्हणजे परत विषमतोल-समतोल-विषमतोल असे दुष्ट चक्र सुरू राहाते. येथे एक खुलासा करणे आवश्यक वाटते. 'जाविअ' 1996 ने भ्रष्टाचार 'नष्ट' करण्याचा शब्दप्रयोग केला नाही. किंबहुना, त्या शब्दप्रयोगाचा वापर टाळण्याकडे कल दिसतो. 'नियंत्रण' या शब्दाचे वरील प्रकारचे भाष्य माझे आहे. अर्थात, बेकरप्रणीत भ्रष्टाचार विश्लेषणाचा त्याला आधार आहे, हे कबूल केले पाहिजे.

अलीकडे भ्रष्टाचाराकडे पाहण्याचा एक विशेष आर्थिक दृष्टिकोन मांडण्याचे काही प्रयत्न झाले आहेत. गॅरी बेकर (1968) यांनी प्रथम सीमान्तिक परिव्यय-लाभाचे विश्लेषण भ्रष्टाचाराला लागू केले. चोरी आणि भ्रष्टाचार स्वतंत्र व्यवसायांसारखे असून त्यांना त्यांची स्वत:ची अशी एक आचारसंहिता असते, असे त्यांचे खळबळजनक परंतु निग्रही प्रतिपादन आहे. ए. एस. आलम यांचा 'भ्रष्टाचारावरील मर्यादा सिद्धान्त'

(ज्याचा निवडक संदर्भ सूचीत उल्लेख आला आहे) बेकरप्रणीत सीमान्तवादी विश्लेषणाला पूरक वाटतो आणि 'जाविअ' 1996 मध्ये त्याचे निव्वळ प्रतिबिंब पडल्याचे जाणवते.

भारतातील भ्रष्टाचाराविषयीचे स्वार्थी (हेतू-साठी सत्तेचा विधिअसंमत किंवा बेकायदेशीर वापर) विश्लेषण प्रामुख्याने माहितीवजा, निराकार (non-formal), क्षणिक गुंगी आणणारे आणि 'भाऊकतेवर आधारित' आहे. त्याचे मूळ दुसऱ्या जागतिक युद्धात आढळते. त्या युद्धाने नियंत्रणे-दुर्मिळता-भ्रष्टाचार (काळा पैसा) या तिळयांना जन्म दिला. त्यानंतर गोरवाला समितीने (1951) भारतातील बोजड किंवा किचकट कायदेकानू, सरकारी निर्णयातील अक्षम्य दिरंगाई आणि भ्रष्टाचार यांच्यातील दुव्यावर बोट ठेवले. पुढे के. संथानम समितीने (1964) भ्रष्टा-चाराचे जास्तीत जास्त समावेशक विवेचन करताना प्रत्येक राज्यात सतर्कता आयुक्तांची नेमणूक करण्याची एक महत्त्वाची शिफारस केली. नंतर मोरारजी देसाईंच्या नेतृत्वाखाली नेमलेल्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने (1969) लोकपाल आणि लोकायुक्त ही पदे निर्माण करण्याची महत्त्वाची तरतुद केली. त्या-नंतरच्या वांछू समितीने (1971) 'करबुडवणीतून निर्माण होणारे उत्पन्न' (tax-evaded income) अशी व्याख्या करून काळ्या पैशाचे अंदाज मांडले. आणि अगदी अलीकडील काळात भारतातील काळ्या अर्थव्यवस्थेची रूपे या अहवालात (1985) 'करयोग्य असलेली परंतु ज्यांची माहिती करअधिकाऱ्यांना दिली जात नाही अशी एकत्रित उत्पन्ने' अशी व्याख्या करून सर्व बिगर-हिशोबी उत्पन्नांचे काही अंदाज दिले. आज भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादितातील काळ्या पैशाचे प्रमाण जवळजवळ 50 टक्क्यांपर्यंत वाढले आहे.

उपरोक्त अहवालांच्या साहाय्याने भ्रष्टाचाराचे / काळ्या पैशाचे स्वरूप समजण्यास मदत होते. अशा प्रकारचा जनमानसात भिनलेला भ्रष्टाचार समूळ नष्ट करण्याच्या भाषेविषयी स्वाभाविकपणेच काही आशंका निर्माण होतात आणि या आशंकांचे श्रेय बेकर-आलम-'जाविअ' 1996 यांच्या भ्रष्टाचाराच्या अधिक वास्तव आर्थिक विश्लेषणाकडे जाते. अशा आशंकांच्या अधिक स्पष्टीकरणासाठी संथानम समितीने नोंदलेल्या अनेक उदाहरणांपैकी काही निवडक किस्से पाहणे आवश्यक आहे. आवश्यक यासाठी की भ्रष्टाचाराचे उच्चाटन करणे किती कठीण काम आहे या प्रश्नाची अधिक उकल होऊ शकते.

(अ) करबुडवणी मोठ्या प्रमाणात विस्तारत आहे. भारतीय सांख्यिकी संस्थेतील दिलीप मुखर्जी यांच्या अभ्यासानुसार (1995) ती करमहसुलाच्या जवळजवळ तीनचारपट होती. संथानम समितीच्या नोंदीनुसार अशी करबुडित रक्कम कर आकारणी करणारे अधिकारी आणि अन्य व्यक्ती यांच्यात वित-रित होते. समिती म्हणते "अशा प्रकारे करबुडित आणि करात सूट मिळालेली रक्कम बिगर-हिशेबी पैशाच्या स्वरुपात ठेवली जाते आणि तिच्या अनेक वापरांपैकी एक वापर म्हणजे लोकसेवकांना भ्रष्टा-चारी बनविणे". म्हणजे करबुडवेगिरीचा व्यवसाय सर्रास आणि बिनधास्तपणे चालू असून त्यातील धोके (परिव्यय) नगण्य आहेत किंवा शून्यापर्यंत घसरले आहेत.

(आ) ज्या व्यक्तीकडून समाजसेवेची अपेक्षा असते (उदाहरणार्थ, 'minister या शब्दाचा अॅडव्हान्स्ड लर्नरच्या डिक्शनरीतील अर्थ "One who gives active service and help" असा आहे) अशी उच्च पदावरील मंत्र्यासारखी व्यक्ती ज्यावेळी सचोटी-पासून दूर जाते त्यावेळी 'आपण ऐसे केले' हा विकृत आदर्श इतक्या वेगाने भरभराटतो की खालच्या सर्व पातळ्यांवरील सेवकांना भ्रष्टाचारापासून मुक्त राहणे अवघड होते. संथानम समितीने या परिस्थितीचे पुढील शब्दांत वर्णन केले आहे. "मंत्र्यांवरील सचोटीच्या अपयशाविषयीचा सर्वसाधारण विश्वास प्रत्यक्ष अप-यशाइतकाच हानिकारक असतो." म्हणजे भ्रष्टा-चाराला राजमान्यता प्राप्त झाल्यामुळे समाजात भ्रष्टाचाराविषयी किमान चाड किंवा चीड वर्त-नाच्या स्वरुपात आढळत नाही. या सर्वांवर कडी म्हणजे यदाकदाचित गुन्हा सिद्ध झालाच तर संभाव्य शिक्षा किंवा दंड याचे स्वरूप इतके सौम्य असते की, त्यामुळे भ्रष्टाचाराला अप्रत्यक्षपणे उत्तेजन मिळते.

वरील दोन उदाहरणांतून येणारा नक्त परिणाम असा. कोणाला आवडो किंवा नावडो, सीमांतवादाच्या

नियमानुसार भ्रष्टाचारापासूनचे लाभ त्याच्या तोटया-पेक्षा (धोके, कडक शिक्षा, दंडात्मक कारवाई, सामाजिक निषेध, इत्यादी स्वरूपातील परिव्ययांपेक्षा) मोठ्या प्रमाणात जास्त असेपर्यंत भ्रष्टाचार समूळ नष्ट होणे नाही. आलमप्रणीत भ्रष्टाचाराच्या आर्थिक विश्लेषणाचा आंशिक आधार घेणाऱ्या 'जाविअ' 1996 ने केवळ प्रतिगामीपणाचा शिक्का मारला जाईल या भीतीपोटी 'भ्रष्टाचाराच्या नियंत्रणावर'च आपले विश्लेषण आटोपते घेऊन लटके समाधान तर मानले नसेल ना?

सध्या महाराष्ट्रात एक समाजसेवक अण्णा हजारे यांचे भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन गाजते आहे. त्यांच्या सर्वच सभांना अलोट गर्दी होते आहे. त्यांच्या भाषणांचे निरीक्षण केल्यानंतर भ्रष्टाचार समूळ नष्ट करण्याचा स्वतः हजारे ठामपणे दावा करीत नाहीत. त्यांच्या भाषणात संयम आणि सावधपणा असतो. अशाच एका 'बद्रीनारायण बरोडिया पुरस्कार' प्रदान करण्याच्या समारंभात (मुंबई, दिनांक 17-2-1997) अण्णांनी भ्रष्टाचाराविषयी सूचक उद्‌गार काढले. ते म्हणतात, "भ्रष्टाचाराची पाळेमुळे खोलवर, व्यक्ती-व्यक्तींत रुतली आहेत. ती समूळ नष्ट करणे अशक्य आहे याची मला जाणीव आहे. परंतु विकास कामांना लागलेली भ्रष्टाचाराची गळती रोखणे हे महत्त्वाचे काम आहे." (महाराष्ट्र टाइम्स, 18, फेब्रुवारी, 1997).

## अधिक चांगले आणि छोटेखानी सरकार

राज्याचा हस्तक्षेप आणि बाजार यांच्या संबंधा-तील अर्थशास्त्रज्ञ आणि योजनाकार यांच्यातील वाद-संवाद ही नित्याची बाब झाली आहे. प्रथम ॲडम स्मिथ (1776) यांनी राज्याची तीन प्रकारची कामे निश्चित केली. 'जाविअ' 1996 मध्ये सरकारच्या चार प्रकारच्या कार्यांची सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. दोन्ही प्रकारच्या कार्यातील फरक केवळ 3 आणि 4 या संख्येतील फरकाने स्पष्ट होत नाही. त्याचा यथा-वकाश विचार करू. त्यापूर्वी 'जाविअ' 1996 मधील सरकारची कार्ये कोणती ते सारांशरूपात पाहू.

'सरकार कशासाठी हवे?' या प्रश्नाला 'जेथे बाजार अयशस्वी ठरतात केवळ तेथेच राज्याचा हस्त-क्षेप समर्थनीय ठरतो,' असे 'जाविअ' 1996 चे उत्तर आहे. विशेषतः योजनेकडून बाजाराकडील संक्रमणाने सरकारच्या नवीन अवताराची गरज स्पष्ट करताना 'जाविअ' 1996 ने सरकारी हस्तक्षेपाची पुढील क्षेत्रे निश्चित केली आहेत :

(अ) **संरक्षण, कायदा व सुव्यवस्था आणि पर्या-वरण संरक्षण अशा शुद्ध सार्वजनिक वस्तू :** अशा वस्तूंच्या उत्पादनासाठी खाजगी बाजारावर विसंबणे समर्थनीय नाही. कारण प्रत्येक व्यक्ती त्यांच्यापासूनच्या लाभांचा आपसूक उपभोग घेत असली तरी त्यांची किंमत मोजण्याची तिची इच्छा नसते. त्यांची सर-कारनेच तरतूद करणे आणि त्यांचा परिव्यय कर-दात्यांकडून वसूल करणे हे केवळ सरकारच करू शकते.

(आ) **धन बाह्यत्तांनी युक्त आणि सांख्यण लाभ :** आरोग्य, शिक्षण यासारख्या वस्तू एका व्यक्तीपेक्षा अवघ्या समाजाला जास्त उपयुक्त असतात. अशा वस्तूंचा पुरवठा हेतुतः मर्यादित करण्याची बाजारांची प्रवृत्ती असते. शिवाय, बाजार अशा वस्तूंच्या बाह्यतां-कडे दुर्लक्ष करतात. म्हणजे अशा वस्तूंच्या किंमतीत प्रदूषणासकट पूर्ण उत्पादन परिव्ययांचे प्रतिबिंब पडत नाही. म्हणून अशा वस्तूंच्या उत्पादनात आणि वितर-णात सरकारचा हस्तक्षेप अटळ ठरतो.

(इ) **नैसर्गिक एकाधिकार कंपन्या :** गॅस, स्थानिक वाहतूक व्यवस्था आणि इतर काही पायाभूत सुविधा एकटया व्यवसाय संस्थेकडून जास्तीत जास्त कार्यदक्षतेने पुरविल्या जातात. परंतु परिणामकारक नियंत्रणाच्या अभावी त्या व्यवसाय संस्था हेतुतः त्यांच्या वस्तू / सेवा यांचा पुरवठा मर्यादित करतात आणि किंमती वाढवितात. म्हणून सरकारी हस्तक्षेप अटळ असतो.

(ई) **अपूर्ण माहिती :** अशी काही क्षेत्रे आहेत की, जेथे उत्पादकांना किंवा उपभोक्त्यांना पूर्ण माहिती उपलब्ध होत नाही. परिणाम? बाजारांचे अपयश. उदाहरणार्थ, खाजगी, वाणिज्य, विमा, बेकारी, आयु-मर्यादा, आरोग्य ऱ्हास इत्यादी धोके / जोखीमा यांच्या

विरुद्ध अचूकपणे हमी देऊ शकत नाही. विमा हप्ते आणि मागणी ( claims ) यांच्याविषयी सहजपणे समतोल सिद्ध करणे कठीण असते. म्हणून सरकारी हस्तक्षेपाची गरज असते.

अॅडम स्मिथ यांचे हस्तक्षेपाविषयीचे विश्लेषण सर्वसाधारण तसेच ढोबळ होते. उलट, 'जाविअ' 1996 चे विश्लेषण काटेकोर, नेटके आणि म्हणून जास्त उजवे आहे.

अशाप्रकारे, संक्रमण अर्थव्यवस्थेत खर्चाची नवीन क्रमवारी ठरविणे, जास्त चांगला खर्चाचा आकृतिबंध, अर्थसंकल्पाचे कार्यदक्ष व्यवस्थापन, करधोरणात सुधारणा करणे, महसूल तूट मिटविणे आणि राजकोषीय विकेन्द्रीकरण ही संक्रमणाची नियमावली सरकारचे आकारमान छोटेखानी / आटोपशीर आणि स्वच्छ करण्याचे समर्थन करते.

आता पाठीमागे उल्लेख केलेल्या चार आणि तीन कार्यातील सूक्ष्म फरकाकडे वळू. अॅडम स्मिथ निरंकुशता नीतीचे ( laissez-faire ) प्रेषित होते. नको योजना, नको सरकार, बाजार सर्वांचा तारणहार, अशा प्रकारचा त्यांच्या काळाला अनुरूप अप्रमादशील ( infallible ) बाजार हे त्यांच्या विश्लेषणाचे आधार विधान ( premise ) होते. परंतु 1996 मध्ये तेच त्यांच्या विश्लेषणाची 'अकिलिझची टाच' ( Achilles' heel ) ठरले. बाजार प्रमादशील नसला तरी तो प्रमादक्षम असतो. स्मिथ यांच्या 'अदृश्य शक्ती'ची ( हाताची ) जागा 'अदृश्य मुठीने' (invisible fist) किंवा 'दृश्य हातकडया'नी ( visble handcuffs ) घेतली असा मार्गारेट जेन रॅडिन आणि रॉबर्ट कटनर सारख्या बाजाराच्या टीकाकारांचा आक्षेप आहे. चलन अतिमूल्यन आणि त्यापासूनच्या जकाती, बाटे आणि संरक्षण नीती हे त्याचे पुरावे आहेत. शिवाय, मागणी–पुरवठ्याच्या समतोलाच्या पलिकडील मूलभूत गरजा–पुरवठा असमतोलाचा तो (बाजार) विचार करू शकत नाही. खाजगी व्यक्तीच्या आवाक्याबाहेरील नकारात्मक बाह्यतांचे नियंत्रण केवळ सरकारच करू शकते. बाजारावरील या मर्यादा विचारात घेऊन 'जेथे बाजार अयशस्वी ठरतात केवळ तेथेच राज्याचा हस्तक्षेप समर्थनीय ठरतो' हे 'जाविअ' 1996 मधील उत्तर अॅडम स्मिथ यांच्या 'बाजार सर्वांचा तारणहार' या संदेशापेक्षा आज जास्त आश्वासक ठरले आहे. परंतु त्यासाठी ते सरकार जास्त छोटेखानी, जास्त स्वच्छ आणि जास्त कार्यदक्ष हवे.

## लोक आणि बुद्धी यांच्यातील गुंतवणूक

या प्रकरणाचे आरंभीचे संविधान ( proposition ) पुढीलप्रमाणे आहे. सुशिक्षित आरोग्यसंपन्न श्रमबल आर्थिक विकासासाठी आवश्यक असते. उलटपक्षी, मोठ्या प्रमाणावरील बेशिक्षित ( ill-educated ) आणि गरीब लोक अर्थव्यवस्थेला भारभूत आणि खर्चिक ठरतात. अशा परिस्थितीत संक्रमण अर्थव्यवस्थेला अनुरूप मनुष्यबळ तयार करणे तातडीचे ठरते. पुढे 'जाविअ' 1996 म्हणतो त्याप्रमाणे केन्द्रित नियोजन काळातील 'होयबा' व्यवस्थापकांच्या जागी उपक्रमशील व्यवस्थापकांचा वर्ग तयार करावयाचा आहे. त्याशिवाय बाजारचलित अर्थव्यवस्थेला शिक्षण, आरोग्य, वाहतूक, इत्यादी विविध समाजसेवांची तरतूद करणे आणि त्या सेवांचे कार्यदक्ष प्रचालन करणे शक्य नाही.

संक्रमण अर्थव्यवस्थांमधील वर्तमान शिक्षण व्यवस्था आणि गरज यांच्यातील मोठी तफावत भरून काढण्यासाठी 'जाविअ' 1996 ने मांडलेला प्राथम्यक्रम ( order of priorities ) शिक्षणासाठी वित्त–व्यवस्था – शिक्षणाचा आशय – शिक्षणाचे वितरण ( delivery ) असा आहे. त्यात शिक्षण–परिचय गुणोत्तराला स्थान नाही, हे ध्यानात घेणे जरूर आहे.

वित्तव्यवस्थेच्या बाबतीत 'जाविअ' 1996 ने प्रशिक्षण प्रमाणकांचा ( training vouchers ) पुरस्कार केला आहे. अशा प्रमाणकांमुळे शिक्षणाच्या ग्राहकांना कोणता शिक्षणक्रम निवडावयाचा आणि कोठे याविषयीचे स्वातंत्र्य असेल. कामगारांनाही त्यांच्या गरजांनुसार प्रशिक्षण आणि त्याच्या जागेची निवड करण्यात स्वातंत्र्य असेल. त्यामुळे संक्रमणपूर्व चिरेबंदी व्यवस्थेच्या जागी व्यावसायिक तसेच भौगोलिक चलनशीलता ( mobility ) निर्माण होणार आहे.

दुसरा क्रम आहे पाठ्यक्रमांचा किंवा त्यांच्या आशय

सुधारणांचा, अभ्यासक्रम सुधारणा हा आशय सुधारणेचा केन्द्रबिंदू आहे. त्यासाठी गरज आहे नवीन पाठपुस्तकांची. बहुतेक संक्रमण देशांतील क्रमिक पुस्तकांची परिस्थिती कालबाह्य आणि आशयविरहित आहे. विशेषत: प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर शिक्षण खात्याकडून पाठ्यपुस्तकांची एक केन्द्रीय यादी तयार केली जाते. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक आणि शाळा याना त्यांच्या स्थानिक गरजांनुसार पुस्तकांची निवड करण्याचे स्वातंत्र्य राहात नाही. या चिरेबंदी पद्धतीच्या जागी 'स्पर्धात्मक वाणिज्यविषयक प्रकाशन उद्योगाचा' (competitive commercial publishing industry) विकास करण्याची सूचना करण्यात आली आहे. शिक्षकांची गुणवत्ता सुधारण्यासाठी त्यांच्या गरजेनुसार त्यांच्या प्रशिक्षणाची तरदूत करणे, त्यांच्या कार्यशीलतेचे (performance) मूल्यांकन करणे आणि ज्ञानाचे उपयोजन करणारी परीक्षा पद्धती विकसित करणे या गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या आहेत. शिक्षणाच्या संपादनापेक्षा त्याचा समाजासाठी सदुपयोग जास्त महत्त्वाचा असतो. त्याला योग्य स्थान 'जाविअ' 1996 ने दिले आहे. शिक्षकाच्या उत्तरदायित्वाचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

तिसरा क्रम आहे शिक्षणाच्या वितरणाचा. वितरण सुधारणा करणे एक तातडीचे परंतु गुंतागुंतीचे आव्हान आहे. 'जाविअ' 1996 च्या भाष्यानुसार त्यात पुढील बाबी ध्वनित होतात;

(अ) **शिक्षणाचे विकेन्द्रीकरण** : स्थानिक गरजांना प्रतिसाद देणारे शिक्षण.

(आ) **शिक्षणाचे विविधीकरण** : शिक्षणाच्या तरतुदीत सरकारपासून खाजगी संस्थांपर्यंत विस्तार करणे, परंतु त्यावेळी स्पर्धा आणि कार्यदक्षतेवर जोर देणे.

(इ) **राज्याचा कार्यभाग** : वरील बदलांना पोषक ठरेल अशा राज्याच्या कार्यभागात परिवर्तन करणे.

(ई) **अधिस्वीकृती (Accreditation)** : अधिस्वीकृती आणि गुणवत्ता यांची योग्य दखल घेण्यासाठी राज्याने आवश्यक चौकट निर्माण करणे. तिच्या आधीन राहूनच व्यक्ती वा संस्था यांना शिक्षणाची तरतूद करावी लागेल.

वृद्धीला पोषक ठरणाऱ्या 'जाविअ' 1996 प्रणीत प्राथम्यक्रमाची भारतीय संदर्भातील प्रस्तुतता हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. येथे फक्त एका बाबीचा सारांशरूपाने विचार करणे अपरिहार्य ठरते.

कोठारी आयोगापासून (1964–66) आजपर्यंत भारतातील शिक्षण पद्धतीविषयी विचारमंथन सुरू आहे. त्या मंथनाचा एक विशेष म्हणजे शिक्षणशास्त्रातील किंवा क्षेत्रातील परिव्ययवादाचा (expenditurism) किंवा पैसावादाचा नवीन अवतार. खरे तर, शिक्षणातील ग्राहकवाद (consumerism) हा पर्याय जास्त समुचित वाटतो. कारण त्यात शिक्षण ग्रहण करण्यापेक्षा शिक्षणावरील परिव्ययात हवी तेवढी वाढ करून फ्रॅंकेन्स्टीनप्रमाणे शिक्षण प्रक्रियेलाच खतम करण्याचा धोका संभवतो. कसे ते पाहू.

वर्तमान शिक्षण पद्धतीचे दुर्दैव हे आहे की, 'जाविअ' 1996 प्रणीत प्राथम्य क्रमातील विस्तव्यवस्था–आशय–वितरण या त्रिसूत्रीपेक्षा शिक्षण सुधारणा कार्यक्रमांतर्गत परिव्ययवादाचे पारडे जड होत आहे. काही मोजके, सन्माननीय अपवाद वगळले तर समाजाच्या सर्व थरांमधून स्वयंभू परिव्ययवाद्यांच्या मागणीला जोर वाढत आहे. शिक्षणाची सर्वांसाठी उपलब्धी (access) विस्तारत असताना (आणि ते आवश्यकही आहे.) गुणवत्तेचा (quality) बळी दिला जात आहे. परिव्ययवाद्यांची ही मागणी शिक्षणाच्या गुणवत्तेला, म्हणजेच पर्यायाने वृद्धीला, कशी विसंवादी आणि घातक ठरते ते पॉल क्रुगमन यांच्या परिव्यय परिकल्पनेच्या आधारे स्पष्ट करू. शिक्षणावरील खर्चाचे स्थूल राष्ट्रीय उत्पादिताशी असणारे गुणोत्तर किमान 6 टक्क्यांपर्यंत वाढविण्यात यावे, हा परिव्ययवाद्यांचा प्रमुख (एकमेव ?) दावा आहे. 6 टक्के गुणोत्तराची शिफारस कोठारी आयोगानेही केली होती. गुंतवणूक / खर्च. मग तो शिक्षणावरील असो वा सर्वसाधारण स्वरुपातील असो, विशिष्ट बिंदूपर्यंतच वृद्धीला / गुणवत्तेला कारणीभूत किंवा पोषक ठरतो. ज्ञानदेवांच्या शब्दात, केळीला घड आल्यानंतर तिची वाढ खुंटते. पॉल क्रुगमन (1995) यांनी पूर्व आशियाई देशांतील

तथाकथित 'आश्चर्या'-विषयी (miracle) पुढील-प्रमाणे निष्कर्ष काढला आहे. त्या देशांतील आश्चर्य हे एक मिथक (myth) आहे, कारण त्या देशांतील 7–8 टक्के अभिवृद्धी दर केवळ 30–40 टक्के इतक्या प्रचंड प्रमाणावरील गुंतवणूक आणि श्रम निविष्टीतील वाढीमुळे निर्माण झाला आहे; उत्पादकतेमुळे नव्हे. अशाच प्रकारचा निष्कर्ष प्रभात पटनायक आणि सी. पी. चंद्रशेखर या भारतीय अर्थशास्त्रज्ञांनी काढला आहे EPW, January 6, 1996) त्यांचे असे प्रतीपादन आहे की, अभिवृद्धीतील 'जलद' किंवा 'शीघ्र' (rapid) वाढ गुंतवणुकीतील प्रचंड प्रमाणावर अव-लंबून आहे. साधनसामग्रीच्या कार्यदक्ष वापराशी (efficiency of resource use) तिच्या अर्थाअर्थी संबंध पोहोचत नाही. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास, ही शीघ्र अभिवृद्धी स्वयंपोषित नसते. हे विश्लेषण शिक्षणातील / लोकातील गुंतवणुकीलाही तंतोतंत लागू पडते. उत्पादकतेशी फारकत घेतलेल्या शिक्षणावरील प्रचंड प्रमाणावरील खर्चामुळे प्रत्याय (returns) जलदपणे वाटणे शक्य आहे. परंतु त्या जलद गतीने वाढणाऱ्या प्रत्यायांच्या गुणवत्तेची हमी देणे धोक्याचे ठरेल. अलिकडील महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या सांख्यिकीनुसार माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाच्या तुलनेत प्राथमिक शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण वाढविण्यात आले आहे. मान्य. म्हणून प्राथमिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली असा कोणी दावा केला तर तो एक अव्यापारेषु व्यापार असेल. कारण त्यात असंख्य गोष्टी गृहीत धराव्या लागतात. उदाहरणार्थ, गळती (drop-out) अनुत्तीर्णता आणि कुंठितता (stagnation) यांच्या स्वरुपातील मोठा अपव्यय (waste) शून्य आहे. शाळेत नाव नोंदणी करणे (enrolment) तसेच नाव नोंदणी केलेल्या मुलामुलींना हजेरीपटावर टिकऊन ठेवणे (retention) यांच्या विषयीचे सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट 100 टक्के सिद्ध झाले आहे. उद्योगांची मागणी आणि शिक्षितांचा पुरवठा यांच्यातील सतत वाढणाऱ्या असमतोलाच्या जागी समतोल प्रस्थापित झाला आहे. शिक्षणावरील खर्चाचा अधिकांश हिस्सा अधिक वेगाने वाढणाऱ्या शिक्षकांच्या वेतनश्रेणीत जिरुन जात नाही. शिक्षकांची उपस्थिती 100 टक्के असते आणि ते 100 टक्के इमानदारीने काम करतात. 'तुम्ही शिक्षणात / अभ्यासक्रमात सुधारणा करा, परिक्षेत काय आणि कसे लिहावयाचे ते आम्ही पाहून घेऊ', असा विद्यार्थी-गणांचा नकारात्मक प्रतिसाद असत नाही.

शिक्षणाची गुणवत्ता हे केवळ त्यावरील खर्चाचे प्रत्यक्ष फल नव्हे. खर्च हा अनेक महत्त्वांच्या घटकांपैकी एक घटक आहे. 'जाविअ '1996 ने विश्लेषण केल्या-प्रमाणे वित्तव्यवस्था–पाठ्यक्रम (आशय)–वितरण या आघाड्यावर संघटनात्मक सुधारणा केल्याशिवाय ती गुणवत्ता स्वयंनिर्वाही ठरणार नाही. शिक्षणावरील खर्चात वाढ करण्याबरोबरच वापरात येणाऱ्या अन्य साधनसामग्रीचा (सचेतन+अचेतन) कार्यदक्ष वापर तितकाच महत्त्वाचा आहे. अशा महत्त्वाच्या आघाड्यां-कडे दुर्लक्ष करणारा किंवा त्याना दुय्यम लेखणारा परिव्ययवाद / पैसावाद /ग्राहकवाद ही शिक्षण सुधारणा कार्यक्रमातील एक मोठी व्यूहात्मक (strategic) चूक आहे.

अखेरच्या प्रकरण 10 मध्ये सात निष्कर्ष दिले आहेत. सर्वच निष्कर्ष महत्त्वाचे आहेत. परंतु महत्त्वां-तील प्रथम क्रमांकाचा वाटणारा निष्कर्ष असा "बाजार प्रक्रियांना मिळणारा कार्यदक्ष प्रतिसाद सुस्पष्टपणे निर्धारित केलेल्या मालमत्ता हक्कांची गरज व्यक्त करतो आणि अंतिमतः याला गरज असेल ती विस्तृत खाजगी मालकीची" (पृ. 143). त्याबरोबरच कार्यसूचीविषयी (agenda) चर्चा करताना त्याच प्रकरणात जाता जाता त्याने पुढील इशारा दिला आहे. "आणि या (संक्रमण प्रक्रियेच्या) अपशयाचा कोणता धोका संभवतो ? नियोजित अर्थव्यवस्थेकडे परत फिर-ण्याच्या संधी अल्प असतील. मात्र विसंगत आणि अस्थिर धोरणांची निष्पत्ती म्हणून प्रदीर्घ कुंठितता (stagnation) आणि वाढत जाणारे दारिद्र्य यांची शक्यता काही नाकारणे शक्य नाही" (पृ. 143)

एकोणिसाव्या 'जाविअ 'चे आणखी एक वैशिष्टच म्हणजे मनुष्यरुपी विकास निर्देशांकांतर्गत (HDI) काही निवडक (सर्व नव्हे) निर्देशकांचा–आरोग्याची उपलब्धी, सुरक्षित आणि शुद्ध पाण्याची उपलब्धी, आरोग्यरक्षण, पोषण, इत्यादी–केलेला समावेश. जाग-तिक बँकेच्या विकासविषयक पारंपरिक दृष्टिकोनातील हा एक लक्षणीय बदल आहे. त्याचे कारण असे. अली-कडे यु. एन. डी. पी. चे पहिले काही वार्षिक अहवाल

प्राप्त होईपर्यंत जागतिक बँक राष्ट्रीय उत्पन्नाच्या विकास निर्देशकाला खिळून होती.

केन्द्रीत नियोजन ते बाजार यंत्रणा या मार्गा-वरील अर्थव्यवस्था आणि धोरण म्हणून जागतिकी-करणाचा स्वीकार करणारी भारतीय अर्थव्यवस्था यांच्या संबंधातील उदयोन्मुख संक्रमणाच्या अर्थशास्त्रात रस घेणाऱ्या प्रत्येकाने अभ्यासण्यायोग्य अहवाल असा यावर अभिप्राय देता येईल.

**संदर्भ टीपा**

प्रस्तुत परीक्षणात इंग्रजी शब्दांच्या मराठी पर्या-यांसाठी **अर्थशास्त्र परिभाषा कोश** (1987), **विश्व-कोश परिभाषा संग्रह** (खं. 18, 1973) आणि **पदनाम कोश** (1962) यांचा आवश्यक त्या ठिकाणी आधार घेतला आहे.

□ □


# मराठी अर्थशास्त्र परिषद

## वार्षिक वर्गणी संपली

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे वार्षिक सदस्य आणि 'अर्थसंवाद'चे वार्षिक वर्गणीदार याना आम्ही आठवण करुन देऊ इच्छितो की, 'अर्थसंवाद'च्या जानेवारी–मार्च, 1997 या अंकाबरोबर ज्यांची वार्षिक वर्गणीची मुदत संपली आहे. त्यानी 1 एप्रिल, 1997 ते 31 मार्च, 1998 या वर्षासाठी आपल्या सदस्यत्वाचे आणि 'अर्थसंवाद'च्या वर्गणीदाराचे नूतनीकरण करुन घ्यावे ही विनंती. **ही वर्गणी कार्यवाह-खजिनदार डॉ. आ. गो. पुजारी, मंगळवेढा यांच्या पत्त्यावर पाठवावी.**

**आ. गो. पुजारी**
कार्यवाह – खजिनदार

## *पैशाचे अर्थशास्त्र* - 1

# पैसा व त्याची निर्मिती

वि. गो. पेंढरकर *

1 पैसा म्हणजे काय, त्याची निर्मिती कशी होते, आणि चलनफुगवटा कसा होतो याबद्दल लोकांमध्ये बरेचसे अज्ञान आढळून येते आणि त्यामुळे याबाबतीत बराच वैचारिक गोंधळ दिसून येतो. उदाहरणार्थ, अर्थसंकल्पातील तूट भरून काढण्यासाठी सरकार चलनी नोटा छापते आणि त्या व्यवहारात आणते; त्यामुळेच चलनफुगवटा होतो अशी एक सर्वसाधारण समजूत आहे. पण एक रुपयाखेरीज इतर चलनी नोटांवर तर रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांची सही असते आणि एक रुपयाच्या नोटांवर वित्त मंत्रालयाच्या सचिवांची सही असते. मग शासन अर्थसंकल्पातील तूट भरून काढण्यासाठी केवळ एक रुपयाच्या नोटा छापते का अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित होतात. या संदर्भात एक सत्यकथा अशी की, काही वर्षांपूर्वी एका मासिकाच्या वाचकाने हा नोटांवरच्या सह्यांतला फरक कशासाठी असा प्रश्न विचारला? त्यावर उत्तर असे दिले गेले की, शासनाला आपली अर्थसंकल्पीय तूट भरून काढण्यासाठी एक रुपयाच्या नोटा छापता याव्यात म्हणून ही व्यवस्था आहे. हे उत्तर एका अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांनी वाचले. त्यांना ते बरोबर वाटेना, पण त्यात नेमकी काय चूक होती हे त्यांच्या ध्यानात येईना. तेव्हा ते मला विचारावयास आले. आणखी एक उदाहरण असे की, कांही महिन्यापूर्वी जेव्हा अर्थव्यवस्थेत रोखतेची तीव्र टंचाई (liquidity crunch) भासत होती तेव्हा एका परिसंवादात एका वक्त्याने असे विधान केले की, रिझर्व्ह बँक रुपयाचे अधिमूल्यन होऊ नये – रुपयाची डॉलरमधील किंमत वर जाऊ नये – यासाठी जे प्रयत्न करते आहे ते या टंचाईला कारणीभूत आहेत. वास्तविक वस्तुस्थिती नेमकी याच्या उलट होती हे पुढे परिच्छेद 26 मध्ये केलेल्या विवेचनावरून दिसून येईल.

2 या अशा वैचारिक गोंधळाचे एक कारण पैसा म्हणजे फक्त नाणी व चलनी नोटा ही समजूत आणि याहीपेक्षा महत्त्वाचे कारण पैशाची निर्मिती नेमकी कशी होते याविषयीचे अज्ञान. ते दूर करण्याच्या उद्दे–

* भूतपूर्व कार्यकारी संचालक, भारतीय रिझर्व्ह बँक, पुणे.

शाने या लेखात अर्थव्यवस्थेत पैसा म्हणजे काय आणि तो कसा निर्माण होतो याचे प्राथमिक स्वरूपाचे वर्णन आपल्या देशातील आकडेवारी घेऊन करावयाचे योजिले आहे.

3 अर्थशास्त्रात पैसा ही संकल्पना दोन अर्थी वापरली जाते. एक, केवळ मूल्यमापक (numeraire) म्हणून आणि दुसरा, 'वास्तविक' म्हणजे जिचे स्वरूप वस्तू (व सेवा) आहे अशी एक प्रकारची मत्ता म्हणून. तात्त्विक चर्चेत पैसा ही संज्ञा या अर्थाने वापरली जाते. या मत्तेचे वैशिष्टच असे आहे की, इतर मत्तेची रोखता तिचे मूल्य किती सुलभतेने पैशाच्या रूपात मिळविता येईल यावर अवलंबून असते. अर्थशास्त्रात बहुतांश प्रतिमाने 'वास्तविक' पैशाचा उपयोग करतात. परंतु आपण ज्याचा व्यवहारात वापर करतो तो पैसा "वास्तविक" नसतो. त्याचे स्वरूप 'पैसा प्राधिकरणाचे जनतेला (public) असलेले पैसाविषयक दायित्व' असे आहे. (या पैशाला इंग्रजीत 'nominal money' म्हणतात. मराठीत nominal याला प्रतिशब्द 'पैसारुप' हा आहे परंतु 'पैसारुप पैसा' असे म्हटल्याने काहीच अर्थबोध होत नाही. असो. असल्या अर्थमीमांसेत शिरण्याचे या लेखाचे उदिष्ट नाही). या व्यवहारातल्या पैशाच्या रकमेला योग्य अशा किंमत निर्देशांकाने भागले म्हणजे त्या रक्कमेचे वास्तविक पैशात रूपांतर होते. परंतु निर्देशांकातील अनेक तात्त्विक व व्यावहारिक त्रुटींमुळे ही परिगणना कधीच अचूक नसते. पैसा प्राधिकरणात देशातील सर्वात उच्च स्तरावर असलेले शासन, मध्यवर्ती बँक, आणि 'व्यापारी' बँका असतात. सर्वोच्च शासनाचा या प्राधिकरणात समावेश करण्याचे कारण असे की, त्याला आपल्या अर्थसंकल्पीय धोरणाद्वारे देशातील पैसा परिस्थितीवर आपल्याला आवश्यक परिणाम घडवून आणता येतात. भारतासारख्या काही देशात हे शासन स्वतः चलनी नोटा काढते आणि नाणी पाडते. या नोटा व नाणी हे सर्वोच्च शासनाचे दायित्व असते आणि याप्रकारे त्याला अल्प प्रमाणात प्रत्यक्षरीत्या पैसा उत्पन्न करता येतो. परंतु शासनाने पैसा उत्पन्न करण्याचा हा अगदी गौण मार्ग आहे. प्रमुख मार्ग कोणता ते पुढील विवेचनात येईलच (परिच्छेद 18). जनता या संज्ञेत व्यक्ती, उद्योगधंदे व अन्य कार्य करणाऱ्या सर्व प्रकारच्या संस्था तसेच स्थानीय शासने समाविष्ट आहेत.

4 या संदर्भात आपल्या देशातील एक जरा गमतीची गोष्ट अशी की, वित्त मंत्रालयाच्या सचिवांची सही असलेला एक रुपयाच्या नोटा या 'नाणे' आहे तर रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांची सही असलेल्या इतर सर्व नोटा या 'वचनपत्रे' आहेत. याचाच अर्थ असा की, जर तुम्ही रिझर्व्ह बँकेकडे शंभर रुपयांची नोट घेऊन गेला व तिच्यावर असलेल्या वचनाच्या पूर्तीसाठी तिच्याकडे शंभर रुपयांची मागणी केली तर ती तुम्हाला एक रुपयाच्या शंभर नोटा देऊन आपले वचन पुरे करू शकते!

5 प्राधिकरणात बँकांच्या संदर्भात 'व्यापारी' या संज्ञेचा एक विशिष्ट अर्थ आहे तो म्हणजे ज्या ठेवींतील पैशाचे चेकद्वारा हस्तांतरण करता येईल अशा ठेवी स्वीकारू शकणाऱ्या बँका हा. म्हणून अशा ठेवी स्वीकारणाऱ्या सहकारी बँकासुद्धा पैशाच्या अर्थशास्त्रात 'व्यापारी' बँकांत समाविष्ट केल्या जातात. त्याचप्रमाणे पोस्ट ऑफिसच्या बचत बँकेचाही समावेश केला जातो.

6 वर पैसा हे पैसा प्राधिकरणाचे 'पैसाविषयक दायित्व आहे' असे म्हटले आहे. याचे कारण असे आहे की, रिझर्व्ह बँक व व्यापारी बँका यांच्या ताळेबंदात दाखविलेली दायित्वे दोन प्रकारची असतात. एक प्रकार त्यांच्या बँकिंग व्यवहाराशी संबंधित असतो. या प्रकारात वेगवेगळ्या तऱ्हेच्या ठेवी आणि बँकांनी परस्परांकडून काढलेली कर्जे यांचा समावेश होतो. याना पैसाविषयक दायित्वे समजतात. तर दुसऱ्या प्रकारात इतर कंपन्यांप्रमाणे या संस्थांनी उभारलेले भांडवल, नफ्यातून जमविलेला राखीव निधी, आणि नेहमीची अन्य दायित्वे (उदाहरणार्थ, प्राप्ती करासाठी राखीव निधी, कर्मचाऱ्यांचा कायम निधी, देणे असलेली वीज, दूरध्वनी, इत्यादींची बिले, वगैरे). समाविष्ट असतात. याना पैशाव्यतिरिक्त (non-monetary) दायित्वे म्हणतात.

7 पैसा प्राधिकरणाच्या पैसाविषयक दायित्वाचा विचार करताना मध्यवर्ती बँकेचे दायित्व व व्यापारी बँकांचे दायित्व यात फरक केला जातो. मध्यवर्ती बँकेच्या दायित्वाला 'राखीव पैसा' (reserve money) असे म्हटले जाते. काही अर्थशास्त्रज्ञ त्याला

'उच्चशक्तिमान पैसा' (high powered money) असे म्हणतात. (हे का म्हणतात याचे स्पष्टीकरण पुढे परिच्छेद 24 मध्ये दिले आहे).

8 आपल्या देशात या राखीव पैशात पुढील गोष्टींचा समावेश होतो. (1) परिचलनात असलेले चलन. या चलनाचे दोन भाग असतात. एक जनतेकडे असलेले चलन (currency with public) आणि दुसरा बँकांच्या जवळ असलेले चलन; (2) बँकांच्या रिझर्व्ह बँकेत असलेल्या ठेवी; (3) रिझर्व्ह बँकेकडे असलेल्या 'इतर' ठेवी. या ठेवी मुख्यत्वे निमसरकारी संस्था, विकास-वित्त संस्था (Developmental Finance Institutions), विदेशी मध्यवर्ती बँका व आंतरराष्ट्रीय वित्त संस्था यांच्या असतात. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, वरील यादीत केन्द्र शासनाच्या रिझर्व्ह बँकेत असलेल्या ठेवींचा समावेश नाही. याचे कारण केन्द्र शासन हे पैसा प्राधिकरणाचा घटक आहे हे आहे.

9 व्यापारी बँकांच्या दायित्वात (1) मागणी दायित्व, व (2) मुदत दायित्वे असे दोन वर्ग असतात. यात सर्वात मोठा भाग मागणी ठेवी व मुदत ठेवी यांचा असतो. पैशाचे परिमाण ठरविताना या ठेवी विचारात घेतात.

10 मध्यवर्ती बँक व व्यापारी बँकांच्या जनतेला असलेल्या पैसाविषयक दायित्वांची बेरीज म्हणजेच पैसा. मात्र ही बेरीज करताना मध्यवर्ती बँक व व्यापारी बँका यांच्यात असलेली परस्पर दायित्वे वगळली पाहिजेत. यात मुख्यत्वे व्यापारी बँकांजवळ असलेल्या चलनी नोटा आणि त्यांच्या मध्यवर्ती बँकेकडे असलेल्या ठेवी यांचा समावेश आहे. अशी ही बेरीज करताना जर केवळ जनतेकडे असलेले चलन आणि बँकांकडल्या मागणी ठेवी विचारात घेतल्या तर जनतेकडील असलेल्या पैशाच्या साठ्याचे M1 हे परिमाण होते. M1 ला 'कोता पैसा' (Narrow Money) असे म्हटले जाते. यात पोस्ट ऑफिसाच्या बचत बँकेतल्या ठेवी मिळविल्या तर त्या परिमाणाला M2 म्हणतात. M2 मध्ये बँकांकडील मुदती ठेवी मिळविल्या म्हणजे M3 हे परिमाण होते. M3 ला 'व्यापक पैसा' (Broad Money) अशी संज्ञा आहे. आणि M3 मध्ये पोस्ट ऑफिसातील इतर ठेवी मिळविल्या म्हणजे M4 हे परिमाण होते. भारतात अशी चार परिमाणे आहेत. अन्यत्र त्यांच्या अर्थव्यवस्थेच्या वैशिष्ट्यांप्रमाणे यापेक्षा कमी किंवा अधिक परिमाणे आहेत. पैसाविषयक समस्यांचा विचार करण्यात आणि धोरण ठरविण्यात व्यापक पैशाची संकल्पना उपयुक्त असल्याने M3 चा नेहमी वापर केलेला दिसून येतो. तक्ता 1 मध्ये मार्च, 28, 1997 या दिनांकाला M3 किती होता आणि त्याचे घटक काय होते ते दिले आहे. ही सर्व माहिती रिझर्व्ह बँकेच्या 'साप्ताहिक सांख्यिकी संक्षेप' (weekly statistical summary)च्या खंड 12, अंक 14, 15 व 17 (एप्रिल 5, 12, व 26, 1997) मधून घेतलेली आहे. (या व यानंतरच्या कोष्टकांतील संख्या कोटी रुपयात आहेत).

**तक्ता 1**

**राखीव पैसा**

| | | |
|---|---|---|
| 1) परिचलनात असलेले चलन | 1,37,744 | |
| अ) पैकी बँकांकडे असलेली रोकड | | 4,633 |
| आ) आणि जनतेकडे असलेले चलन | | 1,33,111 |
| 2) बँकांचे रिझर्व्ह बँकेत असलेल्या ठेवी | | 51,838 |
| 3) रिझर्व्ह बँकेकडे असलेल्या 'इतर' ठेवी | | 3,649 |
| 4) एकूण राखीव पैसा = 1 + 2 + 3 | | 1,93,231 |

**तक्ता 2**

**बँकांतील ठेवी**

| | |
|---|---|
| 1) मागणी ठेवी | 1,03,384 |
| 2) मुदत ठेवी | 4,58,908 |
| 3) एकूण ठेवी = 1 + 2 | 5,62,292 |

**तक्ता 3**

**पैशाचा साठा अथवा पैसा पुरवठा – M3**

| | |
|---|---|
| 1) जनतेकडे असलेले चलन | 1,33,111 |
| 2) व्यापारी बँकांतील ठेवी | 5, 2,292 |
| 3) रिझर्व्ह बँकेकडे असलेल्या 'इतर' ठेवी | 3,649 |
| 4) एकूण = 1 + 2 + 3 M3 | 6,99,052 |

11 हा पैसा निर्माण कसा झाला याचा तपशील आपल्याला बँकांच्या ताळेबंदाच्या मत्तेच्या बाजूतून मिळतो. बँकांच्या दायित्वांप्रमाणे या मत्तेचेसुद्धा पैसा-विषयक मत्ता आणि पैशाव्यतिरिक्त मत्ता असे दोन वर्ग आहेत आणि त्यांच्या व्याख्याही दायित्वांसमान आहेत. पैसाविषयक मत्तेत बँकांनी रोख पत व अधि-कर्ष (cash credit and overdraft), हुंड्या, मुदत कर्जे इत्यादी प्रकारांनी केलेला पतपुरवठा आणि विदेशी चलन यांचा समावेश असतो. मात्र या मत्तेची परि-गणना करताना सर्वोच्च शासनाला केलेला पतपुरवठा 'निव्वळ', म्हणजे त्याची बँकांतील ठेव वजा करून, घेतात. त्याचप्रमाणे विदेशी चलनसुद्धा 'निव्वळ', म्हणजे बँकांकडे असलेल्या विदेशी चलनातून त्यांचे विदेशी चलनातील दायित्व वजा करून, हिशोबात घेतात पैशाव्यतिरिक्त मत्ता इतर कंपन्यांप्रमाणे इमा-रती, फर्निचर, वगैरे स्थिर मत्ता व वेगवेगळ्या प्रकारची चालू मत्ता यांची बनलेली असते.

12 येथे हे नमूद केले पाहिजे की, या चर्चेत आपण बँकांच्या ताळेबंदाचे पैसाविषयक दायित्वे व मत्ता असे जे दोन भाग पाडले ते समतोलात नसतात. यामुळे पैसा पुरवठा व त्याच्या निर्मितीची साधने या परिगणनेत आंतरराष्ट्रीय व्यवहाराच्या ताळेबंदाप्रमाणे 'चूकभूल' सारखी एक बाब असते हे तक्ता 4 वरून दिसेल.

13 तक्ता 4 वरून हे दिसून येईल की, राखीव पैशाच्या निर्मितीत रिझर्व्ह बँकेचा केन्द्र शासनाला निव्वळ पतपुरवठा आणि तिचा विदेशी चलनाचा निव्वळ साठा या दोन बाबी फार महत्त्वाच्या आहेत. रिझर्व्ह बँकेचा शासनाला पतपुरवठा या बाबीचे पुढील तीन घटक आहेत : (अ) अर्थोपाय अग्रिम (Ways and Means Advances), (आ) राजकोष पत्रे (Treasury Bills) आणि (इ) वेगवेगळ्या मुदतीचे केन्द्र शासनाचे कर्जरोखे.

14 (अ) **अर्थोपाय अग्रिम** : केन्द्र व राज्य शासनांच्या तिजोऱ्यांकडे महसुलाचे प्रवाह येत असतात आणि त्यांच्यातून खर्चाचे प्रवाह बाहेर जात असतात. हे दोन्ही प्रवाह एकसारखे नसल्याने कधी त्या त्या शासनाच्या रिझर्व्ह बँकेतील ठेवीत भर पडते तर कधी

**तक्ता 4**

**राखीव पैशाची निर्मितीसाधने**

| तपशील | कोटी रुपये |
|---|---|
| (1) रिझर्व्ह बँकेचा शासनाला निव्वळ पतपुरवठा | 1,19,671 |
| • पैकी केन्द्र शासनाला निव्वळ पतपुरवठा | 1,18,571 |
| (2) रिझर्व्ह बँकेचा बँका व व्यापारी क्षेत्राला पतपुरवठा | 12,663 |
| • पैकी नाबार्ड व अन्य बँकांना | 6,388 |
| (3) रिझर्व्ह बँकेची विदेशी चलनातील निव्वळ मत्ता | 92,266 |
| (4) शासनाचे जनतेला चलनसंबंध दायित्व | 2,856 |
| (5) रिझर्व्ह बँकेचे पैशाव्यतिरिक्त निव्वळ दायित्व | 34,225 |
| एकूण = 1 + 2 + 3 + 4 − 5 | 1,93,231 |

ठेव संपून जाऊन शासनाला आणखी पैशाची गरज भासते. अशा वेळी बँक शासनाला अर्थोपाय अग्रिम या स्वरुपात पतपुरवठा करते. प्रत्येक शासनाला देण्यात येणाऱ्या अग्रिमाला त्या शासनाच्या गरजेनुसार कमाल मर्यादा असते. केन्द्र शासनाची पैशाची गरज या मर्यादेत भागली नाही तर पुढे वर्णन केल्याप्रमाणे ती राजकोष पत्रांकरवी भागविली जाते. राज्य शासनांच्या बाबतीत हा मार्ग उपलब्ध नसल्याने त्यांनी रिझर्व्ह बँकेकडून अनधिकृत अधिकर्ष उचलण्याची अनिष्ट प्रथा पाडली. ही प्रथा बंद करण्यासाठी निरनिराळ्या उपाययोजना केल्या गेल्या आणि ती जवळजवळ बंद झाली आहे.

15 (आ) **राजकोष पत्रे** : ही पत्रे एकोणि-साव्या शतकात इंग्लंडमधील बँकांच्याजवळ असलेल्या शिलकी रोखतेला तात्पुरत्या गुंतवणीकेचे साधन आणि शासनाच्या अर्थसंकल्पासाठी उपयोग या हेतूने काढण्यात आली. ही 90 दिवसांच्या मुदतीची असत आणि दर आठवड्याला लिलाव पद्धतीने विकली जात. ही पद्धती जनमान्य झाली. पुढे शासनाच्या व बँकांच्या सोईप्रमाणे ही पत्रे 6 व 12 महिने मुदतीचीसुद्धा काढली जाऊ

लागली. आपल्या देशात सध्या 90 व 364 दिवस अशा दोन मुदतींची राजकोष पत्रे काढतात. या प्रकारात आतापर्यंत रिझर्व्ह बँक पुढील तीन पद्धतींनी राजकोष पत्रे धारण करू शकत होती. (क) साप्ताहिक लिलावात बाजारात न खपलेली राजकोष पत्रे विकत घेणे, (ख) अर्थोपाय अग्रिमाची कमाल मर्यादा गाठल्यावर शासनाला पैसा पुरविण्यासाठी गरज असेल तितक्या रकमेची 'तदर्थ' (ad-hoc) राजकोष पत्रे निर्माण करून आपल्या रोखासंग्रहात ठेवणे (ग) इतर धारकांची पत्रे पुनर्वटावण (rediscounting) करून ती आपल्या रोखासंग्रहात समाविष्ट करणे. मार्च 1997 मध्ये रिझर्व्ह बँक व वित्त मंत्रालय यांच्यात झालेल्या करारान्वये यापुढे तदर्थ राजकोष पत्रे निर्माण केली जाणार नाहीत. म्हणजे रिझर्व्ह बँकेला केवळ (क) व (ग) या दोनच मार्गांनी राजकोष पत्रे धारण करता येतील. मात्र तदर्थ राजकोष पत्रांचा मार्ग बंद झाल्याने शासनाची अडचण होऊ नये म्हणून या करारात अर्थोपाय अग्रिमाची कमाल मर्यादा वाढविण्यात आली आहे.

16 **(इ) केन्द्र शासनाचे मुदतीचे कर्जरोखे** : हे कर्जरोखे रिझर्व्ह बँक पुढील मार्गांनी धारण करू शकते. : (क) ते जेव्हा विक्रीस काढले जातात तेव्हा बाजारात न खपलेले कर्जरोखे बँकेने स्वतःच्या रोखासंग्रहासाठी विकत घेणे; (ख) तदर्थ राजकोष पत्रांची रक्कम फार वाढली म्हणजे त्यापैकी काही रकमेच्या पत्रांचे मुदतीच्या कर्जरोख्यांत रूपांतर करणे; (ग) जोरदार हंगामात (busy season) बँकांची रोकडीची गरज भागविण्यासाठी त्यांच्याकडून विकत घेणे; (घ) 'पैसा बाजार परस्पर निधी'ची (Money Market Mutual Fund) रोकडीची गरज भागविण्यासाठी त्यांच्याकडून विकत घेणे; (ङ) आपले पैसाविषयक धोरण प्रभावित करण्याकरिता खुल्या बाजारातील व्यवहार (Open Market Operations) या पद्धतीने बाजारातून विकत घेणे आणि (च) अत्यंत अडचणीत सापडलेल्या बँकेला साहाय्य करण्यासाठी तिच्याकडून विकत घेणे.

17 या वेगवेगळ्या प्रकारांच्या महत्त्वाचे आकलन पुढील आकडेवारीवरून होईल. दिनांक 28 मार्च 1997 ला अर्थोपाय अग्रिम काहीच नव्हते. राजकोष पत्रे लिलावातील रु. 1,777 कोटी, तदर्थ रु. 31,115 कोटी आणि पुनर्वटावण केलेली रु. 7,911 कोटी अशी एकूण 40,803 कोटी रुपयांची होती आणि उरलेले 77,768 कोटी रुपये केन्द्र शासनाच्या मुदत कर्जरोख्यांत गुंतविलेले होते. या कर्जरोख्यांतल्या रकमेचा वर निर्दिष्ट केलेल्या मार्गानुसार विभागणीचा तपशील उपलब्ध नाही.

18 ज्याला 'नोटा छापणे' म्हणतात त्याचा खरा अर्थ रिझर्व्ह बँकेने केन्द्र व राज्य शासनांना (अ), (आ) पैकी (क) व (ख) आणि (इ) पैकी (क) या मार्गाने पैसा पुरविणे हा आहे; नुसत्या नोटा छापणे हा नाही. कारण केवळ तसे करण्याचा काहीच उपयोग नाही. त्या व्यवहारात आणण्यासाठी प्रचलित झाल्या पाहिजेत. रिझर्व्ह बँक विधेयकानुसार नोटा प्रचलित करण्याचा एकाधिकार रिझर्व्ह बँकेलाच आहे. त्यामुळे जरी सरकारी छापखान्यात नोटा छापतात तरी प्रत्यक्षात त्या रिझर्व्ह बँकेच्याद्वारा प्रचलित होतात; शासनाकडून नाही. या छापखान्यांना कोणत्या मूल्याच्या किती नोटा छापाव्या याचा तपशील रिझर्व्ह बँक देते. हा तपशील देताना रिझर्व्ह बँक वापरण्यास अयोग्य झाल्या म्हणून प्रचलनातून काढून टाकलेल्या नोटांच्या बदली किती लागतील आणि पैसा पुरवठ्यात वाढ झाल्यामुळे कोणत्या मूल्यांच्या किती अधिक नोटा लागतील या दोन गोष्टींचा हिशोब करते आणि त्याप्रमाणे छापखाने नोटा छापून बँकेला पाठवितात. त्या तिच्या तिजोरीत ठेवलेल्या असतात. त्यातल्या काही थोड्या तिच्याकडून प्रचलित होतात. पण बहुतांश नोटा इतर बँकांच्याद्वारे प्रचलनात येतात. आता ही गोष्ट खरी की केन्द्र शासनाला नाणी पाडून आणि एक रुपयाच्या नोटा छापून तूट भागविण्यासाठी थोडे पैसे जमविता येतील. परंतु तक्ता 4 मधल्या चौथ्या बाबीकडे पाहिले तर या प्रकाराने मिळालेली रक्कम किती लहान आहे ते समजेल.

19 तक्ता 4 मध्ये रिझर्व्ह बँकेच्या विदेशी चलनातील निव्वळ मत्तेचा आकडा बराच मोठा आहे. 1991 पासून कार्यान्वित असलेल्या उदारीकरणाच्या धोरणाचा हा परिणाम आहे. यापूर्वीच्या काळात हा आकडा अगदीच लहान असे. राखीव पैशाची निर्मिती केवळ बँकेने शासनाला केलेल्या पतपुरवठ्यावर – जन–

मान्य भाषेत 'नोटा छापण्यावर' – अवलंबून होती.

20 या तक्त्यात शासनाचे जनतेला चलनसंबंधी दायित्व हे राखीव पैसा निर्मितीचे साधन दाखविले आहे. याचे कारण असे की, तक्ता 1 मध्ये परिचलनात असलेले चलन या बाबीत रिझर्व्ह बँकेच्या नोटांबरोबर शासनाने पाडलेली नाणी–एक रुपयांच्या नोटा धरून – समाविष्ट आहेत. पण ही नाणी बँकेचे दायित्व नसल्याने तिच्या ताळेबंदात त्यांना मत्तेच्या बाजूला प्रतिनोंदित बाब (contra item) नाही. म्हणून ती येथे दाखविली आहे.

21 या तक्त्यातल्या शेवटच्या बाबीसाठी रिझर्व्ह बँकेच्या पैशाव्यतिरिक्त दायित्वातून पैशा–व्यतिरिक्त मत्ता वजा केली जाते आणि तक्ता 1 चा तक्ता 4 शी समतोल करण्यासाठी आवश्यक तीत 'चूकभूल' मिळवून समायोजित केली जाते. ही बाब दायित्वाची असल्याने ती वजा केली जाते.

22 आता पैशाचा साठा अथवा पैसा पुरव–ठ्याच्या निर्मितीची साधने पाहू.

**तक्ता 5**

**पैसा साठा M3 च्या निर्मितीची साधने**

| | |
|---|---|
| (1) बँकांचा शासनाला निव्वळ पतपुरवठा | 2,84,502 |
| पैकी (अ) रिझर्व्ह बँकेकडून | 1,19,671 |
| (आ) इतर बँकांकडून | 1,64,831 |
| (2) बँकांचा व्यापारी क्षेत्राला पतपुरवठा | 3,73,732 |
| पैकी (अ) रिझर्व्ह बँकेकडून | 6,275 |
| (आ) इतर बँकांकडून | 3,67,457 |
| (3) बँक क्षेत्राची विदेशी चलनातील निव्वळ मत्ता | 96,578 |
| (4) शासनाचे जनतेला चलनासंबंधी दायित्व | 2,856 |
| (5) बँकिंग क्षेत्राचे पैशाव्यतिरिक्त निव्वळ दायित्व | 58,615 |
| पैकी रिझर्व्ह बँकेचे पैशाव्यतिरिक्त निव्वळ दायित्व | 34,225 |
| एकूण 1 + 2 + 3 + 4 – 5 = M3 | 6,99,052 |

23 आता जर आपण या पैशाच्या साठ्याला राखीव पैशाच्या साठ्याने भागले तर 'पैसा गुणक' (money multiplier) हे एक महत्त्वाचे परिमाण तयार होते. हे गुणक दोन प्रकारचे असतात. एका प्रकारात एकूण साठे वापरतात व दुसऱ्यात आपल्याला हव्या असलेल्या कोणत्याही दोन दिनांकात या दोन प्रकारच्या पैशात झालेली वृद्धी वापरली जाते. या पद्धतीने काढलेल्या गुणकाला 'वाढीव पैसा गुणक' (incremental money multiplier) ही संज्ञा आहे. अशा प्रकारे M1 व M3 यांचे पैसा गुणक रिझर्व्ह बँक वेळोवेळी प्रसिद्ध करते. या गुणकांची मूल्ये तक्ता 6 मध्ये दिली आहेत. ही मूल्ये प्रत्येक वर्षात बँकांनी निवेदन केलेल्या शुक्रवारच्या आकड्यांच्या सरासरीचा वापर करून काढलेली आहेत.

**तक्ता 6**

**पैसा गुणक**

| वर्ष | M1 | | M3 | |
|---|---|---|---|---|
| | वाढीव | एकंदर | वाढीव | एकंदर |
| 1990-91 | 1·180 | 1·090 | 3·179 | 3·111 |
| 1991-92 | 1·210 | 1·108 | 3·095 | 3·108 |
| 1992-93 | 1·166 | 1·115 | 3·925 | 3·213 |
| 1993-94 | 0·945 | 1·092 | 3·219 | 3·214 |
| 1994-95 | 1·121 | 1·097 | 2·742 | 3·127 |
| 1995-96 | 1·163 | 1·107 | 3·021 | 3·112 |

**स्रोत** : रिझर्व्ह बँकेचा 'चलन व वित्त अहवाल', 1995–96, खंड 2, पृ. 71.

24 या तक्त्यावरून पैसा गुणक हे परिमाण किती स्थिर स्वरुपाचे आहे हे दिसून येते. तसेच हेही दिसते की, M3 चे वाढीव व एकंदर पैसा गुणक राखीव पैशाच्या जवळजवळ तिप्पट आहेत. या कार–णाने राखीव पैशाला 'उच्च शक्तिमान पैसा' ही संज्ञा दिली गेली आहे. या गुणकाच्या स्थिरभावामुळे पैसा प्राधिकरणाला अर्थसंकल्पीय तूट किंवा आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंद यांचे चलनव्यवस्थेवर काय परिणाम संभाव्य आहेत याचा अंदाज बांधता येतो.

25 पैसा गुणकाच्या मूल्याच्या स्थैर्याचे कारण

काय याचे उत्तर शोधण्यासाठी आपल्याला राखीव पैसा व पैसानिर्मिती यामधला दुवा काय ते समजून घेतले पाहिजे. याकरिता प्रथम रिझर्व्ह बँकेचा शासनाला निव्वळ पतपुरवठा ही तक्ता 4 मधील पहिली बाब विचारात घेऊ. हा पतपुरवठा कोणत्या मार्गांनी होऊ शकतो याचे स्पष्टीकरण वर परिच्छेद 12 मध्ये केले आहे. या मार्गांपैकी अर्थोपाय अग्रिम (Ways and Means Advances), राजकोष पत्रे (Treasury Bills) आणि विक्रीस काढले गेलेले पण बाजारात न खपलेले कर्जरोखे बँकेने स्वतःसाठी विकत घेणे या अर्थ-संकल्पीय तूट भरून काढण्याच्या मार्गांपैकी कोणताही मार्ग वापरला तरी प्रक्रिया सारखीच होते.

**टप्पा** (1) – या प्रक्रियेचे टप्पे समजून घेण्या-साठी आपण असे गृहीत धरू की, शासनाला असलेली 100 कोटी रुपयांची गरज या मार्गांनी भागविली गेली. यामुळे राखीव पैसा व राखीव पैशाची साधने यात पहिल्या टप्प्यात रिझर्व्ह बँकेच्या ताळेबंदात जे बदल होतात ते तक्ता 7 मध्ये दाखविले आहेत.

**तक्ता** 7

| तपशील | कोटी रुपये |
|---|---|
| दायित्व – शासनाची रिझर्व्ह बँकेतील ठेव | 100 |
| मत्ता – शासनाला पतपुरवठा | 100 |
| शासनाला निव्वळ पतपुरवठा = मत्ता – दायित्व = | 0 |

**टप्पा** (2) – शासनाने देणी भागविण्याकरिता रिझर्व्ह बँकेवर 100 कोटी रुपयांचे धनादेश काढून निरनिराळ्या देणेकऱ्यांना दिले. पैकी देणेकऱ्यांनी 25 कोटी रुपयांच्या धनादेशांची रोख वसुली रिझर्व्ह बँकेत जाऊन केली. या प्रक्रियेला रिझर्व्ह बँकेने 25 कोटी रुपयांचे चलन प्रचलित केले – जनमान्य भाषेत 'नोटा छापल्या' – असे म्हणतात. बाकी उरलेल्या 75 कोटी रुपयांचे धनादेश त्यांनी आपल्या बँकेतल्या खात्यात भरले आणि ते बँकांनी रिझर्व्ह बँकेकडून वसूल केले. याचे परिणाम तक्ता 8 व 9 प्रमाणे होतात.

**तक्ता** 8

| तपशील | कोटी रुपये |
|---|---|
| राखीव पैसा | |
| (अ) शासनाची रिझर्व्ह बँकेतील ठेव | 0 |
| (आ) जनतेकडे असलेले चलन | 25 |
| (इ) बँकांच्या रिझर्व्ह बँकेत ठेवी | 75 |
| (ई) एकूण = (अ) + (आ) + (इ) = | 100 |
| राखीव पैशाची साधने | |
| शासनाला निव्वळ पतपुरवठा | 100 |

**तक्ता** 9

| तपशील | कोटी रुपये |
|---|---|
| जनतेकडील पैशाचा साठा – M3 | |
| (अ) चलन | 25 |
| (आ) बँकेत ठेवी | 75 |
| (इ) एकूण = (अ) + (आ) = | 100 |
| पैशाच्या साठ्याची साधने | |
| शासनाला निव्वळ पतपुरवठा | 100 |

**टप्पा** (3) – येथपर्यंत पैसा गुणकाची प्रक्रिया काहीच झालेली नसते. तिला येथून सुरुवात होते. कारण बँका त्यांच्या रिझर्व्ह बँकेतील ठेवीत झालेली वाढ आपला पतपुरवठा वाढविण्यासाठी उपयोगात आणतात आणि त्यातून पुन्हा पैशाची निर्मिती होते. ती अशी. बँकांना त्यांच्याकडे असलेल्या ठेवींच्या काही प्रमाणात स्वतःजवळ रोकड व रिझर्व्ह बँकेत ठेव या स्वरुपात ठेवावी लागते. या दोहोंच्या बेरजेला 'रोकड निधी' (Cash Reserve) ही संज्ञा आहे. आणि या निधीच्या ठेवींशी असलेल्या गुणोत्तराला 'रोकड निधी गुणोत्तर' (Cash Reserve Ratio-CRR) ही संज्ञा आहे. हा निधी ठेवीतून वजा जाता उरलेली रक्कम बँका पतपुरवठ्यासाठी वापरतात. उदाहरणार्थ, जर CRR 10 टक्के असला तर बँकांना त्यांच्या ठेवीत झालेल्या 75 कोटी रुपयांच्या वाढीपैकी 7·5 कोटी रुपये या निधीत ठेवावे लागतील आणि उरलेले 67·5

कोटी रुपये पतवाढीसाठी वापरता येतील. येथे हे ध्यानात घेणे आवश्यक आहे की, CRR हे प्राचल (parameter) रिझर्व्ह बँकेला बँकांच्या पतपुरवठ्यावर नियंत्रण ठेऊन पैसापुरवठा नियंत्रित करण्याचे महत्त्वाचे साधन आहे.

**टप्पा** (4) – बँकांनी 67·5 कोटी रुपयांची पतवाढ केली की तितका पैसा त्यांचे ऋणको निरनिराळ्या कारणांसाठी खर्च करतात आणि तो ज्यांना मिळतो त्यांच्या पैशाच्या साठ्यात वाढ होते. ही मंडळी त्यातील काही भाग स्वतःजवळ रोकड म्हणून बाळगतात आणि राहिलेला पैसा आपल्या बँक खात्यात जमा करतात. जनतेजवळ असलेली रोकड व तिच्या बँकांतील ठेवी यांच्या गुणोत्तराला 'रोकड गुणोत्तर' (Cash Ratio) असे म्हणतात. हे गुणोत्तर अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचे 'वर्तनिक प्राचल' (behavioural parameter) आहे. या संबंधात असे दिसून येते की, हा बराचसा स्थिरभावी असतो. उदाहरणार्थ, गेल्या पाच वर्षांत बँकांनी निवेदन केलेल्या शुक्रवारच्या आकड्यांच्या सरासरीचा वापर करून या गुणोत्तराची काढलेली मूल्ये अशी आहेत. 1990–91 : 25·3 टक्के, 1991–92 : 24·7 टक्के, 1992–93 : 23·3 टक्के, 1993–94 : 23·7 टक्के, 1994–95 : 24·1 टक्के, आणि 1995–96 : 25·6 टक्के. आपण जर उदाहरणादाखल या गुणोत्तराचे मूल्य 25 टक्के गृहीत धरले तर बँकांनी केलेल्या 67·5 कोटी रुपयांच्या पतवाढीमुळे जनतेकडील चलनात 16·875 कोटी रुपयांची वाढ होईल आणि बँकांच्या ठेवीत 50·625 कोटी रुपयांची वाढ होईल. ही जनतेकडील चलनातील वाढ भागविण्याकरिता बँकांना रिझर्व्ह बँकेतील आपल्या ठेवींच्या बदल्यात तिच्याकडून रोकड आणावी लागते, म्हणजे याही टप्प्यात रिझर्व्ह बँक तितके चलन प्रचलित करते – जनमान्य भाषेत 'नोटा छापते'. यामुळे पैसा परिस्थिती तक्ता 10 प्रमाणे होईल.

**टप्पा** (5) – बँकांनी वरील टप्प्यात केलेल्या पतपुरवठ्यातील वाढीमुळे झालेल्या ठेवीतील वाढीमुळे पुन्हा पतवाढ होते. पण प्रत्येक टप्प्यात रोकड निधी गुणोत्तर आणि रोख गुणोत्तर यामुळे ठेवींची वाढ कमीकमी होत जाते. काही फेऱ्यानंतर ठेवींची वाढ नगण्य होते आणि हे चक्र थांबते. तोपर्यंत M3 त

**तक्ता** 10

| तपशील | कोटी रुपये |
|---|---|
| **जनतेकडील पैशाचा साठा** – M3 | |
| (अ) जनतेकडे असलेले चलन : टप्पा 2 | 25·000 |
| (आ) जनतेकडे बँकांच्या पतवाढी नंतर वाढलेले चलन : टप्पा 4 | 16·875 |
| (इ) जनतेकडे असलेले एकूण चलन = (अ) + (आ) = | 41·875 |
| (उ) बँकांतील मुदत व मागणी ठेवी : टप्पा 2 | 75·000 |
| (ऊ) बँकांतील मुदत व मागणी ठेवी : टप्पा 6 | 50·625 |
| (ए) एकूण ठेवी = (उ) + (ऊ) = | 125·625 |
| (ऐ) एकूण पैसा पुरवठा : M3 = (इ) + (ए) = | 167·500 |
| **साधने** | |
| (अ) रिझर्व्ह बँकेचा शासनाला निव्वळ पतपुरवठा | 100·000 |
| (आ) बँकांचा व्यापारी क्षेत्राला पतपुरवठा | 67·500 |
| (इ) एकूण साधने = (अ) + (आ) = | 167·500 |

झालेल्या वाढीला राखीव पैशातील वाढीने भागले म्हणजे वाढीव पैसा गुणकाचे मूल्य आपल्याला मिळते. या ठेवी – पतपुरवठा – ठेवी चक्राला 'पत–ठेव यंत्रणा' (credit – deposit mechanism) म्हणतात.

26 वरील उदाहरणात रिझर्व्ह बँकेकडून शासनाला निव्वळ पतपुरवठा वाढला म्हणजे पैशाच्या साठ्यात वाढ कशा तऱ्हेने होते ते दाखविले आहे. अशाच तऱ्हेची वाढ राखीव पैशाच्या इतर साधनात वाढ झाली म्हणजे होऊ शकते. उदाहरणार्थ, जर रिझर्व्ह बँकेने डॉलरचे अवमूल्यन – म्हणजे रुपयाचे अधोमूल्यन – होऊ नये म्हणून डॉलर विकत घेतले तर ते विकणाऱ्या बँकांना रुपये मिळतील, ते त्या पतपुरवठा वाढविण्यासाठी वापरतील आणि पैसा गुणकाद्वारे अर्थव्यवस्थेत पैशाचा साठा वाढेल. (असे डॉलर विकत घेणे म्हणजे रिझर्व्ह बँकेने अमेरिकेला पतपुरवठा करणे होय.) तीच गोष्ट रिझर्व्ह बँकेने बँकांकडील राजकोष पत्रांचे पुनर्वटावण केले किंवा बाजारातून

शासनाचे कर्जरोखे खरेदी केले अथवा बँकांना कर्जे दिली तर होते. या सर्व प्रक्रियात जनतेकडील चलन आणि बँकठेवी या दोहोंत वाढ होते. तात्पर्य, चलन–फुगवटा हा केवळ रिझर्व्ह बँकेकडून शासनाला निव्वळ पतपुरवठा वाढला म्हणजेच होतो असे नाही; तो या इतर कारणांनी देखील होऊ शकतो.

27 राखीव पैशात काही एक वाढ झाली, वर वर्णन केलेली वाढीची प्रक्रिया अगदी शेवटपर्यंत चालू राहिली, या काळात रोख गुणोत्तर व रोकड निधी गुणोत्तर या दोन गुणोत्तरांची मूल्ये अगदी स्थिर राहिली आणि अर्थव्यवस्थेत इतर कसल्याही प्रकारचे बदल झाले नाहीत तर $M_3$ मध्ये किती वाढ होईल याचे प्राथमिक स्वरुपाचे सोपे गणित या लेखाच्या परिशिष्टात दिले आहे.

28 याउलट जर रिझर्व्ह बँकेने राजकोष पत्रे, शासनाचे कर्जरोखे किंवा डॉलर विकले किंवा बँकांना दिलेली कर्जे परत घेतली तर अर्थव्यवस्थेत जनतेकडील चलन व बँक ठेवी या दोन्ही स्वरुपातला पैसा कमी होतो. जनतेकडील कमी झालेले चलन व्यापारी बँकांकडून रिझर्व्ह बँकेच्या तिजोरीमध्ये जाते. या परिस्थितीत पैसा गुणकाची प्रक्रिया उलट दिशेने होते. म्हणजे जनतेकडील पैशाच्या साठ्यातील एकंदर घट रिझर्व्ह बँकेच्या कारवाईने सुरुवातीला झालेल्या घटीच्या काही पट इतकी होते. परंतु अशी घटीची प्रक्रिया सहसा फार काळ चालू ठेवत नाहीत. कारण त्यामुळे अर्थव्यवस्थेत मंदी येण्याचा धोका संभवतो.

29 सारांश, आधुनिक अर्थव्यवस्थेत पैशाची निर्मिती अथवा घट या घटना मध्यवर्ती बँकेच्या पैसारूप मत्तेत वाढ किंवा घट झाल्यामुळे होतात. या बदलांमुळे मध्यवर्ती बँकेचे दायित्व, 'राखीव पैसा', यात तशाच प्रमाणात बदल होतात आणि त्याची परिणती व्यापारी बँकांच्या मत्तेत व ठेवीत राखीव पैशातील बदलाच्या काही पटीने बदल होण्यात होते. ही पट – पैसा गुणक – किती असते हे अर्थव्यवस्थेतील पैसाविषयक शासकीय व वर्तनिक प्राचलांवर अवलंबून असते. या बदलांच्या मुळाशी मध्यवर्ती व व्यापारी बँकांनी केलेल्या पतपुरवठ्यातील बदल असतात.

# परिशिष्ट

## पैसा गुणकाचे गणित

1 समजा की राखीव पैसा **'अ'** या रकमेने वाढला आणि रोख गुणोत्तर **'क'** व रोकड गुणोत्तर **'ग'** आहेत. तर त्यामुळे पहिल्या टप्प्यात जनतेकडील पैशाच्या साठ्यात वाढ पण 'अ' होईल. जनता त्यातील **'क' X 'अ'** अथवा **'अक'** आपल्याकडे रोखीत ठेवेल आणि उरलेला **'अ' – 'अक'**='अ(1 – क)' बँकांत ठेव या स्वरुपात ठेवील. यामुळे परिस्थिती तक्ता 11 मध्ये दर्शविल्याप्रमाणे होईल.

**तक्ता 11**

| तपशील | पैसा |
|---|---|
| **जनतेकडील पैशाचा साठा : $M_3$** | |
| (अ) चलन | अक |
| (आ) बँकेत ठेवी | अ – अक = अ(1 – क) |
| (इ) एकूण = (अ) + (आ) = | अ |

2 बँका या नव्या ठेवींपैकी **ग x अ(1 – क)** रोकड गुणोत्तरासाठी ठेवतील आणि उरलेली रक्कम, **अ(1 – क) – गअ (1 – क) =अ(1 – ग) (1 – क)** पतपुरवठा वाढविण्यासाठी वापरतील. म्हणजे या टप्प्यानंतर जनतेकडील पैशाचा साठा एवढ्या रकमेने वाढेल आणि एकूण साठा अ + अ(1 – ग) (1 – क) इतका होईल. या टप्प्यात चलन व बँक ठेवीत होणारे फेरबदल तक्ता 12 मध्ये दाखविले आहेत.

3 या टप्प्यात झालेल्या अ(1 – ग)(1 – क)$^2$ या बँकांतील ठेवींच्या वाढीतून रोकड गुणोत्तरासाठी **अग(1 – ग) (1 – क)$^2$** ही रक्कम बाजूला काढल्यावर बँका अ(1 – ग) (1 – क)$^2$ – **अग(1 – ग) (1 – क)$^2$ = (1 – ग)$^2$ (1 – क)$^2$** इतकी रक्कम पतवाढीला वापरतील, त्यामुळे पुन्हा जनतेच्या पैशाच्या साठ्यात तितकीच वाढ होईल आणि एकूण पैशाचा साठा **$M_3$** पुढे दर्शविल्याइतका होईल.

**तक्ता** 12

| तपशील | पैसा |
|---|---|
| **जनतेकडील पैशाचा साठा M3** | |
| (अ) जनतेकडे असलेले चलन तक्ता 11 | अक |
| (आ) बँकांच्या पतवाढीनंतर जनतेकडे वाढलेले चलन | अक (1 − ग) (1 − क) |
| (इ) जनतेकडे असलेले एकूण चलन = (अ) + (आ) = | अक { 1 + (1 − ग) (1 − क) } |
| (उ) बँकांतील मुदत व मागणी ठेवी तक्ता क्रमांक 11 | अ (1 − क) |
| (ऊ) बँकांच्या पतवाढीनंतर जनतेच्या ठेवीत वाढ | अ (1 − ग) (1 − क) (1 − क) = अ (1 − ग) (1 − क)$^2$ |
| (ए) एकूण ठेवी = (उ) + (ऊ) = | अ (1 − क) [1 + (1 − ग) (1 − क)] |
| (ऐ) एकूण पैसा पुरवठा : M3 = (इ) + (ए) = | अ + अ (1 − ग) (1 − क) |

M3 = अ + अ (1−ग) (1−क)
+ अ (1−ग)$^2$ (1−क)$^2$

4 या पदावलीकडे बारकाईने पाहिले तर असे दिसून येईल की ती एक भूमिती श्रेणी आहे. या श्रेणीचा समान गुणोत्तर ( common ratio ) (1−ग) (1−क) हा आहे. आणि 'ग' व 'क' यांची मूल्ये 1 पेक्षा कमी असल्याने या गुणोत्तराचे मूल्यही 1 पेक्षा कमी आहे. म्हणून ही श्रेणी अभिसारी ( convergent ) आहे. यामुळे तिची अनंतापर्यंत बेरीज अ/[1 − (1−ग) (1−क)] अशी होते. या बेरजेला राखीव पैशातील वाढीने म्हणजे 'अ' ने भागले की आपल्याला 1/[1 − (1 − ग) (1 − क)] असे वाढीव पैसा गुणकाचे ( Incremental Money Multiplier ) मूल्य मिळते. उदाहरणार्थ, जर आपण 'क' चे मूल्य 0.25 ( 25 टक्के ) व 'ग' चे 0.10 ( 10 टक्के ) असे गृहीत धरले तर या सूत्राप्रमाणे वाढीव पैसा गुणक 3.077 इतका येतो. अर्थात प्रत्यक्षात ही प्रक्रिया अनंतापर्यंत जात नाही. अगोदरच – जेव्हा बँकांच्या ठेवीतील वाढ इतकी कमी होते की तिच्यातून पत–पुरवठा करणे त्यांना लाभदायक वाटत नाही तेव्हा – ती थांबते.

5 राखीव पैशात वेळोवेळी झालेल्या बदलांची बेरीज म्हणजे एकंदर राखीव पैसा. वाढीव पैसा गुणकाच्या प्रभावामुळे या बदलांतून जनतेकडील पैशाच्या साठ्यात ( M3 त ) झालेल्या बदलांची बेरीज ही एकंदर पैशाचा साठा. या दोहोंचे गुणोत्तर म्हणजे पैसा गुणक.

□ □

# सांख्यिकी पुरवणी - (26)

# भारतातील सहकारी संस्था (4)

संकलन : रवीन्द्र दोशी *

## प्राथमिक बिगर-पतपुरवठा (Non-credit) संस्था (1992-93)

(रक्कम कोटी रुपयात)

| संस्थेचा प्रकार | संख्या | सभासद ('000) | स्वनिधी | ठेवी | खेळते भांडवल | कर्जे |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 विपणन | 8,049 | 6,871 | 826 | 152 | 3,760 | 243 |
| 2 कृषी प्रक्रिया ** | 1,891 | 1,113 | 165 | 31 | 709 | 14 |
| 3 साखर कारखाने | 277 | 2,961 | 2,503 | 981 | 7,894 | 59 |
| 4 शेती | 3,890 | 272 | 13 | – | 50 | 1 |
| 5 विणकर | 7,075 | 570 | 89 | 18 | 384 | – |
| 6 इतर औद्योगिक | 23,473 | 1,342 | 73 | 15 | 231 | – |
| 7 ग्राहक भांडारे | 20,543 | 7,927 | 186 | 54 | 627 | – |
| 8 इतर सर्व बिगर-पतपुरवठा | 1,76,328 | 18,016 | 2,268 | 1,722*** | 12,487 | 1,889 |
| **एकूण** | **241,526** | **39,112** | **6,123** | **2,973** | **26,142** | **2,206** |

** यामध्ये कापूस वटणी (ginning) आणि इतर कृषी प्रक्रिया संस्था अंतर्भूत आहेत.

*** यामध्ये शीत साठवण (cold storage), दूध पुरवठा, तूप, कुक्कुट पालन, इतर पशुधन उत्पादन, मत्स्य-पालन, सिंचन, गृहनिर्माण, मजूर करार व बांधकाम, वाहतूक आणि इतर बिगर-पतपुरवठा संस्था यांचा अंतर्भाव नाही; त्यांच्यासंबंधी माहिती उपलब्ध नाही.

## बिगर-पतपुरवठा संस्थांची शेतीमालाची विक्री (1992-93)

| संस्था प्रवर्ग | विक्री मूल्य (कोटी रुपये) | | |
|---|---|---|---|
| | शेतीमाल | शेतीसाठीच्या निविष्टी | एकूण |
| 1 राष्ट्रीय (National) | 136 | 3 | **139** |
| 2 राज्य (State) | 4,978 | 1,709 | **6,687** |
| 3 मध्यवर्ती (Central) | 1,685 | 470 | **2,155** |
| 4 प्राथमिक (Primary) | 1,985 | 991 | **2,936** |

* प्राध्यापक व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'.

## बिगर-पतपुरवठा प्राथमिक सहकारी संस्थांची

| | राज्ये / केन्द्रशासित प्रदेश | विपणन संस्था | | दूध पुरवठा संस्था व संघ | इतर पशुधन उत्पादन संस्था | कृषी संस्था |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण | विशेष | | | |
| 1 | अंदमान व निकोबार बेटे | – | – | – | – | – |
| 2 | आंध्र प्रदेश | 23 | 98 | 234 | – | 2,100 |
| 3 | अरुणाचल प्रदेश | – | – | – | – | – |
| 4 | आसाम | 56 | – | – | – | – |
| 5 | बिहार | 473 | – | – | – | – |
| 6 | चंदीगड | – | – | – | – | – |
| 7 | दादरा व नगर हवेली | – | – | 7 | 7 | – |
| 8 | दमण व दीव | – | – | 1 | – | 1 |
| 9 | दिल्ली | – | – | – | – | – |
| 10 | गोवा | – | 6 | 141 | 2 | 4 |
| 11 | गुजराथ | 186 | 2,114 | 9,860 | 638 | 528 |
| 12 | हरियाणा | 66 | 18 | 1,690 | 88 | 95 |
| 13 | हिमाचल प्रदेश | 50 | 42 | 225 | 24 | 5 |
| 14 | जम्मू व काश्मीर | – | – | – | – | – |
| 15 | कर्नाटक | 187 | 388 | 6,742 | 151 | 268 |
| 16 | केरळ | 210 | 100 | 2,302 | 67 | 69 |
| 17 | लक्षद्वीप | – | – | – | – | – |
| 18 | मध्य प्रदेश | 243 | 1,803 | 3,905 | 69 | 169 |
| 19 | महाराष्ट्र | 320 | 713 | 15,974 | 2,221 | 205 |
| 20 | मणिपूर | – | – | – | – | – |
| 21 | मेघालय | 37 | – | – | – | – |
| 22 | मिझोरम | 6 | – | 36 | 240 | 119 |
| 23 | नागालँड | – | – | – | – | – |
| 24 | ओरिसा | 62 | 74 | 539 | 205 | 22 |
| 25 | पाँडिचेरी | 2 | – | 77 | 2 | – |
| 26 | पंजाब | 98 | 23 | 4,302 | 565 | 78 |
| 27 | राजस्थान | 172 | – | 4,542 | 316 | 197 |
| 28 | तमिळ नाडू | 112 | 193 | – | 1,408 | 27 |
| 29 | त्रिपुरा | 15 | – | 83 | 27 | 3 |
| 30 | उत्तर प्रदेश | – | 159 | 11,029 | – | – |
| 31 | पश्चिम बंगाल | – | – | – | – | – |
| | **एकूण** | **2,318** | **5,731** | **61,689** | **6,030** | **3,890** |

## प्रवर्ग व राज्यनिहाय संस्था (31 मार्च, 1993) (1)

| सिंचन संस्था | इतर बिगर-कृषी संस्था | साखर कारखाने | कापूस वटणी संस्था | इतर शेती प्रक्रिया संस्था | विणकर संस्था | सूत गिरण्या |
|---|---|---|---|---|---|---|
| – | – | – | – | – | – | – |
| 225 | 115 | – | – | 56 | – | – |
| – | – | – | – | – | – | – |
| – | – | 1 | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – |
| 1 | – | 1 | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – |
| 9 | 9 | 1 | 3 | 6 | 1 | – |
| 1,124 | 350 | 24 | 121 | 44 | ,336 | 7 |
| 27 | 41 | 14 | – | 1 | 2 | 1 |
| 40 | 174 | – | 1 | 37 | 186 | – |
| – | – | – | – | – | – | – |
| 594 | 47 | 25 | 4 | 32 | 660 | 18 |
| 18 | 52 | – | 1 | 2 | – | – |
| – | – | – | – | – | – | – |
| 79 | 39 | 3 | 2 | 3 | 735 | 1 |
| 3,583 | 912 | 136 | 225 | 296 | 1,747 | 183 |
| – | – | – | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – |
| – | – | – | 4 | 4 | 86 | – |
| – | – | – | – | – | – | – |
| 113 | – | 4 | – | – | 845 | 8 |
| 5 | – | 1 | – | – | 16 | 2 |
| 61 | 204 | 19 | 2 | 3 | 551 | 7 |
| 32 | – | 1 | 2 | 1,039 | 736 | 6 |
| 32 | 41 | 16 | – | 2 | – | – |
| – | 4 | – | – | 1 | 174 | – |
| – | – | 31 | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – |
| **5,943** | **1,988** | **277** | **365** | **1,526** | **7,075** | **233** |

## बिगर-पतपुरवठा प्राथमिक सहकारी संस्थांची

| राज्ये / केन्द्रशासित प्रदेश | विणकर संस्था–व्यतिरिक्त इतर औद्योगिक संस्था | ग्राहक भांडारे | गृहनिर्माण संस्था | औद्योगिक वसाहती | मत्स्यपालन संस्था |
|---|---|---|---|---|---|
| 1 अंदमान व निकोबार बेटे | – | – | – | – | – |
| 2 आंध्र प्रदेश | 7,973 | 1,145 | 3,165 | 2 | – |
| 3 अरुणाचल प्रदेश | – | – | – | – | – |
| 4 आसाम | – | 474 | 269 | – | – |
| 5 बिहार | – | 2,993 | 2,443 | – | – |
| 6 चंदीगड | – | – | – | – | – |
| 7 दादरा व नगरहवेली | 22 | 11 | 31 | 1 | – |
| 8 दमण व दीव | 3 | 5 | 13 | – | 6 |
| 9 दिल्ली | – | – | – | – | – |
| 10 गोवा | 42 | 102 | 465 | 1 | 17 |
| 11 गुजराथ | 2,663 | 1,739 | 14,022 | 148 | 375 |
| 12 हरियाणा | – | 66 | 1,580 | – | 47 |
| 13 हिमाचल प्रदेश | 181 | 265 | 115 | – | 28 |
| 14 जम्मू व काश्मीर | – | – | – | – | – |
| 15 कर्नाटक | 1,399 | 1,778 | 1,645 | 6 | 274 |
| 16 केरळ | 2 | 937 | 336 | – | – |
| 17 लक्षद्वीप | – | – | – | – | – |
| 18 मध्य प्रदेश | 797 | 2,027 | 2,505 | 1 | 1,007 |
| 19 महाराष्ट्र | 6,266 | 3,459 | 38,852 | 189 | 1,900 |
| 20 मणिपूर | – | – | – | – | – |
| 21 मेघालय | – | – | – | – | – |
| 22 मिझोरम | 203 | 28 | 20 | – | 44 |
| 23 नागालँड | – | – | – | – | – |
| 24 ओरिसा | 102 | 762 | 183 | – | 511 |
| 25 पाँडिचेरी | 13 | 24 | 35 | – | 36 |
| 26 पंजाब | 2,156 | 91 | 974 | – | – |
| 27 राजस्थान | 1,037 | 588 | 1,324 | – | 115 |
| 28 तमिळ नाडू | 380 | 3,921 | – | 10 | 675 |
| 29 त्रिपुरा | 234 | 128 | 3 | – | 129 |
| 30 उत्तर प्रदेश | – | – | – | – | – |
| 31 पश्चिम बंगाल | – | – | – | – | – |
| **एकूण** | **23,473** | **20,543** | **67,980** | **358** | **5,164** |

## प्रवर्ग व राज्यनिहाय संस्था (31 मार्च, 1993) (2)

| शीतगृहे | मजूर संस्था | वन मजूर संस्था | परिवहन संस्था | इतर कृषीतर संस्था | बहु–शाखा संस्था | पर्यवेक्षक संस्था/संघ | राज्य व जिल्हा संघ व संस्था | विद्युत संस्था | महासंघ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| – | 2,698 | 59 | 104 | 2,971 | – | – | 4 | 9 | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| 15 | – | – | – | – | – | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| – | 1 | 2 | 1 | 3 | – | – | – | – | – |
| – | 1 | – | – | – | – | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| – | 15 | 1 | 2 | 3 | – | – | – | – | – |
| – | 2,182 | 149 | 107 | 221 | 3 | 4 | 20 | 1 | 35 |
| 1 | 1,538 | – | 9 | 10 | – | – | 4 | – | 5 |
| – | 51 | – | 149 | 229 | – | – | 7 | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| – | 226 | 51 | 26 | 369 | 2 | 12 | 20 | 12 | 4 |
| – | 256 | 6 | 77 | 1,104 | – | 62 | 1 | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| 2 | 312 | 2,276 | 85 | 241 | 1 | – | 46 | 20 | – |
| – | 5,116 | 381 | 288 | 1,395 | 46 | 306 | 34 | 4 | 149 |
| – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| – | 24 | – | – | – | 1 | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| 17 | 157 | 3 | 21 | 379 | – | – | 9 | 2 | – |
| – | 5 | – | 2 | 7 | – | – | 1 | – | – |
| 13 | 944 | – | 56 | 148 | – | 3 | 11 | – | – |
| – | 970 | 78 | 57 | – | 1 | 10 | 24 | 2 | – |
| – | 81 | 6 | – | 149 | 1 | – | 26 | 3 | 1 |
| – | 38 | 5 | 91 | 50 | – | – | 1 | – | 2 |
| – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| **48** | **14,615** | **3,017** | **1,075** | **7,279** | **55** | **397** | **208** | **53** | **196** |

## बिगर-पतपुरवठा प्राथमिक सहकारी संस्थांतील

(हजारात)

| | राज्ये / केन्द्रशासित प्रदेश | विपणन संस्था | | दुध पुरवठा संस्था व संघ | इतर पशुधन उत्पादन संस्था | कृषी संस्था |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण | विशेष | | | |
| 1 | अंदमान व निकोबार बेटे | – | – | – | – | – |
| 2 | आंध्र प्रदेश | 55·61 | 32·50 | 48·50 | – | 179·92 |
| 3 | अरुणाचल प्रदेश | – | – | – | – | – |
| 4 | आसाम | 16·50 | – | – | – | – |
| 5 | बिहार | 84·88 | – | – | – | – |
| 6 | चंदीगड | – | – | – | – | – |
| 7 | दादरा व नगर हवेली | – | – | 0·15 | 0·16 | – |
| 8 | दमण व दीव | – | – | 0·04 | – | 0·01 |
| 9 | दिल्ली | – | – | – | – | – |
| 10 | गोवा | – | 6·13 | 14·42 | 0·21 | 0·27 |
| 11 | गुजराथ | 138·71 | 358·26 | 1,866·65 | 49·89 | 23·33 |
| 12 | हरियाणा | 88·40 | 48·02 | 136·04 | 3·91 | 1·75 |
| 13 | हिमाचल प्रदेश | 6·93 | 7·53 | 17·96 | 0·71 | 0·12 |
| 14 | जम्मू व काश्मीर | – | – | – | – | – |
| 15 | कर्नाटक | 345·11 | 183·68 | 993·78 | 30·27 | 17·19 |
| 16 | केरळ | 146·46 | 81·96 | 636·99 | 9·11 | 8·55 |
| 17 | लक्षद्वीप | – | – | – | – | – |
| 18 | मध्य प्रदेश | 150·07 | 211·31 | 168·15 | 1·89 | 4·39 |
| 19 | महाराष्ट्र | 648·11 | 173·58 | 1,516·20 | 138·01 | 12·10 |
| 20 | मणिपूर | – | – | – | – | – |
| 21 | मेघालय | 2·74 | – | – | – | – |
| 22 | मिझोरम | 0·12 | – | 0·0 | 5·36 | 5·47 |
| 23 | नागालँड | – | – | – | – | – |
| 24 | ओरिसा | 30·87 | 29·59 | 56·69 | 11·78 | 2·13 |
| 25 | पाँडिचेरी | 1·35 | – | 32·80 | – | – |
| 26 | पंजाब | 85·91 | 51·68 | 235·81 | 10·39 | 6·83 |
| 27 | राजस्थान | 126·60 | – | 348·97 | 12·78 | 3·90 |
| 28 | तमिळ नाडू | – | 126·96 | – | 197·85 | 5·44 |
| 29 | त्रिपुरा | – | – | 4·59 | 1·31 | 0·48 |
| 30 | उत्तर प्रदेश | – | 2,941·26 | 561·45 | – | – |
| 31 | पश्चिम बंगाल | – | – | – | – | – |
| | **एकूण** | **2,618·91** | **4,252·48** | **6,639·31** | **473·70** | **271·94** |

टीप : आकडे हजारात घेतल्याने बेरजा तंतोतंत जुळणार नाहीत.

## प्रवर्ग व राज्यनिहाय सभासद संख्या ( 31 मार्च, 1993 ) (I)

| सिंचन संस्था | ऋणेतर इतर कृषी संस्था | साखर कारखाने | कापूस वटणी व संपीडन संस्था | इतर कृषी प्रक्रिया संस्था | विणकर संस्था | सूत गिरण्या | विणकर संस्था व्यतिरिक्त इतर औद्योगिक संस्था |
|---|---|---|---|---|---|---|---|
| – | – | – | – | – | – | – | – |
| 21·71 | 12·48 | – | – | 74·36 | – | – | 178·36 |
| – | – | – | – | – | – | – | – |
| – | – | 24·73 | – | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – |
| 0·01 | – | 28·00 | – | – | – | – | 0·40 |
| – | – | – | – | – | – | – | 0·71 |
| – | – | – | – | – | – | – | – |
| 0·46 | 0·50 | 2·47 | 1·17 | 4·23 | 0·04 | – | 2·18 |
| 34·91 | 32·26 | 344·25 | 83·15 | 18·06 | 71·48 | 24·12 | 97·09 |
| 0·40 | 1·94 | 312·00 | – | 1·67 | 0·35 | 0·57 | – |
| 2·86 | 23·37 | – | 0·87 | 3·95 | 6·22 | – | 8·90 |
| – | – | – | – | – | – | – | – |
| 33·12 | 8·55 | 243·96 | 5·78 | 272·47 | 114·82 | 57·21 | 241·65 |
| 4·06 | 18·78 | – | 0·65 | 1·31 | – | – | 0·13 |
| – | – | – | – | – | – | – | – |
| 3·14 | 4·08 | 14·15 | 0·77 | 1·64 | 52·96 | 1·45 | 31·02 |
| 325·81 | 126·67 | 1,007·72 | 213·41 | 261·73 | 159·85 | 443·11 | 597·53 |
| – | – | – | – | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – |
| – | – | – | 0·05 | 0·05 | 1·49 | – | 3·36 |
| – | – | – | – | – | – | – | – |
| 5·14 | – | 42·62 | – | – | 107·31 | 1·04 | 42·23 |
| 0·14 | – | 4·17 | – | – | 8·09 | 0·79 | 1·57 |
| 1·06 | 3·36 | 186·19 | 1·47 | 1·72 | 13·63 | 29·65 | 41·15 |
| 0·97 | – | 2·96 | 0·23 | 162·49 | 25·34 | 23·87 | 27·86 |
| 0·03 | 4·17 | 197·76 | – | 1·08 | – | – | 61·22 |
| – | 0·06 | – | – | 0·25 | 8·15 | – | 6·87 |
| – | – | 549·59 | – | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – |
| **433·88** | **236·25** | **2,960·63** | **397·59** | **805·08** | **569·80** | **581·86** | **1,342·35** |

## बिगर-पतपुरवठा प्राथमिक सहकारी संस्थांतील

| राज्ये / केन्द्रशासित प्रदेश | | ग्राहक भांडारे | गृहनिर्माण संस्था | औद्योगिक वसाहती | मत्स्यपालन संस्था | शीतगृहे |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अंदमान व निकोबार बेटे | – | – | – | – | – |
| 2 | आंध्र प्रदेश | 669·89 | 494·56 | 0·48 | – | – |
| 3 | अरुणाचल प्रदेश | – | – | – | – | – |
| 4 | आसाम | 157·90 | 10·75 | – | – | – |
| 5 | बिहार | 455·65 | 174·17 | – | – | 3·44 |
| 6 | चंदीगड | – | – | – | – | – |
| 7 | दादरा व नगरहवेली | 2·25 | 0·49 | 0·20 | – | – |
| 8 | दमण व दीव | 6·64 | 0·33 | – | 1·88 | – |
| 9 | दिल्ली | – | – | – | – | – |
| 10 | गोवा | 25·96 | 10·66 | 0·04 | 1·12 | – |
| 11 | गुजराथ | 509·03 | 575·97 | 15·11 | 48·94 | – |
| 12 | हरियाणा | 73·18 | 122·37 | – | 0·87 | 0·02 |
| 13 | हिमाचल प्रदेश | 35·98 | 5·06 | – | 3·22 | – |
| 14 | जम्मू व काश्मीर | – | – | – | – | – |
| 15 | कर्नाटक | 796·76 | 661·26 | 1·00 | 79·49 | – |
| 16 | केरळ | 288·64 | 167·58 | – | – | – |
| 17 | लक्षद्वीप | – | – | – | – | – |
| 18 | मध्य प्रदेश | 392·05 | 275·40 | 0·52 | 37·69 | 1·35 |
| 19 | महाराष्ट्र | 1,944·93 | 1,276·98 | 31·17 | 202·22 | – |
| 20 | मणिपूर | – | – | – | – | – |
| 21 | मेघालय | – | – | – | – | – |
| 22 | मिझोरम | 1·24 | 0·40 | – | 1·31 | – |
| 23 | नागालँड | – | – | – | – | – |
| 24 | ओरिसा | 0·25 | 95·32 | – | 54·55 | 29·20 |
| 25 | पाँडिचेरी | 49·94 | 18·28 | – | 13·54 | – |
| 26 | पंजाब | 51·50 | 123·03 | – | – | 2·24 |
| 27 | राजस्थान | 293·01 | 163·88 | – | 4·58 | – |
| 28 | तमिळ नाडू | 2,160·14 | – | 1·22 | 217·27 | – |
| 29 | त्रिपुरा | 12·06 | 0·34 | – | 14·27 | – |
| 30 | उत्तर प्रदेश | – | – | – | – | – |
| 31 | पश्चिम बंगाल | – | – | – | – | – |
| | **एकूण** | **7,927·01** | **4,176·81** | **49·74** | **880·95** | **36·24** |

टीप : आकडे हजारात घेतल्याने बेरजा तंतोतंत जुळणार नाहीत.

## प्रवर्ग व राज्यनिहाय सभासद संख्या (31 मार्च, 1993) (2)

(हजारात)

| मजूर संस्था | वन मजूर संस्था | परिवहन संस्था | इतर कृषीतर संस्था | बहु–शाखा संस्था | पर्यवेक्षक संस्था/संघ | राज्य व जिल्हा संघ व संस्था | विद्युत संस्था | महासंघ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| – | – | – | – | – | – | – | – | – |
| 176.04 | 3.64 | 5.66 | 126.46 | – | – | 3.98 | 321.47 | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – |
| 0.08 | 1.23 | 0.15 | 0.11 | – | – | – | – | – |
| 0.02 | – | – | – | – | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – |
| 1.05 | 0.16 | 0.04 | 0.87 | – | – | – | – | – |
| 154.41 | 118.32 | 8.96 | 16.94 | 17.39 | 0.21 | 10.95 | 0.88 | 3.63 |
| 93.41 | – | 3.50 | 0.78 | – | – | 1.99 | – | 2.15 |
| 1.95 | – | 4.18 | 25.56 | – | – | 1.04 | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – |
| 28.70 | 5.96 | 3.94 | 65.10 | 67.92 | 1.63 | 7.43 | 44.59 | 0.12 |
| 29.68 | 0.83 | 6.20 | 270.37 | – | 9.01 | 0.09 | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – |
| 22.36 | 405.61 | 3.12 | 189.99 | 2.24 | – | 15.22 | 207.95 | – |
| 281.77 | 78.35 | 21.58 | 116.82 | 1,009.10 | 33.36 | 27.50 | 80.27 | 33.55 |
| – | – | – | – | – | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – |
| 0.34 | – | – | – | 5.81 | – | – | – | – |
| – | – | – | – | – | – | – | – | – |
| 13.81 | 0.49 | 0.90 | 36.16 | – | – | 1.70 | 11.69 | – |
| 0.61 | – | 0.13 | 3.79 | – | – | 0.40 | – | – |
| 72.56 | – | 3.62 | 4.98 | – | 1.09 | – | – | – |
| 37.16 | 9.18 | 1.91 | – | 11.95 | 0.29 | 8.31 | 5.34 | – |
| 26.05 | 1.92 | – | 96.96 | 63.00 | – | 22.60 | 87.43 | 0.95 |
| 1.63 | 0.38 | 1.96 | 2.49 | – | – | 0.05 | – | 32.54 |
| – | – | – | – | – | – | – | – | 0.15 |
| – | – | – | – | – | – | – | – | – |
| **941.62** | **626.07** | **65.86** | **957.37** | **1,177.41** | **45.58** | **101.24** | **759.61** | **73.8** |

## प्राथमिक सहकारी बिगर-पतपुरवठा संस्था ( 1 )

| संस्थेचा प्रकार | संस्था संख्या 1970–71 | संस्था संख्या 1992–93 | सदस्य संख्या 1970–71 | सदस्य संख्या 1992–93 |
|---|---|---|---|---|
| 1 विपणन | 3,278 | 8,049 | 30,76,873 | 35,21,999 |
| 2 कापूस वटणी ( ginnning ) व संपीडन ( pressing ) | 204 | 365 | 1,57,181 | 3,07,594 |
| 3 इतर प्रक्रिया | 767 | 1,513 | 1,89,421 | 4,59,184 |
| 4 साखर कारखाने | 158 | 276 | 7,50,194 | 29,60,633 |
| 5 शेती | 9,477 | 3,890 | 2,63,532 | 2,71,940 |
| 6 विणकर | 12,861 | 7,043 | 11,84,307 | 5,57,670 |
| 7 इतर औद्योगिक | 34,435 | 23,390 | 17,10,361 | 13,25,442 |
| 8 ग्राहक भांडारे | 13,908 | 20,023 | 37,43,025 | 58,24,780 |
| 9 गृहनिर्माण | 24,011 | 67,966 | 15,63,248 | 41,54,824 |

## प्राथमिक सहकारी बिगर-पतपुरवठा संस्था ( 2 )

| संस्थेचा प्रकार | खरेदी / उत्पादन (कोटी रुपये) 1970–71 | खरेदी / उत्पादन (कोटी रुपये) 1992–93 | विक्री (कोटी रुपये) 1970–71 | विक्री (कोटी रुपये) 1992–93 |
|---|---|---|---|---|
| 1 विपणन | 389·88(आ) | 2,042·86(आ) | 692·01(ई) | 3,834·09(ई) |
| 2 कापूस वटणी व संपीडन | – | – | 71·84 | 48·50 |
| 3 इतर प्रक्रिया | – | – | 6·45 | 87·40 |
| 4 साखर कारखाने | 314·60 | 3,620·26 | 368·62(अ) | 5,158·06 (अ) |
| 5 शेती | 10·14 | 14·79 | 10·35 | 15·19 |
| 6 विणकर | 207·79(इ) | 517·58(इ) | 143·51 | 487·60 |
| 7 इतर औद्योगिक | 78·86 | 266·17 | 50·32 | 229·18 |
| 8 ग्राहक भांडारे | 230·67 | 1,643·76 | 232·71 | 1,691·53 |
| 9 गृह निर्माण | – | – | 50·61(उ) | 804·04 |

**टीपा** : ( अ ) शेतीच्या निविष्टींच्या वाटपाचाही यात समावेश आहे.
( आ ) केवळ मालकांनी केलेल्या खरेदीचे मूल्य.
( इ ) खरेदी केलेले सूत व कापड आणि तयार केलेले कापड यांचे मूल्य.
( ई ) मालक व अभिकर्ता **( agent )** म्हणून केलेली विक्री.
( उ ) संस्था व त्यांचे सदस्य यांनी बांधलेली घरे व गाळे यांचे मूल्य.

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## *एकविसावे वार्षिक अधिवेशन*

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे एकविसावे वार्षिक अधिवेशन **न्यू आर्ट्स, कॉमर्स व सायन्स कॉलेज, अहमदनगर** यांच्या विद्यमाने **दिनांक 21, 22 व 23 नोव्हेंबर, 1997** यावेळी संपन्न होणार आहे. यासंबंधीचे निमंत्रण यथावकाश संयोजकांकडून सदस्यांना मिळेल.

**आ. गो. पुजारी**
कार्यवाह – खजिनदार

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## मराठवाडा विद्यापीठ पारितोषिक, 1996

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिद्ध झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रुपये एक हजार एक चे ' मराठवाडा विद्यापीठ पारितोषिक ' प्रतिवर्षी देण्यात येते. 1 जानेवारी ते 31 डिसेंबर, 1996 या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथांच्या लेखकांना यंदाच्या स्पर्धेत सहभागी होता येईल. स्पर्धेचे नियम व अटी इत्यादींसाठी डॉ. आ. गो. पुजारी, कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद, किल्ला भाग, मंगळवेढा (जिल्हा सोलापूर) 413 305 यांच्याशी संपर्क साधावा. विहित नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या पाच प्रतींसह, कार्यवाहांकडे **10 ऑगस्ट, 1997** पर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

**आ. गो. पुजारी**
कार्यवाह – खजिनदार

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेले कोश व भाषाप्रवेश

| अनु. | कोश | संपादक | किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| (1) | इंग्रजी–मराठी स्थापत्य शिल्पकोश | श्री. रा. वि. मराठे | 15 |
| (2) | उर्दू–मराठी शब्दकोश | श्री. श्रीपाद जोशी<br>श्री. एन. एस. गोरेकर | 50 |
| (3) | आयुर्वेदीय शब्दकोश भाग 1 व 2<br>( संस्कृत-संस्कृत ) | पं. वेणी माधवशास्त्री<br>जोशी व पं. ना. ह. जोशी | 50 |
| (4) | आयुर्वेदीय शब्दकोश भाग 1 व 2<br>( संस्कृत–संस्कृत–मराठी ) | ,, ,, | 75 |
| (5) | वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा<br>( वनस्पतीशास्त्र व्याख्यासंग्रह ) | डॉ. गो. रा. परांजपे | 10 |
| (6) | मराठी वाङ्मयकोश खंड 1 | श्री. गं. दे. खानोलकर | 50 |
| (7) | तामिळ–मराठी शब्दकोश | सौ. रमाबाई जोशी<br>श्री. पु. दि. जोशी | 74 |
| (8) | मराठी–कन्नड शब्दकोश | श्री. गुरुनाथ दिवेकर | 74 |
| (9) | गुजराती–मराठी शब्दकोश | श्री. स. ज. धर्माधिकारी | 15 |
| (10) | कन्नड भाषा प्रवेश | श्री. गु. व्यं. दिवेकर | 13 |
| (11) | बंगाली भाषा प्रवेश खंड 1 | श्री. स. ग. सुखटणकर | 16 |
| (12) | बंगाली भाषा प्रवेश खंड 2 | ,, ,, | 16 |
| (13) | मल्याळम भाषा प्रवेश | श्री. रा. बं. जोशी | 28 |

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने खालील केन्द्रांवर मिळतील.

प्रकाशन व्यवस्थापक,
शासन मुद्रण व लेखनसामग्री विभाग,
चर्नी रोड, मुंबई 400 004.

व्यवस्थापक,
शासन लेखनसामग्री आणि ग्रंथागार,
शहागंज, गांधी चौक,
औरंगाबाद 431 001.

व्यवस्थापक,
शासकीय ग्रंथागार,
वडके बिल्डिंग, पी. वाय. सी. जिमखाना,
पुणे 411 004.


व्यवस्थापक,
शासन मुद्रण व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स,
नागपूर 440 001.

# परिशिष्ट

## नफ्याचा दर कसा व कशामुळे ठरतो ?


नी. वि. सोवनी

('अर्थसंवाद', जानेवारी–मार्च 1997, खंड 20, अंक 4 मधील लेखासंदर्भातील आकृत्या)





**आकृती 1**

कर्जदेय रकमेचा बाजार





**आकृती 2**

वस्तूरूप/वित्तीय भांडवल मिश्र बाजार





**आकृती 3**

लिप्से व इतर यांचे प्रतिमान




**आकृती 4**

सॅम्युअल्सन व नोरधास यांचे प्रतिमान




**आकृती 5**

संयुक्त प्रतिमान

**वाचकांना विनंती**

कृपया हे पान या अंकातून काढून 'अर्थसंवाद', जानेवारी – मार्च, 1997, खंड 20, अंक 4 मधील नी. वि. सोवनी यांच्या लेखाच्या अखेरीस पृ. 354 च्या पुढे चिकटवून घ्यावे.

*With best compliments from*

DR. RAJEEV DONGARE

**RAND POLYPRODUCTS PVT. LTD.**

S-13 (2), T Block,
MIDC, Bhosari, Pune 411026
Phone : 790587
FAX : 0212-790587

[illegible]

आपणा सर्वांच्या चेहऱ्यावर
समाधानाचे हास्य फुलविण्यासाठी
आम्ही नेहमीच प्रयत्नशील ...

# फार्म-ओ-रोड कॉर्पोरेशन
# मे. रत्ना सेल्स

[illegible]

[illegible]

[illegible]
[illegible]
गेली 27 वर्षे
सुपरिचित

- [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible]

[illegible]